९८६५
म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
ग्रं. क्र. १८६२


# स्त्री जीवनाचीं नवीं क्षितीजें

सौ. कमलाबाई टिळक
एम्. ए.

मूल्य पांच रुपये

जगन्नाथ प्रकाशन
ण पेठ, पुणें २.

REFBK-0014357



# स्त्री जीवनाचीं नवीं क्षितिजें

सौ. कमलाबाई टिळक

# स्त्रीजीवनाचीं नवीं क्षितिजें

दा. क्र. १४३५८

सौ. कमलाबाई टिळक
एम्. ए.

REFBK-0014357

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम.......................... वि: ..........................
.......................... नों. वि: ..........................

जगन्नाथ प्रकाशन
५२८ नारायण, पुणें २

प्रकाशक : श्रीपाद जगन्नाथ गानू
" जगन्नाथ प्रकाशन "
५२८ नारायण, भटवाडी पुणें २

जगन्नाथ प्रकाशन ७ वे

प्रथमावृत्ती १९६५

किंमत ५ रुपये

मुद्रक : जयंत श्रीधर टिळक
" केसरी मुद्रणालय "
५६८ नारायण, पुणें २.

चि. सौ. माधुरीस

# प्रस्तावना

श्रीमती सौ. कमलाबाई टिळक यांनीं "स्त्री-जीवनाचीं नवीं क्षितिजें" हें एक सुंदर निबंधवजा पुस्तक लिहिलें आहे. या पुस्तकांतील नऊ प्रकरणें व दहावा उपसंहार मिळून त्यांनीं आपलीं मतें निर्भीडपणें पण अतिशय सौम्य व मृदु शब्दांत मांडलीं आहेत. भारतांतील स्त्री-जीवन शंभर वर्षांपूर्वी कसें होतें, पन्नास वर्षांपूर्वी कसें होतें, विद्यमान् काळांत कसें आहे, आणि स्त्रीजीवनाचे प्रश्न कसकसे बदलत गेले याचें चित्र पहिल्या तीन प्रकरणांत त्यांनीं रेखाटलेलें आहे. सारा समाज बदलून गेलेला आहे. माणसें तींच आहेत, फक्त मनें बदललीं आहेत, विचार बदलले आहेत. जुन्या आचारपरंपरा पार कोलमडून गेलेल्या आहेत.

हें असें होणें स्वाभाविक आहे. शतकेंन शतकें भारतीय समाज हा स्थितिमान होता आणि राज्यें बदललीं म्हणजे राज्यकर्ते बदलले तथापि त्यामुळें राजधानी सोडून अन्य ठिकाणीं असलेल्या जनतेचें जीवन ताबडतोब बदललें असा अनुभव आलेला नाहीं. वेदकालीन स्त्रीशिक्षणाविषयींच्या कल्पना, जीवनाविषयींच्या कल्पना, आदर्शविषयक कल्पना या स्मृतिकाळांत राहिल्या नाहींत. आणि त्यानंतर आलेल्या काळांत समाजाचा स्त्रीविषयक दृष्टीकोन प्रतिगामी झाला असेंच म्हणायला पाहिजे. वेदकाळांत व स्मृतिकाळांत नसलेली व पुराणकाळांत नाममात्र असलेली पडद्याची प्रथा मोठ्या प्रमाणांत मुसल्मानी रियासतींत दिसून आली व याला कारण समाजानें तत्कालीन परिस्थितीला अनुसरून घेतलेली अगर स्वीकारलेली संरक्षणव्यवस्था. असें म्हणतां येईल कीं, पाश्चात्त्य विद्येशीं व लोकांशीं भारताचा संबंध येईपर्यंत जीवनांत जे बदल झाले ते विशेष मूलगामी नव्हते, व जे कांहीं झाले त्यांनीं ऐन-चौकट उखडून टाकली नव्हती; तथापि मराठी सत्तेचा अंत झाल्यानंतर व पाश्चात्त्य लोकांशीं व विद्येशीं संबंध आल्याबरोबर आमच्या साऱ्या जीवनामध्यें एक क्रांति झाली. व्यक्ति-

स्वातंत्र्याच्या कल्पना ज्या इंग्लंडमध्यें होत्या, त्या एकोणिसाव्या शतकाच्या मध्यावर प्रतिपादल्या जाऊं लागल्या. महाराष्ट्रीय राजकीय विचार हा इंग्लिश राजकीय विचाराच्या वळणावरतीं गेला व समाज स्थितिनिष्ठ राहिला नाहीं. त्यामुळें बदल करणें व्यक्तीला व समाजाला अनिवार्य झालें. इंग्रजांनीं नाहीं नाहीं म्हणत म्हणत कायद्याच्या द्वारा मोठें सामाजिक परिवर्तन घडवून आणलें. पुनर्विवाहाचा कायदा, वारसाचा कायदा, धर्म-परिवर्तनाचा कायदा इत्यादि गोष्टी ज्या एकोणिसाव्या शतकाच्या मध्याला झाल्या, त्यामुळें भारतीय समाजाची सारी घडी बिघडली. जुन्या वातावरणांत राहून नवी विद्या शिकणें अशक्य झालें. नवी विद्या शिकून जुनें वातावरण सहन करणें तसेंच अशक्य झालें. आणि मग जीवनाच्या साऱ्या क्षेत्रांत झपाट्यानें परिवर्तन झालें. पराक्रमामध्यें भारतीय लोक कमी पडले. पराभव झाला आणि मग आमचीं शस्त्रें कमी पडलीं याची जाणीव झाली; आणि त्या जाणिवेंतूनच आमची संस्कृति नव्या जगाला कमी पडत आहे याचा साक्षात्कार झाला. त्यांतून मग वर्णाश्रमधर्माचीं मूल्यें तपासलीं जाऊं लागलीं. आणि या तपासणींत जुन्या संस्कृतीप्रमाणें स्त्री-शिक्षण, स्त्री-जीवन, वैवाहिक-जीवन, व्यक्तिगत-जीवन या साऱ्या गोष्टींचा परामर्श घेतला गेला, आणि धर्मविषयक सामाजिक सुधारणांचें युग सुरू झालें. ही स्थिति महाराष्ट्रांतच झाली असें नव्हे तर साऱ्या भारतभर झाली. आणि जेथें इंग्रजी विद्या जोरांत सुरू झाली तेथें तर ही क्रिया अधिक बलवत्तरपणें सुरू झाली.

धार्मिकदृष्ट्या बंगालमध्यें ब्रम्हो पंथ निघाला, पंजाबमध्यें आर्यसमाज पंथ निघाला, खुद्द शीख धर्मांतसुद्धां नामधारी पंथ निघाला व पश्चिम भारतामध्यें प्रार्थनासमाज हा पंथ निघाला. परंतु हे सर्व पंथ काढण्यामागें जो एक विश्वास होता, जो एक सामाजिक विश्वास होता तो खरा ठरला नाहीं. भारतांतील सामाजिक दोष जातिभेदामुळें निर्माण झाले. हे जातिभेद धर्मामुळें निर्माण झाले असें वाटत होतें, पण ही चूक होती. ही चूक ख्रिस्ती मिशनऱ्यांनीं पण केली. धर्मपरिवर्तन झालें, पण अनुभव असा आला कीं, ब्राह्मण-ख्रिश्चन, मुसलमान-ख्रिश्चन, मराठा-ख्रिश्चन व शूद्र-ख्रिश्चन या लोकांनीं धर्मांतर करतांना जातिभेद पण नव्या धर्मांत नेला. जातिभेद हा हिंदु समाजाचा महाप्राण ठरला होता, व तो एकत्र कुटुंबाच्या पद्धतीवर पोसला जात होता. आणि

जेव्हां धर्म बदलण्यानें एकत्र कुटुंब मोडतें व वारसाहक्काला बाध येत नाहीं अशी स्थिति निर्माण झाली त्या वेळीं हिंदु धर्माची चौकट बिघडली नाहीं, जी बिघडली ती हिंदु समाजाची चौकट. याशिवाय मोठें आर्थिक परिवर्तन भारतामध्यें झालें म्हणजे जाति व व्यवसाय यांची जी सांगड युगानुयुगें घालण्यांत आली होती ती मोडली. वर्णव्यवस्था व्यवसायाच्या दृष्टीनें इंग्रजी राज्य सुरू होतांच अवघ्या ५–५० वर्षांत मोडली. लोकसंख्या वाढली आणि सर्व तऱ्हेनें वाढता संसार जुन्या वास्तूवर आधारून चालणें अशक्य होऊन हळूहळू शिक्षणाकडे प्रवृत्ति ज्ञानापेक्षा योगक्षेमाच्या दृष्टीनें होऊं लागली.

इंग्रजांनीं कारभाराच्या सोयीकरतां इंग्रजी विद्येची व्यवस्था केली; पण या "वाघिणीच्या दुधानें" मोठी क्रांति झाली. आधुनिक विज्ञान आकर्षक ठरलें आणि मग शिक्षण हें एका जातीची मिरास राहिली नाहीं. प्रत्येकाचा तो अधिकार आहे असें वाटूं लागलें व हा अधिकार जाती, धर्म, लिंगभेद निरपेक्ष असा आहे असें वाटूं लागलें. आणि स्त्री-शिक्षणाला मग सुरुवात झाली व झपाट्यानें स्त्रीशिक्षणाची प्रगति झाली हें मी आज पहात आहें. माझ्या मातेला अक्षरओळखसुद्धां नाममात्र होती, तिच्या सुनेला मराठी लिहितांवाचतां येत होतें, इंग्रजीची फक्त तोंडओळख होती. पण आज तिच्या नाती-कोणी बी. ए., कोणी एम्. ए. आहेत आणि याप्रमाणें हें स्थित्यंतर अवघ्या ७०–८० वर्षांत घडून आलें आहे. आज मुलींना शाळेंत घाला असें सांगावें लागत नाहीं. आतां कॉलेजेंहि त्यांनां अपुरीं पडूं लागलीं. प्रशाला अपुऱ्या पडूं लागल्या. आणि सरकारच्या नव्या धोरणानें प्राथमिक शिक्षण हें अनिवार्य झालें असून; शिक्षणाबरोबरच लग्नाच्या प्रश्नांतहि परिवर्तन झालें आहे.

आतां अष्टवर्षा वधू मिळणार नाहीं. आतां लग्न केव्हां करावें हा प्रश्न चर्चिला जात नाहीं, उलट लग्न होणार की नाहीं याची चिंता समाजांत दिसून येत आहे. वेदकाळांत स्त्रीविषयक कल्पना ज्या होत्या त्या आदर्शांच्या होत्या. पुराणकाळांत त्यांनां अद्भुत रसाची जोड मिळाली होती. पुढील काळामध्यें स्त्रिया गृहस्वामिनी झाल्या आणि आतां त्या संसाररथाचें एक आवश्यक चाक एवढ्याच राहिल्या नसून संसार ही जर एक पेढी मानली तर ती सहकारी तत्त्वावरील पेढी आहे व त्यांत दोन्ही भागीदारांना काम करावें लागतें,

मिळवावें लागतें येथपर्यंत दृष्टिकोन आलेला आहे. क्रांति म्हणजे कांहीं गडबड, गोंधळ, उलथापालथ असेंच कांहीं मानण्याचें कारण नाहीं. क्रांति म्हणजे माणसामाणसांतील मनुष्य व समाज, मनुष्य व पदार्थ यांच्यांतील संबंधांत होणारे बदल! ज्या जागेंत मी राहतों त्या जागेंत आज मी भाडेकरी म्हणून रहात आहें. आणि जर उद्यां कायदा झाला कीं भाडें देत असेपर्यंत मालकाला मला काढतां येत नाहीं तर एक मोठी क्रांति होईल. माणसें तींच, वास्तु तीच पण आपसांतील संबंध बदलले. आणि जर उद्यां पिकविणाराचें शेत त्याप्रमाणें राहणाराचें घर ठरलें तर भाडेकरी मालक झाला व मालक देशोधडीला गेला. माणसें तींच, वास्तु तीच, आपसांतील संबंध बदलले. तसेंच आज वैवाहिक जीवनांत झालें आहे. आतां स्त्री ही एक ‘ व्यक्ति ’ आहे, तिला व्यक्तित्व आहे, तिला कांहीं अधिकार आहेत, ती एका स्वतंत्र देशाची नागरिक आहे, या सर्व संदर्भांत तिच्याशीं पुरुषानें संसार करावयाचा आहे. साहजिकच ती जर अर्थोत्पादनांत मदत करणारी असेल, तर आणखी परिवर्तन या नात्यांत होईल. तथापि विवाह ही केवळ व्यक्तिगत बाब नाहीं. तिला एक सामाजिक पार्श्वभूमि असते व कांही सामाजिक हेतुही असतो, आणि तो म्हणजे समाज चालवावयाचा असतो, वंश चालवावयाचा असतो आणि म्हणून स्त्री आणि पुरुष हे प्रवृत्तीनुसार एकत्र येतात. त्यांच्या एकत्र येण्याचा सामाजिक हेतु योग्य तऱ्हेनें साध्य व्हावा म्हणून समाज कांहीं नियमन, कांहीं नियंत्रण करीत असतो. आणि हें नियमन व नियंत्रण कांहीं कायद्यानें होतें, कांहीं सामाजिक संकेतानें व कांहीं व्यक्तिगत संयमानें. तथापि व्यक्तींनीं जुळवून घेतलें पाहिजे, समय ओळखला पाहिजे. आतां एकत्र कुटुंबें संपलीं आहेत, व स्त्री ही आपल्या जीवनाची अधिष्ठात्री झाली आहे. आपल्या संसाराची शिल्पकार झाली आहे. तेवढ्यावरच भागलें नाहीं, तर तिच्या पवित्र कुशींत निर्माण होणारी नवी पिढी ही नव्या राष्ट्राची शिल्पकार आहे, याची जाणीव तिला झाली पाहिजे, झाली आहे. आणि म्हणून नव्या समाजाच्या संदर्भांत नवीं नवीं कर्तव्यें तिला करावयाचीं आहेत. चूल आणि मूल या दोहोंच्याच वेटाळ्यांत तिचें जीवन आतां राहणार नाहीं. किंबहुना त्याला संपूर्णतया सांगता यावयाची असेल, त्याचा विकास व्हावयाचा असेल तर तिनें आतां यापेक्षां अधिक असें जीवनक्षेत्र आपलें मानलें पाहिजे.

स्वतंत्र भारतांत आज ती नागरिक आहे, म्हणजे मतदार आहे. राजकारणाला ती वळण देऊं शकते. शिक्षण व अनेक व्यवसायांमध्यें ती चमकत आहे. राजकारणांतहि आहे, मंत्रिमंडळांत आहे, राजदूतांत आहे, राज्यपालांत आहे, किंबहुना असें एकहि जीवनाचें क्षेत्र नाहीं कीं त्या ठिकाणीं तिनें आपल्या कर्तृत्वाची निशाणी रोवली नाहीं. पूर्वींचें शांत, गंभीर, संथ असें जीवन आतां संपलें. आतां यंत्रयुग सुरू झालें आहे. आणि यंत्राप्रमाणेंच मानवी मनें सतत गतिमान झालेलीं आहेत. आपला संसार हा आतां भौगोलिक मर्यादेनें मर्यादित असला, तरी जगाच्या संसारांत तो समाविष्ट आहे. आज व्यक्तिवाद अर्थशून्य होत चालला आहे. आज व्यक्ति ही सामाजिक जीवनांतील एक शक्ति या नात्यानें ओळखली जात आहे. त्याचप्रमाणें राष्ट्र हें सर्व जगांतील अन्य राष्ट्रव्यवस्थेंतील एक भाग असें ओळखलें जात आहे. जग एका अर्थानें एक झालें आहे. आणि म्हणून या व्यापक अर्थानें वाढलेल्या स्वतःच्या संसाराकडे पाहण्याची व्यापक बुद्धि आज स्त्री आणि पुरुष यांच्यांमध्यें हवी आहे. विवाह हें एक साहस आहे आणि या साहसांत स्त्री आणि पुरुष दोघेंहि भाग घेत आहेत. दोघांनांहि स्वतःची उन्नति करावयाची आहे. व त्याबरोबर ज्या समाजांत आपण राहतों त्या समाजाचीहि; आणि म्हणून त्यांपैकीं कोणीहि एक निष्क्रिय बनून राहणें अयोग्य आहे.

वरील आधुनिक स्त्रीपुढील सर्व प्रश्न सर्वांगीण रीतीनें या पुस्तकांत सौ. टिळक यांनीं चर्चिले आहेत. बदललेल्या परिस्थितींतसुद्धां जुन्या आश्रमव्यवस्थेंतील चांगली कल्पना त्यांनीं स्वीकारून जुन्या सोन्याला नवें भूषण बनवावें तसें थोडें केलें आहे. सारें पुस्तक येथून तेथून वाचनीय झालेलें आहे. त्यांची भाषा प्रभावी व प्रसादपूर्ण आहे. नवा इतिहास घडविण्याचा संकल्प मनामध्यें धरून स्त्री आणि पुरुष यांनीं विवाहक्षेत्रांत प्रवेश करावयाचा आहे व त्या संकल्पाला सिद्धीप्रत न्यावयाचें आहे.

माझी अशी खात्री आहे कीं, सौ. टिळक यांचें हें पुस्तक अनेकांना विचार प्रवर्तक व प्रेरणा देणारें ठरेल.

"पुणें विद्यापीठ",
गणेशखिंड, पुणें ७
दि. २३–७–१९६५.

**न. वि. गाडगीळ**

# लेखिकेचे चार शब्द

पुणें येथें महर्षि कर्वे यांच्या पुण्यतिथीनिमित्त एक व्याख्यानमाला योजिलेली आहे. दुसऱ्या पुण्यतिथीनिमित्त या "महर्षि कर्वे पुण्यस्मरण व्याख्यानमालेंत" तीन व्याख्यानें देण्याविषयीं मला निमंत्रण आलें, तें मीं मोठ्या आदरानें स्वीकारलें; कारण महर्षि कर्वे यांच्या स्मरणार्थ योजिलेल्या या ज्ञानयज्ञांत एखादी आहुति टाकण्याची संधि मिळणें हा एक मोठा मानच आहे. ता. ७।८।९ नोव्हेंबर १९६४ मध्यें पुण्याच्या गोखले हॉलमध्यें हीं व्याख्यानें झालीं. महर्षींचें सारें जीवित स्त्री-शिक्षणाच्या कार्याला वाहिलेलें असल्यामुळें या व्याख्यानांचा विषय स्त्रीशिक्षणविषयक असावा असें मला साहजिकच वाटलें. विचारांतीं "आजच्या सुशिक्षित स्त्रीपुढील समस्या" हा विषय मीं निवडला. स्त्रीच्या आयुष्यांतील विद्यार्थीदशा अथवा ब्रह्मचर्याश्रम, गृहस्थाश्रम व वानप्रस्थाश्रम, या तीन पर्वांची चर्चा व्याख्यानांत केली. अर्थात् विषयाची व्याप्ति मोठी असल्यामुळें तो तीन व्याख्यानांत आटोपतां येईल, किंवा सर्व समस्यांचा उकल करतां येईल हें संभवनीयच नव्हतें. पण विषय जिव्हाळ्याचा व ज्वलंत असल्यामुळें मीं तो निवडला. या विषयावरील विचारांनां ठिकठिकाणीं जोराची चालना द्यावी असा माझा उद्देश होता. तो बराच सफल झाला असें म्हणायला हरकत नाहीं. अलीकडे या विषयावर अनेक ठिकाणीं चर्चा होतांना आढळते. व्याख्यानानंतर माझ्याकडेही बऱ्याच पृच्छा आल्या व विचारविनिमय झाले.

पुणें येथील '**जगन्नाथ प्रकाशन**'चे चालक श्री. गानू यांनीं या विषयावर मीं एक लहानसें पुस्तक लिहून द्यावें अशी मागणी केली. माझ्या उद्देशाला ही मागणी पोषकच होती. तेव्हां तिन्ही व्याख्यानांतील मजकुरामध्यें भर घालून व एकदोन संलग्न मुद्यांची चर्चा समाविष्ट करून "स्त्री जीवनाचीं नवीं क्षितिजें" या पुस्तकाची मांडणी केली.

लेखिकेच्या विनंतीवरून, पुणें विद्यापीठाचे कुलगुरु श्री. काकासाहेब गाडगीळ यांनीं वेळांत वेळ काढून, अत्यंत मार्मिक व विचारपरिप्लुत अशी प्रस्तावना अगदीं थोड्या वेळांत लिहून देऊन लेखिकेस उपकृत केलें आहे.

पन्नास-साठ वर्षें स्त्रीशिक्षणाचा प्रसार झाल्यावर आज स्त्रीजीवनाचा कायापालट झालेला आढळतो. आजच्या सुशिक्षित स्त्रीपुढें नवीं क्षितिजें, नवीं क्षेत्रें, उघडलीं आहेत; तिच्या कर्तृत्वाला नवी झळाळी आली आहे, पण त्या बरोबरच तिचें जीवन गुंतागुंतीचेंहि झालें आहे. आपलीं बहुविध कार्यें बजावतांना तिच्यासमोर अनेक प्रश्न व समस्या उभ्या राहात आहेत. या समस्यांचा विचार व उकल समाजानें व राष्ट्रानें सहानुभूतिपूर्वक व सहकार्याच्या बुद्धीनें प्रेरित होऊन करणें आवश्यक आहे. आधुनिक, सुशिक्षित स्त्रीचें नवें जीवन कृतार्थ व अनायासाचें होणें हें केवळ तिच्याच हिताचें नसून, समाजाच्या हिताचें व राष्ट्राची प्रगति साधणारें आहे. या दृष्टीनें विचारवंत विचार करूं लागतील व कार्यकर्ते त्या विचारास मूर्तस्वरूप देण्यासाठीं झटूं लागतील तर या पुस्तकाचें उद्दिष्ट साध्य झाल्याचें समाधान लेखिकेस लाभेल.

सौ. कमलाबाई टिळक

'कमलालय',
चेंबूर, मुंबई ७१
१५ ऑगस्ट १९६५.

# विषय-अनुक्रम


| प्रकरण | विषय | पृष्ठांक |
|---|---|---|
| | प्रस्तावना—श्री. काकासाहेब गाडगीळ | पांच |
| | लेखिकेचे चार शब्द | नऊ |
| १ | स्त्रीजीवनाची पूर्वपीठिका ... ... | १ |
| २ | स्त्री-शिक्षण व त्यांतून उद्भवलेले प्रश्न ... | १४ |
| ३ | स्त्रियांनां उच्च शिक्षण द्यावें काय ? ... | २८ |
| ४ | वैवाहिक जीवन – कौटुंबिक लागेबांधे ... | ४० |
| ५ | वैवाहिक जीवनांतील 'चकवा' ... | ५७ |
| ६ | 'चकव्यांतून' सुटका ... ... | ७३ |
| ७ | वानप्रस्थाश्रम अथवा समाजसेवाश्रमाची कल्पना | ८५ |
| ८ | वानप्रस्थाश्रम – पूर्वतयारी व फलश्रुति ... | ९७ |
| ९ | कुटुंबनियोजन ... ... ... | १०९ |
| १० | उपसंहार ... ... ... | १२१ |
| ११ | शुद्धिपत्र ... ... ... | १३६ |


• •

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत
अनुक्रम ४०५५२ वि: निबंध
क्रमांक १९६२ नों. दि: २१।५।६६

# स्त्री-जीवनाचीं नवीं क्षितिजें

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणें
ग्रा. क्र.
स्थल प्रत

## प्रकरण १ लें

## स्त्री-जीवनाची पूर्व पीठिका

" आजची स्त्री " कशी आहे, कशी घडली आहे व कशी घडावयास पाहिजे, याचा विचार या लहानशा पुस्तकांत करावयाचा आहे. आरंभींच हें स्पष्ट केलेलें बरें, कीं " आजची स्त्री " या शब्दांनीं महाराष्ट्रांतील, मध्यमवर्गीतील, शहरांत राहणारी स्त्री अभिप्रेत आहे. लेखिकेचें ज्ञान व अनुभव बव्हंशीं या क्षेत्रांतील स्त्री-समाजाविषयीं असल्यामुळें, त्या क्षेत्रांतील स्त्रीपुरतेंच विवेचन मर्यादित केलें आहे. आतां कुणी असें म्हणेल कीं, असें मर्यादित विवेचन फुकट आहे. बहुजन-समाजाचा विचार झाल्याशिवाय बांधलेले सिद्धांत अपुरे व निरुपयोगी ठरतील. या टीकेला प्रस्तुत विषयापुरतें उत्तर पुढीलप्रमाणें देतां येईल. स्त्री-शिक्षणाचा प्रसार झाल्यामुळें स्त्रीजीवनांत नवीं क्षितिजें खुलीं झालीं आहेत असें या पुस्तकांत दाखवावयाचें आहे. या स्त्री-शिक्षणाचा प्रसार बहुजनसमाजांत अद्यापि व्हावयाचा आहे. हा प्रसार ज्या नागरी मध्यमवर्गीयांत झाला व ज्यामुळें या स्त्रियांनां अभिनव कार्यक्षेत्रें उपलब्ध झालीं, त्यांचाच विचार संकलित असल्यामुळें, केवळ मध्यमवर्गीयांच्या जीवनाभ्यासावर आधारलेलें विवेचन ग्राह्य ठरावें. अर्थात् खेडोपाडीं व बहुजनसमाजांत स्त्री-शिक्षणाचा प्रसार जसजसा होईल, तसतसा स्त्रीजीवनाचा नवा अर्थ त्या क्षेत्रांतहि लावावा लागेल व त्यापासून जे अनेक प्रश्न व समस्या निर्माण होतील, ते सोडवतांनाही प्रस्तुत पुस्तकांतील विवेचन उपयोगी पडेल. कारण निदान

महाराष्ट्रांत तरी मध्यमवर्ग हा सर्व महाराष्ट्राची नाडी आहे. महाराष्ट्रांतील सगळ्या राजकीय, सामाजिक, शैक्षणिक नवप्रवृत्तींचें नेतृत्व बहुजनसमाजांत जागृति होण्यापूर्वीं, मध्यमवर्गाकडेच होतें. बहुजनसमाजांतील जागृतीचेंहि नेतृत्व मध्यमवर्गाकडेच जातें हें नाकारतां येणार नाहीं. साहाजिकच मध्यम-वर्गाचें अनुकरण बहुजनसमाज करतो. त्यामुळें महाराष्ट्राच्या या नाडीच्या स्पंदनावरून महाराष्ट्राचें स्वास्थ्य अजमावतां येतें. मध्यमवर्गाच्या वागणुकीचें बारीक निरीक्षण बहुजनसमाज करीत असतो. आज जें मध्यमवर्ग करतो तें उद्यां सर्व बहुजनसमाज करील. तेव्हां मध्यमवर्गाच्या प्रश्नांचा विचार, बहुजनसमाजाच्या समस्या सोडवतांनाहि उपकारक ठरल्याशिवाय राहाणार नाहीं.

स्त्रीजीवनाचीं नवीं क्षितिजें संशोधिण्यापूर्वीं, सिंहावलोकन करून, स्त्रीजीव-नाची पूर्वपीठिका न्याहाळिली पाहिजे. हें निरीक्षण मनोरंजक व बोधप्रद व्हावें. व्यक्तीच्या, समाजाच्या व राष्ट्राच्या पूर्व-संचिताचें वर्तमान परिस्थितीशीं नक्कीच नातें असतें, व भावी कालावरहि तें आपला ठसा उमटविल्याशिवाय राहात नाहीं. भूपृष्ठाच्या चढउतारावरून नदी कशी वाहिली, किंवा आतां वाहते किंवा पुढें वाहील याचा अंदाज भूगोलशास्त्रतज्ज्ञ बांधतात. पृथ्वीच्या पाठीवर वेळोवेळीं फरक काय कारणांमुळें व कसे होतात हें त्यांना त्यांच्या त्या विषयाच्या अभ्यासा-मुळें कळत असतें व म्हणून ते हे अंदाज बांधूं शकतात. "पूर्व दिव्य ज्यांचें त्यांना रम्य भावि काल" असा इतिहासविषयक अंदाज, कवीनें–जो द्रष्टा म्हणून मानला जातो – लिहून ठेवलाच आहे. तेव्हां भारतांत – फार पूर्वीं – अगदीं वेदकालीं – स्त्रीजीवन कसें होतें तें तपासल्यास – सध्यांच्या महाराष्ट्रीय स्त्रीजीवनाची प्रकृति कशी व कां आहे तें समजेल. भूतकालाचा वर्तमानकालाशीं संवाद म्हणजे इतिहास अशी एका जाणत्यानें व्याख्या केली आहे. या संवादाचे पडसाद भविष्यकालापर्यंतहि पोहोंचतातच. तेव्हां आपण ज्या विषयाचा विचार करूं इच्छितों त्याची पूर्वपीठिका समजून घेणें, त्या विषयाचें वर्तमान व भावी स्वरूप समजण्यासाटीं अत्यंत उपकारक ठरेल.

दुर्दैवानें भारताचा वेदकालीन इतिहास – हल्लींच्या इतिहासाच्या कल्पने-प्रमाणें, तारीखवारांनिशीं उपलब्ध नाहीं. वेदकालीन उपलब्ध वाङ्मयावरूनच त्या वेळच्या जीवनाबद्दलचे कयास करावे लागतील.

वेदकाळीं, म्हणजे सुमारें चार हजार वर्षांपूर्वीं समाजांत स्त्रियांचें स्थान उच्च,

पुरुषांच्या बरोबरीचें होतें. भारतीयांना स्त्रियांबद्दल किती आदर होता—आणि अर्थात् या आदराचें मूळ स्त्रीच्या योग्यतेंतच असणार—हें त्यांच्या देवविषयक कल्पनांवरून लक्षांत येतें. आर्यांच्या दैवतांत देवतांचा भरणा प्रामुख्यानें आहे. देवतांच्या स्तुतिपर कितीतरी ऋचा वैदिक वाङ्मयांत आढळतात. शिवाय अखिल सृष्टीच्या आद्यतत्त्वाच्या कल्पनेंतहि स्त्रीतत्त्वाला पुरुषाच्या बरोबरीनें स्थान देण्यांत आलें होतें. 'प्रकृती'शिवाय 'पुरुषा' चें विश्वाच्या सृजन व संचालनाचें कार्य सिद्धीस जात नसे. अर्धनारीनटेश्वर हा विश्वाचा निर्माता, शास्ता व त्राता आहे. कुठल्याही देवाला त्याच्या 'शक्ती'वांचून, स्त्रीवांचून, आर्यांच्या मताप्रमाणें पूर्णता येत नसे. स्वतःच्या पतीच्या सामर्थ्याचें मूळ, आपल्या शक्तींत असल्याचें, इंद्राणीनें एका वैदिक ऋचेंत मोठ्या अभिमानानें सांगितलें आहे.

वेदकालीं स्त्रियांना समाजांत हें मानाचें स्थान होतें, कारण त्यांना पुरुषांप्रमाणेंच स्वयंसिद्ध, बौद्धिक, आध्यात्मिक व सामाजिक जीवन होतें. अशा जीवनाला आधारभूत, भक्कम पाया म्हणून उपयोगी पडणारें शिक्षण स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीनें मिळे. मुलाप्रमाणेंच मुलीचेंहि उपनयन करण्यांत येई. कारण तो संस्कार म्हणजे शिक्षणार्थ गुरुगृहीं जाण्याचा आरंभ असें समजलें जात होतें. स्त्री-विद्यार्थिनींचे दोन गट असत. एक सद्योद्वाहा म्हणजे ज्यांनीं शिक्षण पूर्ण झाल्यानंतर अनुरूप पति निवडून गृहस्थाश्रमांत प्रवेश करण्याचा संकल्प केला आहे व दुसऱ्या ब्रह्मवादिनी—म्हणजे आजन्म ब्रह्मचर्य पाळून अध्ययन-अध्यापनाला वाहून घेणाऱ्या स्त्रिया.

गृहस्थाश्रमामध्यें पत्नीला पतीच्या बरोबरीनें सर्व धर्मकर्मांत स्थान असे. यज्ञकृत्यें हा वैदिक कालांतला मुख्य धर्म. "अपत्नीक" पुरुष "अयज्ञीय" समजला जात असे. आजसुद्धां अग्निहोत्री ब्राह्मणाला पत्नीशिवाय आपलें अग्निहोत्र चालवितां येत नाहीं. पत्नी पतीप्रमाणें सायं-सकाळ संध्यावंदन करी. यज्ञांतील अनेक कृत्यें पत्नीनें स्वतंत्रपणें करावयाचीं असत व तीं करतांना म्हणावयाचे मंत्र, सूक्तें वगैरे ती स्वतः म्हणत असे. आतांप्रमाणें, "हाताला हात" लावण्याची मध्यस्थी वेदकाळीं स्त्रीला लागत नव्हती. फक्त स्त्रियांनीं करावयाचे असे सुद्धां कांहीं यज्ञ असत. सीता, रुद्रबलि, रुद्रयाग वगैरे संज्ञांनीं ते ओळखले जात. माता म्हणूनहि स्त्रीचा अधिकार फार मोठा होता. "हजार

शिक्षकांपेक्षां पिता श्रेष्ठ; व त्यापेक्षां हजार पटींनीं श्रेष्ठ असा गुरु, माता आहे " अशा अर्थाचें सुभाषित, केवळ आई न्हाऊं-माखूं घालते, खाऊं-पिऊं घालते, म्हणून लिहिलें जाईलसें वाटत नाहीं. भावी जीवनाला उपयोगी पडेल, असें सच्छीलवर्धक उच्च शिक्षण फक्त माताच देऊं शकेल हें आमच्या पूर्वजांना उत्तम रीतीनें समजलें होतें. उच्च शिक्षण घेतलेली सद्योद्वाहा स्त्री, पत्नी, माता व समाजाची एक घटक म्हणून पुरुषाबरोबर समान दर्जा वैदिक समाजांत पावली होती.

ब्रह्मवादिनी स्त्रियांनाहि अर्थात् गुरुकुलें चालवणाऱ्या उपाध्यायांप्रमाणेंच समाजांत मान होता. "उपाध्याया" अशी स्वतंत्र संज्ञाच या कन्याकुलें चालवणाऱ्या स्त्रियांना होती. या स्त्रिया अध्यापन करीत व व्यासंगानें स्वतःचें अध्ययन ताजें व तेजस्वी ठेवून, स्वतंत्र ग्रंथरचना करीत. त्यांनीं लिहिलेले ग्रंथ कालाच्या उदरांत गडप झालेले असले तरी लोपामुद्रा, विश्ववारा, घोषा वगैरे विदुषींनीं रचिलेल्या ऋचा वेदांत सांपडतात. ब्रह्मयज्ञाच्या वेळीं संस्मरणीय अशा विद्वान् साहित्यिकांत सुलभा, मैत्रेयी, गार्गी, वाचक्नवा अशा पंडितांचीं नांवें आहेत.

वेदकालीं प्राप्त झालेल्या या उच्च स्थानापासून, तदनंतरच्या कालांत स्त्री हळूहळू खालीं येऊं लागलेली आढळते. स्मृतिकाळांत स्त्री अगदीं खालच्या पायरीपर्यंत येऊन ठेपलेली दिसते. या ऱ्हासाला अनेक कारणें होतीं. त्या सर्वांच्या तपशिलांत शिरण्याचें हें स्थल नव्हे. पण लक्षांत एवढेंच घ्यावयाचें कीं या ऱ्हासाचें मुख्य कारण म्हणजे स्त्रीचा शिक्षणाचा हक्क-वेदाध्ययनाचा हक्क तिच्यापासून हिरावला गेला हें होय. याप्रमाणें ज्ञानामृताला पारखी झालेली स्त्री यज्ञकृत्यांना साहजिकच अनधिकारी ठरली. शिक्षणानें बुद्धीचा, व्यक्तिमत्त्वाचा विकास न झाल्यामुळें तिचा घरांत व समाजांत प्रभाव पडेनासा झाला. वेदोत्तर वाङ्मयांत स्त्रीविषयीं अनादराचे किंवा तिच्या दुबळेपणामुळें अनुकंपेचे उद्गार ठिकठिकाणीं आढळतात. स्मृतिकालांत स्त्रीच्या अंगीं अनेक अवगुण चिकटवलेले आढळतात. अज्ञानी, अननुभवी स्त्रीच्या दुबळेपणाची जाणीव होऊन स्मृतिकार मनूनें कनवाळूपणानें दंडक घातला कीं "स्त्रीला कधींहि अरक्षित अशी सोडूं नये. आयुष्याच्या तिन्ही पर्वांत तिला संरक्षक पाहिजे. कौमार्यांत पित्यानें, तारुण्यांत पतीनें व वृद्धपणीं पुत्रानें स्त्रीचें रक्षण करावें."

पाराशरस्मृतीवर टीका लिहितांना, माधवाचार्यांनीं स्पष्ट म्हटलें कीं, "पुरुष विद्वान असतो. पण त्याची पत्नी ही अविद्या असते; अशिक्षित व अडाणी असते. तिची योग्यता पुरुषाबरोबर कशी असणार ?"

स्त्रियांबद्दल असे अनुदार उद्‌गार काढल्याबद्दल या थोर विद्वानांनां दोष देतां येत नाहीं. स्त्रीचा या कालापर्यंत शारीरिक, बौद्धिक, मानसिक ऱ्हास झाला होता खराच व त्याचीं कारणेंहि उघड आहेत. मुलींच्या उपनयनाची प्रथा हळूहळू बंद झाली. गुरुगृहीं अध्ययनाला जायचें नाहीं; मग उपनयनाच्या विधींत अर्थ काय राहिला ? मुलीला उपयुक्त गृहकृत्यें वगैरे तिनें आपल्या सासूच्या हाताखालीं शिकावीं म्हणून उपनयनाच्या वयाला, आठव्या वर्षी, मुलीचा विवाहच करून देण्याची प्रथा पडली. शास्त्रकारांच्या पद्धतीप्रमाणें, घालून दिलेल्या नियमाचा भंग करणारास महत्पाप लागेल अशी भीतीही घालून ठेवली. त्यामुळें "अष्टवर्षा"ची कन्या झाल्यानंतर मातापिता तिचा विवाह करून देऊं लागले. दहा वर्षांनंतर कुमारी मुलगी घरांत ठेवणें महापातक समजलें जाऊं लागलें. स्त्रियांच्या साऱ्या अवनतीचें मूळ जो बालविवाह तो असा शास्त्रशुद्ध होऊन बसला. आठ वर्षांच्या कोंवळ्या वयांत आपुलकीच्या, मायेच्या वातावरणांतून, परगृहीं संकुचित वृत्तीनें वावरणाऱ्या मुलीच्या शरीराचा, मनाचा इष्ट विकास कसा व्हावा ? मग तिच्या अर्धविकसित व्यक्तिमत्वांत कांहीं दोष शिरले तर काय आश्चर्य ? ज्या वयांत चूलबोळक्यांनीं खेळायचें त्या वयांत ती स्वयंपाक, उष्टीं खरकटीं करूं लागली. बाहुल्यांनीं खेळावयाच्या वयांत रक्तामांसाचे गोळे वाढवायची जोखीम तिच्या कोंवळ्या खांद्यांवर पडली. न साहेल असें ओझें अंगावर पडल्यामुळें ती शरीरानें कमकुवत व शिक्षणाअभावीं, बाहेरील जगाच्या अननुभवामुळें बुद्धीनें पांगळीं बनली. मग तिच्याविषयीं कुटुंबीयांनां व समाजाला अनादर व क्वचित अनुकंपा वाटली तर तें वाजवीच होय. अस्मिता लोपलेली, आत्मविश्वास पार गमावून बसलेली स्त्री स्वतःचें जिणें फुकट मानूं लागली. स्त्रीजन्म येणें म्हणजे पूर्वजन्मींच्या कांहींतरी पापांचें फळ असें स्वतः स्त्रीलाच वाटूं लागलें.

नंतर पुराणकाळींही स्त्रियांची ही अवनति कायमच राहिली. महाभारतांतील द्रौपदी, रामायणांतली सीता वगैरे पंचकन्या प्रातःस्मरणीय अर्थात् परमवंद्य समजल्या जातात. गडकरी यांनीं पुण्यप्रभावांत, सुदाम्याच्या

तोंडीं मजेनें असे उद्‌गार घातले आहेत कीं, ही पंचपतिव्रतांची यादी कुणा बदफैली राणीनें बनवून घेतली असली पाहिजे. कारण त्या पांची जणींच्या चारित्र्यावर एकादा तरी शिंतोडा उडालेला आहे. द्रौपदी पांचांची पत्नी, सीता परघरीं–आणि तीहि दुरात्म्याच्या घरीं अनेक वर्षे राहिलेली, अहिल्या तर प्रत्यक्ष भ्रष्टच झालेली, तारेचाहि दोन पुरुषांशीं संबंध आलेला, मंदोदरी राक्षसाच्या पदरीं पडलेली–राक्षसाला देव मानायला बांधून घेतलेली–मग यांना आदर्श पतिव्रता म्हणायचें तरी कसें? सुदाम्याच्या बोलण्यांतला विनोदाचा भाग सोडून द्या पण मला वाटतें या पांच स्त्रिया एका बाबतींत तरी भारतीय स्त्रियांच्या प्रतिनिधि निश्चितच आहेत आणि त्यामुळें त्यांचें प्रातःस्मरण, जाणतेपणानें मननपूर्वक केल्यास स्त्रियांना बोधप्रद होईल.

या पांची स्त्रियांच्या नशिबीं दुःख, अपमान, अवहेलना लिहिलेली होती. थोर कुळांत जन्म असून, अंगीं नाना प्रकारचे सद्गुण असूनहि त्यांच्या आयुष्यांत त्यांना शारीरिक हालअपेष्टा व मानसिक यातनाच भोगाव्या लागल्या. हें असेंच खडतर आयुष्य एकोणिसाव्या शतकापर्यंत प्रत्येक भारतीय स्त्रीच्या ललाटीं रेखलेलें असे. अर्जुनानें पण जिंकला तेव्हां सीतेनें रामाला स्वयंवर-मंडपांत वरमाला घातली तशीच हर्षनिर्भर द्रौपदीनें अर्जुनाच्या गळ्यांत घातली असेल. पण तिचें दुर्दैव ओढवलें व ती एखाद्या भाकरीच्या तुकड्याप्रमाणें पांचांत विभागली गेली. त्या वेळीं तिची संमति कुणीं विचारल्याचें वाचण्यांत नाहीं. सीतेची व्यथा तर कालाच्या अंतापर्यंत सहृदयांच्या अंतःकरणाला टोंचीत राहील. अग्निदिव्य केल्यावरसुद्धां तिच्या नांवाला कलंक लागला व गर्भाचें ओझें घेऊन तिला निर्वासित व्हावें लागलें. क्रौंचवधानें कासावीस झालेल्या वाल्मीकि ऋषीला पुन्हां एकदां पतिपत्नीची ताटातूट पहावी लागली. या वेळीं निषादाच्या तीरानें नाहीं तर एका रजकाच्या वाग्बाणानें. सम्राज्ञीला रघुवंशाचे कुलदीपक लव्हाळ्यांत दर्भात जोजवावे लागले. पित्यापेक्षां कांकणभर जास्तच पराक्रमी असे पुत्र, पतीला सुपूर्त करून शेवटीं सीतेनें आपल्या मातेच्या, पृथ्वीच्या उदराचा आश्रय केला. "अहिल्या कपटाला बळी पडून भ्रष्ट झाली. तिचें मन गंगाजळाप्रमाणें शुद्ध, पवित्र होतें", ही गोष्ट गौतमासारख्या महात्म्यालासुद्धां लक्षांत घेण्याजोगी वाटली नाहीं; कारण स्त्रीबद्दलची मूळ कल्पनाच ही कीं, ती वस्त्रपात्राप्रमाणें एक वस्तु आहे. बायबलांत ज्याप्रमाणें

भांड्याकुंड्यांच्या पंक्तीला पत्नीला बसवलें आहे तोच प्रकार. बायबलांत धर्माज्ञा आहे कीं, "शेजाऱ्याच्या पत्नीचा किंवा त्याच्या चीजवस्तूचा, भांड्याकुंड्यांचा लोभ धरूं नका." वस्त्र जसें एकदां विटाळलें म्हणजे त्याज्य किंवा पात्र जसें एकदां भंगलें कीं निरुपयोगी, त्याप्रमाणें स्त्रीच्या शरीराला एकदां कलंक लागला कीं ती जन्मांतून उठायची. तारेला वालीनें जबरदस्तीनें आपल्या 'जनानखान्यांत' ढकलली; पुढें वालीचा वध झाल्यावर सुग्रीवानें तिला परत घेतली. (डार्विनच्या सिद्धान्ताप्रमाणें माकडापासून मानव उत्क्रांत झाला. रामानें परघरीं राहिली म्हणून सीतेचा त्याग केला, हें त्याच्या उत्क्रांत माणुसकीचें, उच्चतर संस्कृतीचें लक्षणच म्हणावयाचें!) तिच्या मनाच्या यातना वाल्मीकींना वर्ण्य वाटल्या नाहींत, तरी आपल्याला तर्कानें जाणतां येतील. मंदोदरीच्या नशिबीं दुर्वृत्त, राक्षसगणाच्या नवऱ्याशीं संसार करावयाचें आलें. "परस्त्रीचा अभिलाष धरूं नका, अनर्थ होईल" असा नवऱ्याला तिनें युक्त उपदेश केला होता; पण रावणानें तो जुमानला नाहीं व स्वतःचा व मंदोदरीचा सर्वनाश करून घेतला. बिभीषण, राक्षसाचा भाऊ पण सत्प्रवृत्तीचा म्हणून रामानें त्याचा गौरव करून त्याला लंकाधीश केलें. मंदोदरी ही दुःशील पतीची सच्छील पत्नी—रामायणकारांनीं तिला मात्र, उर्मिलेप्रमाणेंच अनुल्लेखानें पडद्याआड ठेवलें आहे.

अशी हीं प्रातःस्मरणीय पंचकन्यांचीं चरित्रें. यांना आदर्श मानावें असा दंडक शास्त्रकारांनीं घालून दिला. कारण या थोर स्त्रियांच्या अंगीं पराकाष्ठेची सहनशक्ति होती. थोर असूनहि त्यांनीं आपली अस्मिता पतीच्या अस्मितेंत मिसळून टाकली होती.

ही झाली पुराणांतरींच्या स्त्रीची जीवनगाथा. नंतर बौद्ध धर्मांत स्त्रीला धार्मिक बाबतींत समान दर्जा प्राप्त झाला होता. स्त्रिया भिक्षुणी होऊन अध्यात्माचा मार्ग चोखाळूं शकत. हिंदुधर्मांतल्याप्रमाणें त्यांना त्या बाबतींत पुरुषाची मध्यस्थी लागत नव्हती. पण हिंदु धर्माच्या पुनरुत्थानानंतर स्त्रियांचा हा समान हक्क लुप्त झाला.

इतिहासकालीं स्त्रियांची अवनति अधिकाधिकच होत गेली. मुसलमानांच्या आक्रमणामुळें स्त्रियांचें उरलेंसुरलें स्वातंत्र्य संपूर्ण नष्ट झालें. देशांत अशांतता, बेबंदशाही माजली. रात्रंदिन युद्धाचा प्रसंग पडूं लागला. अशा वेळीं स्त्रीचें रक्षण करण्यास बांधलेले पुरुष, तिच्यावर तिऱ्हाइताची नजर पडूं नये म्हणून जपूं

लागले. स्त्रिया, यामुळें घराच्या चार भिंतींत, आपखुषीनें बंदिवान झाल्या. उत्तर-हिंदुस्थानांत तर चार भिंतींच्या जोडीला आणखी तोंडावर पडदा आला. प्रत्यक्ष सासऱ्याला, दीरालासुद्धां स्त्रीचें मुखावलोकन करण्याची परवानगी नव्हती. पुरुष जनानखान्यांत प्रवेश करतांना " मी येतों आहें " असें मोठ्यानें जाहीर करीत. मग आंतील स्त्रियांची पळापळ होऊन त्या ठिकठिकाणीं दडून बसत. महाराष्ट्रांत एवढा नाहीं, पण खानदानी मराठा घराण्यांत स्त्रिया पडदा पाळीतच. पडदा न घालणाऱ्या जातींतील स्त्रियासुद्धां स्वयंपाकघर, माजघरापलीकडे जायला बिचकूं लागल्या, पुरुष घरांत असतांनां अंगणांत तर काय, पण ओटीवरसुद्धां येण्याची त्यांची प्राज्ञा नव्हती. " शामची आई " मध्यें, शामच्या वडिलांचे सावकार, त्यांच्या पंगतीला जेऊन, ओटीवर पानाचा तोबरा भरीत, शामच्या आईच्या संदर्भांत अनुचित शब्द बोलले. " कर्ज फेडवत नाहीं, पैसा नाहीं, चीजवस्तु जवळ नाहीं. मग आतां बायको विका. " अपशब्द कानीं पडतांच, शामची आई विजेसारखी बाहेर येऊन सावकाराला छेडूं लागली. पण, आपण तिथें बसलेलें असतांना बायकोनें ओटीवर येऊन परपुरुषासमोर बोलावें हा शामच्या वडिलांना स्वतःचाच अपमान झाल्यासारखें वाटलें व त्यांनीं बायकोवर, सावकार गेल्यावर ताशेरे झाडले.

अशींच अनेक वर्षें लोटलीं व एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धांत हिंदुस्थान व महाराष्ट्र इंग्रजांच्या एकछत्री अमलाखालीं आला. मनु एकदम पालटला. महाराष्ट्रांत उच्चवर्णीयांची, विशेषतः ब्राह्मणांची अवस्था कठीण झाली. संस्कृत विद्येवर उपजीविका करणारे घनपाठी, जटापाठी, दशग्रंथी ब्राह्मण, मोडींत बोरू कुरुकुरु चालवणारे कायस्थ–सगळेच संकटांत सांपडले. संस्कृत भाषा मृत असल्याचें जाहीर झालें, मेकॉलेसाहेबांनीं एका फटकाऱ्यासरसें देशी भाषा व त्यांतील वाङ्मय कुचकामाचें ठरवलें. इंग्रजी विद्या वाघीण ठरली. पोटापाण्याचा प्रश्न सोडवण्यासाठीं, सातां समुद्रांपलीकडून आलेल्या व आतां घर बळकावून बसलेल्या या वाघिणीचें दूध काढायला सज्ज व्हावें लागलें. अनेक ' वाईकर भटजी ' उपाध्येगिरीवर आतां योगक्षेम निभावणें शक्य नाहीं हें पाहून आपल्या ' बाळयांना ' संस्कृतऐवजीं चार इंग्रजी अक्षरें शिकवावीं, म्हणून आपापले गांव सोडून शहरांत येऊन दाखल झाले व इंग्रजी पाठशाळा हुडकूं लागले. रोजच्या चवली पावली दक्षिणेऐवजीं, वाघिणीच्या दुधाची एखादी धार

तोंडांत पडल्याबरोबर महिन्याकांठीं चाळीस-पन्नास चकचकीत रौप्यमुद्रा तनखा झडूं लागल्यामुळें लोक भुरळून गेले. किंचिदुन्मीलित ओठांतून उमटणारे बोबडे, मृदु बोल कानांत मधासारखे गोड लागूं लागले. त्यापुढें आ वासून, मानेला झटके देत, उंच स्वरांत, प्रत्येक शब्द खणखणीत वाजवीत होणारे वेदघोष वेड-कांच्या डरॉव, डरॉव सारखे कर्णकठोर वाटूं लागले. आगगाड्या, तारायंत्रें, डाकघरें, टेबलखुर्च्या, कवायत, चहाबिस्कुटें वगैरे आंग्ल सुधारणेच्या थाटानें लोकांचे डोळे दिपले होतेच; पण हें झालें आंग्ल संस्कृतीचें फक्त बाह्यांग. या वाघिणीच्या अंगोपांगांकडे विस्मयानें नुसतें टकमक न पाहतां, जे हिमतीनें तिचें दूध घटाघटा प्याले, त्यांच्या डोळ्यांसमोर आंग्ल संस्कृतीच्या अंतरंगींचें भव्य, नेत्रोद्दीपक दालन खुलें झालें. त्या दालनांतील अनोख्या चिजा पाहून विस्मयानें, कौतुकानें, आदरानें त्यांचीं अंतःकरणें भारावून गेलीं. इंग्लिश वाङ्मयांत पडलेलें इंग्रजांच्या चारित्र्याचें प्रतिबिंब त्यांना आदर्श व अनुकरणीय वाटूं लागलें. नेकी, एकजूट, देशाभिमान, वक्तशीरपणा, टापटीप, कार्यकुशलता, उरक इत्यादि इंग्रजांचे नाना गुण विलोभनीय होते. त्यांचें राजकारण, समाजव्यवस्था, वाङ्मय, कला, शास्त्रें — सर्वच अभिनव व म्हणून हवेंहवेंसें वाटण्याजोगें होतें.

इंग्लंडमध्यें राजघराण्याचा थाटमाट, वैभव होतें; व त्याबरोबरच लोक-शाही अधिकाराच्या रुबाबांत नांदत होती. इंग्लिश काव्यांतलें निसर्गप्रेम; कादंबऱ्यांतली वास्तवता व गाढ सामाजिक आशय; नाट्याचा शहेनशहा शेक्सपिअर याच्या अफाट साहित्यांत प्रकट झालेली प्रतिसृष्टि; इंग्रजांचे अर्थगर्भ, सुसूत्र इतिहास; अर्थशास्त्र, राज्यशास्त्र वगैरे शास्त्रांची पद्धत-शीर, तत्त्वशुद्ध मांडणी; विज्ञानाची अद्भुत वाटचाल वगैरे पाहून, अभ्यासून थक्क झालेली तरुण पिढी, इंग्रजांचें आपल्यावर राज्य म्हणजे परमे-श्वराचें वरदान असें मानूं लागली होती. आपल्या विषयाच्या दृष्टीनें झालेला महत्त्वाचा परिणाम इंग्रजांच्या समाजव्यवस्थेचा. स्त्री-पुरुष घरींदारीं, करम-णुकींत, सामाजिक जबाबदारींत समान दर्जानें वावरतांना पाहून आमच्या तरु-णांना एक नवीनच साक्षात्कार झाला. चटकन् अनुकरण करण्याजोगी, व्यक्तीच्या हातूनहि होण्याजोगी ही एक तरी गोष्ट होती. शिक्षणाच्या अभावामुळें आपल्या स्त्रिया आपल्या सहचरी खऱ्याखुऱ्या अर्थानें होऊं शकत नाहींत, असें योग्य निदान करून, या तरुणांनीं आपआपल्या घरीं charity begins at

home या सुभाषिताप्रमाणें या सुधारणेची सुरुवात केली. अर्थात् घरांतील जुन्या पिढीकडून या सुधारणेला कसून विरोध झाला. " आमच्या आयुष्यांतील कांहीं आठवणी " मध्यें रमाबाईसाहेबांनीं आपल्या इंग्रजी शिकण्याला घरांतील वडील स्त्रियांकडून किती विरोध होत असे, याचें वर्णन केलें आहे. आनंदीबाई जोशी यांना उच्च शिक्षणासाठीं परदेशीं पाठवणाऱ्या जोशांना टीकेचे किती प्रहार सोसावे लागले ! या प्रत्यक्ष घडत असलेल्या गोष्टींचें प्रतिबिंब हरि नारायण आपटे यांच्या कादंबऱ्यांत सुंदर पडलें आहे. " पण लक्षांत कोण घेतो " मध्यें यमूचा नवरा रघुनाथराव यमूकडून इसापनीति वाचून घेत असे; अन् हें काम रात्रीच्या हक्काच्या वेळीं तेवढें व्हायचें. कारण दिवसभर वडील माणसांची करडी नजर चुकवून, पुस्तकें ठेवलेल्या नवऱ्याच्या खोलींत जाणें यमूला शक्यच नव्हतें. रघुनाथराव पहिल्या वर्गांत नेहमीं पास होणारा, हुशार, कॉलेज-पदवीधर, पण ट फ करीत वाचणाऱ्या यमूचा अभ्यास घ्यायचा त्यानें कधीं कंटाळा केला नाहीं. न्यायमूर्ति रानड्यांसारखे व्यासंगी विद्वान्, मोठ्या अधिकाराच्या सरकारी नोकरीवर, नाना सामाजिक, धार्मिक, वाङ्मयीन चळवळींत अग्रेसर पण तेही रमाबाईंचा अभ्यास तत्परतेनें करून घेत.

याप्रमाणें हळूहळू या बालपत्न्या तयार झाल्या. नंतर स्वतंत्र बिऱ्हाड परगांवीं करण्याची वेळ आल्यावर, हळूहळू या तरुण स्त्रियांना घराबाहेर पडण्यास त्यांचे पती उत्तेजन देऊं लागले. स्त्री-पुरुषांनीं एकत्र बसून गप्पागोष्टी करणें, स्त्रियांनीं फुरसतीच्या वेळीं कुठें तरी एकत्र जमणें, या छोट्याशा सभांतून बोलण्याची, चर्चा करण्याची संवय करणें वगैरे गोष्टी होण्यास सुरुवात झाली. अर्थात् सनातन्यांना हें सर्वच फार चमत्कारिक वाटत होतें. " असूर्यंपश्या " म्हणून गौरवलेल्या स्त्रिया, पुरुषांच्या खुर्चीला खुर्ची लावून भरसभेंत बसूं लागल्या, परक्या पुरुषांसमोर वर तोंड करून सभांतून भाषणें करूं लागल्या. कलियुगाचा हा प्रभाव – धर्म असा बुडाल्यावर जगबूड कांहीं फार दूर नाहीं; असा आक्रोश सुरू झाला. " पण लक्षांत कोण घेतो " मधल्या यमूनें कुठल्याशा सभेंत एक लहानसें भाषण केलें म्हणून पुण्यास तिच्या सासरीं केवढा आकांत झाला – हें वाङ्मयांतलें चित्र वस्तुस्थितीचें निदर्शक होतें. रमाबाईसाहेबांनीं सभेंत इंग्रजींत एक लहानसें भाषण केलें तेव्हां घरांतल्या वडील स्त्रिया न्यायमूर्तींचा अधिक्षेप करून म्हणाल्या, "बायको भर सभेंत परक्या पुरुषांसमोर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ........................ वि: ......................
क्रमांक ........................ नोंदी दि. ......................


साहेबाच्या भाषेंत फाडफाड बोलली. तेव्हां तुमची पगडी डोक्यावर कशी राहिली ?" मथितार्थ असा कीं, न्यायमूर्तीचें मस्तक लज्जेनें खालीं जावें व पगडी डोक्यावरून खालीं पडावी.

पण विरोधक, स्त्रीशिक्षणाचा व स्त्रीसुधारणेचा हा प्रवाह, निदान मोठ्या शहरांतून तरी थोपवूं शकले नाहींत. भारतांतील इतर प्रांतांप्रमाणें, महाराष्ट्रांतहि आगरकर, महात्मा फुले, भांडारकर, तेलंग, महर्षि कर्वे, देवधर वगैरे समाज सुधारकांच्या प्रयत्नांनीं स्त्रीशिक्षणाचें पाऊल भराभर पुढें पडूं लागलें. मुलींना प्राथमिक, माध्यमिक शिक्षण देण्यासाठीं सरकारी व खाजगी शाळा व हायस्कुलें उघडूं लागलीं. मध्यमवर्गीतील मुलींना शाळेंत पाठवण्याची प्रथा सर्रहा सुरू झाली. वरच्या थरांतून ही सुधारणा हळूहळू खालच्या थरांतून पसरली. स्त्रिया शिकल्या तर नवऱ्याचें आयुष्य कमी होतें अशा तर्कशास्त्राला आव्हान देणाऱ्या खुळ्या कल्पना मागें पडल्या. "पण लक्षांत कोण घेतो" मधल्या बनूताईसारख्या स्त्रीशिक्षणाच्या उद्दिष्टाबद्दलच्या आचरट कल्पना आजकाल कुठें दिसत नाहींत. बनूताई मुंबईला आपल्या भावजयीच्या, यमूच्या बिऱ्हाडांत पाहुणी आली होती. बनूताईला नवऱ्यानें टाकलें होतें. तिच्याबद्दल सहानूभूति वाटून यमूच्या सुशिक्षित, सुशील शेजारणीनें, लक्ष्मीबाईनीं बनूताईला विचारलें, "तुम्हांला लिहायवाचायला येतें का बनूताई ?" लक्ष्मीबाईनां वाटलें, "संसाराला मुकलेल्या या बिचारीच्या आयुष्यांत शिक्षणानेंच काय तो विरंगुळा, समाधान उत्पन्न व्हायचें." बनूताईला मदत करावी, अशा सदिच्छेनेंच लक्ष्मीबाईनीं प्रश्न केला होता. पण बनूताईनें शिक्षणाभावानें संकुचित, कुचकट बनलेल्या मनोवृत्तीनें उत्तर केलें, " हो; येतं ना. लिहायला येतं; वाचायला येतं. यसफ्यस करायला येतं--अन् झालं म्हटलंच तर नवऱ्याच्या हातांत हात घालून फिरायला सुद्धां जातां येतं." अर्थात् बनूताईचा नवरा तिला ही संधि देत नव्हता, ही गोष्ट निराळी. पण तिच्या या उत्तरावरून स्त्रीशिक्षण म्हणजे एक प्रकारचा आचरटपणा, आगाऊपणा ही जुन्या पिढीची कल्पना स्पष्ट दिसते. पण तरुण पिढीनें नेटानें आपल्या ध्येयसिद्धीचा मार्ग चोखाळण्याचें व्रत चालू ठेवलें. ज्या समाजसुधारकांच्या अविरत प्रयत्नांनीं स्त्रियांच्या पदरांत हें ज्ञानामृताचें फळ पडलें, त्या थोर महात्म्यांच्या स्मृतीशीं महाराष्ट्रांतील स्त्रियांच्या तीन पिढ्या कृतज्ञ रहातील.

याप्रमाणें आज पन्नास-साठ वर्षें स्त्री-शिक्षण समाजांत रुळलें आहे. दुय्यम शिक्षण संपवून विश्वविद्यालयीन उच्च शिक्षण घ्यायला स्त्रियांनीं सुरुवात केली, तेव्हांही कडाक्याचा विरोध समाजाकडून झाला. या विरोधाचें मुख्य कारण म्हणजे कॉलेजांतून मुलींना मुलांबरोबर बसावें लागे. मुलींचीं स्वतंत्र हायस्कुलें होतीं पण कॉलेजांत सहशिक्षणच होतें. अर्थात् मुलांचा वारासुद्धां मुलींना लागूं नये म्हणून प्राध्यापक, प्राचार्य दक्ष असत. मुलींचीं बसायचीं बाकें मुलांपासून दूर एका कोपऱ्यांत मांडलेलीं असायचीं. प्राध्यापक वर्गांत आल्यावरच मुली येऊन बसत; तास संपल्यावर प्रथम मुलींना जायला सांगून मग प्राध्यापक वर्गाबाहेर जात. सभांमधून मुलगी भाषण करायला उभी राहिली असे प्रसंग विरळाच असत. जिमखाना कमिटीवर मुलींची प्रतिनिधि म्हणून एक मुलगी निवडून द्यायची अशी प्रथा पडल्यावर, निवडून आलेल्या मुलीला तिच्या लोकविलक्षण धिटाईबद्दल 'झांशीवाली' असा एखादा बहुमानाचा किताब मुलांकडून मिळायचा. कालांतरानें मुली सायन्स, मेडिकल कॉलेजांतून दाखल झाल्या. कायदा, इंजिनिअरिंग क्षेत्रांतहि तुरळक चमकूं लागल्या.

आज कॉलेजांत शिकणारी मुलगी हा नावीन्यपूर्ण अपवाद राहिलेला नसून सर्वसामान्य नियमच झाला आहे. विश्वविद्यालयाच्या सर्व क्षेत्रांतून स्त्रिया प्रवेश मिळवून, पदव्या, पारितोषिकें, शिष्यवृत्त्या पटकावीत आहेत. आर्ट्स् कॉलेजांतून मुलांपेक्षां मुलीच जास्त दिसूं लागल्या आहेत. क्रीडा, संमेलनें, सभा, अभिनय वगैरे सर्वच चळवळींत मुली प्रामुख्यानें भाग घेतांना दिसत आहेत. मुली कॉलेजशिक्षण घेऊं लागल्यामुळें विवाहाची वयोमर्यादा आपोआपच पुढें सरकली आहे. बालविवाह स्मृतिशेष झाले आहेत. विवाहानंतर पुष्कळ स्त्रिया नोकरी किंवा व्यवसाय करून अर्थस्वातंत्र्य प्राप्त करून घेत आहेत. स्त्रिया मिश्र-समाजांत मोकळेपणीं, आत्मविश्वासानें वावरत आहेत. पुरुषांबरोबर क्लबांत जात आहेत. एकाच प्लॅटफॉर्मवर वक्तृत्व गाजवीत आहेत. पुरुषांबरोबर नाना संस्थांच्या कार्यकारीमंडळावरून, समित्यांतून कामें करीत आहेत. नाटकसिनेमांत अभिनयानें उठून दिसत आहेत. आद्य समाजसुधारकांच्या कल्पनांपलीकडे स्त्रीशिक्षणाची, स्त्रीस्वातंत्र्याची, स्त्रीसुधारणेची झेंप पोंचली आहे.

पण ह्या सुधारणांबरोबरच अनेक नव्या समस्या स्त्रियांपुढें व समाजापुढें उभ्या राहिल्या आहेत. स्त्री-शिक्षणाचा प्रयोग यशस्वी झाला; पण त्याच्या अर्ध-

शतकाच्या वाटचालीनंतर आतां तो निरनिराळ्या दृष्टिकोनांतून तपासून पाहण्याची गरज वाटूं लागली आहे. स्त्री-शिक्षण असावें हे निर्विवाद आहे. पण तें कुठल्या पातळीपर्यंत, कुठल्या मर्यादेपर्यंत द्यावें, याबद्दल वाद उपस्थित झाले आहेत. सहशिक्षण असावें कीं नाहीं, स्त्री-पुरुषांचे अभ्यासक्रम निराळे ठेवण्याची जरुरी आहे काय वगैरे अनेक नवे प्रश्न विचारवंतांपुढें व शिक्षण-क्षेत्रांतील कार्यकर्ते व तज्ज्ञ यांच्या पुढें उभे ठाकले आहेत. अनेक मतांचा गलबला होऊन समाजाचा बुद्धिभेद होत आहे. स्त्रियांचें आर्थिक स्वातंत्र्य हाहि एक वादंगाचा मध्यबिंदु बनला आहे. अर्थार्जनासाठीं पांचसहा तास स्त्रिया घराबाहेर राहूं लागल्या तर कुटुंबाची व समाजाची घडी मोडेल, कौटुंबिक सुख व समाजस्वास्थ्य धोक्यांत येईल अशी कांहीं विचारवंतांना प्रामाणिक शंका वाटत आहे. याप्रमाणें आर्थिक स्वातंत्र्याचा आग्रह धरणाऱ्या सुशिक्षित स्त्रिया समाजाचे यक्षप्रश्न बनल्या आहेत व सुशिक्षित, अर्थार्जनक्षम असूनहि फक्त गृहिणीपद व मातृपद सांभाळणाऱ्या स्त्रिया वैफल्यानें ग्रासून गेल्या आहेत. जुन्या व नव्या पिढीचा संघर्ष, स्त्रीजीवनाकडे बघण्याच्या नव्या दृष्टिकोणामुळें समाजांत व विशेषतः कुटुंबांत तीव्रतर होऊं लागला आहे. स्त्रीशिक्षणापूर्वी स्त्रियांची प्रत्येक पिढी ही एकाच कित्त्याचीं वळणें होतीं व तीं तशींच राहावीं म्हणून कटाक्षानें प्रयत्न होत होता. पण स्त्रीशिक्षणानंतर कित्त्याचें वळण बदललें. जुन्या पिढीच्या डोळ्यांनां हें वळण शल्यासारखें खुपूं लागलें. स्त्रियांची जुनी पिढी मनस्तापानें दुःखी झाली; नवी पिढी चक्रव्यांत सांपडली. या दुःखाची झळ पुरुषवर्गाला व समाजालाहि साहजिकच जाचक होऊं लागली. यामधून सुटण्याच्या मार्गाची शोधाशोध ठिकठिकाणीं सुरू आहे.

या सर्व समस्यांचा विचार व जमल्यास उकल पुढील प्रकरणांतून करण्याचा विचार आहे.

* * *

प्रकरण २ रें

# स्त्रीशिक्षण व त्यांतून उद्भवलेले प्रश्न

**स्त्री**-शिक्षण सुरू झाल्यानंतर पहिलीं कांहीं वर्षें मुलांना दिलें जाणारें शिक्षणच मुलींना दिलें जात होतें. प्राथमिक शिक्षणाच्या क्षेत्रांत वेगळेपणाचा प्रश्नच उद्भवत नव्हता. इंग्रजींत ज्यांना तीन 'आर्स् (R's)' म्हणतात— reading, writing, 'rithmetic—किंवा ज्यांना आपण मराठींत तीन 'णें' म्हणूं – लिहिणें, वाचणें, गणणें (मोजणें, गणित) त्याचें शिक्षण मुलां-मुलींना समानच असावें, याबद्दल वाद नव्हता. शहरांतील म्युनिसिपालिट्यांनीं हें शिक्षण देण्यासाठीं मुलांमुलींच्या पृथक् शाळा उघडल्या. दुय्यम शिक्षण देण्यासाठीं शहरांतून मुलींसाठीं खाजगी संस्थांनीं सरकारी मदतीनें हायस्कुलें उघडलीं. या हायस्कुलांतून, शिवण सोडलें तर बाकीचा अभ्यासक्रम मुलांप्रमाणेंच असे व मुलें-मुली एकाच म्हणजे प्रवेश–परीक्षेला बसत; कारण मुलांमुलींना ही परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर एकाच विश्वविद्यालयांत पुढील शिक्षणासाठीं दाखल व्हावयाचें असे. महर्षि कर्वे यांनीं जपानप्रमाणें स्त्रियांसाठीं स्वतंत्र, विशिष्ट अभ्यासक्रमाचें विश्वविद्यालय असावें ही कल्पना महाराष्ट्रांत आणली (१९१६). मुलींचा जीवनक्रम विवाहानंतर मुलांच्या जीवनक्रमापेक्षां अगदीं भिन्न असल्यामुळें त्यांना मुलें घेत असललेलें शिक्षण देऊं नये, सुगृहिणी, सुमाता होण्याचें ध्येय स्त्रियांचें असावें व ध्येयसिद्धीला साहाय्यरूप असा भिन्न अभ्यासक्रम या स्त्रियांच्या विश्वविद्यालयांत असावा, असा प्रचार

अण्णासाहेब कर्वे, गो. मा. चिपळूणकर आदींनीं महाराष्ट्रांत केला. या विश्वविद्यालयाच्या पहिल्या पदवीपरीक्षेचें, बी. ए. च्या पायरीचें, नांव " गृहीतागमा " असें ठेवण्यांत आलें. लोकांना पदवीचें हें नांव पण मोठें सूचक वाटलें. खरें म्हणजे " गृहीतागमा " म्हणजे जिनें विद्या ग्रहण केली आहे, असा या पदवीचा आशय. पण लोकांना आपलें " गृहीतागमा " म्हणजे गृहाशीं, घराशीं कांहींतरी संबंध असलेली असें वाटलें व त्यामुळें गृह चालविणारी गृहिणी या विश्वविद्यालयांतून तरबेज होऊन बाहेर पडणार, असा लोकांचा ग्रह होऊन बसला आहे.

अर्थात्, या नवीन अभ्यासक्रमाच्या विश्वविद्यालयाला feeding schools म्हणजे प्रवेशेच्छु विद्यार्थिनी तयार करणाऱ्या, निराळ्या अभ्यासक्रमाच्या दुय्यम शाळांची गरज उत्पन्न झाली. या स्त्रियांना विश्वविद्यालयाचें शैक्षणिक माध्यम मातृभाषा राहील असें ठरल्यामुळें तर अशा स्वतंत्र शाळांची गरज जास्तच निकडीची ठरली. कारण त्या सुमारास मुंबई विश्वविद्यालयाच्या प्रवेश-परीक्षेच्या अभ्यासक्रमाचें माध्यम इंग्लिश होतें. मराठी माध्यमाच्या, गणिता-सारखे मुलींना बिकट व निरुपयोगी ठरणारे विषय इच्छेनुसार कटाप करण्याची सोय असलेल्या, गृहजीवनशास्त्र, बालमानसशास्त्र वगैरे मुलींना उपयुक्त विषयांचें शिक्षण देणाऱ्या कन्याशाळा पुणें, सातारा, मुंबई येथें उघडल्या गेल्या (१९१७). भावी मातांना दिलें जाणारें शिक्षण मातृभाषेंतूनच दिलें जावें असा आकर्षक योग या संस्थांतून साधण्यांत आला. पण अनुभवांतीं हा योगच या संस्थांच्या लोकाश्रयाच्या आड आला. इंग्रजी भाषेची भुरळ, त्या भाषेंत सफाईनें बोलण्याची हातोटी साधण्याची आवड व महत्त्वाकांक्षा, इंग्रजी भाषेबरच्या प्रभुत्वामुळें समाजांत, व्यवसायांत पडणारी छाप अजून कायम होती, दिवसेंदिवस वाढत होती. इंग्रजींतून अस्सल इंग्रजासारखें बोल-ण्याची कला साध्य व्हावयास हवी असेल तर प्रथम इंग्रजींतून मनांत विचार करण्यास शिकलें पाहिजे, (think in English) असें शाळाकॉलेजांतून इंग्रजी भाषेचे शिक्षक कळकळीनें प्रतिपादित होते. अशा परिस्थितींत इंग्रजी माध्यम नसलेल्या शाळांतून आपल्या मुलींना पाठवायला पालक राजी होईनात. शिवाय या स्त्रियांच्या विश्वविद्यालयावर अजून सरकारी मान्यतेचें शिक्कामोर्तब झालें नव्हतें. राजमान्य नसलेली संस्था वा मतप्रणाली लोकमान्य होई ती

फक्त जहाल ठरलेल्या राजकारणांत. सुधारक समजल्या जाणाऱ्या, पाश्चात्य विद्याविभूषित, उदारमतवादी म्हणवणाऱ्या संपन्न समाजाच्या थरांत, राजमान्य नसलेल्या संस्थेकडे लोकांनीं पाठ फिरविली यांत आश्चर्य नाहीं.

नवीन काढलेल्या संस्थांना "पैसे द्या" म्हणून संचालकांना दारोदार झोळी फिरवावी लागते. पण कन्याशाळांचे चालक "मुली द्या" म्हणून पालकांपाशीं याचना करीत होते. १९२० सालीं सुरू झालेल्या असहकारितेच्या राजकारणी चळवळीनें या कन्याशाळांना थोडासा फायदा करून दिला. सरकारी शाळा-कॉलेजें ओस पाडण्याच्या घोषणेमुळें कांहीं मुली—पण फारच थोड्या प्रमाणांत – मुंबई विश्वविद्यालयाच्या प्रवेश परीक्षेसाठीं विद्यार्थिनी तयार करणाऱ्या शाळा सोडून, स्त्रियांच्या युनिव्हर्सिटीला जोडलेल्या कन्याशाळांतून दाखल झाल्या. पण एकंदरींत बरींच वर्षें या कन्याशाळा रोडावलेल्या होत्या. ज्या मुलींना इंग्रजी माध्यमांतून शिक्षण झेंपत नव्हतें, ज्यांचें गणित कच्चें होतें, अशा मुली, पालक इंग्रजी हायस्कूलांतून काढून कन्याशाळांत घालीत. चांगल्या, बुद्धिमान् विद्यार्थिनी न मिळाल्यामुळें कदाचित्, या शाळांतील शिक्षणाचा दर्जा कमी प्रतीचा आहे, अशी लोकांची समजूत असे. पुढें प्रांतांतून द्विदल राज्यपद्धति सुरू होऊन १९२० च्या सुमारास शिक्षणखातें लोकाभिमुख झालें, तेव्हां स्त्रियांच्या युनिव्हर्सिटीच्या जी. ए. या पदवीला सरकारी नोकरीसाठीं सरकारी मान्यता मिळाली. तरीसुद्धां नेहमीं घडतें त्याप्रमाणें कागदोपत्रींच्या सवलती कागदपत्रांतच राहिल्या. जी. ए., बी. ए. पेक्षां कमी दर्जाची पदवी आहे ही समजूत कांहीं लोकांच्या डोक्यांतून दूर झाली नाहीं. आतां या युनिव्हर्सिटीला सरकारी चार्टर मिळाल्यामुळें कदाचित् या पूर्वग्रहांत फरक पडला असेल. खरें पाहूं गेलें असतां, या विश्वविद्यालयाचे अभ्यासक्रम, पहिल्यापासूनच उच्च दर्जाचे दिसत. वामन मल्हार जोशी, कमलाबाई देशपांडे, लागू, मायदेवांसारखे मान्यवर शिक्षक या संस्थेला लाभले होते. पण तरीसुद्धां पालकांचा ओढा व विद्यार्थिनींचा लोंढा या संस्थेकडे वळला नाहीं. आज अर्थात्, विद्यार्थिनींची संख्या बेसुमार वाढल्यामुळें कुठल्याहि शाळेंत गर्दी होते. मुंबईमध्यें मॉंटेसरी शाळांत प्रवेश मिळण्यासाठीं गर्भावस्थेंतच मुलाचें नांव नोंदून ठेवावें लागतें. जसें पूर्वी नवा डॉक्टर सहा महिने पाटी लावून बसला तरी त्याच्या फुकट्या मित्रांखेरीज त्याच्याकडे कुणी येत नसे;

पण आज मात्र नव्या जुन्या सर्वच डॉक्टरांच्या दवाखान्यांपुढें रुग्णांच्या बाऱ्या ( queues ) लागलेल्या दिसतात. याचें कारण म्हणजे लोकांमध्यें, रोग बळावूं न देतां आरंभींच योग्य उपचार करण्याबद्दलची जाणीव. विभक्त कुटुंब-पद्धतीमुळें घरांत अनुभवी वडील माणसें औषधपाणी सांगावयास नसल्यामुळें तरुण माणसें जरा कांहीं झालें कीं डॉक्टरकडे धांव घेतात, हेंहि खरेंच. हीच गोष्ट स्त्री-शिक्षणाची. एकंदरीनेंच लोकसंख्या भरमसाट वाढत असल्यामुळें शिकाऊ मुलींची संख्या वाढत आहे; दुसरें, स्त्रीशिक्षणाची आवश्यकता बहुतेकांस पटली आहे. मग ती मुलीला चांगलें स्थळ मिळावें म्हणून असो; किंवा मुलगी शिकून नोकरी करून, बापाच्या संसाराला हातभार लावील म्हणून असो. एकंदरीनें शिकणाऱ्या मुलींची संख्या वाढूं लागल्यामुळें सर्वच शाळा-कॉलेजांतून गर्दी होऊं लागली. याचा अर्थ मुलींसाठीं निराळे अभ्यासक्रम असावेत हें तत्त्व लोकमान्य झालें, असा करतां येणार नाहीं. अजूनहि दुसऱ्या विश्वविद्यालयांना जोडलेल्या कॉलेजांमध्यें प्रवेश मिळवण्याचा प्रथम प्रयत्न करण्यांत येतो. तेथें ' गुण ' कमी पडल्यामुळें प्रवेश मिळाला नाहीं, म्हणजेच स्त्रियांच्या विश्वविद्यालयाकडे पालक व पाल्य वळतात.

मुलींचे अभ्यासक्रम मुलांच्याहून निराळे असावेत, हें तत्त्व ग्राह्य झालें कीं सहशिक्षणाचा प्रश्न आपोआपच सुटेल. कारण मग निराळ्या अभ्यासक्रमांसाठीं पृथक् शाळा व कॉलेजें काढावींच लागतील. पण भिन्न अभ्यासक्रमाचें तत्त्व जोंवर एकमतानें मान्य झालें नाहीं, तोंवर सह-शिक्षणाच्या प्रश्नावर वाद माजणारच.

भिन्न अभ्यासक्रमाबद्दलच्या मतांचा प्रथम विचार करूं या. एका पक्षाचें म्हणणें कीं स्त्रीचें कार्यक्षेत्र घरकाम व अपत्यसंगोपन, तेव्हां तद्विषयक ज्ञान तिला तिच्या शिक्षणापासून प्राप्त झालें पाहिजे. पण ही भूमिका आधुनिक मतप्रणालीला मान्य होणार नाहीं. स्त्री ही जशी सुगृहिणी, सुमाता व्हावयास पाहिजे तशी ती उत्तम नागरिक, समाजाची एक कार्यशील घटक व राष्ट्राची सच्ची पुत्री पण झाली पाहिजे. तिनें फक्त ' स्वकुलतारक सुता 'च न राहतां, राष्ट्राला तारण्यास मदत केली पाहिजे. नुसती आपल्या बालकांचीच माता होऊन न राहतां, समाजांतील दलितांना, ' रंजल्या गांजल्यांना ' तिनें ' आपुलें ' म्हटलें पाहिजे. असें चौरस कार्य करण्याची पात्रता अंगीं

येण्यासाठीं स्त्रीला चौरस, पुरुषांसारखें, शिक्षण द्यावयास नको काय ? मग गृहजीवनशास्त्रच शिकवून न थांबतां तिला राज्यशासनशास्त्र, अर्थशास्त्र वगैरे शिकावयास पाहिजे यांत शंका नसावी. उलट पक्षीं मी तर असें म्हणेन कीं, आधुनिक जमान्यांत स्त्री-पुरुषांना एकमेकांचीं कर्तव्यें करण्याची वेळ येत असल्यामुळें, पुरुषाला सुद्धां स्त्रीच्या जीवनाला आवश्यक समजलें जाणारें शिक्षण दिलें पाहिजे. आतां स्त्री घराबाहेर पडून अर्थार्जन करते. कधीं संसाराला मदत म्हणून, तर कधीं हौसेनें, घेतलेलें शिक्षण फुकट जाऊं नये म्हणून. स्त्रिया जर कचेऱ्यांतून, प्रयोग शाळांतून कामें करण्याचें शिक्षण घेतात व तीं कामें उत्तम करून दाखवतात, तर पुरुषानें स्वयंपाकघर-माजघरांतून कामें करण्याचें शिक्षण कां घेऊं नये व पत्नीच्या गैरहजेरींत किंवा तिला जरा आराम म्हणून तीं कामें कां करूं नयेत. बाहेरच्या जगांत पुरुषाच्या खांद्याला खांदा भिडवून स्त्री कामें करण्यास उभी ठाकली आहे; मग घरांतून स्त्रीच्या हाताला हात भिडवून पुरुषानें स्वयंपाक, रुग्णपरिचर्या, बालसंगोपन इत्यादि कामांची माहिती घेऊन तीं कुशलतेनें करण्यास तयार कां होऊं नये ? तेव्हां प्राथमिक शिक्षणाप्रमाणेंच दुय्यम शिक्षणहि स्त्रीपुरुषांना समान ठेवण्यास हरकत नाहीं. दोन हजार वर्षांपूर्वी होऊन गेलेल्या प्लेटो या ग्रीक तत्त्ववेत्त्यानें स्त्री-पुरुषांचीं जीवित कार्यें सारखींच असल्यामुळें त्यांना समान शिक्षण द्यावें असें प्रतिपादिलें आहे. आतां स्त्रीचा बव्हंशी जास्त वेळ घरकामांत व बालसंगोपनांत जात असल्यामुळें तिनें त्या त्या विषयांत 'खास अभ्यास' (specialisation) हवा तर करावा. शाळा-कॉलेजांतून सक्तीच्या विषयांबरोबर दोन-तीन विषय ऐच्छिक ठेवण्याची प्रथा आहेच. सध्यां तर S. S. C. च्या शालान्त परीक्षेच्या अभ्यासक्रमांत अगणित ऐच्छिक विषय आले आहेत. मुलांनीं त्यांपैकीं सुतारकाम, टायपिंग वगैरे विषय निवडावे व मुलींनीं गृहजीवनशास्त्रविषयक अभ्यासक्रम ऐच्छिक म्हणून घ्यावे. तेव्हां दुय्यम शिक्षणांत मुलामुलींचे अभ्यासक्रम व परीक्षा इत्यादि आमूलाग्र निराळ्या ठेवावयास हव्यात असें नाहीं. मुलींच्या शाळा निराळ्या असतातच. त्यांमध्यें मुलींनीं निवडलेले ऐच्छिक अभ्यासक्रम—सूपशास्त्र, गृहसजावट, धुणें, इस्त्री करणें, शिवणभरत काम, अपत्यसंगोपन वगैरे शिकवण्याची व त्या त्या विषयांच्या प्रात्यक्षिकांसाठीं सुसज्ज प्रयोगशाळांची सोय असावी.

विश्वविद्यालयाच्या पातळीला तर मुलामुलींचीं ऐच्छिकें योजून निराळीं ठेवण्याची बिलकूल गरज नाहीं असें मला वाटतें. विश्वविद्यालयीन शिक्षणाचा उद्देश दुय्यम शिक्षणाप्रमाणें केवळ सर्वसाधारण ज्ञान व कांहीं कांहीं प्रात्यक्षिकांत नैपुण्य असा नसून, व्यक्तिमत्त्वाचा विकास हा आहे. स्वतःची ओळख पटवून घेऊन, नंतर त्या ज्ञानाच्या द्वारा सृष्टीचें गूढ उकलण्याचा प्रयत्न करणें, हें सर्व धर्मांच्या मतें मनुष्यजन्माचें उद्दिष्ट आहे. हें ध्येय साध्य करण्यास विश्वविद्यालयीन शिक्षण साहाय्यरूप झालें पाहिजे—तरच तें 'उच्च शिक्षण' या संज्ञेस पात्र होईल. स्वतःची ओळख पटल्याशिवाय जीवनाचा अर्थ समजणार नाहीं. 'पिंडीं तें ब्रह्मांडीं' या आपल्याकडच्या सुप्रसिद्ध वचनाची यथार्थता आतां पद्मभूषण जयंत विष्णु नारळीकर यांनीं प्रो. हॉईल यांच्या सहकार्यानें गणित मांडून सिद्ध करून दाखविली आहे. प्राथमिक शिक्षणानें माणूस साक्षर होतो. ढलपा बोलका होतो. दुय्यम शिक्षणानें ज्या व्यावहारीक जगांत वावरावयाचें, त्याच्या व्यापारांचें सम्यक् ज्ञान होऊन व्यक्ति या जगांत न चांचपडतां आपली अधिभौतिक प्रगति साधूं शकते. उच्च शिक्षणानें आत्मविकास होऊन आत्मोद्धाराचा मार्ग दिसूं लागतो. उच्च शिक्षण तिसरा डोळा, ज्ञानचक्षू उघडतें, अंतरींचा ज्ञानदिवा प्रज्वलित करतें. उच्च शिक्षणानें विचारशक्तीच्या कक्षा रुंदावतात, भावनांचें उदात्तीकरण होतें. विवेकशक्ति सूक्ष्मदर्शी व तेजस्वी होते व मनुष्य 'परिणतप्रज्ञ' होतो. मग असें हें उच्च शिक्षण स्त्री-पुरुषांस समान असावें यांत वादच नाहीं. स्त्रीचें मन, बुद्धि, भावना, विवेकशक्ति, आत्मिक सामर्थ्य कांहीं पुरुषांहून भिन्न नसतें. आतां मध्यंतरींच्या 'शबल युगांत' शास्त्राद्रूढिर्बलीयसी ठरल्यामुळें त्या दडपणाखालीं 'स्त्रीची अक्कल चुलीपुरतीच असते', 'स्त्रीचा मेंदू पुरुषापेक्षां कमकुवत असतो', 'स्त्रीची मनोवृत्ति संकुचित, ऱ्हस्वदृष्टि असते' वगैरे 'पापग्रह' उच्चींत होते, पण विज्ञानानें सिद्ध झालें आहे कीं, स्त्री-पुरुषांच्या बुद्धिमत्तेंत, विचारशक्तींत कांहींहि फरक नसतो; व प्रत्यक्ष वस्तुस्थितींतहि हें खरें असल्याची साक्ष पटते. मादाम क्यूरी व त्यांची कन्या, पर्ल बक, व्हॅलेंटिना वगैरे स्त्रियांनीं निरनिराळ्या क्षेत्रांत पुरुषांच्या बरोबरीनें कर्तृत्व करून दाखवलें आहे, व आपल्या बुद्धीच्या झेंपीनें डोळे दिपवून टाकले आहेत. भारतांत ही समान संधि व मोकळीक नसूनहि पंडिता रमाबाई, विजयालक्ष्मी पंडित, सरोजिनी नायडू, इंदिरा गांधी यांसारख्या

स्त्रीरत्नांनीं, स्त्रिया कुठल्याहि बाबतींत पुरुषांपेक्षां उण्या पडणार नाहींत, हें सिद्ध करून दाखवलें आहे.

आतां कुणी असें म्हणेल कीं, हीं सर्व विश्वविद्यालयीन शिक्षणाचीं ध्येयें आपण गृहीत धरलीं खरीं, पण प्रत्यक्षांत तीं कुठें सिद्ध होत आहेत? सध्यांच्या शिक्षणक्रमाविरुद्ध दोन आक्षेप नेहमीं पुढें आणण्यांत येतात. पहिला आक्षेप हें उच्च शिक्षण रोजच्या दैनंदिन व्यवहारांत उपकारक ठरत नाहीं; दुसरा आक्षेप उच्च शिक्षणाचे उदात्त उद्देश या शिक्षणानें साध्य होत नाहींत. हे दोन दोष सध्यांच्या शिक्षणपद्धतींतून व ही पद्धत ज्यांनीं आंखली त्यांच्या विशिष्ट मनोभूमिकेमुळें उद्भवले आहेत.

सध्यांची शिक्षणपद्धति, अभ्यासक्रमांची आखणी वगैरे आमच्या इंग्रजी राज्यकर्त्यांनीं १८३५ सालापासून सुरू केली. हिंदुस्थानांत या स्वरूपाचें शिक्षण देणें सुरू करण्याचे राज्यकर्त्यांचे उद्देश दोन. एकतर "White Man's burden", गोऱ्या माणसाच्या शिरावर परमेश्वरानें लादलेली दलितोद्धाराची जबाबदारी पार पाडण्यासाठीं, अज्ञानांधकारांत चांचपडणाऱ्या भारतीय जनतेला ज्ञानप्रकाश दाखवणें; आपल्या उच्च संस्कृतीच्या शिक्षणानें असंस्कृत हिंदूंचा उद्धार करणें. हे अर्थात् दाखवावयाचे दांत होते. चावायचे दांत खरे आंतून निराळेच होते. खंडप्राय असा देश जिंकून तर घेतला; तोसुद्धां ईस्ट इंडिया कंपनीच्या निषेधाचे खलिते– "आपणांस सैन्य वाढवायचें नाहीं; मुलखगिरी करायची नाहीं; व्यापार वाढवण्याकडे फक्त लक्ष द्या" सारखे येत असतांना, कांहीं महत्त्वाकांक्षी, गरुडझेंपीच्या इंग्रज अधिकाऱ्यांच्या ईर्षेमुळें, प्रतापी इंग्रजसरकारच्या छत्राखालीं आला. पण आतां या अवाढव्य मुलखाचा राज्यकारभार कसा व कुणी चालवायचा? छोट्याशा इंग्लंड देशांतून सर्व लहानमोठ्या अधिकाराचे कर्मचारी आणणें शक्य नव्हतें. शिवाय उष्ण कटिबंधांतल्या या देशांत सर्वच साहेबांना प्रकृतिस्वास्थ्य राखून व डोकें थंड ठेवून काम करणें जमलें नसतें. तेव्हां मोठीशी इच्छा असो वा नसो एतद्देशीयांना हाताशीं धरून त्यांच्याकडून राज्ययंत्राचीं चाकें फिरवून घेणें अपरिहार्य होतें. तेव्हां इंग्रजी लिहितांवाचतां यावें, इंग्रजींतून आंकडेमोड करतां यावी या उद्देशानें इंग्रजी हायस्कुलें हिंदी लोकांसाठीं सरकारनें उघडलीं.

विलायतेंतील प्राथमिक शिक्षण आमच्याकडे दुय्यम शिक्षण म्हणून दिलें

जाऊं लागलें. दहा–बारा वर्षांच्या, मराठींतून चांगल्या दर्जाचें वाङ्मय वाचून त्याचें रसग्रहण करूं शकणाऱ्या मुलांना "झाडाखालीं गाई आहेत", "मेजावर पुस्तक आहे" अशा सुभाषितांनीं परिपूर्ण आंग्ल भाषाडोहांत, जीव घाबरा होईपर्यंत बुड्या मारण्याची वेळ आली. याच दर्जाचे इतरहि शिक्षणक्रम आखले गेले. इतिहासाच्या पाठ्यपुस्तकांत, बाबराच्या कारकीर्दीचें वर्णन त्यानें हुमायुनाच्या अंथरुणाभोंवती प्रदक्षिणा घालून त्याचें दुखणें आपल्यावर ओढवून घेतलें एवढेंच असे. हुमायुनाचा इतिहास म्हणजे अकबराच्या जन्माच्या वेळीं, वाळवंटांत त्यानें कस्तुरी कशी वांटली हा एवढाच. तान्ह्या मुलाला पाजावयाच्या दुधाप्रमाणें, पाणी घालून पचावयास हलका केलेला पांचट इतिहास आमचीं मुलें शिकूं लागलीं. जणूं आमच्या दहा-बारा वर्षांच्या मुलांनां भारतावरील मोंगलांच्या आक्रमणाचें, त्यामुळें देशांत झालेल्या स्थित्यंतराचें आकलनच झालें नसतें. विशेष नवलाची गोष्ट म्हणजे त्या वेळीं हिंदुस्थानाच्या इतिहासाची सुरुवात बाबरापासूनच होत असे. तत्पूर्वींच्या हिंदु राजांच्या वैभवाचा, त्यांच्या अमलाखालीं झालेल्या भारतवर्षाच्या सर्वांगीण उन्नतीचा इतिहास मुलांपुढें ठेवलाच जात नसे. आणि हें इतिहासाचें गाढ ज्ञान विद्यार्थ्यांनें आपल्या लंगड्या, तोकड्या इंग्रजी भाषेंतून प्रकट करावयाचें! ज्या पूर्वेतिहासापासून विद्यार्थ्यांनें स्फूर्ति घ्यावयाची तो इतिहास शिकवण्याची ही तऱ्हा.

आमच्या देशी भाषांतील वाङ्मयावर तर मेकॉलेसाहेबांनीं आपला कुप्रसिद्ध पढतमुर्खी शेरा मारून ठेवलेला असल्यामुळें, त्या विद्यार्थ्यांना शिकवण्याच्या बाबतींत हीच शोचनीय स्थिति होती. "साऱ्या देशी भाषांमधल्या साहित्यांतल्या उत्कृष्ट कृति गोळा केल्या तरी ग्रंथालयांतील एक खणसुद्धां त्यानें भरणार नाहीं" असें मेकॉलेसाहेबानें विधान केलें होतें. त्याला स्वतःला अर्थात् या सर्व साहित्याशीं तोंडओळख करून घेणें शक्यच नव्हतें. ज्या देशबुडव्या 'सूर्याजी पिसाळां'नीं ही माहिती साहेबाला पुरवली त्यांनीं हा मातृद्रोह करून काय मिळविलें असेल तें हरि जाणे. पण मेकॉलेसाहेबासारख्या प्रकांड पंडितानें, अपुऱ्या माहितीच्या आधारावर असें घाईनें मत बनवावें हें उचित नव्हे. मराठींतील ज्ञानेश्वरी व संतवाङ्मय, व्रजभाषेंतील मीराबाईचीं पदें, हिंदींतील तुलसीरामायण व कबिराचे दोहे, गुजराथींतील नरसी मेहताचें भक्तिरसानें ओथंबलेलें काव्य, बंगालींतील चैतन्यप्रभूचें रसीलें वाङ्मय, उडिया, तेलगू,

तामीळ, कन्नड इत्यादि प्रगत भाषांतील वाङ्मय जाणणारे पंडित शोधून काढून साहेबानें त्यांच्याकडून देशी भाषांतील वाङ्मयाची माहिती करून घ्यावयास हवी होती. कारण साहेब तसा जातीचा व्यासंगी. भारतांतील निरनिराळ्या गॅझेटिअर्समधली माहिती इंग्रजांनीं अभ्यासपूर्वक जमवलेली आढळते. हिंदुस्थानांतल्या इंचइंच जमिनीचा 'सर्वे' करून त्या भूपृष्ठाचे नकाशे इंग्रजांनींच श्रमपूर्वक तयार केले आहेत. निरनिराळ्या प्रदेशांतल्या आदिवासी जनतेची भाषा, चालीरीती यांचा अभ्यास करून बहुमोल ग्रंथ इंग्रजांनीं लिहिलेले आहेत व ते आजसुद्धां त्या त्या विषयांत प्रमाण मानले जात आहेत. पण मेकॉलेसाहेब या क्षेत्रांत तेवढा उणा पडला व त्यामुळें आमच्या शिक्षण-पद्धतीचें व अभ्यासक्रमाचें मातेरें झालें. त्याचे दुष्परिणाम आम्हीं आजतागायत भोगीत आहोंत. प्राथमिक शाळांतून नेमावयाच्या मातृभाषेंतील पाठ्य-पुस्तकांत समाविष्ट करतां येईल असें साहित्य पाठ्य-पुस्तक समित्यांना देशी भाषांत आढळलें नाहीं व त्यामुळें पारशी स्त्रीनें रचलेलीं "वहावा, वहावा चेंडू हा, सुंदर कितितरि खचित अहा" अशीं काव्यकुसुमें आमचीं मुलें पाठ करूं लागलीं. आईच्या प्रेमाची कविता हवी म्हणून इंग्रजी वाङ्मयाकडे धांव घ्यावी लागली. "रडवें माझें वदन बघोनी, भूक लागली हें जाणोनी, कोण उगें करि मज पाजोनी, तीं माझी आई—" ही पन्नास वर्षांपूर्वी प्रसिद्ध असलेली कविता एका इंग्लिश भावगीताचें भाषांतर होतें, हें कुणाला खरेंसुद्धां वाटणार नाहीं. पण वस्तुस्थिति अशी होती खरी.

सारांश, इंग्रजांनीं जो अभ्यासक्रम आपल्या शिक्षणाच्या आराखड्यांत घातला, तो विद्यार्थ्यांचा आत्मविकास व्हावा, त्याच्या अंगभूत गुणांचा उत्कर्ष होऊन त्याचा उपयोग देशोन्नतीला व्हावा, म्हणून नव्हे; तर केवळ त्याला इंग्रजी भाषेचें तात्पुरतें ज्ञान होऊन, काळी नागीण त्याला कागदावर कसबानें खेळवतां यावी म्हणून. साहजिकच शिक्षणाचा अर्थ व ध्येय नोकरी एवढेंच ठरत चाललें व त्यामुळें स्त्रीशिक्षण मागें पडलें. 'स्त्रियांनीं शिकून काय करायचें आहे? त्यांना नोकरी थोडीच करायची आहे' हा मुद्दा सरळ व वाजवी वाटूं लागला. इंग्रज राज्यकर्तेहि प्रथम स्त्रीशिक्षणाच्या वाटेस गेले नाहींत. त्या काळीं देशी धर्मांना, रूढींना आपल्या कुठल्याहि कृतीनें धक्का लागूं नये म्हणून इंग्रज फार जपत होते. राज्यकर्त्यांना सल्ला देणाऱ्या पंडितांनीं सांगितलें असावें कीं,

' आमच्या धर्मांत स्त्रियांना वेदाधिकार नाहीं—ज्ञानाचा, शिक्षणाचा अधिकार नाहीं. आमच्या स्त्रियांचा समाजांतील दर्जा अर्भक किंवा सेवक या पायरीचा आहे. ' इंग्रज बिचारा चूप बसला. १८३५ च्या शिक्षणविषयक फतव्यांत, स्त्रीशिक्षणाचा उल्लेख कटाक्षानें गाळण्यांत आला. पुढें १८५४ च्या खलित्यांत मात्र उपर्युक्त तरुण पिढीच्या आग्रहावरून लोकमत अजमावून स्त्री-शिक्षणाच्या कलमाचा समावेश झाला. ठिकठिकाणीं मुलींसाठीं सरकारी व खाजगी अशीं स्वतंत्र हायस्कुलें निघालीं. पण अद्यापि शिक्षण म्हणजे नोकरी मिळवण्याचें साधन हेंच समीकरण लोकांच्या डोक्यांत पक्कें बसलेलें असल्यामुळें, थोड्या सुधारकांच्या मुलींशिवाय, मुली शाळेंतून पाठवल्या जात नव्हत्या. पालकांच्या मतें घरकाम, मुलें संभाळणें या कामांना शिक्षणाची आवश्यकता नव्हती. "अंगावर पडलें कीं आपोआप येतें " असें म्हणून कोंवळ्या मुलींना, कांहींहि प्रशिक्षणाशिवाय, आईबाप खुशाल संसाराच्या गाड्याला जुंपीत. पशुपक्षी जसें " सहजवृत्तीच्या " ( instinct ) जोरावर आपल्या पिलांना वाढवितात, तसेंच उत्क्रांत असूनहि मानवाची स्त्री आपलीं मुलें वाढवूं लागली.

पुढें तरुण पिढीच्या आग्रहानेंच, नवऱ्या मुलानें शिकलेली बायको पाहिजे असा हट्ट धरल्यामुळें पालक मुलींना शालेय व नंतर हळूहळू कॉलेज शिक्षणहि देऊं लागले. तरी अद्यापिहि जुनी पिढी बायकांना शिकवायच्या या नवीन खुळाला नाकें मुरडीतच होती. बी. ए., एम्. ए. होऊन भाकऱ्या भाजायचें किंवा पोरें मोठीं करायचें ज्ञान कांहीं होत नाहीं; मग उगीच शिकून वेळ, पैसा, मेहनत कां खर्ची घालावी अशी त्यांची विचारसरणी होती. ही गोष्ट खरी होती हें आपण वर पाहिलेंच. मुलांच्या शिक्षणाचाहि त्यांच्या नित्य, कौटुंबिक जीवनांत उपयोग होत नव्हता; पण लक्षांत घेण्याजोगी मौज म्हणजे " नित्य जीवनांत उपयोग नाहीं म्हणून मुलांना तें शिक्षण देऊं नये " असें मात्र कुणी म्हणत नव्हतें. बी. ए., एम्. ए. झाल्यानें बाजारांतून चांगली, स्वस्त भाजी कशी आणावी हें मुलांना समजत नाहीं, म्हणून त्यांना कॉलेजांत पाठवूंच नये, असें कुणाच्या मनांतहि येत नव्हतें. कारण मुलांनीं कशाचें तरी शिक्षण घेणें हें अपरिहार्य आहे, ही पूर्वापार चालत आलेली समजूत व रूढी. कालमानानें या शिक्षणाचें रूप व पद्धति—आशय व अभिव्यक्ति बदलत गेली; पण मुलगे कांहींना कांहीं तरी शिकतच राहिले. इंग्रजी

अमलापूर्वी शेंडीला झटके देत ते " शक्लृपच् " किंवा अमरकोश, समासचक्र घोकीत होते. इंग्रजांनीं शाळा-कॉलेजें काढल्यावर डोक्यावर पागोटीं ठेवून ते कॅट्मॅट् करूं लागले, स्पेन्सर-मिल वाचूं लागले. कालांतरानें कोट-टोपी घालून ते शेक्सपियर, वर्डस्वर्थ, शेलेमध्यें गुंगून गेले; नंतर विजारी-शर्ट घालून शॉ इब्सेनची विचक्षणा करूं लागले. आतां चित्रविचित्र मॅनिले घालून मार्क्स-फ्रॉइडची ते चिकित्सा करीत आहेत. एवंच मुलांनीं कांहीं तरी शिकलें पाहिजे ही वज्रलेप समजूत होती. पण मुलींच्या बाबतींत मात्र, गुळाच्या ढेपीपासून तोडला तरी मुंगळा जसा परत तिलाच जाऊन चिकटतो, तसें लोकमत शबल्युगाकडे परत जाई. सुधारणेच्या प्रवाहांत डुबी घेतल्यावर, जरा नाकातोंडांत पाणी गेलें, कीं घाबरून लोकमत उथळ, तुंबलेल्या डबक्याकडे धांव घेई व " मुलींना शिक्षणाची जरूर नाहीं. व्यर्थ त्यांना शिकवूं नये " या आपल्या लाडक्या जुन्या फांदीला बिलगून राही.

सारांश, नित्य-जीवनोपयोगी नाहीं म्हणून मुलींना शिक्षण देऊं नये, हें म्हणणें तर्काला धरून नाहीं ; कारण स्त्री-पुरुषांच्या, आजच्या युगांत मान्य असलेल्या, समान दर्जाशीं तें विसंगत आहे. जें शिक्षण सध्यां उपलब्ध आहे, तें पुरुषांबरोबरच स्त्रियांना घेऊं द्यावें, हेंच न्यायाचें ठरेल. शिवाय, अशा दोषपरिप्लुत अभ्यासक्रमाच्या जोरावर सुद्धां गेल्या पन्नाससाठ वर्षांत, स्त्रियांनीं यक्षिणीची कांडी फिरावी असा चमत्कार करून दाखवला आहे. परदेशचे लोक अचंबा करताहेत, कीं ज्या हिंदुस्थानांत स्त्रिया मागासलेल्या, अडाणी, घरकोंबड्या आहेत म्हणून आम्हीं ऐकत होतों, त्याच हिंदुस्थानांतून राजदूत म्हणून आमच्याकडे स्त्रिया येत आहेत ! आंतरराष्ट्रीय सभा आपल्या चतुर वाक्प्रवाहानें जिंकीत आहेत ! खुद्द हिंदुस्थानांत राज्ययंत्रणेंत स्त्रिया आहेत. नाना व्यवसायांत आहेत. स्वातंत्र्याच्या लढ्यांत पुरुषांच्या बरोबरीनें त्यांनीं अग्रेसरत्व पटकावलें होतें. हा कायाकल्प कौतुकास्पद नाहीं काय ? जर आज निरुपयोगी असा शिक्का मारून स्त्रियांना उच्च शिक्षणापासून मागें ओढलें तर या सर्व कर्तृत्वावर पाणी पडेल. समाजसुधारकांचे अर्धशतकाचे प्रयत्न व्यर्थ जातील. मोठ्या हिमतीनें पुढें सरसावलेल्या स्त्रियांचा हिरमोड होईल व प्रगतीच्या गाड्याला खीळ पडेल. तेव्हां जें सध्यां चालू आहे, तें शिक्षण स्त्रियांनीं, पुरुषांच्या बरोबरीनें घेणें हेंच देशाच्या व स्त्रीपुरुषांच्या हिताचें ठरेल.

शिवाय आजची सदोष शिक्षणपद्धति सुधारण्याचे प्रयत्न देशांत ठिकठिकाणीं चालू आहेतच. दुय्यम व उच्च शिक्षणच केवळ नव्हे, तर प्राथमिक शिक्षणसुद्धां रोजच्या जीवनाशीं संलग्न असावें; असा विचारप्रवाह शिक्षणतज्ज्ञांच्या चर्चांतून दिसून येत आहे. तसेंच उच्च शिक्षणाचें ध्येय जें आत्मविकास तें साध्य व्हावें म्हणून अभ्यासक्रम आंखण्यासाठीं नाना समित्या सरकार वेळोवेळीं नेमीत आहे. या समित्या देशभर फिरून, ठिकठिकाणचें लोकमत व तज्ज्ञांचे विचार संकलित करीत आहेत. या सर्व योजनांचा फायदा पुरुषांप्रमाणें स्त्रियांनांहि मिळेलच. शिवाय स्त्रियांच्या म्हणून ठरलेल्या जीवित-कार्यास उपकारक होईल असें शिक्षण देणारीं गृहजीवनशास्त्रविद्यालयेंहि (Home Science Colleges) बऱ्याच ठिकाणीं निघालीं आहेत. या कॉलेजांवरहि त्यांच्या अभ्यासक्रमांवरून व शिक्षणपद्धतीवरून टीका होत आहेच. पण टीकेनेंच नेहमीं सुधारणा होत असते. विरोधानें संबंधित ध्येयाचें नैतिक बल निर्विवाद वाढतें. या Home Science Colleges मध्यें वरील दर्जाच्या सरकारी अधिकाऱ्यांसाठीं गृहिणी तयार करण्याची तेवढीच सोय आहे; मध्यमवर्गाला या शिक्षणाचा कांहीं उपयोग नाहीं अशी टीका झाल्यावर या कॉलेजांतून मध्यमवर्गाला रुचेल, पचेल, झेंपेल असा अभ्यासक्रम आंखण्याचेहि प्रयत्न सुरू आहेत. या सर्व पातळींच्या विविध प्रयत्नांतून, समुद्रमंथनानंतर अमृत प्राप्त झालें, तसा स्त्री-पुरुषांस आदर्श असा अभ्यासक्रम केव्हांतरी निश्चितच बाहेर पडेल. तोंवर मात्र प्रयत्न न थांबवतां, निष्क्रिय न राहतां, हालाहलसुद्धां पचवण्याची तयारी ठेऊन, उपलब्ध झालेल्या ज्ञानाचा होईल तेवढा उपयोग करून घेतला पाहिजे.

समान अभ्यासक्रमांच्या विचारानंतर सहशिक्षणाचा प्रश्न पुढें येतो. विश्वविद्यालयांतून स्त्री-पुरुषांसाठीं एकच अभ्यासक्रम व एकच परीक्षा असतांना स्त्रियांसाठीं निराळीं कॉलेजें काढून, 'तेंच तें' निराळें करीत बसण्यांत अर्थ आहे काय ? त्यामुळें पैसा, मेहनत, वेळ व्यर्थ जात नाहीं काय ?

हा प्रश्न पंचवीस वर्षांपूर्वी जेवढा कठीण वाटे, तेवढा आजच्या कालमानांत वाटणार नाहीं. आज कॉलेजांत शिकणाऱ्या मुलांमुलींची संख्या एवढी फुगलेली आहे कीं, एका गांवांत दोन-तीन कॉलेजें सुद्धां पूर्णसंख्येचीं अशीं चालवितां येतील. अशा परिस्थितींत मुलींचीं स्वतंत्र कॉलेजें काढलीं तर तीं पैशाचा व्यर्थ

अपव्यय करणारीं ठरतील असें वाटत नाहीं. शिवाय तत्त्वाचा प्रश्न म्हणून सहशिक्षणाचा विचार केला तर असें वाटतें कीं, प्राथमिक व दुय्यम शिक्षणांत पृथक् ठेवलेलीं मुलें-मुली कॉलेजच्या पहिल्या वर्षी एकदम एकत्र आणणें कितपत हितकारक ठरेल हा प्रश्न चिन्त्य आहे. चमत्कारिक वयांत, आधीं दूर ठेऊन मग एकदम एकत्र आणल्यामुळें मुलगे वारा प्यालेल्या वासरांसारखे बेफाट वागूं लागतात. सहशिक्षण द्यावयाचेंच तर तें प्राथमिकपासून विश्वविद्यालयीन पातळी-पर्यंत सर्व्हा दिलें पाहिजे. म्हणजे कुठल्याच पायरीला कांहीं अनैसर्गिक गोष्ट आहे असें वाटणार नाहीं.

सध्यांच्या सहशिक्षणाचा दुसरा दोष म्हणजे तें खऱ्या अर्थानें सहशिक्षण होतच नाहीं. सध्यांच्या पद्धतींत मुली नुसत्या मुलांच्या डोळ्यांपुढें 'शोकेस'मधल्या आकर्षक बाहुल्यांसारख्या दिसतात. त्यांच्याशीं बोलणें, एकत्र खेळणें म्हणजे महत्पाप समजलें जाणार. इंग्लंडमध्यें दुसऱ्या महायुद्धानंतर तऱ्हेतऱ्हेच्या वस्तु बाजारांत दिसत पण त्या सर्वांवर "Not for Home Consumption–For export only" अशी चिठ्ठी असे. "ह्या वस्तु एतद्देशीयांसाठीं नाहींत, परदेशांत निर्यात करण्यासाठीं आहेत." इंग्लिश लोक बिचारे आशाळभूतपणें त्या आकर्षक वस्तूंकडे टकमक बघत. तशी कॉलेजांतील विद्यार्थिनी "आपल्यासाठीं नव्हत; कुणा अन्य भाग्यवंतांसाठीं" अशी जणूं कपाळावर चिठ्ठी लावल्यासारख्या मुलांना भासतात. मग निराशेच्या पोटीं उच्छृंखलपणा उत्पन्न होतो. जेवढें दृष्टिसुख, संभाषणाचें समाधान, निसटता स्पर्श मिळवतां येईल तेवढा अधाशासारखा, कधीं कधीं सदभिरुचीच्या मर्यादा उल्लंघून सुद्धां घ्यायला मुलें तयार होतात. श्रीमुखांत बसली तरी 'तेवढाच हात गालाला लागला,' असें म्हणणारे महाभाग पाहण्यांत येतात. सारांश, खऱ्या अर्थानें सहशिक्षण न दिल्यास, त्याचे परिणाम अनिष्ट होतांना आढळ-तात. या बाबतींत एका पाश्चात्त्य संकेताचा उल्लेख करावासा वाटतो. पश्चिमेकडे अशी पद्धत आहे कीं, नाटकसिनेमा पहाण्यास, हॉटेलांत खाना घेण्यास, किंवा नृत्य वगैरे सार्वजनिक समारंभांत भाग घेण्यास मुली एकट्या जात नाहींत. एखाद्या मित्राबरोबर, आधीं योजना करून जातात. या प्रथेनें सार्वजनिक समारंभांत, उत्सवांत, किंवा करमणुकीच्या स्थळीं, मुलांच्या वर्तनावर साहजिक-पणें नियंत्रण येतें. आपली मैत्रीण बरोबर असतांना, दुसऱ्या मुलींची टवाळी

करण्यास किंवा अनुचित शब्द बोलण्यास मुलगा कधींही धजणार नाहीं. स्त्री-पुरुषमिश्र समाजामध्यें एकमेकांच्या वर्तणुकीवर सदभिरुचीचें बंधन पडतें, हा अनुभव आहे; पण कॉलेजांमध्यें मुलें-मुली खऱ्या अर्थानें बरोबर राहात, शिकत, बोलत, बसत नसल्यामुळें, मुलांच्या वर्तनावर बंधन न पडतां उलट फटकून वागणाऱ्या मुलींची टवाळी, त्यांच्याशीं मवालीगिरी करण्यास मुलांना जसा ऊत येतो. तेव्हां सहशिक्षण द्यावयाचें असल्यास तें नुसतें वाच्यार्थानें न देतां सहजीवनाच्या तत्त्वावर दिलें तरच हीन अभिरुचीचें प्रदर्शन टळून तें एकमेकांच्या व्यक्तिमत्त्वाच्या विकासाला पोषक होईल.

असो. याप्रमाणें महाराष्ट्रांतील स्त्री-शिक्षणाचा गेल्या ५०–६० वर्षांचा इतिहास पाहिला. शहरांतील मध्यमवर्गांत स्त्री-शिक्षण निरपवाद सुरू झाल्यानंतर कांहीं समस्या समाजापुढें उभ्या राहिल्या. कॉलेजांतील शिक्षण नित्याच्या जीवनास निरुपयोगी असतें म्हणून तें घेण्यांत स्त्रियांनीं आपला वेळ उगीचच व्यर्थ दवडूं नये, स्त्रियांच्या पदवी-परीक्षांचे अभ्यासक्रम पुरुषांच्या अभ्यासक्रमाहून भिन्न असावे, वगैरे विचारप्रवाह, सहशिक्षणाबद्दलचा दृष्टिकोण व समाजाची एकंदर स्त्री-शिक्षणाविषयींची प्रतिक्रिया यांचा विचार केला. स्त्रियांच्या उच्च शिक्षणाविरुद्ध घेण्यांत येणाऱ्या आणखी एका आक्षेपाचा पुढील प्रकरणांत विचार करूं.

★ ★ ★

प्रकरण ३ रें

# स्त्रियांना उच्च शिक्षण द्यावें काय ?

**स्त्रियांना** उच्च शिक्षण देऊं नये असा विचारप्रवाह आजकाल, स्त्रीशिक्षणाच्या प्रयोगाला ५०–६० वर्षें झाल्यानंतर, समाजांत कुठें कुठें प्रकट होऊं लागला आहे. उच्च शिक्षणाकडे वळल्यामुळें व पदवीपरीक्षा पदरांत पाडून घेण्याच्या महत्त्वाकांक्षेमुळें मुलींची विवाहाची वयोमर्यादा पुढें सरकते. त्यामुळें विवाह होण्यास अडचणी येतात. विवाहोत्तरहि या अडचणी सुखी संसारांत अंतरायरूप होतात.

मुलींचें उच्चशिक्षण विवाह होण्यास अडचणी उत्पन्न करतें, अशी कांहींची तक्रार आहे. एक तर कॉलेजांत शिकणाऱ्या मुलींच्या आपल्या वराबद्दलच्या, व भावी संसाराच्या मानचित्राबद्दलच्या अपेक्षा प्रमाणाबाहेर वाढतात. या अपेक्षांची परिपूर्ति होईल असें स्थळ हुडकून काढतांना आईबापांची त्रेधा उडते. मुलगी बी. ए. झाली कीं तिला घरीं बसवून ठेवणारे लोक आढळतात. त्यांचें म्हणणें असें कीं "मुलगी एम्. ए. झाली कीं तिला, तिच्यापुढें एक पाऊल टाकलेला, म्हणजे पी. एच्. डी. नवरा पाहिजे. कुठून हुडकून काढायचे एवढे पुष्कळ शिकलेले मुलगे ?" कांहीं ठिकाणीं, मुलीच्या संभाव्य वाढत्या अपेक्षांना बिचकून, मुलगेच "कॉलेजांत जाणारी वधू आपणांस नको" म्हणून स्पष्ट सांगतांनां आढळतात. याच्याहून बिकट अशी दुसरी अडचण म्हणजे मुलीचें वय ती बी. ए. होईपर्यंत बरेंच वाढतें. त्यामुळें तिच्या रूपांतलें

आकर्षण ( Charm ) कमी होतें. या Charm बद्दल कांहीं वर्षांपूर्वी बरीच चर्चा मराठी मासिकांतून व वृत्तपत्रांतून झाली होती. " चार्म " म्हणजे नक्की काय, याबद्दल बरीच शहानिशा करण्यांत आली होती. कोणाच्या मतें मुलीच्या चेहऱ्यावरचा तजेला, टवटवी, मोहकता षोडशवर्षांनंतर कमी होते. इंग्रजींतसुद्धां sweet seventeen असें म्हणण्याचा प्रघात आहे. आपल्याकडेहि " प्राप्ते तु षोडशे वर्षे " हें सुभाषित सुपरिचित आहे. कुणी म्हणतात, उच्च शिक्षण घेतल्यानें स्त्रीच्या अंगचे स्त्री-सहज गुण, मार्दव, लाजवटपणा, शालीनता, लालित्य हीं कमी होतात. ती 'पुरुषी' बनते व त्यामुळें वधूपरीक्षेच्या वेळीं ती पसंत होणें कठीण होऊन बसतें. ती बी. ए. होते पण S. A. गमावून बसते. पुढें विवाहित आयुष्यांतहि तिचा " चार्म " लोपलेला असल्यामुळें ती नवऱ्याला आपल्याभोंवती रुंजी घालीत, घोटाळत ठेवूं शकत नाहीं. त्यामुळें ती दुःखी होण्याचा संभव असतो. पुढेंमागें तिच्या वैवाहिक जीवनाला सुरुंग लागण्याची शक्यता असते.

आणखीहि एक मुद्दा मुलींच्या उच्च शिक्षणाविरुद्ध पुढें आणण्यांत येतो. पुरुषाला साधारणपणें आपल्याबरोबरीनें शिकलेली तर राहोच पण बुद्धिमान् बायकोसुद्धां नको असते, असा प्रवाद आहे. अर्थात् तो कितपत खरा आहे, हें पुरुषवर्गच मनोमन जाणूं शकतील. मला भेटलेली एक इंग्लिश मुलगी मला एकदां म्हणाली, " मी जेव्हां डेट् वर जातें (हें 'date' प्रकरण काय आहे, हें आपल्याकडेसुद्धां आतां ऐकून-वाचून सर्वांना माहीत झालें आहे. दोन तरुण मुलगा-मुलगी मैत्री वाढवण्यासाठीं, ठरवून, सिनेमाला, नृत्याला, खान्याला जातात किंवा नुसता एकमेकांच्या सहवासांत काळ घालवतात. त्याला Dating अशी संज्ञा आहे ) " तेव्हां साध्यासाध्या गोष्टीसुद्धां मला ठाऊक नसल्याची बतावणी करतें. मग माझा मित्र माझ्या खुळेपणाची चेष्टा करीत, मला त्या साध्या गोष्टी मोठ्या अवडंबरानें समजावून सांगतो. आपण कितीतरी जास्त बुद्धिमान् आहोंत या जाणीवेनें तो मनांत अगदीं खुलून जातो. " पुरुषाला बुद्धिमत्तेंत आपण पत्नीहून श्रेष्ठ आहों, असें नेहमींच वाटत असतें, व ती त्याची समजूत टिकवून ठेवणें पुष्कळ वेळां पत्नीला सोईस्कर पडतें. James Barrie च्या What Every Woman knows या नाटकांत पत्नी पतीला त्याचीं पार्लमेंटमधलीं भाषणें तयार करण्यास उत्तम मदत करते. पण ती मदत अशा युक्तीनें करते कीं

पतीला वाटतें आपणालाच ही मार्मिक शब्दयोजना, खुबीदार विनोद वगैरे सुचले; व मग तो स्वतःवरच खूष होऊन, घरांत नीट वागतो. ती इंग्लिश मुलगी मला म्हणाली, " Reputation for brain kills a girl socially. " तरुणी बुद्धिमान् आहे असें एकदां कळलें कीं, मग मुलगे तिला हौसे-मौजेसाठीं आपल्याबरोबर नेण्यास राजी नसतात. आपल्याकडेसुद्धां कॉलेजांत एखाद्या मुलानें एखाद्या बुद्धिमान् मुलीशीं मैत्री वाढवण्याचा प्रयत्न केला तर इतर मुलगे त्याला सावध करतात– " अरे, स्कॉलर आहे बरं का तें प्रकरण : उगीचच फुकटांत वेळ दवडूं नकोस " असो.

सारांश, उच्चशिक्षण घेतल्यानें, अनेक कारणांनीं लग्नाच्या बाजारांत मुलीचा भाव उतरतो, असा आक्षेप, मुलींच्या शिक्षणाविरुद्ध बऱ्याच ठिकाणीं घेण्यांत येतो.

आतां, यांपैकीं पहिला आक्षेप, विवाहाची वयोमर्यादा वाढल्यामुळें मुलीचा ' चार्म ' जातो, याचा विचार करूं. आधीं पुरुषाच्या दृष्टीनें ' चार्म 'ची व्याख्या काय ठरते याचा शोध केला पाहिजे. दोनतीन वर्षांपूर्वी एका मराठी मासिकाच्या दिवाळी अंकांत "माझ्या मतें स्वरूपसुंदर स्त्री कशी असावी " या विषयावर, विविध क्षेत्रांतील नामांकित पुरुषांचीं मतें मागवून छापलीं होतीं. त्यांत या ' चार्म 'च्या कल्पनेबद्दल बरेंच रुचिवैचित्र्य आढळलें. कुणीं वर्ण, कुणीं रेखीव नाकडोळे, कुणी बांधा, तर कुणी सर्वसाधारण चुणचुणीतपणा ( smartness ) यावर भर दिला होता. पण मला वाटतें, वधू पसंत करतांना व विवाहोत्तर, पुरुषाच्या लेखीं स्त्रीमधला ' चार्म ' म्हणजे ' निराळेपणा' हाच असतो. पुरुषांना नेहमीं कांहींतरी नवें निराळें हवें असतें; जसें खाण्यापिण्यांत तसेंच उपभोगास. गोरी बायको असली तर पुरुषाला एखाद्या श्यामलेचें आकर्षण वाटूं लागतें. बायकोचें नाक चाफेकळीसारखें असलें तर दुसऱ्या एखादीचें बटनासारखें, शेंडा किंचित् वर उचललेलें नाकच त्याला लोभसवाणें वाटूं लागतें. रूपवती बायको असली, तर बौद्धिक भूक जागृत होते व ती पुरवणारी एखादी ' चतुरा ' भूल घालते. बुद्धिमति, वाक्चतुर पत्नी असली तर मग एखादी मुग्धा ( dumb ) लाजाळूचें पानच जास्त विलोभनीय भासतें. तेव्हां या सारख्या बदलणाऱ्या ' चार्मच्या ' कल्पनांपायीं, स्त्रियांनीं आपला उच्च शिक्षण प्राप्त करून घेण्याचा हक्क व संधि गमावून बसावें कीं काय ? अमुक एक

गोष्ट म्हणजे ' चार्म ' व त्यानें पुरुष निश्चित आकर्षित होतो व कायमचा अंकित होऊन राहातो, असें निश्चित करतां आलें असतें तर गोष्ट निराळी होती. पण पुरुष हा वृत्तीनें मधुप आहे. पुरुषच काय, प्रत्येक मनुष्यप्राणीच नावीन्याचा भुकेला असतो. यांत स्त्रीसुद्धां आलीच. " कळ्यांचे निःश्वास " मध्यें विभावरी शिरूरकर यांनीं ही गोष्ट स्पष्टपणें समाजापुढें मांडली. तेव्हां लोकांनां मोठा धक्का बसला, पण ही गोष्ट खरी आहे. मात्र युगानुयुगें अंगांत पक्क्या मुरवलेल्या संयमामुळें, स्त्री आपली ही वैचित्र्याची भूक विसरून गेली आहे. पुरुषांनींसुद्धां हा संयम बाळगला तरच संसार सुखाचे होण्याची शक्यता आहे. संयमांतच मानवाची श्रेष्ठता आहे, प्रतिष्ठा आहे. मनुष्य पशुकोटींतून उत्क्रांत झाला असें मानतात तें त्याच्या अंगीं आलेल्या या विवेकामुळेंच. सारांश, केव्हांतरी क्षीणशक्ती नक्कीच होणारा हा ' चार्म ' उच्चशिक्षण घेतल्यानें जातो म्हणून स्त्रियांना त्या शिक्षणापासून परावृत्त करणें अविचाराचें होईल.

तसाच विचार करूं गेलें, तर असें म्हणावेसें वाटतें कीं, उच्च शिक्षणानें उलट एकप्रकारचा ' चार्म ', एक आगळेंच तेज स्त्रीमध्यें येतें, व तें जन्मभर टिकतें. वसंत संपल्याबरोबर हें आकर्षण पळ काढीत नाहीं. उच्चशिक्षण घेतल्यानें स्त्रीच्या अंगीं एक प्रकारचा आत्मविश्वास येतो. तिचें व्यक्तिमत्त्व, घासूनपुसून लख्ख केलेल्या आरशाप्रमाणें झगमगूं लागतें. तिच्या जीवनाला प्रखर आत्मसंमानाची (self respect) पक्की बैठक मिळते; व या बैठकीवर ती आपल्या वैवाहिक जीवनांत ठाम अधिष्ठान मांडूं शकते. पुरुषाच्या चंचलपणाला, परंपरेनें अंगीं मुरलेल्या अरेरावीला, स्त्रीच्या या जागृत, सुप्रतिष्ठित, प्रखर व्यक्तिमत्त्वाचा वचक बसतो. स्त्री ही " विनाश्रय " जगूं न शकणारी ' लता ' नव्हे, ही पुरुषाची खात्री पटली म्हणजे तो तिची उपेक्षा किंवा उपमर्द करण्यास धजणार नाहीं. यदाकदाचित् पुरुषाचा आधार, संसाराच्या मध्यभागीं सुटला, तरी उच्चशिक्षाविभूषित स्त्री, पूर्वीच्या अशिक्षित, परावलंबी स्त्रीप्रमाणें अगतिक होत नाहीं. सुखाचे, कृतकृत्य संसार होण्यास स्त्रीच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास व उत्कर्ष होणें, तिची अस्मिता जागृत होणें व ती सदैव प्रखर तेजानें तळपत राहाणें अत्यंत जरुरीचें आहे. उच्चशिक्षण, स्वावलंबन, आर्थिक स्वातंत्र्य वगैरे साधनांनीं हें ध्येय साध्य न करतां जर स्त्री नाशवंत, अनिश्चित स्वरूपाच्या ' चार्म ' मागें लागेल तर ती फसेल. शिवाय

पुरुषाला खूष करण्याकरतां व खूष राखण्याकरितां 'चार्म'ची जोपासना किंवा उपासना करणें म्हणजे 'स्त्री ही एक उपभोग्य वस्तु आहे' ही कमीपणाची भूमिका स्वीकारल्यासारखें होतें. विवाह हेंच स्त्रीच्या जीवनसाफल्याचें एकमेव गमक ठरतें. "Marriage is the only career for woman – स्त्रीला आपल्या योगक्षेमाची तरतूद करून ठेवण्याचें एकमेव साधन म्हणजे विवाह" ही लाजिरवाणी कबुली दिल्यासारखें होतें. उलटपक्षीं असें म्हणावयास हरकत नाहीं कीं जिचा स्वतंत्र व्यक्ति म्हणून सर्वांगीण–मानसिक, बौद्धिक, आत्मिक–विकास झाला आहे, अशा सर्वांगसुंदर स्त्रीमध्यें 'पुरुषोत्तमा' ला ज्याचा सर्वांगीण उत्तम विकास झाला आहे, अशा पुरुषाला 'चार्म' आढळेल. पूर्णत्वाला पूर्णत्वाचीच ओढ लागणार. जर पुरुषाला अशा पूर्णविकसित स्त्रीत्वाची ओढ वाटली नाहीं, भीति वाटली, तर त्याच्या पौरुषत्वांतच कांहीं तरी उणेपणा असावा, असें विधान करणें फारसें चूक ठरणार नाहीं. 'पुरुषोत्तमा' च्या कोटीला तो पोहोंचला नाहीं हें उघड होईल. मग अशा निकृष्ट, कोत्या, खालच्या दर्जाच्या पातळीच्या, चुकीच्या अभिरुचीला लाडावण्यासाठीं स्त्रिया आपल्या व्यक्तिमत्त्वाच्या विकासावर, उच्च शिक्षणाच्या अधिकारावर पाणी सोडण्यास उद्युक्त होणार काय? त्या असें करतील तर दोन्ही बाजूंनीं फशीं पडतील. क्षणभंगुर 'चार्म' कालांतरानें मावळला म्हणजे पुरुष तर त्यांच्या हातून निसटेलच आणि अर्ध्याकच्च्या शिक्षणानें अर्धवट विकसित झालेल्या फिक्या व्यक्तिमत्त्वामुळें त्यांचें जीवन बिनबुडाचें व केविलवाणें होईल.

'स्त्रियांनीं शिकून काय करावयाचें आहे? त्यांना पुरुषांसारखी नोकरी थोडीच करायची आहे?' असें सनातनी पक्षाचे लोक पूर्वी म्हणत असत. पण आतां आर्थिक तंगीच्या परिस्थितीमुळें स्त्रियांना नोकरी करणें बव्हंशीं भागच पडत आहे. उच्च शिक्षण घेतल्यानें स्त्रीला उच्च पातळीवरचें आर्थिक स्वातंत्र्य मिळूं शकेल हा उच्च शिक्षणापासून आणखी एक फायदा आहे. व्यवहारी भाषेंत सांगायचें म्हणजे उच्च शिक्षणानें स्त्रीला मोठ्या पगाराची, उच्च दर्जाची मानाची नोकरी मिळेल. इथेंहि विरोध करणारे म्हणतील कीं, "आम्हीं मुळीं विवाहित स्त्रियांनीं नोकरी करण्याच्या विरुद्ध आहोंत." कांहींचें म्हणणें मुलांनाच मुळीं नोकरी करणाऱ्या मुली नको असतात. वधूपरीक्षेच्याच वेळीं मुलगे अट घालतात कीं, "विवाह झाल्याबरोबर नोकरी सोडण्याची तयारी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ........ वि: ........
क्रमांक ........ नों: दि: ........


पाहिजे ". अशा परिस्थितींत चांगली नोकरी मिळेल म्हणून मुलींना उच्च शिक्षण देण्यांत काय अर्थ आहे ? यावर असा प्रतिपक्ष करतां येईल कीं, या अडचणी व विरोध तात्पुरता आहे. आपला समाज संक्रमणावस्थेंत आहे. हें संक्रमण राजकीय, आर्थिक, औद्योगिक क्षेत्रांतच फक्त नसून सर्वसाधारण समाजव्यवस्थेंतहि होत आहे. स्त्रीशिक्षण समाजाच्या अजून पचनीं पडलेलें नाहीं. स्त्रीचें जग फक्त घर व कुटुंब हें नसून तिला समाजांत स्थान असणें जरूर आहे हें तत्त्व पुरुषवर्गाच्या व समाजाच्या मनोभूमिकेंत अजून खोल रुजलेलें नाहीं. स्त्रीच्या जीविताकडे बघण्याचा हा दृष्टिकोन क्रांतिकारी आहे खराच. एक काळ असा होता कीं, चाळीस वर्षांच्या स्त्रीला घराबाहेर पडून कुठें जायचें असलें तर तिला पुरुषमाणसाची सोबत लागे; मग तें पुरुष-माणूस दहा-बारा वर्षांचा मुलगा असला तरी पुरत असे. या संस्कारांतून व वहिवाटींतून आपण आज १९६५ सालांत पन्नास-साठ वर्षांच्या अवधीनंतर संक्रमण करीत आहों. तेव्हां मनाच्या ठेवणी, विचारांच्या दिशा, बदलायला वेळ लागणारच. आज आपल्या बायकोनें चार लोकांच्या डोळ्यांसमोर येऊं नये असें जुन्या संस्कारांमुळें मुलांनां वाटत असलें तरी माझी खात्री आहे कीं, कांहीं वर्षांनीं, कुठें कुठें सध्यां सुद्धां, " मिळवती बायको पाहिजे " असा मुलगे आग्रह धरतील. आर्थिक चणचणीची आंच दिवसेंदिवस प्रखर होत जात आहे. एका पुरुषाच्या आर्थिक प्राप्तीवर संसार चालत नाहींसे झाले आहेत. पूर्वीची संयुक्त कुटुंबपद्धति लुप्त झाली आहे. अविभक्त कुटुंबपद्धतींत भावाचा भावाला आधार वाटे. अडल्या पडल्या पाठीशीं भावांचा आधार असावा, म्हणून सुनेला, " अष्टपुत्रा सौभाग्यवती भव " असा तोंडभरून आशीर्वाद, पूर्वी वडील माणसें देत असत. आजच्या परिस्थितींत आधीं आठ भाऊ नसतातच; आणि असले तरी ते आठ दिशांना पोटाच्या पाठीमागें फिरत असतात. अशा परिस्थितींत मिळवती बायको, खांद्याला खांदा भिडवून, संसाराचें जूं वहायला सिद्ध झाली तर पुरुषाला केवढा आधार वाटेल ! तेव्हां समाजाच्या संक्रमणावस्थेंतील तात्कालिक अडचणींना व विरोधाला भिऊन शाश्वत, खऱ्या मार्गापासून आपण चळतां कामा नये. मोठाल्या राजमार्गांवर दुरुस्तीचें काम चालू असतांना, रस्त्यावर diversions च्या पाट्या असतात. थोडी वांकडी वाट करून, अडचणीच्या जागेला वळसा घालून, पुन्हां मुख्य मार्गावर वाहनें आणतात. त्याचप्रमाणें स्त्रियांनीं

आपला मुख्य मार्ग, स्त्रीत्वाचा सर्वांगीण, पूर्ण विकास हें कधींहि विसरतां कामा नये. विवाहविषयक वगैरे तात्पुरत्या अडचणींनां बगल देऊन, त्यांनीं पुन्हां, आपल्या अंतिम ध्येयापर्यंत पोंचवणाऱ्या मुख्य मार्गावर आपल्या प्रगतीची गाडी आणली पाहिजे. पॅरिसमध्यें जशा केवळ वैचित्र्याच्या हौसेनें पोशाखाच्या फॅशन्स बदलतात व स्त्रिया त्या फॅशन्समागें, त्या विचित्र वाटल्या, तरी धांवतात, त्याप्रमाणें लग्नाच्या बाजारांत बदलणाऱ्या फॅशन्समागें स्त्रिया लागल्या, तर त्यांचें आयुष्य अस्थिर होऊन, चुकीच्या मूल्यांमागें भरकटत जाईल.

साठसत्तर वर्षांपूर्वी "अष्टवर्षा भवेत् कन्या" या दंडकान्वयें बालवधूला मागणी होती. मग वाघिणीचें दूध प्यालेले तरुण गर्जू लागले कीं, "आम्हांला शिकलेली बायको पाहिजे". आईबाप मग मुलींना शाळेंत घालूं लागले. मग लग्नाच्या बाजारांतले मध्यस्थ दलाल सांगूं लागले कीं, "नुसत्या शिक्षणाचा कांहीं उपयोग नाहीं. कांहींतरी कला, accomplishments गाणें, नृत्य, फॅन्सी भरतकाम, फॅन्सी सूपशास्त्र असें कांहींतरी पाहिजे". मुली बिचाऱ्या पेटीच्या, गायनाच्या, भरतकामाच्या क्लासेस्‌मध्यें जाऊं लागल्या. आतां आणखी एक पायरी पुढें गेली आहे. पोहणें, टेनिस, बॉलरूम नृत्य आलें नाहीं तर मुली गांवढळ ठरूं लागल्या आहेत. आतां मुली तेंहि सर्व शिकूं लागल्या आहेत. पण यामुळें लग्नाच्या बाजारांत तात्पुरता भाव वाढला तरी 'मानव्याच्या'—व्यक्तिविकासाच्या क्षेत्रांतला आपला भाव पार उतरत जात आहे हें स्त्रियांनीं लक्षांत ठेवावें; व या शेअर बाजारांतल्यासारख्या दोनबोटें तीनबोटेंच्या इशाऱ्यांवर धांवपळ न करतां, आपल्या सर्वांगीण विकासावर, तेजस्वी, स्वावलंबी, स्वतंत्रप्रज्ञायुक्त व्यक्तिमत्वनिर्मितीच्या ध्रुवताऱ्यावर सर्व लक्ष केंद्रित करावें.

स्त्रीजीवनाच्या नव्या क्षितिजावर उदय पावलेला हा नवतारा आहे. याच्या उजेडांत स्त्रियांनीं आपल्या ध्येयाप्रत पोंचणारा मार्ग हुडकून काढला पाहिजे. मध्यंतरींच्या अज्ञानाच्या अंधकारांत स्त्रियांची स्वतःची स्वतःलाच ओळख पटत नव्हती. स्वतःला नगण्य मानून, आपलें व्यक्तिमत्त्व त्यांनीं पतीच्या व्यक्तिमत्वांत पूर्णपणें विलीन करून टाकलें होतें. "पतिवांचुनि सतिला दैवत जगतीं अन्य नाहीं"—हें स्त्रीजीवनाचें ब्रीदवाक्य झालें होतें. कुणी कदाचित् म्हणेल कीं अत्युच्च प्रीतीचें, असीम स्वार्थत्यागाचें हें उदाहरण आहे. 'दीपपतंग' वगैरे प्रतीकांनीं या असीम स्वत्वहोमाची कवींनीं काव्यांत प्रशंसा

केली आहे. या विधानाबद्दल एवढेंच म्हणतां येईल कीं, जाणूनबुजून, खुषीनें हा स्वार्थत्याग स्त्रियांनीं पिढ्यान्‌पिढ्या केला असता तर तो आदर्शभूत झाला असता खराच; पण सध्यां चालू असलेला अस्मितेचा होम हा नेणता, केवळ अंध रूढीच्या पोटीं केला जातो. कधींकधीं इच्छेविरुद्ध लोकापवादाला भिऊन केलेला असतो. त्यामुळें या स्वार्थत्यागाचें समाजाला व पुरुषवर्गाला कौतुक नसतें व त्याचें मोठेसें श्रेयहि स्त्रियांना दिलें जात नाहीं. स्त्रियांच्या जन्माची व्याख्या व इतिकर्तव्यता "आपलें असें कांहींच नाहीं" समजून वागणें ही ठरून गेली होती. एखादीनें बंड पुकारून या मताविरुद्ध आवाज उठवला तर ती स्त्रीजातीला कलंक आहे, असें समजून तिची मुस्कट-दाबी केली जाई. जसें पूर्वीं बायका सती जातांना आरडाओरडा करूं लागल्या तर तो ऐकूं येऊं नये म्हणून मंगल ( ! ) वाद्यांचा प्रचंड गजर करीत असत; ती उठून बाहेर धांव घेण्याचा प्रयत्न करूं लागली तर तिला काठ्यांनीं आंत ढोशीत असत, त्यांतलाच हा प्रकार. आधीं 'सती जाणें' या प्रथेंतच, तींतील अमानुषता व क्रौर्य बाजूला ठेवलें तरी स्त्रीला स्वतंत्र व्यक्तिमत्त्व, अस्तित्व नाहीं ही कल्पना अभिप्रेत आहे. ख्रिश्चन धर्माच्या सिद्धांताप्रमाणें पशुपक्ष्यांना आत्मा नसतो. आम्हीं हिंदु, स्त्रियांना आत्मा नसल्याप्रमाणें वागतों. तोंडानें अर्थात् स्त्रीचा गृहलक्ष्मी, देवता म्हणून गौरव केला तरी तिला वागणूक मात्र माणसासारखी सुद्धां दिली जात नाहीं.

संसारांतून संवगडी उठून गेला कीं स्त्रीला कवडीचीहि किंमत राहात नाहीं. विधवेचें जिणें मातीमोल, दर्शनसुद्धां अशुभ, ही हिंदूंमध्यें रूढ झालेली कल्पना, स्त्रीनें आपलें स्वत्व किती गमावलें होतें याची साक्ष पटवते. बडोद्यास एकदां, कांहींशा सनातनी मताच्या स्त्रीसमाजापुढें व्याख्यान देतांना मी म्हटलें होतें, "दुर्दैवानें जीवनाचा जोडीदार गमावल्यास, स्त्रीनें दुःख करीत बसून, आपलें उरलेलें जीवन फुकट घालवूं नये. आयुष्याचा समाजहितासाठीं उपयोग करावा." माझ्या या विधानामुळें बऱ्याच स्त्रियांचा माझ्यावर फार रोष झाला, व त्यांनीं माझ्यावर प्रश्नांची, शंकांची सरबत्ती केली. उत्तरें देतांना, महात्मा गांधींची मी माझ्या बाजूनें साक्ष काढली. तेव्हां अर्थात् प्रतिपक्ष निरुत्तर झाला. महात्मा गांधींनीं विधवेच्या जीवनाबद्दल फार आदराचे उद्गार काढले आहेत. विधवेच्या हातून फार मोठी समाजसेवा होऊं शकते हें लक्षांत घेऊनच त्यांनीं हे उद्गार काढले.

कै. रमाबाईसाहेब रानडे यांचा अंत झाला, त्या वेळीं त्यांना श्रद्धांजलि वहातांना महात्मा गांधी म्हणाले, "रमाबाई रानडे यांच्यासारख्या विधवेचा मी पुजारी आहें. हिंदुधर्मांतील 'विधवा' या शब्दाभोंवतीं एक पवित्र सुगंधाचें वलय आहे. खरी हिंदु विधवा हा एक मोठा ठेवा आहे. हिंदुधर्मांची मानवसमाजाला ती देणगी आहे." वेदकालीन समाजाला सुद्धां पत्नीनें पती-बरोबर सती जाणें मान्य नव्हतें. पतीच्या मृत देहाजवळून पत्नीला उठवतांना कुटुंबाचा उपाध्याय तिला म्हणे, "बाई, उठ. जीवनांत परत चल. मृत पती-शेजारीं कशाला बसतेस ? त्याच्याविषयींचें तुझें पत्नीचें कर्तव्य संपलें आहे आतां" (ऋग्वेद). पुढें, दुसऱ्या प्रकरणांत आपण पाहिल्याप्रमाणें स्त्रीचा शिक्षणाचा अधिकार गेल्यावर तिला समाजांत दर्जा व स्वतंत्र व्यक्ति म्हणून स्थान नाहींसें झालें. पण, आजच्या जमान्यांत, जागृति झाल्यानंतर, स्त्रियांनीं पुन्हा आपल्या स्वत्वाची ओळख पटवून घेतली पाहिजे व उच्च शिक्षणादि साधनांनीं आपला विकास करून घेऊन, स्वतंत्र कर्तृत्व करून दाखवण्याची तयारी केली पाहिजे.

उच्चशिक्षण डावलून किंवा तें घेऊनहि स्त्रिया पुरुषांच्या कर्तृत्वांतच समाधान मानून घेऊं लागल्या, तर मात्र तें फार अनुकंपनीय ठरेल. अशा स्त्रियांना उद्देशूनच मला वाटतें, कांहीं वर्षांपूर्वीं पूज्य दादा धर्माधिकाऱ्यांनीं आदेश दिला होता कीं, "स्त्रियांनो, पुरुषव्यतिरिक्त जीवन जगण्याची धडाडी दाखवा, पुरुषाची माता होण्याची महत्त्वाकांक्षा बाळगूं नका." प्रथमदर्शनीं हा आदेश फार विचित्र वाटतो व तसा तो पुष्कळांना वाटलाहि. पण भोंवतालच्या स्त्री-समाजाचें निरीक्षण करूनच कांहींशा उद्वेगानें दादांनीं हा आदेश दिला असावा. त्यांना आढळून आलें कीं, स्त्री शिक्षण घेत आहे; पण स्वतःच्या आत्मविकासाच्या उद्दिष्टानें ती शिक्षण घेतांना दिसत नाहीं. शिक्षण जमेल तेवढें घ्यावें; त्याच्या जोरावर चांगला नवरा पटकवावा; त्याच्याबरोबर चांगला संसार करून कुटुंबवर्धन करावें; आपले पुत्र साटोपानें वाढवून ते महापदावर चढले म्हणजे त्यांच्या उत्कर्षांत स्वतःच्या जीविताचें सार्थक मानावें एवढीच आधुनिक स्त्रीच्या मनाची झेप. स्त्री ही अजूनहि पुरुषाच्या कर्तृत्वांतच समाधान मानते. अजूनहि ती पुरुषाच्या पुरुषार्थाशींच जखडलेली आहे. तिला स्वतःची ओळख पटलेली नाहीं. पूर्वीच्या समान-शिक्षणाला,

समान-संधीला मुकलेल्या स्त्रीप्रमाणेंच ती पुरुषाभोंवतींच रिंगण धरीत आहे. डोळ्यांवर झांपड बांधलेल्या घाण्याच्या बैलाप्रमाणें, गरगर, भोंवळ येईपर्यंत तेंच तें करीत, आकुंचित क्षेत्रांत ती फिरत रहात आहे. दादा धर्माधिकारी यांच्यासारख्या स्त्रीहितेच्छु विचारवंतांना आधुनिक युगांतसुद्धां स्त्रीनें आपल्या जीवनाचा अर्थ एवढाच समजावा, हें पाहून खेद होत असावा. कुठल्याहि व्यक्तीच्या जीवनाची सार्थकता दुसऱ्या व्यक्तीच्या पराक्रमांत कां असावी ? स्वतंत्र कर्तृत्वाची महत्वाकांक्षा व तयारी न ठेवल्यास स्त्रीच्या प्रगतीचा मार्ग खुंटेल. या आकुंचित रिंगणांत घोटाळत राहिल्यामुळें जीवनाच्या शेवटीं तिच्या पदरीं वैफल्य मात्र पडेल. ज्या खांबाभोंवतीं ती निष्ठेनें फिरत आहे, ते खांब डळमळले, पति उपेक्षा करूं लागला, मुलगा तुच्छ लेखूं लागला कीं तिचा झोक जाणार आहे, तोल सुटणार आहे. स्त्रीनें या कोंडाळ्यांतून बाहेरच्या विशाल विश्वांत यावें व तेथें आपलें स्थान शोधून काढून आपलीं पावलें तेथें उमटवावींत, म्हणून दादा धर्माधिकाऱ्यांनीं चमत्कारिक वाटणारा, निर्वाणीचा आदेश स्त्रियांना दिला.

अर्थात् पुरुषनिरपेक्ष जीवन जगायचें म्हणजे पुरुषांशीं फारकत घ्यायची असा अर्थ नाहीं. पुरुषांबरोबर सहकार करूनच दोघांनीं मिळून आयुष्याचा अर्थ समजावून घ्यायचा आहे. मात्र पुरुषाच्या स्वत्वांत आपलें स्वत्व बुडवून टाकायचें नाहीं. परस्परांवर प्रेम करून, एकमेकांबद्दल आदर बाळगून, समत्वाच्या भूमिकेवर उभे राहून, एकमेकांस पूरक व्हावयाचें आहे. आपल्या धर्मात सुद्धां हेंच अभिप्रेत आहे. सृष्टीच्या गूढाचें उत्तर अर्धनारीनटेश्वराच्या स्वरूपांत आहे. प्रकृतिपुरुषाच्या सहकार्यानें हा विश्वसंसार थाटला गेला आहे. या दोन तत्त्वांची फारकत केल्यास, जगाचा अगडब्याळ कारखाना बंद पडेल. आणि फारकत काय म्हणून करायची ? " सहनाववतु सह नौ भुनक्तु सहवीर्यं करवावहे " या वेदमंत्रांत म्हटल्याप्रमाणें स्त्री-पुरुषांनीं हातांत हात घालून एकमेकांस संभाळून न्यायचें आहे, जोडीनें जीवनांतला आनंद लुटायचा आहे. उज्ज्वल कर्तृत्वानें उभयतांचा व राष्ट्राचा संसार उजळावयाचा आहे. मध्यंतरीं अर्धनारीनटेश्वराचें अर्धें अंग जणूं विकल होऊन गेलें होतें; व त्यामुळें जीवनाचा खेळ विस्कटला होता, अपुरा रहात होता. पुढें शिक्षणानें हें विकलांग बलवान् करण्याची संधि मिळूनही स्त्रियांनीं तिचा उपयोग केला नाहीं तर ती त्यांची मोठी चूक होईल व त्यामुळें त्यांचें व राष्ट्राचेंहि नुकसान होईल.

याप्रमाणें आपण स्त्रियांच्या उच्च शिक्षणाविरुद्ध घेतल्या जाणाऱ्या आक्षेपांचा विचार केला. समाजाच्या मतें स्त्रियांना सांस्कृतिक उच्च शिक्षण ( Arts Humanities ) देण्यांत अर्थ नाहीं. कारण त्याचा त्यांच्या रोजच्या जीवनांत कांहीं उपयोग होत नाहीं. व्यावसायिक ( vocational ) उच्च शिक्षणहि स्त्रियांनीं घेऊं नये, कारण विवाहानंतर त्या त्याचा कांहीं उपयोग करूं शकत नाहींत. मेडिकल, सायन्स, लॉ वगैरे कॉलेजांतल्या जागा मात्र त्या अडवतात. त्यामुळें हे अभ्यासक्रम घेऊं इच्छिणाऱ्या कित्येक मुलांना प्रवेश मिळत नाहीं. त्यांचा हिरमोड होतो व त्यांना अनावड असलेल्या, कमी उपयुक्त किंवा कमी किफायतशीर अभ्यासक्रमांकडे वळावें लागतें. दुसऱ्या आक्षेपान्वयें उच्चशिक्षणामुळें, विवाहाची वयोमर्यादा वाढल्यामुळें मुलींच्या विवाहांत अडथळे येतात. या दोन्ही आक्षेपांना उत्तरें देण्याचा प्रयत्न केला. स्त्रियांना उच्च शिक्षणापासून दूर ठेवणें म्हणजे काळाचीं पावलें न ओळखणें, बदलत्या युगधर्माला मान न देण्यासारखें आहे. शिवाय या मार्गानें आज पन्नास-साठ वर्षें बरीच वाटचाल झाली आहे. ह्या मार्गावरून परत फिरणें प्रतिगामी व घातक प्रवृत्तीचें द्योतक ठरेल. अनेक वर्षांनीं, भगीरथ प्रयत्नांनीं, प्रचंड विरोधाला तोंड देऊन प्राप्त करून घेतलेल्या या शिक्षणाच्या हक्काकडे स्त्रियांनीं पाठ फिरवूं नये. त्यांच्या हातांत आलेलें तें एक धारदार शस्त्र आहे. संसारांतील, जीवनांतील नाना अडचणींवर तें चालवतां येईल. या शस्त्राला पूर्ण धार आल्याशिवाय प्राथमिक अवस्थेंतच तें तिच्या हातून काढून घेणें निर्दयपणाचें ठरेल. मानाची, लाभाची नोकरी करतां येईल किंवा एखादा स्वतंत्र व्यवसाय करतां येईल इतकें शिक्षण, मग तें सांस्कृतिक असो, तांत्रिक असो वा व्यावसायिक असो– प्रत्येक स्त्रीनें घेतलेंच पाहिजे.आर्थिक स्वावलंबन पूर्णांशानें सिद्ध झाल्याशिवाय, कोंवळ्या वयाच्या, अपुऱ्या ज्ञानाच्या, अपक्व कर्तृत्वाच्या मुलीचें लग्न करून तिला संसाराच्या गाड्याला जुंपणें हा समाजहिताविरुद्ध मोठा गुन्हा मानला पाहिजे.

चारी पुरुषार्थ साधणें ही पुरुषाच्या जन्माची इतिकर्तव्यता मानली जाई. आजच्या नवयुगांत, स्त्री स्वतःच्या मगदुरावर हे चारी पुरुषार्थ साधण्यास समर्थ होईल. अर्थात् या पुरुषार्थांचा अर्थ आधुनिक जमान्याच्या संदर्भांत बसेल असा बदलून घ्यावा लागेल. प्रथम धर्म–समाजाची, व्यक्तीची धारणा करतो तो धर्म. स्वतःची जीवितयात्रा यशस्वी करण्यास मदतरूप होईल तो

धर्म. सध्यांच्या युगांत उपलब्ध असेल तें सर्व शिक्षण–सांस्कृतिक, व्यावसायिक, उच्च पातळीवर आत्मसात् करणें, हा प्रथम पुरुषार्थ आहे. (कायद्यांत पुरुषाच्या व्याख्येंत स्त्रीचा समावेश होतो.) नंतर दुसरा पुरुषार्थ अर्थ. नियुक्त केलेलें जीवितकार्य यशस्वी करण्यास अर्थसंचयाची मदत लागणारच. तण्डुलाः प्रस्थमूलाः असें वचनच आहे. स्त्री स्वतःच्या सामर्थ्यावर दुसरा पुरुषार्थ पण साधूं शकेल. तिसरा पुरुषार्थ काम—संसार करणें, वंशसातत्य राखणें, जीवनाचा आनंद उपभोगणें. पूर्वी स्त्रीच्या हिशेबीं या पुरुषार्थात ती एक फक्त साधन होती. कर्ता पुरुष होता; पण आधुनिक जमान्यांत आपल्या स्वतंत्र व्यक्तिमत्वाची ओळख पटल्यामुळें, स्त्रीची हीनत्वाची भावना नष्ट झाली आहे. मोठ्या अभिमानानें, कुशलतेनें, समान कर्तृत्वानें संसाराची धुरा ती पुरुषाबरोबर वहात आहे. चौथा पुरुषार्थ मोक्ष. याचा अर्थ भूतकाळीं परमार्थाचें, अध्यात्माचें साधन करणें असा होता. नवयुगांत परमार्थ साधणें, म्हणजे स्वतःच्या कुटुंबाच्या हितापलीकडे नजर टाकणें. फक्त स्वार्थाकडे लक्ष न देतां, परमार्थ म्हणजे श्रेष्ठ असें समाजहित, राष्ट्रविकास, साधण्यास साहाय्यभूत होणें. नवयुगांतील उच्चविद्याविभूषित स्त्री हा पुरुषार्थ साधण्यास समर्थ झाली आहे. पूर्वीच्या अशिक्षित स्त्रिया, या सर्व पुरुषार्थांचा एकच गोळा बनवून, चटणी वाटतात त्याप्रमाणें करून, त्याला 'पत्नीधर्म' असें नांव देऊन, तो साधण्यांत सर्व पुरुषार्थ साधले असें मानीत होत्या. पतीला देव मानणें,– मग तो पति कसाहि असो, रावणासारखा असुरी प्रवृत्तीचा असो, गौतमासारखा क्रोधी, अविवेकी असो, रामासारखा संकटसमयीं वाऱ्यावर सोडून देणारा असो–हा साध्वी स्त्रीचा एकमेव धर्म मानला जात होता. या पत्नीधर्मात स्वत्वाची, स्वाभिमानाची, अस्मितेची तर आहुति पडेच, पण स्वार्थ व परमार्थ या दोहोंचीहि होळी होई व स्त्रीजन्म, बायका मानीत त्याप्रमाणें, खरोखरच अगदीं फुकट जाई.

ज्ञानामृतानें स्त्रीच्या जीवनांतल्या या सर्व व्यथा टळणार आहेत. समाजांतल्या व्याधि दूर करण्यास तिचे हात बळकट होणार आहेत. राष्ट्राला एक पाऊल प्रगतिपथावर पुढें नेण्यास ती समर्थ होणार आहे. तिच्या मनाला कर्तव्यपालनाची शांति लाभणार आहे. समाजाला पुष्टि मिळणार आहे व राष्ट्राला तुष्टि प्राप्त होणार आहे.

★★★

प्रकरण ४ थें

# वैवाहिक जीवन - कौटुंबिक लागेबांधे
## ( Family Relationships )

सध्यां चालू असलेल्या वहिवाटीप्रमाणें, शहरांतील मध्यमवर्गीतील मुलगी सुमारें वीस-एकवीस वर्षांची, बी. ए. किंवा तत्सम पदवी घेऊन विवाह करते व उंबऱ्यांतील माप लाथाडून सासरीं गृहप्रवेश करते. एकंदर हा सर्व प्रसंगच कांहींसा करुण, मोठा अद्‌भुत व शेवटीं सर्व उत्तम झालें तर अतीव काव्यमय आहे.

वीस-बावीस वर्षें जीवापलीकडे जतन केलेला, मोठ्या दुकीनें वाढवलेला, काळजीपूर्वक वळण दिलेला, शिक्षणानें सुसंस्कृत केलेला पोटचा गोळा, तट्कन् माया तोडून, परक्या घरांत कायमचा लोटणें या प्रसंगांतील करुणरसाला दुसरी तोड नसेल. वरातीनंतर, मुलीला श्वशुरगृहीं सोडून तिचें माहेरचें वऱ्हाड परत फिरतें. तो क्षण तर काळजाचे लचके तोडणारा असतो. आवरले तरी पुनःपुन्हां बाहेर फुटणारे हुंदके, दुःखाचे कढ, सद्गदित स्वरांत, स्पष्ट न उमटणाऱ्या विनवण्या " संभाळा, तुमच्या पदरांत घातली आहे, " " जपा, भारी हळवी आहे पोर ", " जतन करा बरं, फार फार गरीब स्वभावाची आहे " असे शब्द वधूपक्षाकडून कानीं पडतात. वरमाय ही, स्त्रीचीच जात पडल्यामुळें गहिंवरते व " अगदीं काळजी करूं नका तुम्ही. मला पण मुली आहेतच ना, " असें तोंड भरून आश्वासन देते.

पूर्वी मुली लग्नाच्या वेळीं सात-आठ वर्षांच्या असत तेव्हां हा करुणरस फारच मोठ्या प्रमाणांत प्रकट होई. आतां मुली प्रौढ झाल्यामुळें या करुणरसाला अद्‌भुतरसाची जोड मिळते. कुठली कोण मुलगी, पूर्वी नांवहि एकमेकांचें ऐकलेलें नाहीं, परस्पर दृष्टिभेटहि झालेली नाहीं, मग परिचय दूरच–आणि ती एकदम वीस-बावीस वर्षे ज्या घरांत, ज्या माणसांत, ज्या मायेच्या कोषांत वाढली, तीं बंधनें एका झटक्यांत तोडून, सर्वथैव परक्या अशा माणसाच्या हातांत विश्वासानें हात देते; त्याच्याशीं एकनिष्ठ राहण्याची शपथ घेते; त्याच्या घराशीं, कुटुंबाशीं समरस, एकजीव होण्याचा निश्चय करते. पूर्वी लहान वयांत मुली सासरीं येत, तेव्हां या समरस होण्यांत अद्‌भुत असें कांहीं नसे; कारण तिचें मन अद्यापि संस्कारक्षम असे; विचार कोंवळे असत; शारीरिक, मानसिक, बौद्धिक वाढ अजून व्हावयाची असे; त्यामुळें मुलीला नवीन वातावरणांत एकजीव होऊन जाणें कठीण नव्हतें. लहानसें रोपटें उपटून दुसऱ्या जागीं लावलें तर तें लवकर रुजतें, पटकन वाढतें. पण पूर्ण वाढ झालेलें झाड उपटून दुसऱ्या जागीं नेलें व तें चटकन मूळ धरून, सहजपणें वाढूं लागलें तर तो मोठा चमत्कारच म्हणावयाचा. आजच्या वधू वयानें मोठ्या असतात. त्यांचें व्यक्तिमत्त्व घडलेलें असतें. नवीन संस्कार घेण्याची शक्यता नसते, तयारी नसते. माहेरचा सहवास फारां दिवसांचा, स्नेहाचीं मुळें फार खोल गेलेलीं; माहेरच्या प्रत्येक गोष्टींचा अभिमान जाज्वल्य, आपुलकी गाढ, अशा परिस्थितींत पतीचे लागेबांधे ज्या कुटुंबांत दृढ झाले आहेत, त्या कुटुंबाशीं समरस होणें क्रमप्राप्त खरेंच पण अतिशय बिकट. तें साध्य झालें तर एक अद्‌भुत गोष्ट घडली असेंच म्हटलें पाहिजे.

विवाह या संस्थेच्या कल्पनेंतच मोठें काव्य आहे. दोन व्यक्तींनीं एकनिष्ठपणें आजन्म एकत्र रहाणें व एकमेकांच्या सुखदुःखाचे व लाभहानीचे वांटेकरी होणें ही कल्पनाच मोठी हृदयस्पर्शी, उदात्त व काव्यमय आहे. विवाहानंतर हळूहळू दृढ होत जाणारें स्नेहबंधन, उत्पन्न होणारी जवळीक व शेवटीं साध्य होणारी जिवाशिवाची मिळवणी – प्रत्येक टप्प्याला, या मधुर संयोगांतून मनोज्ञ काव्यरस पाझरतांना सहृदय रसिकाला आढळेल. पतीचें हृदय नवरसानें कांठोकांठ तर भरतेंच पण सासरच्या इतर मंडळींनांहि नवीन सुनेचें कौतुक करतांना पुरेपुरेसें होतें. परक्याची पोर, आपल्या पोराच्या पदराला गांठ

मारून घरांत आलेली. आपला वंशवृक्ष वाढवण्याची नाजुक, बिकट जोखीम ती आपल्या कोंवळ्या खांद्यावर वहाणार. आपल्या घराण्यांतले जुने संस्कार, पुराणपरंपरा समजावून घेऊन, आत्मसात् करून, त्या पुढें चालू ठेवणार. आपल्या माहेराहून, मातापित्यांच्या प्रेमळ छायेंतून ती आपल्या घरीं आशेनें आली आहे. प्रेमाचा स्पर्श, एखादा गोड शब्द यांसाठीं ती आपल्या तोंडाकडे आतां पहाणार आहे. तिचें सुखदुःख सर्वस्वीं आपल्यावर अवलंबून आहे. मायेचा आसरा तुटल्यामुळें बावलेलें हें फूल सहानुभूतीचा फुंकर घालून आपल्याला पुन्हां फुलवायचें आहे. स्फुंदत, अश्रु ढाळीत आई-बापांनीं आपल्या हवालीं केलेला अमोल ठेवा सासरचीं माणसें पुनःपुन्हां कौतुकानें, कुतूहलानें, धन्यतेच्या भावनेनें न्याहाळीत रहातात.

या अद्भुतरम्य, कुतूहलपूर्ण वातावरणांत, विवाहानंतरचे दिवस, वधू-वरांच्या धुंद दृष्टीपुढें एखाद्या गूढ, मधुर, सुंदर स्वप्नासारखे उलगडत जातात. नवरा-बायकोच्या मनांचा मिलाफ इतक्या चटकन् इतका पक्का होतो कीं, घरांतील वडील माणसें तो चमत्कार पाहून, अचंब्यांत पडतात. लग्नाच्या आदल्या दिवसापर्यंत, शाळा, कॉलेज, ऑफिसमध्यें जातांना, ज्या मुलाला कपडे, पुस्तकें, पेन, घड्याळ, किल्ल्या शोधून द्यायला आई लागत होती, त्या मुलाला "आई घरांत आहे" या गोष्टीचासुद्धां विसर पडल्यासारखा होतो. "एकला नयनाला विषय तो झाला" याप्रमाणें दिवसरात्र त्याचे डोळे, कान, जणूं एकाच व्यक्तीसाठीं असतात. चार शब्दांनासुद्धां महाग झालेली आई आश्चर्य करते, व तिला खेदहि होतो. "मुलगा आपल्याला अंतरावा म्हणून का आपण एवढी वाजतगाजत सून घरांत आणली! पंचवीस वर्षें याच्यासाठीं खस्ता खाल्ल्या, अपार माया केली – हें सगळें एका दिवसांत, एका क्षणांत कसें विसरला हा? मंतरलेलें पाणी टाकून चमत्कार घडवून आणणाऱ्या अरबी भाषेंतल्या चेटकिणीप्रमाणें, मंगलाष्टकें म्हणतांनां टाकलेल्या अक्षता कुणीं भारून ठेवल्या होत्या कीं काय?" असे विचार आईच्या मनांत येतात व ती कष्टी होते.

खरोखर, 'कामा'ची शक्ति या जगांत फार मोठी आहे. फ्रॉइडनें 'कामप्रवृत्तीला' ( sex instinct ) दिलेलें महत्त्व कधीं कधीं जरा अतिशयोक्त वाटलें तरी, सत्यसृष्टींत पाहूं गेलें असतां, त्याचा समग्र मानवजीवनाचा अर्थ

'कामवृत्ती'च्या संदर्भात लावण्याचा सिद्धांत अगदींच निराधार नाहीं, असें वाटूं लागतें. हल्लींच्या नवरा-बायकोच्या विवाहोत्तर वागणुकींत, फ्रॉइडच्या सिद्धांताचें खरेंपण, सासूसासऱ्यांना स्पष्ट दिसतें. साठ-सत्तर वर्षांपूर्वी मुलेंमुली लग्नांत लहानवयी असत. "नवरटला खापिटला" म्हणण्याचे दिवस अगदींच मागें पडले असले तरी, आठ-नऊ वर्षांच्या सागरगोटे खेळणाऱ्या पत्नीचा सागरगोटा झेलून लपवल्यामुळें फुरंगटलेल्या सुनेची समजूत, रामशास्त्री प्रभुणेच्या आईला कशी घालावी लागत असे व 'अरे, तिची खोडी काय काढतोस अशी सारखी म्हणून 'राम' ला कसें रागवावें लागत असे, हें तो चित्रपट पाहिलेल्या वाचकांना स्मरत असेल. बालविवाहाच्या काळांत, सासूसासऱ्यांच्या छत्राखालीं, समवयस्क दीरनणंदांच्या सहवासांत, क्रमाक्रमानें बाल्यांतून यौवनांत मुलगी प्रवेश करीत असे. मुलगाहि आईच्या मायेच्या कोषांतून हळूहळू बाहेर पडत, प्रणयाच्या जाळ्यांत नकळत गुरफटत असे— पण हा खेळ, transfer scene सारखा, झटपट प्रवेशासारखा, एकदोन दिवसांत खेळला जात नसल्यामुळें तो वडील माणसांच्या डोळ्यांवर येत नसे; त्यांच्या मनाची हळुहळू तयारी होत गेल्यामुळें, त्यांना पति-पत्नीच्या जवळकीचें वैषम्य वाटत नसे. पण प्रौढ-विवाहाच्या या जमान्यांत, ऐन तारुण्यांत तरुण-तरुणी विवाहबंधनानें निगडित होतात; अशा वेळीं एकमेकांची भुरळ परस्परांवर पडून तीं परस्परांसाठीं वेडीं झालीं, एकमेकांचें जग एकमेकांत पाहूं लागलीं व पहातां पहातां बेभान होऊन, बाकीच्या जगाची शुद्ध हरपून बसलीं, तर त्यांत आश्चर्य नाहीं. मात्र एकमेकांच्या अवीट सहवासांत, एका अनोख्या जगाची ओळख करण्यांत मग्न होऊन, त्या अनुभवाचा आनंद लुटतांना, उभयतांनां कुटुंबांतील इतर व्यक्तींच्या बाबतींतल्या कर्तव्याचें विस्मरण होतें, त्यामुळें तीं टीकेस पात्र होतात व कुटुंबीयांच्या मनोव्यथेस कारण होतात.

ही कुटुंबीयांची मनोव्यथा, अपेक्षाभंगाचें दुःख मला अनेक कुटुंबांत आढळतें. "अलीकडच्या मुली एवढ्या मोठमोठ्या परीक्षा देतात, कॉलेजांतून शिकतात; सासरीं, कुटुंबीयांना धरून कसें वागावें हा साधा व्यवहार नाहीं का शिकवीत कॉलेजांतून?' अशी पृच्छा एका मन दुखावलेल्या सासूबाईंनीं मजजवळ केली होती. मीं त्यांना माहिती पुरवली कीं नव्यानें निघालेल्या "Home Science Colleges मधून Family Relationships" "कौटुं-

बिक लागेबांधे संभाळण्याची, टिकवण्याची, वाढवण्याची जबाबदारी कशी पार पाडावयाची " या विषयाचें शिक्षण देण्यांत येतें. पण त्या माऊलीची सून हा विषय शिकली नसावी किंवा शिकलेलें ज्ञान मदनबाणाच्या टोकानें तिच्या मनांतून उडवून टाकलेलें असावें.

या बाबतींत अर्थात् एकाच पक्षाला दोषी ठरवणें न्यायाचें होणार नाहीं. एका हातानें टाळी कधीं वाजत नाहीं. तेव्हां या कौटुंबिक लागेबांधे संभाळण्याच्या बाबतींत, दोन्ही पक्षांनां, कुटुंबीयांनां व नवविवाहितांनां चार शब्द सांगावेसे वाटतात.

प्रथम कुटुंबीयांच्या मनोभूमिकेचा विचार करूं. पूर्वपरंपरेनें कुटुंबांतील सासूसासऱ्यांच्या अशा अपेक्षा बनलेल्या असतात कीं, घरांत सून आली कीं सासूच्या शिरावरचा कामाचा बोजा हलका व्हावा. पूर्वसंस्कारांमुळें कुटुंबीयांची अपेक्षा असते कीं, सूनबाईनें सासूसासऱ्यांच्या अर्ध्या वचनांत राहावें. पूर्वीपासून घरांत चालत आलेली रीतभात, कुलाचार सासूच्या हाताखालीं शिकावा व मग ती परंपरा पुढें चालवावी. आतां तर सूनबाई चांगल्या वयानें मोठ्या, शिकल्यासवरलेल्या; तेव्हां त्या सर्व गोष्टी चटाचट शिकून घेऊन आपली संसाराच्या जबाबदारींतून चटकन सोडवणूक करणार, या कल्पनेनें सासूबाई नव्या सूनबाईच्या वागण्यासवरण्याकडे चिकित्सक दृष्टीनें बघत असतात. लग्नानंतरचा महिना नव्या नवाळींत, नातेवाइकांच्या घरीं फराळ मेजवान्या झोडण्यांत, सूनबाईला हौसेनें नित्य नव्या वस्त्रप्रावरण-अलंकारांनीं नटवण्यांत निघून जातो. मग हळूहळू संघर्षाला सुरुवात होते. अगदीं जुन्या मताची सासू असली तर पांचवारी नेसून शेपटे फलकावीत सुनेनें घरभर हिंडावें हें तिला आवडत नाहीं. तुळशीला पाणी घालणें, गंध उगाळून पूजेची तयारी करणें वगैरे 'ओळ' तिला नाहीं, उष्टें-खरकटें, सोंवळें-ओंवळें याचा विधिनिषेध नाहीं, गव्हले-पापड करतां येत नाहींत, घरीं बसावयास, सून पाहावयास बायका आल्या तर त्यांनां नमस्कार करण्यास आपणहून वांकत नाहीं, वगैरे अनेक तक्रारी सासूबाईच्या चालू असतात. जरा आधुनिक वळणाच्या सासूबाईंना सुद्धां सुनबाईचें कांहीं कांहीं बाबतींतील वागणें खटकतें. विशेषतः तिचें व मुलाचें एकमेकांभोंवतीं दिवसभर घोंटाळणें, वडील माणसांसमोर हंसणेंखिदळणें किंवा घरांत इतर चार माणसें जमलीं असतांना, दारांना कड्या घालून खोल्यांतून दिवसाढवळ्या

हितगुजें करणें, घरांतील अडचणींचा विचार न करतां दोघांनींच सिनेमा-सहलीला वगैरे जाण्याचे बेत आंखणें, घरांत परवानगी विचारल्याशिवायच मित्रमैत्रिणींच्या घरीं पार्टीला वगैरे जाणें, घरांत आपलेपणानें सर्वांचें करण्या-ऐवजीं आपलें व नवऱ्याचेंच तेवढें व्यवस्थित करणें, एकंदरीनें परकेपणानें वागून, घराची एकजिनसी जबाबदारी अंगाबाहेर टाकणें–वगैरे वागण्याच्या तऱ्हांनीं सासूबाई नाराज होतात, सूनबाई आल्यानें आपलें काम व जबाबदारी कांहींच कमी झाली नाहीं म्हणून रंजीस येतात. हा वागण्याचा एक प्रकार. हें एक टोंक. सासरा जोंवर घरांत कर्ता पुरुष असतो, तोंवर सूनबाईची वागण्याची ही तऱ्हा असते. नंतर सासरा पेन्शनींत निघाला, कीं वर्तणुक दुसरें टोंक गांठते. तें म्हणजे सासूसासऱ्यांना अजिबात गुंडाळून ठेवून, घराचा संपूर्ण ताबा घेऊन मनसोक्त वागणें, सासूसासऱ्यांचीं जुन्या ऋणानुबंधाचीं माणसें घरांत भेटण्यास किंवा राहण्यास आलीं असतां, कपाळाला आंठ्या घालून, त्यांचें कसेंबसें जळफळत करणें. त्यामुळें सासरासासूला स्वतःच्या घरांत चोरट्यासारखें वाटूं लागतें. आपलीं चार माणसें पाहुणी आल्यामुळें, किंवा आपल्या मुलीबाळी माहेरपणाला आल्या म्हणजे सुनेला जास्त काम पडतें व मुलावर पैशाचा भार पडतो म्हणून सासूसासऱ्याला ओशाळगत वाटते. हळूहळू या कानकोंडेपणाचें उद्वेगांत रूपांतर होतें. आपण कष्ट करून जन्मभर संसार केला, मुलाबाळांना शिक्षण देऊन मोठें केलें, त्यासाठीं पदरमोड करून आतां म्हातारपणीं कफल्लक झालों, आतां सर्वस्वीं परावलंबी जिणें जगण्याची वेळ आली, स्वतःच्या रक्तामांसाचा मुलगा असून आपल्याला लाचारी पत्करावी लागते, म्हणून या वृद्धांना विषाद वाटतो. मुलाबद्दल आईबापांनां, भावाबद्दल बहिणींनां मायेचा ओलावा नैसर्गिकच असल्यामुळें, सगळ्या दोषांचें खापर बऱ्हंशीं सुनेच्या मस्तकावर फुटतें. अलीकडच्या जमान्यांत शिक्षणहि दोषाचें जबाबदार धरलें जातें. शिकलेल्या मुलींचीं हीं सारीं थेरें असा ग्रह होतो. त्या कावेबाजपणें नवऱ्याला आपल्या मुठींत ठेवतात व मग तो बाईलबुद्धया, स्वतःचे डोळे असून त्यांनीं बघत नाहीं, कान असून ऐकत नाहीं, तोंड असून कांहीं बोलत नाहीं असें वाटूं लागतें.

ही कुटुंबांतील वडीलधाऱ्या माणसांची स्थिति खेदजनक आहे, यांत शंका नाहीं. सध्यां मध्यमवर्गांतून घरोघर ही परिस्थिति आढळते. वाङ्मयांतून, विशेषतः मासिकांतल्या लघुकथांतून या परिस्थितीचें करुण प्रतिबिंब पडलेलें

आढळतें. या परिस्थितीला जबाबदार कोण, तरुण पिढी, कीं जुनी पिढी कीं संक्रमणाच्या अवस्थेंतील कांहींशी विस्कटलेली समाजाची घडी, हें ठरवणें कठीण आहे. पण परिस्थिति निवळावी म्हणून उभयपक्षीं काय करतां येईल याचा विचार उपकारक व्हावा.

प्रथम आपली आधुनिक जमान्यांत बदललेली समाजरचना जुन्या पिढीनें लक्षांत घेतली पाहिजे. कृषिप्रधान संस्कृतींत, लहान गांवांतून एकत्र नांदणारीं मोठालीं कुटुंबें आतां राहिलेलीं नाहींत; त्या पंचवीसतीस माणसांच्या कुटुंबांत नवी सून अगदीं सहजपणें सामावून जाई. मोठ्या प्रमाणावर चालू असलेल्या परंपरा, व्रतवैकल्यें, सणवार, रीतरिवाज, यांत रुळतां रुळतां ती त्या अगदीं सुलभतेनें आत्मसात् करी. दुसरी, फार महत्त्वाची, लक्षांत घेण्याजोगी गोष्ट म्हणजे मुलीचें विवाहाचें वय, तिनें घेतलेलें शिक्षण व त्यामुळें तिचें पूर्ण आकार घेतलेलें व्यक्तिमत्त्व. पूर्वीं लग्नांत मुलीला परकर शिवावे लागत व नंतरहि ' पदर ' येईपर्यंत सासू सुनेला वीतवीत कांठाच्या खणाचे परकर, पुढें ' शिपाई ' लावून मोठ्या हौसेनें शिवी. आतां मुली मोठ्या असतात. नवीन पद्धतीप्रमाणें ' लगीन साड्या ' पसंत करतेवेळीं, दागिन्यांचे घाट निवडतेवेळीं भावी सूनबाईला बरोबर घेऊन जाण्याचा प्रघात पडला आहे, तो खरोखर फार स्तुत्य आहे. पण लग्नाच्या वेळीं इतका समजूतदारणा दाखविणारीं माणसेंसुद्धां, विवाहोत्तर सून नांदायला आली, कीं तिच्या वेगळेपणामुळें, तिच्या भिन्न चालण्याबोलण्याच्या तऱ्हेमुळें, खाण्यापिण्याच्या निराळ्या संवयीमुळें, बिथरून जातात. आपल्या कुटुंबाच्या खाण्यापिण्याच्या संवयी, आपली वागण्याबोलण्याची तऱ्हा, आपले विचार, आपलीं मतें, आपले रीतरिवाज ती उचलीत नाहीं म्हणून वडील माणसें नाराज होतात. लग्नाच्या पूर्वी वापरलेला समंजसपणा व उदार दृष्टिकोण, नंतरहि बारा महिने कायम ठेवला तर कुटुंबांत संघर्षाची ठिणगी पडणार नाहीं व उभयपक्षी मनःशांति बिघडणार नाहीं. या वडील मंडळींनीं असा विचार केला पाहिजे कीं, वीस-बावीस वर्षांची, शिक्षणानें मनाचा, बुद्धीचा पूर्ण विकास झालेली मुलगी नवे व निराळे संस्कार कसे स्वीकारील ? ओल्या मातीला हवा तसा आकार देतां येतो; पण भाजून पक्क्या झालेल्या भांड्याला निराळा आकार देऊं म्हटलें तर " घटस्फोट " झाल्याशिवाय तें होणें नाहीं. उच्च शिक्षण घेतल्यानें सर्वांगीण विकास होऊन

व्यक्तिमत्व घडतें, किंवा तें तसें घडलें पाहिजे, असें आपण म्हणतों, ऐकतों. अट्टाहासानें, शिकलेली मुलगी सून म्हणून घरांत आणतों; मग व्यक्तिमत्व बनून गेलेल्या या मुलीवर, सासरच्या कुटुंबाचे ठसे कसे उमटणार ? पाश्चात्त्य संस्कृतीपासून आपण, स्त्रीशिक्षण, प्रौढविवाह, प्रीतिविवाह, स्त्रीस्वातंत्र्य वगैरे सुधारणा जाणून वा नेणून, राजीखुषीनें वा नाइलाजानें उचलल्या; पण मग या बदलांमुळें कुटुंबाची घडीहि बदलेल या गोष्टीकडे मात्र आपण कानाडोळा करतों. पाश्चात्त्यांपासून नवीन कुटुंबरचना न शिकतां, आपण पहिल्या पद्धतीचाच आग्रह धरून बसतों. नवीजुनी विचारसरणी एका घरांत गुण्यागोविंदानें नांदणें शक्य नाहीं हें पाश्चात्त्यांनीं ओळखून, त्याप्रमाणें कुटुंबव्यवस्था केली. पाश्चात्त्य पद्धतीप्रमाणें विवाह निश्चित होऊन साखरपुडा झाला की नव्या कपड्यालत्त्यांच्या खरेदीबरोबर भावी जोडपें आपलें नवें बिऱ्हाड, आपला सवता सुभा थाटण्यास सुरुवात करतें. त्यांचा नवीन संसार स्वतंत्रपणें मांडण्याची जुळवाजुळव करण्यास हवी असेल ती मदत वडील माणसें आनंदानें देतात. संमति तर, लग्न झाल्याबरोबर वेगळें बिऱ्हाड ही एक अगदीं स्वाभाविक गोष्ट समजून, केव्हांच प्रसन्न मनानें दिलेली असते. मुलगा लग्न लावण्यास देवळांत (चर्चमध्यें) जातो तो पित्याच्या घरून. लग्नविधि आटोपल्यावर, मातापित्यांच्या घरीं वधूवरें येतात; तेथें सज्ज ठेवलेली मेजवानी झोडून, ताबडतोब मधुचंद्राच्या सफरीसाठीं तीं निघतात. मधुचंद्राहून परत येतात तीं थेट आपल्या नव्या थाटलेल्या स्वतंत्र घरांत प्रवेश करतात. एकमेकांच्या घराला भेट देण्याचे आठवड्यांतून कांहीं दिवस ठरवून टाकतात. अशा भेटींच्या वेळीं सासूबाईंनां संसाराबद्दल कांहीं "टिप्स्" (सूचना) सूनबाईंना देतां येतात. रोज एका ठिकाणीं राहणें नसल्यामुळें संघर्षाचा प्रश्नच नसतो; त्यामुळें सासूबाईंच्या या सूचना सूनबाई खेळीमेळीनें ऐकून घेतात, क्वचित् अमलांत आणतात. शिवाय नाताळ, कुटुंबीयांचे वाढदिवस, ईस्टर वगैरे नैमित्तिक कारणांस्तव दोन्ही घरें एकत्र येतात व हौसमौज करतात. आतां पश्चिमेकडे पर्यटन करून आलेली मंडळी सांगतात कीं, या पद्धतींतहि जुनी पिढी मोठीशी संतुष्ट नसते. वृद्ध माणसांना म्हातारपणीं एकाकी वाटतें; तरुणमंडळींच्या, विशेषतः नातवंडांच्या सहवाससुखाची ओढ लागते, व ती पुरी होत नसल्यामुळें तीं कष्टी होतात. पण मी म्हणतें, एकत्र राहून उभयपक्षीं सारखी कचकच करीत बसण्यापेक्षां असें स्वतंत्र

राहणें, त्या पद्धतींतील दोष पत्करूनहि कौटुंबिक लाग्याबांध्याच्या दृष्टीनें जास्त उपकारकच ठरेल.

पण सर्वच म्हातारे आईबाप अथवा अन्य नातेवाईक स्वतंत्र राहाण्यास आर्थिक कारणांमुळें, समर्थ होत नाहींत. नाइलाजानें एका घरांत जुनी-नवी पिढी एकत्र नांदावयाची वेळ आल्यास, जुन्या मंडळींनीं आपल्या अपेक्षांस मुरड घालण्यास शिकलें पाहिजे. गीतेमध्यें निष्कामकर्मयोग सांगितला आहे तो फक्त आध्यात्मिक मार्गाचाच वाटाड्या आहे, असें नव्हे. संसारांत शांति प्राप्त करून घेण्यासहि तो उपयोगी पडेल. कर्म करीत राहायचें, पण फलाची अपेक्षा करायची नाहीं, परतफेडीची आशा ठेवायची नाहीं. आपल्या हातून होईल तेवढें कर्म, करतां येतील तेवढीं कर्तव्यें करावयाचीं; पण त्याचा मोबदला म्हणून तरुण पिढी आपणांसाठीं कांहीं करील अशी वाट पहात बसायचें नाहीं. त्यांनीं आपलीं वडील माणसांबद्दलचीं कर्तव्यें बजावलीं तर उत्तमच. आपल्या वांट्यास भाग्य व त्यांच्या वांट्यास चांगुलपणा. त्यांनीं आपलीं कर्तव्यें नाहीं केलीं तर त्यांचें नशीब त्यांच्याबरोबर; पण आपण मात्र आपला चांगुलपणा मळवूं नये. आपलीं मतें वडिलांनीं तरुणांवर लादूं नयेत. आपले आचारविचार त्यांनीं उचलावे अशी सक्ती करूं नये. अशा जुलमाच्या रामरामानें इच्छित साधणार नाहींच, उलट अपमान व वैफल्य वृद्धांच्या पदरांत पडेल. पूर्वीं सर्व ज्ञान अनुभवजन्य असे. ग्रंथ कमी व छापण्याची जादू अवगत होईपर्यंत ग्रंथाचा प्रसार थोडा. तेव्हां वडील माणसांच्या तोंडून ज्ञान मिळविण्याचें महत्त्व फार मोठें होतें. मातृदेवो भव। पितृदेवो भव। आचार्यदेवो भव। हे आदेश कांहीं केवळ वाढलेल्या वयाला मान द्यावा म्हणून नव्हते. देव मानावे अशा योग्यतेचें ज्ञान या त्रयीच्या अंगीं अनुभवापोटीं येत असे. पण आधुनिक युगांत, सातासमुद्रांपलीकडचें, नवखंड पृथ्वीचें ज्ञान, वाटेल तेव्हां, वाटेल त्या वयांत, घरबसल्या मिळूं शकतें. छापील अक्षराची किमया, विज्ञानाच्या वाटचालीमुळें उपलब्ध झालेलीं रेडिओसारखीं साधनें यांनीं गुरुमुखांतल्या ज्ञानाला मागें टाकलें आहे. तेव्हां तरुणांनीं वृद्धांना त्यांच्या अधिक ज्ञानाबद्दल मान देण्याची तत्परता दाखवली नाहीं तर त्याचा खेद किंवा आश्चर्य मानूं नये. केवळ ‘जन्मा’ची देणगी दिल्यामुळें मातापित्यांना पूज्य मानायचें तर ‘जन्म’ ही आजकालच्या दुनि-

येंत अमोल अशी चीज समजली जात नाहीं; व ती हमखास सुखाला कारण होईल असेंहि घडत नाहीं. चांगलें वळण लावलें, सुशिक्षण दिलें म्हणून कृतज्ञता दाखवावी तर तें जुनें चांगलें वळण व सुशिक्षण आजच्या धकाधकीच्या जगांत उपयोगी पडत नाहीं, उलट अंतरायरूप होतें असा तरुण पिढीचा अनुभव असतो. अशा या परिस्थितींत तरुण पिढीनें जुन्या पिढीशीं आदराची वागणूक ठेवावी अशी अपेक्षा कशाच्या आधारावर करावी ?

हें सर्व विवरण कदाचित् एकांतिक वाटेल; पण त्यांतला ग्राह्यांश लक्षांत ध्यायचा तो हा कीं, दिवसेंदिवस जुन्या पिढीनें नव्या पिढीपासून, आज्ञाधारकत्वाची, आदराची, लीनतेची, आपल्या पावलावर पाऊल टाकून चालण्याची अपेक्षा अजिबात करूं नये. अपेक्षाच ठेवल्या नाहींत म्हणजे आशाभंगाचें दुःख नाहीं. वरील गोष्टींपैकीं एखादी अर्धी वांट्यास आली तर निर्भेळ आनंद होण्याची शक्यता मात्र नक्की.

याप्रमाणें, पुढें ज्याचें विवरण विस्तारानें करण्याचा हेतु आहे तो वानप्रस्थाश्रम वृद्धांनीं स्वीकारावा. वानप्रस्थाश्रमाचा नवीन आशय म्हणजे जनांत असून वनांत असल्याप्रमाणें राहाणें — निरिच्छ, निर्लेप, अनासक्त, निरंजन, गीतेंत वर्णन केल्याप्रमाणें 'स्थितप्रज्ञ' बनणें. असा वानप्रस्थाश्रम, समाजसेवाश्रम बनवून समाजाचें हित व मनाची शांति कशी साध्य करून घ्यावी, याचा विचार पुढें करूं.

आतां तरुण पिढीलाहि चार शब्द सांगावयाचे आहेत. त्यांच्या बाजूचें समर्थन वर येऊन गेलेंच; पण आतां उलटेहि चार हात दाखविले पाहिजेत.

नातू आजोबांच्या खांद्यावर बसून, " मी बाबा-आजोबांपेक्षां मोठा " म्हणून टाळ्या पिटूं लागला तर त्याच्या त्या गोड बालिशपणाचें, मधुर, लुटुपुटीच्या अहंकाराचें कौतुक वाटतें; पण तरुण मंडळी, पूर्व सूरींनां मूर्खांत काढून, स्वतःच्या ज्ञानाचा, कर्तृत्वाचा टेंभा मिरवूं लागली, तर तें हास्यास्पद वाटतें. उन्हाळा रुक्ष, रखरखीत म्हणून टाकाऊ ठरवतां येणार नाहीं; कारण त्या रखरखाटामुळेंच वर्षाऋतु जन्म घेतो व पृथ्वीला तृप्त करून सस्यश्यामला करून सोडतो. आजच्या पिढीच्या कर्तृत्वाचीं सूक्ष्म बीजें, बारीक पण टणक मुळें, नक्कीच जुन्या पिढीच्या कर्तृत्वांत सांपडतील. हें ओळखून, पटवून घेणें तरुणांना शहाणपणाचें ठरेल; कारण त्यांनीं लक्षांत घ्यावें कीं, आजची नवी

पिढी ही उद्यांची जुनी पिढी आहे. बिरबल चांदीच्या सुळावर चढला तर शहेनशहांनां सुवर्णाच्या सुळावर चढावें लागेल हें सत्य विसरूं नये. परदुःख शीतळ समजण्याची चूक करूं नये. आजच्या पिढीचें कर्तृत्व उद्यांच्या पिढीनें नादान, कुचकामाचें ठरवलें तर कसें वाटेल? तेव्हां हें सर्व लक्षांत घेऊन तरुणांनीं वृद्धांबद्दल आदरभाव, कृतज्ञताबुद्धि ठेवावी.

आणि ही गोष्ट मोठी अवघड आहे असेंहि नाहीं. जुनीं खोडें जलबिंदूंच्या थोड्याशा शिडकाव्यानेंसुद्धां हिरवळतात. शिकलेल्या सुनेनें दोन-चार वेळां कंबरेंत लवून नमस्कार केला, एखादे वेळेस पाय दाबून दिले तरी वडील माणसांना धन्य धन्य होतें. बारीक-सारीक गोष्टींत परवानगी विचारली तर आभाळ ठेंगणें वाटूं लागतें. एखादें वर्ष लीनतेनें वागून जुन्या, सहृदय, मायेचें आंतडें असलेल्या वडील माणसांनां एकदां जिंकलें, आपलेंसें केलें कीं, पुढें मग पुष्कळ सवलती आपोआप मिळतात. मग एका खिळ्यासाठीं नाल व नालासाठीं अबलख घोडा कां हातचा जाऊं द्यावा?

शिवाय शिकलेल्या मुलींपासून अशिक्षित सासूपेक्षां जास्त समजूतदारपणा, मनुष्यस्वभावाचें जास्त सूक्ष्म ज्ञान अपेक्षित ठेवलें, तर तें वाजवीच ठरेल. सांस्कृतिक विषयांच्या अभ्यासांत, वाङ्मयद्वारा, शिकलेल्या मुलींनीं मनुष्य-स्वभावाचे निरनिराळे नमुने अभ्यासिलेले असतात. मानसशास्त्राच्या अध्यय-नानें, मनुष्याच्या वागणुकींतले बारकावे व त्यांचीं, इतरेजनांच्या चटकन लक्षांत न येणारीं कारणें, सुशिक्षित मुलगी जाणूं शकते. बाळपणीं भोगलेल्या सासुरवासानें आपल्या सासूच्या स्वभावांत आलेल्या कडवटपणाचें मर्म, थोड्याशा सहवासानें तिला कळून येईल व मग त्याचा राग येणार नाहीं. 'घरीं आलेली' विधवा नणंद आपला दुःस्वास कां करते, हें पूर्वीच्या बाल-वधूपेक्षां, प्रौढ, सुशिक्षित सुनेला जास्त चांगलें समजेल व त्या दुःखावर हळुवारपणें, युक्तीनें फुंकर घालण्याची कलाहि तिला लवकर साध्य होईल. कारण तिची बुद्धि प्रगल्भ झालेली असते. ग्रंथद्वारा कां होईना, पण जगाचा अनुभव गाढ व विस्तृत असतो. शाळा-कॉलेजांतून शिक्षण घेतांना पदवीच्या अभ्यासा-व्यतिरिक्त इतर प्रवृत्तींत – खेळ, संमेलनें, नाटकें – तिनें भाग घेतलेला अस-ल्यास निरनिराळ्या स्वभावांच्या व्यक्तींबरोबर काम करतांना तिला सहजीवनाची कला आत्मसात् करतां आली असेल. तेव्हां पांच-सहा माणसांच्या कुटुंबांत

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. १४३५०



सगळ्यांना संभाळून, सगळ्यांना खूष ठेवून पण आपलें स्वत्व राखून वागणें तिला जड जाऊं नये. लग्नाआधीं ती नोकरी करीत असल्यास जगाचा तिचा अनुभव आणखीच जास्त विविध असेल. मात्र सासरच्या कुटुंबाशीं मिळवून घेण्याची इच्छा पाहिजे; इच्छाच नसल्यास मार्ग असूनहि दिसणार नाहींत; दिसूनही तिकडे पाऊल पडणार नाहीं.

ज्या घरीं आपण लग्न होऊन आलों, ज्या कुटुंबाचें नांव जन्मभर आपल्या नांवाशीं जोडून घेतलें, त्या कुटुंबाशीं समरस होण्याची इच्छा व महत्त्वाकांक्षा प्रत्येक सुनेनें बाळगली पाहिजे, असें तिला माझें आग्रहाचें सांगणें आहे. अलीकडे पुष्कळ ठिकाणीं अशी टीका ऐकूं येते कीं—आणि या टीकेला मुलींच्या वागणुकीचा आधार असतोच—"मुलींना सासरचीं बाकीचीं माणसें नको असतात; फक्त नवरा तेवढा हवा असतो." मुलीचीच काय पण मुलीच्या माहेरच्या माणसांचीहि दृष्टि अशीच असते. हें पाहून काळ कसा बदलत जातो व त्याबरोबर माणसांचे दृष्टिकोण कसे बदलत जातात, याची गंमत वाटते. पूर्वीं दहाजणांच्या घरांत मुलगी पडावी, " सासूसासऱ्यांची, दीरानणंदांचीं" सासुरवाशीण व्हावी, असा आईबापांचा कटाक्ष असे. आतांशा आईबापच, "आमच्या मुलीला काय करायचें आहे सासूसासऱ्यांशीं ? पाहिजेत कशाला ते ? आणि असले तरी ती कुठें राहणार आहे त्यांच्यापाशीं ? नवऱ्याला नोकरी लागली कीं ती जाणार नोकरीच्या गांवीं; कधीं सटीसामासीं आली तर आली, नाहींतर नाहींच." असें म्हणतात. आईबापांचेच हे विचार; मग मुलीलाही तसेंच वाटूं लागलें तर कांहीं आश्चर्य नाहीं. पण सुशिक्षित मुलींनीं—स्वतंत्र विचार करायला शिकलेल्या मुलींनीं, या दृष्टिकोणांतील फोलपणा शोधून काढून, त्याचा त्याग करावा. वंशशास्त्राचा अभ्यास केलेल्या सुशिक्षित मुलींच्या लक्षांत येईल कीं, " नवरा तेवढा हवा—सासूसासरे नकोत " ही भूमिका अशास्त्रीय, चुकीची व हास्यास्पद आहे. ' हव्या असलेल्या ' नवऱ्याचा पिंडच मुळीं 'नको असलेल्या' सासूसासऱ्यांच्या रक्तामांसाचा बनलेला असतो. " पंचवीस वर्षांचें वय होईपर्यंत त्याच्या मनावर, बुद्धीवर, चारित्र्यावर झालेले संस्कार, त्याच्या आईबापांपासूनच आलेले असतात, एवढेंच नव्हे तर त्याच्या प्रत्येक अवयवांत मनबुद्धीच्या प्रत्येक कणांत पूर्वींच्या सात पिढ्यांचा वारसा असतो. शिवाय नुसत्या नवऱ्याचाच नव्हे, तर तिच्या भावी अपत्याचा पिंडही हेच पूर्वसंस्कार घेऊन

बनणार आहे. मुलीला सासू-सासरे असावेत असा पूर्वी आग्रह असे ता याच कारणांकरतां. सासू-सासऱ्यांपासून मुलीला आपल्या कुटुंबाचा पूर्वेतिहास, पूर्व-परंपरा समजावून घेतां येते व त्याच्या जोरावर वर्तमान व भावी संस्कारांची संगति लावतां येते. जुन्या माणसांच्या तोंडून कुटुंबांतील जुन्या गोष्टी ऐकल्या-शिवाय, तिला, तिच्या नवऱ्याच्या व मुलांच्या भावी वर्तणुकीचा अन्वयार्थ लावतां येणार नाहीं. नवरा चार दिवस बायकोच्या तंत्रानें चालला, त्यानें तिच्या कलानुसार आपल्या वागण्याचा तोल ठेवला, तिला खूष ठेवण्यासाठीं तिला आवडणाऱ्या गोष्टी आपण आवडवून घेतल्या—तरी तेवढ्यानें कांहीं जन्म संपला नाहीं. पुढें केव्हांतरी त्याचे दबलेले पूर्वसंस्कार, वर डोकें केल्याशिवाय रहाणार नाहींत. मग सासरच्या कुटुंबाची सदैव उपेक्षा करणारी स्त्री बुचक-ळ्यांत पडेल. आपला नवरा व मुलें अशीं कां वागतात, याचें गूढ, फक्त स्वतःच्या संस्कारांच्या संदर्भांत तिला उलगडतां येणार नाहीं. पण जर तिनें त्यांच्या कुटुंबांतील पूर्वसंस्कारांचा अभ्यास केला असला, सासरच्या माणसांत आपुलकीनें वागून त्यांच्याशीं समरस होण्याचा प्रयत्न केलेला असला, तर तिला नवऱ्याच्या व मुलांच्या वागणुकीचें कोडें पडणार नाहीं. सासरीं ती परक्यासारखी वागली, तर सासरचीं माणसें तिच्याशीं आपुलकीनें वागणार नाहींत, तिला विश्वासांत घेणार नाहींत, आपल्या मनाचे पापुद्रे तिला उलगडून दाखविणार नाहींत.

या संदर्भांत मला एक गमतीची गोष्ट आठवते. माझ्या परिचयाची एक सुशिक्षित मुलगी लग्न होऊन सासरीं गेली. नवरा सासूसासऱ्यांचा एकुलता एक मुलगा. तीन नणंदा आपआपल्या सासरीं, पण त्या सगळ्यांचा साहजिकच त्या मुलावर फार जीव. घरांत जुनें वळण. आमच्या तरतरीत, आधुनिक विचारांच्या मुलीला ते लाड व कौतुक खुळेपणाचें वाटे. स्वतःचेंहि असें वेडपट कौतुक करून घेण्याची तिची तयारी नव्हती. सासू-सासऱ्यांचा जबरदस्त अपेक्षाभंग झाला. मतभेद, क्वचित् भांडण होतां होतां शेवटीं घराचीं दोन छकलें झालीं. सासू-सासरे बिचारे डोळे गाळीत बसले. सूनबाईनें अद्ययावत् फॅशनचा नवा कोरा, सासरच्या जुन्या कोंकणीपणाचा वासहि नसलेला झकपक संसार थाटला. योग्य वेळीं तिला पहिलावहिला मुलगा झाला. बारशाचा थाट उडाला. मी मुलाला मांडीवर घेऊन त्याचें कौतुक केलें. मुलगा गोरा, घारा,

देखणा होता. पण मुलगी नाखूष दिसली. तिचे स्वतःचे डोळे काळेभोर होते. मुलाच्या डोळ्याचा घारा रंग तिला बिलकूल पसंत नव्हता. "तुझ्या यजमानांच्या डोळ्यांवर बाळाचे डोळे गेलेले दिसतात" मीं तिला खुलविण्यासाठीं म्हटलें. तिनें कपाळाला आंठ्या घालून म्हटलें. "छे, इतके घारे नाहींत कांहीं त्यांचे डोळे. याचे झाले आहेत सासूबाईसारखे – मांजरासारखे हिरवे अगदीं." तीव्र नापसंतीनें तिनें मुलाकडे पाहिलें. जणूं एवढ्याशा वयापासून अवज्ञा करणाऱ्या, नको असलेल्या आजीच्या डोळ्यांचा रंग उचलणाऱ्या धट्टकल्याचा, तिला राग आला होता. मला हंसायला यायला लागलें. मीं मनांत म्हटलें, "अग, नुसत्या डोळ्यांच्या रंगानें काय झालें आहे? आणखी कितीतरी लकबी, संवयी गुणावगुण त्यानें आजोबाआजीपासून उचलले असतील. ते ध्यानांत येऊं लागले म्हणजे मग किती रागावशील! तुला नको होते ना सासू-सासरे! आतां ते तुझ्या मुलाच्या अंगांतच शिरकाव करून कायमचे तुझ्या घरांत ठाणें देतील. मग घेशीलच ना आवडून?"

सूनबाईनंतर मुलाची पाळी. त्यालाहि चार शब्द सांगितले पाहिजेत. पुष्कळ वेळां जुन्या-नव्या पिढीच्या संघर्षाचें मूळ, मुलाच्याच वागणुकींत असतें. सूनबाईवर नुसतें नांव येतें. अशा वेळीं सूनबाईची मोठी पंचाईत होते. दोन्ही पक्षांचें – वडील माणसें व पति–मन संभाळणें म्हणजे अक्षरशः तारेवरचा नाच ठरतो. "आमच्या आयुष्यांतील कांहीं आठवणी" या आपल्या पतीच्या चरित्रामध्यें रमाबाईसाहेब रानडे यांनीं या पेंचाचें एक छान उदाहरण दिलें आहे. पंडिता रमाबाईच्या प्रवचनासाठीं कांहीं आमंत्रित स्त्री-पुरुष एका घरीं जमणार होते. त्या वेळच्या समाजाच्या एकंदर बनलेल्या अवताराप्रमाणें (Pattern) त्या घरचे पुरुष सुधारलेले होते; बायका अद्यापि जुन्या वळणाच्या होत्या. तेव्हां बैठक घालतांना खुबीनें बायकांनीं आपली बसावयाची जागा आंत आडोशाला केली होती. खुल्या दालनांत पुरुषांची व्यवस्था होती. न्यायमूर्ति रानड्यांच्याबरोबर रमाबाईसाहेब सभास्थानीं आल्या. बाईवर, त्या सुधारकी वळणाच्या म्हणून घरांतल्या बायकांचा दांत होता. तसें रमाबाईसाहेबांचें पोशाखाचें, वागण्याचें वळण जुनेंच होतें. पण त्या इंग्रजी लिहावाचायला शिकतात, पुरुषांच्या सभांनां हजर राहातात, भाषणें करतात, हा जुन्या बायकांच्या मतें सुधारकी अचरटपणा व भ्रष्टाकार. "सुधारकी बायका कशाला

आंत आडोशाला बसतील? बसूं द्यात त्यांनां पुरुषांमध्यें" अशी आपापसांत कुजबूज करून, रमाबाईसाहेबांनां बाहेर पुरुषांत बसण्यास त्या बायकांनीं भाग पाडलें. रमाबाईंनां, एकट्याच पुरुषांत बसायला चमत्कारिक वाटूं लागलें. "मला बरें वाटत नाहीं, मी घरीं जातें" अशी हळूच न्यायमूर्तींनां सूचना देऊन, रमाबाई तेथून उठून घरीं आल्या. घरच्या जुन्या बायकांनां, आपण हुशारी करून कशा उठून आलों, याचें वर्णन रमाबाईंनीं खुलवून सांगितलें. वडील बायकांनीं रमाबाईंची पाट थोपटली. "अग, आपण बायकांनीं असंच मर्यादा संभाळून वागायला पाहिजे. पुरुषांना काय होतं, अमुक करा, नि तमुक करा म्हणून सांगायला! बरं केलंस हो उठून आलीस तें. त्या बायकांचा तरी हा काय चावटपणा! निर्लज्जासारखी पुरुषांच्यांत का एकटी बायको बसणार?" कधीं नव्हे त्या घरांत झालेल्या आपल्या या कौतुकानें रमाबाई खुलल्या. तासभर खेळीमेळी, गप्पागोष्टी झाल्या. मग न्यायमूर्ति प्रवचन ऐकून घरीं आले. नेहमींच्या वहिवाटीप्रमाणें हातांतून पगडी, कोट घ्यावयास रमाबाई पुढें आल्या. आपल्या अधु डोळ्यांच्या शोधक नजरेनें न्यायमूर्तींनीं रमाबाईंकडे बघितलें. "कसें वाटतें आहे तुला आतां?" शांतपणें त्यांनीं प्रश्न केला. तासाभराच्या गप्पागोष्टींच्या भरांत, आपण केलेली बतावणी रमाबाई साफ विसरून गेल्या होत्या. "काय वाटायचं? मला काय झालं आहे?" त्या पटकन् बोलून गेल्या. एकही शब्द न बोलतां न्यायमूर्तींनीं हात मागें घेतला. स्वतःच कपडे जागच्या जागीं ठेवले व ते आपल्या कामास लागले. त्यानंतर दोनतीन दिवस हा अबोला कायम राहिला. बिचाऱ्या रमाबाई अगदीं रंजीस आल्या. शेवटीं चूक पदरांत घेऊन—अशी खोटी बतावणी करून—सभा पुन्हां चुकवणार नाहीं असें रमाबाईंनीं कबूल केलें तेव्हां न्यायमूर्तींनीं अबोला सोडला.

तरुण मुलींची ही अशी बिकट परिस्थिती घरांत होते. नवऱ्यानें म्हणावें, "संध्याकाळीं फिरायला चल." बायको कां कूं करायला लागली कीं रुसावें. त्याचा रुसवा काढण्यासाठीं फिरण्यास बायको तयार झाली तर सासूबाईंच्या रागाला तोंड द्यायची वेळ यायची; कारण सूनबाई फिरायला गेल्या कीं सासूबाईंनां चूल फुंकावी लागायची. सासूबाईंचा तो जळफळाट पाहून, नवऱ्याबरोबर फिरण्यांत आलेली 'मजा' सगळी खलास व्हायची. मुलींची ही कुचं

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 1662

क्रमांक 1662 नों. दि.

बणा, नवरे जर विचारानें वागले तर टळेल. माझ्या ओळखीच्या एका तरुणानें या समस्येवर छान उपाय शोधून काढला होता. तो सकाळीं बायकोला फिरायला नेई; कारण सकाळीं सासूबाईनीं सोवळ्यानें स्वयंपाक करण्याचा प्रघात होता; संध्याकाळीं तो आईच्या बरोबर फिरायला जाई; कारण संध्याकाळच्या ओवळ्या स्वयंपाकाचा 'चार्ज' सूनबाईकडे असे. नवऱ्याचें असें चतुर सहकार्य मिळाल्यास, मुलींनां, कुटुंबीयांचीं मनें संभाळणें सुलभ जाईल.

दुसरें, मुलानें आईबापांबद्दल, बहीणभावांबद्दल किंवा इतर नातेवाइकांबद्दल अनादराचे उद्गार किंवा तुच्छतेची वागणूक बायकोच्या लक्षांत येईल, अशी ठेवूं नये. तोच कुटुंबीयांबद्दल जिव्हाळा दाखवीत नाहींसा झाल्यावर बायकोला तो कुठून उत्पन्न होणार? ती तर जाणून बुजून, परक्या रक्तामांसाची, परक्या घरांतून आलेली असते. कुटुंबीयांच्या अंगचे दोष माहीत असले तरी ते बायकोसमोर काढूं नयेत. 'सत्य सदा बोलावें' वगैरे सुभाषितें पाठ्य असलीं, तरी व्यवहारांत नेहमीं 'हातचा एक' मागें राखून ठेवावा लागतो. दोष दाखवण्या-ऐवजीं आपल्या आई-बापाच्या तरुणपणीं, संसार उभा करण्यासाठीं त्यांनीं केलेले कष्ट, स्वतःवर केलेली अपार माया व असीम स्वार्थत्याग, याचें दिग्दर्शन बायकोजवळ, वेळ साधून निरनिराळ्या दृष्टिकोणांतून करावें म्हणजे तिला कुटुंबाचा पूर्वेतिहास समजल्यामुळें, वडील माणसांबद्दल आदर व सहानुभूतीची भावना उत्पन्न होईल.

तिसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे मुलानें, आपल्या पत्नीचा पिंड व मन, स्वभाव व चारित्र्य ज्या संस्कारांमुळें बनलें आहे, त्या संस्कारांचा अभ्यास तिच्या माहेरच्या माणसांशीं घनिष्ट संबंध ठेवून करावा; तिच्या कुटुंबाचा इतिहास, परंपरा सहानुभूतीनें, आदरानें समजावून घ्याव्या. या बाबतींत मध्यंतरींच्या कालांत वरपक्षाची वागणूक तितकीशी स्तुत्य नव्हती. अगदीं पूर्वीं "सोय पाहील तो सोयरा" असे स्नेहाचे संबंध, सोयरीक जमल्यावर दोन्ही कुटुंबांमध्यें राहात; पण मध्यंतरीं एकदां वरात मिरवून मुलीला आपल्या घरीं आणली की वधूपक्षाचा संबंध संपला, अशा बेफिकिरीनें वरपक्ष वागत असे—आतां हें पुष्कळ बदलत आहे, व हा बदल स्तुत्य आहे. अलीकडच्या जमान्यांत मुलगा सासुरवाडीं पुष्कळ जाणेंयेणें ठेवतो; जिव्हाळ्यानें, आपुल-कीनें पत्नीच्या नातेवाइकांपाशीं वागतो. पूर्वीं कदाचित् एवढा निकट संबंध

ठेवण्याची जरुरी नसेल; कारण तेव्हां बालवधू सासरीं येई व तिचा स्वभाव, व्यक्तिमत्त्व वगैरे सासरच्या संस्कारांनींच घडविलें जाई. पण आतां सर्वांगीण पूर्ण विकास झाल्यावर वधू सासरीं येते. तेव्हां तिचे पूर्वसंस्कार काय आहेत याचें सम्यक् ज्ञान पतीला झाल्याशिवाय उभयतांच्या मनांची मिळवणी शक्य होणार नाहीं. सासरच्या वडील माणसांनींहि, ही आवश्यकता लक्षांत घ्यावी आणि "मुलगा सासुरवाडीला फार जातो; बाईलबुद्ध्या झाला आहे" वगैरे टीका करूं नये. पूर्वी जांवई म्हणजे एखाद्या नबाबासारखा रुबाब त्याचा सासुरवाडीं असायचा. सासुरवाडीच्या माणसांना तो परका वाटे. पण आतां जांवई घरच्या मुलासारखाच त्याच्या सासूसासऱ्यांनां वाटतो. हा बदल स्तुत्य व इष्ट आहे हें लक्षांत घेऊन, मुलाच्या नातेवाइकांनीं आपला दृष्टिकोण आधुनिक ठेवावा. लग्नाच्या वेळीं इंग्रजांमध्यें असा शिष्टाचार आहे कीं मुलानें सासऱ्याला म्हणायचें "you have not lost a daughter, you have gained a son." "मुलगी लग्नानें आपणांस अंतरली असें मानूं नका. उलट तिच्या लग्नामुळें तुम्हांला एक पुत्र लाभला, असें समजा" ही भावना फार स्तुत्य व अनुकरणीय आहे. इंग्रजांचे इतर आचारविचार रीत-रिवाज आपण उचलले, त्यांच्याबरोबरच ही सोयऱ्यांची परस्परांबद्दलची दृष्टि उचलली पाहिजे–आचरणांत आणली पाहिजे.

याप्रमाणें कुटुंबीयांनीं आधुनिक विचारसरणीचा आश्रय केला, जास्त अपेक्षा करण्याचें सोडून दिलें आणि तरुण मुलांमुलींनीं कुटुंबीयांविषयीं आदराची, आपलेपणाची, समजुतीची भावना ठेवली तर कौटुंबिक लागेबांधे स्नेहाचे राहून दिवसेंदिवस गाढ होत जातील. उभयपक्षीं समाधान राहून कुटुंबांत सुखशांति नांदेल. अविभक्त कुटुंबपद्धति तर परिस्थितीनें दिवसेंदिवस मोडतच जात आहे. पुढें मी विवरण करणार असल्याप्रमाणें शहरी राहणींत नवराबायको-मुलें हेंच कुटुंबाचें 'एकम्' (unit) राहणार आहे. पण विवाह झाल्याबरोबर जीं दोनचार वर्षें एकत्र कुटुंबांत काढावीं लागतील, त्या-वेळेला हे कौटुंबिक लागेबांधे, चतुरपणानें वागून, गोडीगुलाबीचे व दृढ राखणें, हें उभयपक्षांस हितावह आहे. ही जबाबदारी उभयपक्षांची आहे हें ध्यानांत ठेवून, उभयपक्षांनीं परस्परसंबंध स्नेहाचे राखण्यासाठीं झटावें.

* * *

प्रकरण ५ वें

# वैवाहिक जीवनांतील ' चकवा '

आधुनिक सुशिक्षित मुलीनें उच्च शिक्षण-सांस्कृतिक (Liberal) किंवा व्यावसायिक (Vocational) घेतल्यानंतर योग्य वेळीं ती विवाहबद्ध होते. विवाहानंतर तिच्या पुढें दोन पर्याय उभे राहतात. मधुचंद्राच्या यक्ष-भूमींतून ती बाहेर पडली व वास्तव जगांतील जीवनाचा विचार करूं लागली की तिला आढळून येतें कीं, आपल्या वैवाहिक जीवनाचें ध्येय ठरवून त्याप्रमाणें आपण आपल्या आयुष्याचा आराखडा रेखला पाहिजे. आपण सुगृहिणी, सुमाता, आदर्श पत्नी होण्याचें ध्येय पुढें ठेवून, संपूर्णपणें घरसंसाराला वाहून घेणार आहों काय ? विवाहपूर्व घेतलेलें सर्वसाधारण किंवा व्यावसायिक शिक्षण, भिंतीवर चौकटींत टांगलेल्या पदवीच्या प्रमाणपत्राप्रमाणें, घराच्या चौकटींतच ठेवणार आहों काय ? का, आपल्या शिक्षणाला अनुरूप असें काम, नोकरी किंवा व्यवसाय पत्करून, आपण आपल्या शिक्षणाचा उपयोग करून, कुटुंबाच्या आर्थिक उत्पन्नांत भर घालण्याचें निश्चित करणार आहोंत ? घरसंसार व घरा-बाहेरील अर्थार्जन यांची सांगड घालण्याचें ध्येय आपण आपल्यापुढें ठेवणार आहों का ? विवाहित स्त्रीपुढील या दोन्ही पर्यायांचा आपण विचार करूंया व त्यांतून कोणत्या समस्या उत्पन्न होतात हें पाहूंया.

पहिला पर्याय पत्करणारी नववधू, लग्न झाल्याबरोबर, ताज्या दमानें, नव्या उत्साहानें, आपला संसार सजवूं लागते. लग्न झाल्यावर दोनचार वर्षें तिला

सासरच्या एकत्र कुटुंबांत परतंत्रपणें काढावीं लागलीं असल्यास, तिचा दबलेला उत्साह, दाबून टाकलेल्या हौशी, मनांतच कोंडून पडलेल्या नवनव्या कल्पना, एकदम उफाळून वर येतात; काय करूं आणि काय न करूं, असें तिला होऊन जातें. लग्नापूर्वी तिनें कांहीं वर्षें नोकरी केलेली असल्यास, त्या कंटाळवाण्या रुक्ष, बेढंगी दैनंदिनींतून आपली कधीं सुटका होईल व स्वतःचें छोटेसें घरकुल मांडून तें सजवण्यानटवण्याची संधि केव्हां येईल म्हणून ती आशेला आलेली असते. लग्न झाल्याबरोबर, लादलेल्या कर्तव्याच्या काचांतून सुटून ती, हौसेने पत्करलेल्या, ज्याच्यासाठीं श्रम केल्यानें शरीरमन सुखावतें, अशा स्वतःच्या संसारांत येते. घराबाहेरच्या ऊन-पावसांतून ती घरट्याच्या सुरक्षित सुखसावलींत येते. संसार मांडतां, शृंगारतां, पहिलीं दोन वर्षें पाऊल न वाजवतां निघून जातात. क्रमानें या छोट्या गृहराज्याचा भावी युवराज अवतरतो. आतां तर त्या तरुण मातेला घरांतच स्वर्ग सामावल्यासारखा वाटतो. घरकाम व तान्हुल्याची गोड चाकरी करण्यास दिवस पुरत नाहीं. इच्छेप्रमाणें—या आधुनिक युगांत व सुशिक्षित मातापित्यांच्या संसारांत स्वेच्छेप्रमाणेंच म्हटलें पाहिजे,—ईश्वरेच्छेनें किंवा नशिबीं असेल त्याप्रमाणें म्हणतां येणार नाहीं—दोन-तीन योजनाबद्ध गृहरत्नें घर उजळतात; या कोमल कळ्या हळूहळू उमलत जातात. घराचें कोंदण अपुरें पडून, लवकरच मुलें घराबाहेर पडतात; मोठीं होऊन शाळेंत जाऊं लागतात. त्यांना स्वतःचें असें जीवन घराबाहेर निर्माण होऊं लागतें. पतीचें स्वतंत्र जीवन घराबाहेर अर्थात् फुलतच असतें. या आठ-दहा वर्षांच्या काळांत त्याला त्याच्या नोकरींत बढती किंवा व्यवसायांत अधिकाधिक यश व नांव मिळालेलें असतें. त्याच्या जबाबदाऱ्या वाढलेल्या असतात. त्या यथायोग्य रीतीनें बजावून, आणखी पुढें सरकण्यासाठीं भगीरथ प्रयत्न करण्यांत तो गर्क असतो.

संसार सुरू करून हा इतका काळ लोटल्यावर, एक दिवस ही सुशिक्षित पत्नी व माता एकदम आपल्या मोह-निद्रेंतून जागृत होते. पहिल्या दहा वर्षांत पडलेल्या मधुर, मादक स्वप्नांची डोळ्यांवरील गुंगी व मनावरील धुंदी एकदम उडून जाते. डोळे उघडून ती सभोंवार पाहूं लागते. घराच्या चार भिंतींच्या आंत तिचा जीव आतां गुदमरल्यासारखा होतो. दाराजवळ येऊन, बाहेरच्या जगाकडे डोकावून पहातां तिला आढळून येतें कीं, तिचा बाहेरच्या जीवनाशीं

संबंध तुटल्यासारखा झाला आहे. बाहेरच्या जगाची तिला ओळख पटत नाहीं. व तें बाहेरचें जगहि तिच्याशीं ओळख दाखवीत नाहीं. ती भांबावून जाते, कावरीबावरी होते. पण मग घरांत येऊन, शांत बसून, ती आपल्या मनाची समजूत घालूं लागते,–"बाहेरच्या जगाशीं संबंध तुटला याचें मीं वाईट वाटून कां घ्यावें ? माझ्या संसारासाठीं, लाडक्या पाडसांसाठीं स्वखुषीनें मीं हा त्याग केला आहे, नाहीं का ? एका स्त्रीच्या स्वार्थत्यागावर, स्वत्वाच्या होमावर उभारलेल्या गृहमंदिराचें सगळे कवि, सगळे लेखक, गुणगान गात नाहींत का ? " न मातुः पर दैवतम् । " असें सुभाषितकारांनीं लिहून ठेवलें आहे, तें आपल्यासारख्या अतुल स्वार्थत्याग आपल्या मुलांसाठीं करणाऱ्या मातांकडे पाहूनच. सुमाता, सुगृहिणी होण्याचें ध्येय आपण पत्करलें तेव्हांच राजीखुषीनें आपण वैयक्तिक महत्त्वाकांक्षेवर पाणी सोडलें; घराबाहेरच्या एखाद्या क्षेत्रांत चमकून उठण्याची उमेद, धमक असून ती बाजूला सारली. आर्थिक स्वातंत्र्य तुच्छ लेखलें, जगाच्या शर्यतींतून आपखुषीनें अंग काढून घेतलें. वैयक्तिक महात्मतेंतून होणारा आनंद, वाटणारी धन्यता आपणास आपल्या पति-पुत्रांच्या उत्कर्षांतून, सुखापासून मिळणार आहे–मिळाली आहेच. " अशी आपल्या मनाची समजूत घालून उत्साहानें ती आपल्या सांसारिक कर्तव्याकडे वळते. घरकामाच्या कधीं न संपणाऱ्या, तोचतोपणानें कंटाळवाण्या वाटणाऱ्या रामरगाड्यांत स्वतःला गुरफटून घेते.

पण दुसऱ्या दिवसापासून ती आपल्या पतीची व मुलांची घरांतील वागणूक पूर्वीपेक्षां जास्त बारीक नजरेनें न्याहाळते. तिचा पति कामावरून घरीं आला, मुलें शाळेंतून परतलीं की त्यांची स्वतःशीं होणारी वागणूक जागरूकपणें तपासते. त्यांचें घरांतलें, घराबाहेरचें जीवन, सुखाचें, आरामाचें, यशाचें व्हावें, म्हणून चोवीस तास तिनें घरांत स्वतःला डांबून घेतलेलें असतें; गहन विषयांनां कवेंत घेईल अशी बुद्धि व प्रशिक्षण घेतलेलें असूनहि, ग्रीक पुराणांतील प्रॉमिथिअसप्रमाणें घरकामाच्या जडमूढ फत्तराला तिनें स्वखुषीनें आपल्याला जखडून घेतलेलें असतें. पण तिनें त्यांच्यासाठीं केलेल्या या आत्मयज्ञाची, अमाप स्वार्थत्यागाची पुसटशी जाणीवसुद्धां तिला त्यांच्या वागण्यांत दिसत नाहीं. तीं आपल्याच कर्तृत्वांत दंग असतात; आपल्या हुशारीबद्दल धन्यता मानून घेत, तिच्याकडूनहि आपलें कौतुक व्हावें म्हणून अपेक्षितात; तिचा पति वाढत्या जबा-

बदाऱ्यांखालीं शिणलेला पण कृतकृत्यतेनें स्वतःवर खूष असतो. आपण कांहींतरी ' पुरुषार्थ ' करून दाखवीत आहों, कांहींतरी भरीव कार्य करीत आहों. समाजाच्या, राष्ट्राच्या प्रगतीस आपला हातभार लागत आहे याचा त्याला अभिमान वाटत असतो. आपल्या पत्नीकडे या यशाचें कांहीं श्रेय जाण्याजोगें आहे अशी जाणीव त्याच्या स्वप्नांतसुद्धां त्याला होत नाहीं. बिचारी पत्नी, आपल्या वांट्याला आलेल्या, आपण खुषीनें स्वीकारलेल्या, निष्क्रिय, बाहेरच्या जगाच्या दृष्टीनें कर्तृत्वशून्य, फिक्या जीवनाकडे पाहून कष्टी होते. घराबाहेरच्या धांवत्या, वेगवान्, झगमगणाऱ्या जीवनाचा भाग बनलेल्या आपल्या पतीकडे ती हेव्यानें बघते; त्याच्या दैनंदिनीबद्दल उत्कंठतेनें प्रश्न विचारते; पण तो आपल्या कामाबद्दल तिच्याशीं बोलायला फारसा उत्सुक नसतो. त्याच्या हिशेबीं त्याचें जग निराळें व तिचें जग निराळें असतें. ती घरांतल्या कांहीं गोष्टींबद्दल, रंगांत येऊन बोलूं लागली तर त्याला तें कंटाळवाणें वाटतें. आपला भार हलका करण्यासाठीं ती त्याला एखादें घरांतलें काम सांगूं लागली तर तो कावतो. " तुम्हांला दिवसभर काय काम असतें ? हीं असलीं कामें माझ्यापर्यंत आणीत जाऊं नका बुवा ! " असें दटावून, हात झाडून, तो मोकळा होतो. ती घरकाम सर्वस्वीं संभाळते याबद्दल कृतज्ञतेची जाणीव त्याच्या वागणुकींत तिला आढळत नाहीं. तिनें हीं कामें करायचीं, हें तो गृहीत धरूनच चालतो. समाजाची हीच दृढभावना कीं, स्वयंपाक, झाडलोट, धू–धास, मुलांचा सांभाळ, हीं बायकांचीं कामें. पण या कामांची किंमत मात्र पुरुषाच्या व समाजाच्या लेखीं जवळजवळ शून्य असते. स्त्रीचें कार्य, संसाररथाच्या दोन चक्रांपैकीं एक, म्हणून ग्रंथांतून गौरविलें जातें– पण तें कौतुक शब्दांतच राहातें. ग्रंथांतून अमाप स्तुति पण प्रत्यक्ष वागणूक तुच्छतेची, असा देखावा स्त्रियांच्या बाबतींत, आमच्या हिंदु समाजांत जसा दिसतो, तसा इतरत्र क्वचितच आढळेल. " गृहं तु गृहिणीहीनं कान्तारादतिरिच्यते। " " यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः। " असें तोंडानें म्हणायचें पण प्रत्यक्ष व्यवहारांत मात्र या देवतांची पूजा, जरी अगदीं खेटरांनीं नाहीं, तरी वाग्बाणांनीं बांधली जाते. मदनाचे पुष्पबाण फक्त लग्नानंतरच्या पहिल्या मादक, मधुर स्वप्नरम्य दिवसांत. " राघू बोले मैनेच्या कानांत ग–चल सखी आंब्याच्या वनांत ग " हें कूजन फक्त पहिले कांहीं दिवस. नंतर, पुढें राघू, आंब्याच्या वनाबाहेर सटकून आपल्या उद्योगाला

लागतो, पण मैना मात्र घराच्या पिंजऱ्यांत बंद होऊन पडते; सोन्याच्या पिंजऱ्यांतला मोत्याचा चारा कांहीं दिवस गोड लागतो पण कालांतरानें ती बेचैन होते; खुल्या आकाशांत भराऱ्या मारणाऱ्या स्वच्छंद राघूकडे पाहून, आपण आपल्या हातानें आपले पंख कापून घेतल्याबद्दल तिला खेद होतो. अशा वेळीं तीव्र वैफल्याच्या भावनेनें पूर्वी मधुर भासत असलेलें तिचें आयुष्य कडवट होतें. हें वैफल्य शंभर वर्षांपूर्वीच्या अशिक्षित बायकांत होतेंच; पण त्या तें अटळ मानीत. स्त्री-जन्माची कहाणी म्हणजे वैफल्याची गाथा हें ठरूनच गेलें होतें. स्त्रीचा जन्म म्हणजे सात जन्म हातून घडलेल्या पापाचें प्रायश्चित्त अशी दृढ भावना स्त्रियांमध्यें होती. परावलंबी, पुरुषाच्या लहरीशीं नशीब जखडलेली स्त्री म्हणजे जशी कांहीं कसायाच्या हातीं सांपडलेली गाय.

> “ काय बाई असूनियां बाप संवरत ( समर्थ )
> कसायामागून चालली गाय हंबरत. ”

या स्त्रीगीतांत वर्णिल्याप्रमाणें विवाहित स्त्रियांची अवस्था होती. ती बदलण्याचा मार्ग माहीत नव्हता. या व्यथेवर इलाज एकच होता आणि तो म्हणजे परमेश्वरापाशीं पुढला जन्म पुरुषाचा मागणें.

पूर्वीची स्त्री अशिक्षित व म्हणून अगतिक असल्यामुळें, हें वैफल्य निमुटपणें घोटून टाकी. पण सुशिक्षित स्त्रीला हा घोट गिळवत नाहीं. तिला हें वैफल्य साहजिकच जास्त सलतें, कारण शिक्षणानें ती स्वतः ‘ समर्थ ’ झालेली असते. बापाच्या सामर्थ्यावर किंवा नवऱ्याच्या जिवावर, जगण्यासाठीं ती अवलंबून नसते. तरीहि गृहिणीपद, मातृपद भूषविण्यासाठीं तिनें परावलंबित्व पत्करलेलें असतें. त्याची कदर समाज, पुरुष करतील अशी अपेक्षा तिला असते; पण शेवटीं तिच्या नशिबीं ची अवहेलना चुकत नाहीं. तिच्या कार्याची किंमत कुणालाच वाटत नाहीं. घरकामाला व बालसंगोपनाला आर्थिक मूल्य ( economic value ) व सामाजिक दर्जा ( social status ) द्यायला समाज व पुरुषवर्ग अद्यापि तयार नाहीं. तोंडानें देतील पण मनांतून पटलेलें नाहीं. ओंठांतलें पोटांत अजून पोंचलें नाहीं, पचनीं पडलेलें नाहीं. पुढें कालांतरानें घरांत सून आली म्हणजे तर स्त्रीचा घरकामावरचा सुद्धां ताबा सुटून, तिचें आयुष्य अगदींच रितें होतें. सुनेचें नवें तंत्र घरांत येतें.

आपल्या घराबाहेरच्या जगांत पति गुरफटलेला पाहून, स्त्री आशेनें मुलांकडे वळते. पण मुलें केव्हांच मोठीं होऊन आईपासून दुरावलेलीं असतात. त्यांना जवळ ओढण्याचा, सर्वस्वीं आपल्यावर अवलंबून ठेवण्याचा ती प्रयत्न करूं लागली तर ती व मुलें दोन्ही हास्यास्पद ठरतील. बालमानसशास्त्र जाणणाऱ्यांना माहीतच आहे कीं वाजवीपेक्षां फाजील काळजी घेणें, (over protection), हें मुलांच्या मानसिक निरोगी वाढीला घातक असतें. याप्रमाणें ज्या पतीसाठीं, ज्या मुलांसाठीं, ज्या घरसंसारासाठीं, स्त्रीनें आपल्या स्वत्वाचा होम केला, तो पति, तीं मुलें, तो संसार हळूहळू तिच्या हातांतून निसटून जातात. तिचें असें कुणीच धरांत राहत नाहीं व ती त्रिशंकूसारखी मध्येंच लोंबकळत राहाते. बाहेरच्या जगाशीं संबंध सुटलेला व घराशीं कालांतरानें तुटलेला. पूर्वीच्या अशिक्षित स्त्रियांना देवधर्म, व्रतवैकल्यें, जपजाप्य वगैरे साधनें वेळ घालवायला, ध्येय म्हणून पुढें ठेवायला व मनःशांति मिळवायला आयुष्याच्या उत्तरार्धांत उपयोगी पडत. पण बुद्धिवादी, बुद्धिजीवी सुशिक्षित स्त्रीला तीं पटत नाहींत. लक्षांत घेण्याजोगी गोष्ट म्हणजे ज्या सुमारास म्हणजे अजमासें चाळीस-पंचेचाळीस वर्षांच्या वयाला, मुलें हातावेगळीं होऊन स्त्रीचें आयुष्य निरर्थक होऊं लागतें, त्याच सुमारास पन्नाशीला आलेला तिचा पति त्याच्या कार्यक्षेत्रांत उच्चपदावर चढलेला असतो. आपल्या कामांतलें नैपुण्य व बरेच दिवसांचा नोकरींतील अनुभव ( seniority ) याच्या जोरावर त्याला भराभर वरच्या जागा मिळत गेलेल्या असतात. घरींदारीं त्याचें आयुष्य यशस्वी, अर्थगर्भ झालेलें असतें. पण स्त्री मात्र, त्याच्या शेजारीं संसारांत उभी असली, तरी तिच्या आयुष्याची दिशा त्याच्या उलट असते. ती वैफल्यानें ग्रासलेली असते; आपला जन्म फुकट गेला असें तिला वाटूं लागतें; आयुष्याच्या पूर्वार्धांत जें कांहीं थोडेंबहुत कमावलेलें असेल तें ती गमावून बसते. तिच्या मनाची शांति नष्ट होते; ती त्रासिक बनते; ज्या वैवाहिक, सुखी जीवनासाठीं तिनें स्वार्थत्याग केलेला असतो, त्या जीवनाला तडे जाऊं लागतात.

घरामध्यें आपल्या स्वार्थत्यागाची, आपण बजावलेल्या कर्तव्यांची कुणालाच जाण नाहीं, हें पाहून, स्त्री आशेनें घराबाहेर, समाजाकडे बघूं लागते. तिथें तरी कुणाला तिच्या कार्याचें, तिच्या सेवाव्रताचें कौतुक वाटत आहे का ?

आपण पूर्वी पाहिलेंच आहे कीं, मध्यमवर्गांतील व्यक्तींच्या वागणुकीकडे

समाजाचे चौकस व चिकित्सक डोळे लागलेले असतात. मध्यमवर्गांतील सुशिक्षित स्त्रियांचें जीवन सर्व समाज, विशेषतः स्त्रीसमाज सूक्ष्म दृष्टीनें निरखीत असतो. शिकलेल्या मुलींबद्दलची समाजाची पहिली प्रतिक्रिया म्हणजे ती पोशाखी, घरसंसाराला निरुपयोगी असणार ही होय. तिचें लग्न झाल्यावर ती संसार कसा करते, नवऱ्याशीं, सासू-सासऱ्यांशीं कशी वागते याकडे समाज टवकारून बघत असतो. आधुनिक काळांत ही शंकाकुल वृत्ति पुष्कळ कमी झाली आहे. पण ५०।६० वर्षांपूर्वी, सुशिक्षित मुलीला सदैव आरोपीच्या पिंजऱ्यांत उभे राहिल्यासारखें वाटत असे. सर्वांच्याच नजरा तिच्यावर रोखलेल्या; व तिच्या प्रत्येक शब्दावर, हालचालीवर नाना अर्थ बसविण्याचे उपद्व्याप करणारे पुष्कळच ' हितचिंतक '. १९३० सालीं माझी एक मैत्रीण लग्न होऊन कोंकणांत सासरीं गेली. तेव्हांची फार गमतीदार हकीगत ती मला सांगे. ती मुलगी रस्त्यानें जाऊं लागली कीं एम्. ए. झालेली मुलगी कशी असते हें पहाण्यासाठीं दाराखिडक्यांतून बायकांची गर्दी होई. एक दिवस तर सांगण्या-सारखी गोष्ट झाली. तिच्या सासूबाई तिला घेऊन संध्याकाळीं एका आप्ताच्या घरीं भेटावयास जाणार होत्या. तसा निरोप त्यांनीं सकाळीं त्या घरीं पाठवला. दुपारीं त्यांच्याकडला एक माणूस येऊन तिच्या सासूबाईजवळ हलक्या आवाजांत चौकशी करूं लागला कीं, " सूनबाई कशावर बसतात ? " कोंकणांत ओटीवर किंवा माजघरांत कांबळें पसरलें कीं छान खाशी बैठक तयार व्हायची. पण त्या आप्तांना वाटलें कीं एम. ए झालेली मुलगी जमिनीवर अंथरलेल्या कांबळ्यावर कशी बसेल ? सारांश, समाजाची कल्पना कीं शिकलेली मुलगी म्हणजे कांहींतरी अद्भुत, जगावेगळी पण निव्वळ दिखाऊ व निरुपयोगी चीज. ती संसार कस्चा करणार ?

या पहिल्या प्रतिक्रियेनंतर, थोडासा अनुभव आल्यानंतर दुसरी प्रतिक्रिया शिकलेली मुलगी, इतर चार मुलींप्रमाणें संसार करूं लागली, मुलांना कडे-खांद्यावर वागवूं लागली कीं मग जुन्या स्त्रिया म्हणत. " हा असा संसार आम्ही सुद्धां केला. तुम्ही एवढी डोकेंफोड करून, शिकून, काय जास्त मिळवलेंत ? " समाज टीका करी कीं, " पोळ्या वाटोळ्या लाटतां येण्यासाठीं कांहीं भूमिति शिकावी लागत नाहीं. शेक्सपीअरचीं अवतरणें पाठ म्हणून कांहीं मुलांना अंगाई करतां यायचें नाहीं. " समाजाची ही टीका

ऐकून शिकलेल्या मुलीलाहि वाटूं लागतें कीं, " खरेंच आपलें शिक्षण फुकट. आपण एवढें मरेमरेंतों अभ्यास करून, पदवी घेऊन शेवटीं काय मिळवलें ? पूर्वीच्या अशिक्षित बायका करीत तेंच आपण करतों आहों; व त्यांच्या वांट्याला जी तुच्छता, बेपर्वाई घरींदारीं येई, तीच आपल्यालाहि भोगावी लागत आहे. "

याप्रमाणें सुशिक्षित विवाहित स्त्री वैफल्यानें भकास झालेलें जीवन जगूं लागते. भरल्या संसारांत ती एकाकी होते. तिचें मन खचून जातें व त्याचा परिणाम शरीरावरहि दिसून येतो. शिकलेल्या बायका, दोनतीन मुलें झाल्यावर, अर्धाअधिक संसार झाल्यावर, त्याच वयाच्या अशिक्षित बायकांपेक्षां जास्त म्हाताऱ्या दिसूं लागतात, हें पुष्कळ ठिकाणीं दिसून आलें आहे. कांहींच्या मतें याचें कारण, प्रथम उच्च शिक्षणाचा व नंतर सांसारिक जबाबदाऱ्यांचा व गर्भधारण, बालसंगोपनाचा—असा स्त्रीवर पडणारा दुप्पट भार. पण मला वाटतें, विवाहित सुशिक्षित स्त्री लवकर शरिरानें व मनानें थकते, याचें कारण तिला आलेली वैफल्याची भावना. तारुण्याची टवटवी व उमेद बरेच दिवस टिकविण्यासाठीं तन्दुरुस्त शरीर व " ना खंत ना खेद " असें मन यांची जरुरी असते, हें सर्वमान्य आहे. पण यापेक्षां सुद्धां " आपली कुणाला तरी जरुरी आहे; आपल्यावर कुणीतरी सर्वस्वीं अवलंबून आहे " ही जाणीव माणसाला तरुण ठेवते. वृद्ध आजी पोरक्या नातवाला मोठा करते, तें याच उमेदीवर. वृद्ध आजीला, आईवेगळ्या मुलाला मांडीवर घेतल्यावर पान्हा फुटतो, ही गोष्ट कदाचित केवळ दंतकथा असली तरी त्यामागील तत्त्व मननीय आहे. " आतां आपल्या उपस्थितीची, आपल्या मदतीची, सहकार्याची कुणाला गरज उरली नाहीं, " असें स्त्रीला संसारांत भासूं लागलें कीं ती शरीरानेंहि वृद्ध होऊं लागते. " A woman is as old as she feels " असें इंग्लिशमध्यें वचन आहे. " बाईचें वय किती ? तर तिच्या मनाला आपण जेवढ्या आहों असें वाटत असेल, तेवढें. " माणसाचें वय मोजण्याच्या फूटपट्ट्या दोन तऱ्हेच्या असतात. एक chronological age म्हणजे वर्षें मोजून ठरणारें वय; व दुसरें biological age म्हणजे शरीरमनाच्या उभारीवर ठरणारें वय, जीवनोपभोगक्षमता दाखवणारें वय. आपण म्हणतों कीं, " अमका साठ वर्षांचा पण उत्साह पंचविशीच्या तरुणाला लाजवील असा

आहे. " पण हा जीवनोत्साह काटेकोरपणें मापण्याचीं साधनें अजून उपलब्ध नाहींत, शाळांतून मुलांचें mental age मानसिक झेंप, अजमावतात. एखादें मूल बारा वर्षांचें वयानें असलें तरी त्याच्या मनाची वाढ मात्र पांच वर्षांच्या मुलाच्या मानसिक पातळीवरच असते. त्याला retarded मागासलेलें, मंद म्हणतात. याच्या उलट एखादें दहा वर्षांचें मूल सोळा वर्षांच्या मुलाएवढी मानसिक प्रगल्भता दाखवतें. मुलांचीं मानसिक वयें अजमावण्याचे तक्ते जसे शिक्षणशास्त्रज्ञांनीं बनवले आहेत तसे स्त्री-पुरुषांचें biological वय मोजण्याचे तक्ते tests कुणीं शोधून काढले तर फार सोईचें होईल.

याप्रमाणें सुशिक्षित विवाहित स्त्रीचें जीवन, फक्त घरसंसाराला वाहून घेण्याचें ध्येय तिनें आपल्यापुढें ठेवल्यामुळें, संसाराच्या उत्तरार्धांत कसें वैफल्यानें कडवट होण्याचा संभव असतो, तें आपण पाहिलें. मध्यमवर्गांतल्या स्त्रिया या वैफल्याच्या भावनेंतून थोडीबहूत सोडवणूक करून घेण्यासाठीं, एका मार्गाचा अवलंब करूं लागल्या आहेत. त्या मार्गावर सडकून टीकाहि होत आहे. विनोदाचा तो एक विषय आजकाल झाला आहे. तो विषय म्हणजे आतांशा बऱ्याच प्रमाणांत शहरांतून ठिकठिकाणीं निघालेलीं महिलामंडळें. मध्यमवर्गांतील खालच्या थरांतील स्त्रिया ( Lower Middle Class ) घरकामाच्या कंटाळवाण्या दैनंदिनींतून थोडा तरी विरंगुळा मिळावा, म्हणून स्वतःची ओढ करून, त्रास सोसून (आणि घरांतल्या माणसांना थोडा त्रास देऊनहि ) महिलामंडळाच्या सभासद होतात. मध्यमवर्गांतल्या वरच्या थरांतल्या ( Upper Middle Class ) स्त्रिया, मुलें मोठीं होऊन शाळेंत जाऊं लागलीं, कीं वेळ जात नाहीं म्हणून महिलामंडळांचा आश्रय करतात. श्रीमंत स्त्रिया काळाचें कंबरडें मोडण्यासाठीं ( to kill time ) रेसेस्‌ना जातात, अद्यावत् वेषभूषा, केशभूषा याच्या मागें लागतात, पार्ट्या देतात, क्लब्‌स्‌मध्यें पैसे लावून रमी खेळतात. त्या जें सामाजिक जीवन ( social life ) मिळविण्याचा प्रयत्न करतात, तेंच सामुदायिक जीवन ( group life ) खालच्या पातळीवर, मध्यमवर्गांतल्या स्त्रिया महिलामंडळांतून मिळवतात. पुढें विस्तारानें विषय मांडावयाचा आहे कीं, स्त्री अथवा कुठलाहि मनुष्यप्राणी, नुसत्या कौटुंबिक जीवनावर जगूं शकत नाहीं. त्याला थोडें सामाजिक जीवन, बाहेरच्या जगाचा वारा, हवा असतो. मनुष्य, आपण समाजाचा एक घटक

आहों, कर्तृत्ववान् घटक आहों, अशी मनाची – जनाची नाहीं पटली तर न पटो – खात्री करून घेण्यासाठीं धडपडत असतो. महिलामंडळांत हें हवें असलेलें सामुदायिक जीवन स्त्रियांना मिळतें.

शिवाय, दुसरी लक्षांत ठेवण्याजोगी गोष्ट आहे कीं, हीं महिलामंडळें पुरुषांच्या क्लब्सारखीं केवळ मनोरंजनासाठीं चालविलीं जात नाहींत. प्रत्येक महिलामंडळाला, त्याच्या मगदुराप्रमाणें ध्येयें असतात. पहिलें ध्येय, आत्मविकास व दुसरें समाजसेवा. कांहींतरी ज्ञानांत, कर्तृत्वांत भर पडावी म्हणून हिंदीचे वर्ग, इंग्रजी संभाषणकलेचे वर्ग, शिवणकाम भरतकामाचे वर्ग, प्रथमोपचाराचें शिक्षण–वगैरे प्रवृत्ति महिलामंडळांतून चालू असतात. अलिकडे भजनाचे वर्ग, कुटुंबनियोजनाचीं केंद्रें वगैरेंवर जास्त जोर देण्यांत येत आहे. या सर्व प्रवृत्तींच्या (activities) मुळाशीं, सभासदांची सर्वांगीण प्रगति व्हावी व त्या द्वारा कांहींतरी समाजकार्य हातून व्हावें, ही उत्कट, प्रामाणिक इच्छा असते. अर्थात् ध्येयसिद्धीसाठीं द्यावा लागणारा वेळ थोडा, व्यवधानें पुष्कळ व सार्वजनिक कार्याचा अनुभव बेताचा, म्हणून मनांत भरावें असें भरीव काम या महिलामंडळांतून होत नाहीं व म्हणून त्यांच्या तथाकथित समाजसेवेची थट्टा होते. पण मला वाटतें, हीं महिलामंडळें पुष्कळ उपयुक्त कामें करीत असतात. बालवाड्या, पुस्तकालयें, दूधकेंद्रें, आरोग्यकेंद्रें, कुटुंबनियोजन केंद्रें व उद्योगमंदिरें अशा स्त्रियांना उपयुक्त व समाजाला उपकारक संस्था कित्येक महिलामंडळें उत्तम चालवतात. आतां या मंडळांतील भांडणें, आपापसांतील हेवेदावे, कोते विचार, क्षुल्लक बाबींचें मोठें स्तोम या गोष्टींवर सपाटून टीका होते; पण टीकाकारांना असा प्रश्न विचारावासा वाटतो कीं, अशीं भांडणें, हेवेदावे, संकुचित वृत्ति कुठल्या क्षेत्रांत आढळत नाहींत ? नुसतें रोजच्या वर्तमानपत्राचें एक पान उघडलें तर देशभर सर्व पातळीवरून, साऱ्या क्षेत्रांतून सुरू असलेले हेवेदावे, क्षुद्र असूया, भल्याबुऱ्या मार्गांनीं स्वतःची प्रतिष्ठा वाढवून घेण्याची धडपड, मोठ्या संख्येनें सांपडतील. "भरीव कार्य होत नाहीं" या टीकेवर असें सांगतां येईल कीं, महिलामंडळांतून भरीव कार्याची अपेक्षा करणेंच चुकीचें आहे. आठवड्यांतून एक दिवस, दोन-तीन तास एकत्र येणाऱ्या महिला कितीसें कार्य करूं शकणार ? त्या एवढें करतात, हेंच कौतुकास पात्र आहे. एखाद्या कार्यास सर्वस्वी वाहून घेतलेल्या संस्थांकडूनसुद्धां मोठेंसें प्रचंड

कार्य होतेंच असें नाहीं, हा सार्वत्रिक अनुभव आहे.

या महिलामंडळांपासून स्त्रियांचे दोन फायदे होतात, अशा मताची मी आहें. दोन तऱ्हेचीं कार्यें मंडळें करतात. पहिलें, यापूर्वी उल्लेखिलेलें घराबाहेरील जीवन, सामाजिक जीवन किंवा सामुदायिक जीवन स्त्रियांना मिळवून देणें हें होय. कृषिप्रधान संस्कृतींत, लहान गांवांतून, हें सामुदायिक जीवन स्त्रियांनां त्यांच्या रोजच्या दैनंदिनींतच मिळत असे. वर्षाचीं सांठवणीचीं वगैरे कामें, भात सडणें, डाळी करणें, पोहे कांडणें, पापड-लोणचीं घालणें, वगैरे कामें सहकारी तत्त्वावर होत असत. अशा वेळीं दहा घरच्या बायका एकत्र जमत व फार खेळीमेळीनें, गप्पाटप्पांत, हास्यविनोदांत हीं कामें उरकीत असत. लग्नमुंजी, डोहाळ-जेवणें, बारशीं, व्रतांचीं संपूर्णें, मावंदीं वगैरे नैमित्तिक कार्यांतहि हें सामुदायिक जीवन बायकांना भरपूर मिळे. अशा वेळीं एकमेकींच्या कौशल्याचें कौतुक होई व परस्परांपासून कित्येक गोष्टी शिकण्याची संधि मिळे. आधुनिक काळांत, शहरांतून, अशा नित्य व नैमित्तिक कामांसाठीं स्त्रियांनीं एकत्र येण्याचें बंद झालें, म्हणून पापड-लोणच्यांचीं दुकानें निघालीं व लग्नमुंजींचीं कंत्राटें देण्याची पद्धत पडली. या नवीन प्रघातांमुळें सोय झाली पण पूर्वीची गंमत गेली. दहा घरच्या बायका एकत्र जमून, हंसतखेळत, एकमेकींचे अनुभव सांगत, रूखवताचे लाडू वळण्यांत, करंज्या करण्यांत, कामापरी काम होई व सहजीवनाचा आस्वाद चाखावयास मिळे. पण आतां हें दिवसेंदिवस शक्यच होईनासें झालें आहे. आतां शहरांत त्रुटित कुटुंबें, दोन खोल्यांत त्रिपुटी-नवरा-बायको-मुलें असें कुटुंबाचें एकम् ( unit ) झालें आहे. पूर्वीच्या लहान शहरांतल्या मोठ्या वाड्यांतून दहाबारा कुटुंबें बिऱ्हाडाला असायचीं. त्यांतल्या बायका दुपारीं एखाद्या मध्यवर्ती ओटीवर तांदूळ निवडायला, शेंगा सोलायला एकत्र बसायच्या. हातानें काम, तोंडानें गप्पा. वर्तमानपत्राचें, क्लबाचें, विचारविनिमय परिसंवाद समीक्षण करणाऱ्या सभांचें, रंगभूमिजलशाचें काम येथें होऊन जाई; कुणीं ताज्या ताज्या वाड्यांतल्या किंवा गांवांतल्या बातम्या सांगाव्या, कुणी चौघींनीं सोंगट्या कवड्यांचा, फऱ्यामऱ्याचा डाव मांडावा, कुणी आपल्या कुटुंबांतल्या छोट्या-मोठ्या समस्या–दुखणींबाणीं, कटकटी-कुरबुरी, लग्नें-बाळंतपणें–सल्ल्यासाठीं पुढें मांडाव्या, त्याच्यावर मतामतांचा गलबला व्हावा, अशाच समस्यांवर

इतर वाड्याबाहेरच्या कुटुंबांतून योजलेल्या उपायांवर टीकाटुशा कराव्या, कुणीं गाणीं म्हणावीं, तर कुणी घरांतले किंवा बाहेरचे घडलेले प्रसंग रंगवून, ठसक्यानें हुबेहूब उठवावे–(जुन्या फार न शिकलेल्या बायकांमध्यें विनोद-बुद्धि फार असते व वेंचक शब्दांत एखाद्या घरगुती उपमेनें किंवा प्रतिमेनें शब्दचित्र उभें करण्यांत त्यांची बरोबरी कसलेले लेखक सुद्धां करूं शकणार नाहींत. ) पण शहरी राहणींत या ओटीवरच्या 'पंचायती' बंद पडल्या आहेत. आतां दोन खोल्या, दार कायमचें बंद, आंत इन् मिन् तीन माणसें. नवरा ऑफिसमध्यें जातांना, एकदां दार उघडून लागलें, कीं सात-आठ तासांची निश्चिंति. अशा कुटुंब-व्यवस्थेंत स्त्री साहजिकच एकाकी पडते. नवरा-मुलें यांनां बाहेरचें जीवन असतें. स्त्रीचें आयुष्य चार भिंतींच्या आंत. कुणी म्हणेल, स्त्रीनें जवळच्या वाचनालयांत नांव घालावें, फिरत्या मासिकांचें वर्गणीदार व्हावें, रेडिओ ऐकावा–पण या सर्व करमणुकी एकांगी असतात. रेडिओ बोलतो, बाई ऐकते, छापील पानें डोळ्यांवाटे बुद्धींत शिरतात. पण रेडिओ किंवा छापील पानें तिच्याशीं बोलत नाहींत—संवाद करीत नाहींत, व तिला रेडिओशीं किंवा मासिक-पुस्तकांशीं बोलतां येत नाहीं. माणसाला प्रतिसाद ( response ) देईल अशी संगत पाहिजे असते. अशा साथीचा तो भुकेला असतो. ही अशी संगत, साथ मिळावी म्हणून स्त्रिया महिलामंडळांत जातात. मंडळें स्त्रियांच्या मनाची एक फार मोठी गरज भागवतात. घरांतल्या गोष्टींतून, आठवड्यांतून एकदां तरी सर्वस्वीं मन काढून घेणें, कुटुंबीयांव्यतिरिक्त इतर चार बायकांत मिसळणें व सामाजिक जीवनाचा आनंद उपभोगणें हें स्त्रियांचें मानसिक आरोग्य टिकवण्याच्या दृष्टीनें फार जरूर आहे.

महिलामंडळांपासून होणारा दुसरा फायदा म्हणजे सामाजिक कार्यांची होणारी संवय; तीं कार्यें करीत असतांना येणारा अनुभव, व त्यानिमित्त घराबाहेरच्या जगाशीं येणारा, चालू राहणारा संबंध. या संवयीचा, अनुभवाचा, संपर्काचा स्त्रीच्या उत्तरवयांत तिला फार मोठा फायदा होणार आहे. त्याचा विचार पुढें एका प्रकरणांत विस्तारानें करावयाचा आहेच. स्त्रीचें कौटुंबिक जीवन व आयुष्याच्या उत्तरार्धांत ती स्वीकारणार असलेलें सामाजिक जीवन यांनां सांधणारा महिलामंडळें हा एक दुवा आहे. पूर्वीं व्यक्तीनें आयुष्याच्या उत्तरार्धांत वानप्रस्थाश्रमांत प्रवेश करावा, असा धर्माचा दंडक होता. वानप्रस्था-

श्रम म्हणजे परमार्थाचा मार्ग. आयुष्याच्या पूर्वार्धांत 'स्वार्थ' साधला—संसार केला, स्वकीयांचें, स्वतःचें ऐहिक हित साधलें – आतां उत्तरार्धांत परमार्थ साधावा, पारलौकिक हित साधावें, अशी हिंदुधर्माची योजना होती. आधुनिक जीवनांत परमार्थ याचा अर्थ समाजाचें, राष्ट्राचें हित साधणें, असा लावावा लागेल. या समाजसेवेचा थोडासा अभ्यास, स्त्रीला महिलामंडळांतून करतां येतो; व त्यामुळें गृहस्थाश्रमाकडून, एकदम वानप्रस्थाश्रमाकडे वळणें तिला अवघड वाटत नाहीं, जड जात नाहीं.

आतां आपण केवळ घरांतील जीवनांत येणारी विफलता टाळण्यासाठीं, घराबाहेर काम अथवा व्यवसाय करणाऱ्या स्त्रियांकडे वळूं. यांत नुसते पैसे मिळविण्यासाठीं, कारकून, टायपिस्ट, रिसेप्शनिस्ट, सेल्सवुईमेन वगैरे नोकरी करणाऱ्या स्त्रिया व डॉक्टर, वकील, इंजिनिअर वगैरे स्वतंत्र व्यवसाय करणाऱ्या स्त्रिया या दोन्हींचा समावेश होईल. या दोन्ही प्रकारांच्या स्त्रियांच्या जीवनाचा व त्यांच्यापुढें उभ्या राहणाऱ्या समस्यांचा विचार करूं. पुढील प्रश्नांचीं उत्तरें शोधून काढल्यास या विवेचनास मदत होईल. स्त्रिया नोकरी कां करतात ? नोकरी करणऱ्या स्त्रियांना आर्थिक स्वातंत्र्य मिळतें का ? नोकरी करणाऱ्या स्त्रियांचा कुटुंबांत व समाजांत दर्जा वाढतो का ? कौटुंबिक कर्तव्यें व बाहेर पत्करलेल्या कामाची जबाबदारी यांचा मेळ घालतांना, नोकरी करणाऱ्या स्त्रियांच्या मार्गांत काय अडचणी येतात ?

विवाहित स्त्रिया नोकरी कां करतात ? पाश्चात्त्य देशांत या विषयाबद्दल आंकडेवारी गोळा करून, अनुमानें काढण्यांत आलेलीं आहेत. मुंबईच्या एका संस्थेनें मर्यादित क्षेत्र निवडून या विषयाची माहिती गोळा करण्याचा प्रयत्न केला होता. साधारण ढोबळ मानानें असें म्हणतां येईल कीं, मध्यमवर्गांतील खालच्या थरांतील स्त्रिया कुटुंबाची आर्थिक गरज म्हणून नोकरी करतात. मध्यमवर्गांतील वरच्या वर्गांतील स्त्रिया हौस म्हणून, वेळ जात नाहीं म्हणून नोकरी करतात. मघाशीं आपण पाहिल्याप्रमाणें फक्त गृहिणीपद संभाळणाऱ्या स्त्रियांना जगापासून तुटून दूर पडल्याची तीव्र भावना होते–ती टाळण्यासाठीं या स्त्रिया नोकरी करतात. व्यावसायिक शिक्षण घेतलेल्या स्त्रिया आपल्या पेशांत नैपुण्य मिळावें, कीर्ति, मानसन्मान मिळावा, आणि आपण घेतलेल्या शिक्षणाचा उपयोग व्हावा, म्हणून घरांतील कर्तव्यें सांभाळून घराबाहेर

व्यवसाय चालू ठेवतात. केवळ आर्थिक स्वातंत्र्य मिळवावें, आपण शिक्षण घेतलेलें असल्यामुळें परावलंबी, ओशाळें जीवन जगूं नये म्हणूनच केवळ नोकरी करणाऱ्या स्त्रिया मात्र फारशा आढळत नाहींत.

दुसरा प्रश्न असा कीं नोकरी केल्यानें स्त्रियांना आर्थिक स्वातंत्र्य लाभतें का? एकटेपणा गेल्यानें मनाला समाधान मिळतें का? या प्रश्नाचें उत्तर नकारात्मक द्यावें लागेल. एकतर कारकून, टायपिस्ट यांसारख्या नोकरींत विशेष पैसा मिळत नाहींच; जो मिळतो, त्याला खर्चाचीं अनेक तोंडें पडतात. घरची बाई घराबाहेर नोकरी करीत असल्यामुळें नोकरांवर पैसा खर्च होतो, उधळ-माधळ होते. दुसरी गोष्ट पुरुषाच्या नोकरीला घरांत जो मान किंवा किंमत असते ती स्त्रीच्या नोकरीला प्राप्त होत नाहीं. उलट ती घराबाहेर नोकरी करते हा कुटुंबाचा एकप्रकारें अपराधच करते, आपल्या वांट्याचीं घरांतील कामें दुसऱ्यावर लादते; घराबाहेर पोशाखीजीवन जगते, चैन करते– अशा दृष्टीनें कुटुंबीय व समाज तिच्याकडे पहातात. मिळवलेला पैसा खर्च करण्याचा हक्क तिला नेहमींच असतो असें नाहीं; शिवाय कुटुंबाच्या वाढत्या व विविध गरजांत तो पैसा केव्हांच उडून जातो. याप्रमाणें मिळवत्या स्त्रीला आर्थिक स्वातंत्र्य किंवा मानसिक समाधान न मिळतां, घरची व बाहेरची दुप्पट दगदग मात्र तिच्या नशिबीं येते. या शारीरिक शिणाबरोबर, अनेक शंकाकुशंका तिच्या मनाचें स्वास्थ्य नाहींसें करून टाकीत असतात. आपण पांचसहा तास घराबाहेर राहून नोकरी करतों म्हणजे कांहींतरी अनैसर्गिक गोष्ट करतों अशी अपराधाची भावना ( sense of guilt ) तिच्या मनाला सारखी डांचत असते. आपल्या नोकरीमुळें आपल्या हातून आपल्या मुलांची, पतीची आबाळ तर होत नाहीं ना, या भीतीनें तिचा थरकांप होत असतो. लोक म्हणतात त्याप्रमाणें, घराबाहेर, पुरुषांच्या जगांत वावरल्यामुळें आपल्या अंगचें स्त्रीजातिसहज असें मार्दव, लालित्य वगैरे गुण जाऊन आपण ‘ पुरुषी ’ तर बनत नाहीं ना अशी दारुण शंका वरचेवर तिच्या मनांत डोकावते. याप्रमाणें शारीरिक कष्ट, मनाच्या टोचण्या व समाजाची व कुटुंबीयांची टीकाखोर वृत्ति यांनीं मिळवत्या विवाहित स्त्रीचें आयुष्य हालाचें व त्रासाचें होतें.

पुष्कळ पैसे मिळवून देणारी, मानाची नोकरी किंवा लाभदायक स्वतंत्र व्यवसाय स्त्री करीत असल्यास शारीरिक कष्ट वांचतात, कुटुंबांत व समाजांत

दर्जा पण वाढतो. मात्र मनाच्या टोंचण्या कमी होत नाहींत. आपल्या व्यवसायांत विशेष कौशल्य संपादून, पुढें पुढें जाण्याच्या महत्त्वाकांक्षेंत, आपलें आपल्या मुलांकडे पुरेसें लक्ष राहात नाहीं; यामुळें त्यांच्या मानसिक वाढीवर कांहीं वाईट परिणाम तर होणार नाहीं ना ही भीति तिच्या मनाला त्रास देत रहाते. जितकी स्त्री जास्त सुशिक्षित, सुजाण, बुद्धिमान्, तितकी तिची विवेकबुद्धि जास्त जागृत, ज्ञान जास्त चौरस व त्यामुळें मनाचें अस्वास्थ्यहि जास्त प्रमाणांत. ती मनाशीं विचार करते, " स्त्रियांना शिक्षण दिलें म्हणजे त्या सुशिक्षित माता आपल्या मुलांना उत्तम वळण, शिक्षण देऊन, पुढील पिढी समर्थ करून सोडतील; अडाणी, अशिक्षित आई मुलांच्या सर्वांगीण, योग्य वाढीस साहाय्यरूप होत नाहीं, असें स्त्रीशिक्षणाचे कैवारी एकीकडे आवेशानें प्रतिपादन करीत असतात; आणि दुसरीकडे, आम्ही सुशिक्षित स्त्रिया, आपल्या शिक्षणाचें सार्थक करण्यासाठीं, आपलीं मुलें अडाणी आप्त स्त्रियांच्या किंवा पगारी, अशिक्षित नोकरांच्या हवालीं करून, दिवसाचे पांच-सहा तास घराबाहेर काढतों. " हा अनवस्थाप्रसंग, करुण विसंगतीचा देखावा, डोळ्यांसमोर उभा राहून, मिळवत्या स्त्रियांचें मन विषण्ण होतें.

ही अशी बिकट समस्या आज विवाहित, सुशिक्षित स्त्रियांपुढें आहे. गृहसंसार, बालसंगोपन याला सर्वस्वीं वाहून घ्यावें, तर शिक्षण फुकट गेल्याची हुरहूर मनाला लागते. ज्या समाजाचे सुजाण घटक आपण आहों, होऊं इच्छितों, त्या समाजासाठीं आपण कांहीं करूं शकत नाहीं, त्याच्या उन्नतींत आपला कांहींच वांटा नाहीं; मग मध्ययुगीन स्त्रींत व सुशिक्षित म्हणवून घेणाऱ्या आपणांत काय फरक, हा विचार तिला हिरमुसलें करतो. उच्च विद्याविभूषित असूनहि आपणाला समाजांत मानाचें स्थान नाहीं, पूर्वीच्या स्त्रियांच्या वांट्याची उपेक्षा, अवहेलनाच आपल्याही वांट्याला येते – कारण, आपण करीत असलेल्या घरकामाला, अपत्यसंगोपनाला समाज किंमत देत नाहीं. ही जाणीव तिच्या आयुष्यांत वैफल्याची भावना उत्पन्न करते. आयुष्याच्या उत्तरार्धांत मुलें स्वावलंबी झाल्यावर व पुरुष आपल्या क्षेत्रांतील यशाचा कळस गांठण्यांत दंग असतांना, स्त्री संसारांत एकाकी होते. याप्रमाणें " इतोभ्रष्टस्ततो भ्रष्टः । " अशी स्त्रीची अवस्था होते. तिला घरांतहि मानाचें स्थान नाहींसें होतें; बाहेरच्या जगांत तर तिला जागाच नसते.

ही अनवस्था टाळण्यासाठीं घराबाहेर पडून नोकरी करणाऱ्या स्त्रीची

स्थितीहि मोठी स्पृहणीय नसते. तिच्यावर शारीरिक व मानसिक दुप्पट ताण पडतो; घरांतील व नोकरींतील दुहेरीं कर्तव्यें, आटापिटा करून ती सांभाळीत असतांहि, दोन्ही ठिकाणीं तिचें चीज होत नाहीं. घरांतील लोकांचा तिच्यावर असा आरोप असतो कीं, बाहेरच्या कर्तव्याच्या नादांत, ती घराकडे दुर्लक्ष करते; उलटपक्षीं ती जिथें नोकरी करते तिथें तिचे सहकारी व वरिष्ठ कुरकुरतात कीं तिचें संपूर्ण लक्ष कामाकडे कधींच नसतें; अर्धेंअधिक लक्ष घराकडे व मुलांबाळांकडे असतें. ती वरचेवर गैरहजर राहाते. विवाहित स्त्रियांच्या या अधिक प्रमाणांतल्या गैरहजेरीवर (absenteeism), आंकडेवारी गोळा करून, धन्यांनीं ( employers ) वेळोवेळीं ताशेरे झाडले आहेत. याच कारणामुळें विवाहित स्त्रियांना नोकऱ्या देण्यास धनी नाखूष असतात. कांहीं केमिकल कन्सर्न्स्, मुलींना नोकरी देतेवेळेसच, लग्न झाल्यास नोकरीवरून कमी करण्यांत येईल, असा समज देऊन ठेवतात. यावर पुष्कळच टीका स्त्रियांच्या सभांतून होऊन, त्याविरुद्ध चळवळहि होत आहे. स्त्रियांच्या अंगीं उच्च दर्जाची कर्तबगारी ( executive capacity ) असूनहि, केवळ त्या विवाहित म्हणून त्यांना उच्च श्रेणींतील जागा न देतां, खर्डेघाशीच्या मेजापाशीं मानमोड करण्याच्या कामावरच अडकवून ठेवलें जातें. याप्रमाणें नोकरी करणाऱ्या स्त्रियाहि घर-संसार करणाऱ्या स्त्रियांप्रमाणेंच, दोन्ही जगांत मान व इभ्रत गमावून बसतात.

या ' चक्रव्यांत ' सांपडलेली सुशिक्षित विवाहित स्त्री बावरून जाते; ती दुहेरी पेंचांत सांपडते—जीवनाच्या अर्ध्या वाटेवर ती गोंधळांत पडते—आपण रस्ता चुकलों या जाणिवेनें ती घाबरते—पण तिला परत फिरणें शक्य नसतें—व पुढें कोणत्या रस्त्यानें जावें तेंहि कळेनासें होतें. फक्त संसार केलेल्या स्त्रीच्या हातून अर्ध्या वाटेवर संसार सुटून जातो; मग तिला कुठें जावें, काय करावें, हें सुचेनासें होतें—कारण तिनें आपल्या हातानेंच आपल्याला जगाशीं जोडणारे दोर कापून टाकलेले असतात. घर व नोकरी दोन्ही सांभाळण्यासाठीं धडप-डणाऱ्या स्त्रीचीहि त्रेधा होते. केल्या कामाचें श्रेय घरींदारीं, दोन्ही ठिकाणीं मिळत नाहीं. आपला मार्ग चुकला असें तिला वाटतें; पण या ' चक्रव्यांतून ' बाहेर कसें पडावें ते तिला कळत नाहीं; आयुष्याची अर्धी वाट एका रुळावरून गेल्यावर, एकदम सांधा बदलणें जमत नाहीं.

या ' चक्रव्यांतून ' सुशिक्षित विवाहित स्त्रीला बाहेर काढण्याचा कांहीं मार्ग सांपडतो का याचा विचार पुढील प्रकरणांत करूं.

★ ★ ★

प्रकरण ६ वें

# ‘ चकव्यांतून ’ सुटका

सुशिक्षित, विवाहित स्त्री संसाराच्या अर्ध्या वाटेवर कशी ‘ चकव्यांत ’ पडते, हें आपण मागील प्रकरणांत पाहिलें. या चकव्यांतून सुटका होण्याचा कांहीं मार्ग सांपडतो का हें या प्रकरणांत पहायचें आहे.

अर्थात् या समस्येवर सनातनी मताच्या लोकांनीं सुचवलेला मार्ग म्हणजे स्त्रियांनीं उच्च शिक्षण घेण्याच्या भानगडींत न पडणें. मामुली दुय्यम शिक्षण घेऊन त्यांनीं विवाह केला तर मग नुसता संसार केल्यामुळें शिक्षण फुकट गेल्याचीहि भावना होणार नाहीं व जीवन व्यर्थ झाल्याचें वैफल्यहि जाणवणार नाहीं. शिक्षणाचा उपयोग करावा म्हणून नोकरी करण्याची ओढहि वाटणार नाहीं व गुण्यागोविंदानें स्त्रिया घरांतील कर्तव्यें बजावीत रहातील, शिवाय थोडेसें शिक्षण घेतलेलें असल्यामुळें त्या अगदींच अडाणी रहाणार नाहींत. घराबाहेरचा कामचलाऊ व्यवहार करण्यापुरती, जगांत काय चाललें आहे याचें ज्ञान होण्याइतकी बुद्धीची पातळी आलेली असेल. हा सुवर्णमध्य पत्करावा, स्त्रियांच्या उच्च शिक्षणाचा प्रयत्न फसला, म्हणून तो कटाप करावा, म्हणजे सर्व समस्या सुटून जातील. या मतप्रणालीचा विचार तिसऱ्या प्रकरणांत येऊन गेलाच आहे. हा उपाय प्रतिगामी स्वरूपाचा असल्यामुळें, साठ-सत्तर वर्षांच्या प्रगतीवर पाणी फिरवणारा असल्यामुळें तो पत्करणें स्त्रियांच्या व समाजाच्या हिताचें नाहीं. ह्याव्यतिरिक्त, आधुनिक विचारसरणींत, बदलत्या युगधर्मांत बसेल, असा मार्ग आपण शोधून काढला पाहिजे.

आपण गेल्या प्रकरणांत पाहिलें कीं, स्त्रीनें घराबाहेर पडून कामधंदा करावा ही गोष्ट कुटुंबीयांनां व समाजाला अपरिचित असल्यामुळें, त्यांचा सुशिक्षित विवाहित स्त्रीच्या नोकरी–व्यवसायाकडे पहाण्याचा दृष्टिकोण विकृत राहातो; त्यांची सहानुभूति व सहकार्य न मिळाल्यामुळें तिची नोकरी उभयपक्षीं एक समस्या होऊन बसते. ही समस्या सोडविण्याचा पहिला उपाय म्हणजे कुटुंबीयांची व समाजाची या विषयाबद्दलची मनोभूमिका बदलून टाकणें. सुशिक्षित विवाहित स्त्री ही घराबाहेर उद्योगधंदा किंवा व्यवसाय करते तो गरज म्हणून करते असें आपण जेव्हां जेव्हां म्हणतों तेव्हां तेव्हां ही गरज फक्त स्त्रीची नसून तिच्या कुटुंबाची असते—एवढेंच नव्हे तर ती समाजाची व राष्ट्राचीहि गरज असते, ही गोष्ट प्रथम सर्वत्रांनीं नीट ध्यानांत ठेवली पाहिजे. एखाद्या राष्ट्राचें जीवनमान किंवा उन्नति मापावयाची असल्यास त्या राष्ट्रांत ‘ बशे ’ लोक किती आहेत व ‘ उत्पादक ’ लोक किती आहेत हें बघावें असें तज्ज्ञ म्हणतात. स्त्रिया म्हणजे अर्धें राष्ट्र. शंभर वर्षांपूर्वीं मध्यमवर्गांतील सर्वच स्त्रिया ‘ बशा ’ म्हणजे उत्पादनकार्यांत भाग न घेणाऱ्या होत्या. ( आपण आपल्या विवेचनासाठीं नागरी, मध्यमवर्ग निवडला आहे हें वाचकांच्या ध्यानांत असेलच. कामकरी वर्गांचा विचार या पुस्तकांत प्रस्तुत नाहीं. ) पण तेव्हां निदान समाज किंवा राष्ट्र स्त्रियांच्या शिक्षणावर, प्रशिक्षणावर ( training ) पैसा, वेळ व मेहनत तरी खर्चीं घालीत नव्हतें. पण गेल्या साठ वर्षांत स्त्रियांच्या शिक्षणावर–उच्च सांस्कृतिक व व्यावसायिक-शिक्षणावर राष्ट्राचा अर्थ, काळ व श्रम यांचा व्यय चालू आहे. त्याची परतफेड म्हणून स्त्रीकडून राष्ट्राच्या उत्पादनकार्याला ( productive work ) व प्रगतीला कुठल्या तरी क्षेत्रांत हातभार लागावा, अशी राष्ट्रानें अपेक्षा केल्यास तें गैरवाजवी म्हणतां येणार नाहीं. आतां कुणी म्हणेल कीं स्त्री उत्तम संसार करते, मुलांची उत्कृष्ट जोपासना करते, हीच तिची परतफेड राष्ट्रानें मानावी. पण आधुनिक युगधर्माप्रमाणें, स्त्रियांचा दर्जा पुरुषांच्या बरोबरीनें आहे. आपल्या राष्ट्राच्या घटनेंतहि स्त्रीचा समान दर्जा मान्य केला आहे. समान दर्जामुळें जसे समान हक्क मिळतील तशा समान जबाबदाऱ्याहि स्वीकाराव्या लागतील. स्त्री ही उत्तम पत्नी व आदर्श माता झाली कीं तिचें राष्ट्रविषयक कर्तव्य संपलें ही विचारसरणी पुरुषांच्या कर्तव्यासहि लागू करतां येईल काय ? पुरुष हाहि आदर्श

पति व आदर्श पिता अशीं कर्तव्यें बजावीत असतो. पण तेवढ्यानें त्याचें राष्ट्रकार्य पुरें झालें असें म्हणणें हास्यास्पद ठरेल. राष्ट्राच्या उत्पादनकार्यांत व नवजीवननिर्मितींत त्याचा हातभार असणें अत्यंत आवश्यक मानलें जातें. एका लेखकानें असें म्हटलें आहे कीं आदर्श मातापिता, आदर्श पतिपत्नी हें सुशिक्षणाचें दुय्यम दर्जाचें उत्पादन ( byproducts ) आहे. ज्याप्रमाणें रॉकेलच्या खाणींतून मुख्य रॉकेल काढतात पण दुय्यम श्रेणीचें द्रव्य म्हणून व्हॅसेलीनहि काढतात, किंवा पेट्रोल शुद्ध करतांना सर्पण म्हणून वापरण्याजोगा गॅस मिळतो, तसेंच हें आहे. मुख्य उद्देश रॉकेल मिळविण्याचा, पेट्रोल शुद्ध करण्याचा; त्याप्रमाणें उच्चशिक्षणाचा मुख्य उद्देश राष्ट्राच्या प्रगतीसाठीं कर्तृत्ववान्, तेजस्वी नागरिक तयार करणें. व्हॅसेलिन, गॅस हें दुय्यम दर्जाचें, सहजासहजीं उत्पन्न झालेलें तसेंच स्त्री-पुरुष हे कुटुंबाचे आदर्श घटक होतात, ही गोष्ट दुय्यम महत्त्वाची, मुख्य कामाबरोबर सहज साधून गेलेली. सारांश, स्त्रियांच्या कर्तृत्वाची राष्ट्राला गरज आहे. उत्तम स्त्री-डॉक्टर, निष्णात स्त्री-वकील, योजक स्त्री-इंजिनिअर, ( पुरुष इंजिनिअर जीं घरें बांधतात, त्यांत देखावा उत्तम असला तरी सोय शून्य असते, हा बायकांचा अनुभव आहे. ) आदर्श शिक्षिका व परिचारिका, माल खपवणाऱ्या स्त्रिया व विमाव्यवसायांत कार्य करणाऱ्या स्त्रिया वगैरे नाना क्षेत्रांत स्त्रियांची कामगिरी वैशिष्ट्यानें उठून दिसत आली आहे व त्यामुळें स्त्रियांनीं हीं कामें करणें ही केवळ त्यांची गरज नसून राष्ट्राची गरज आहे हें उघड दिसतें. ही गरज एकदां मान्य केली म्हणजे ओघानेंच आलें, कीं स्त्रियांनां ही गरज भागवितां यावी म्हणून राष्ट्रानें त्यांना सहकार्य दिलें पाहिजे. स्त्रियांना आपलीं दुहेरीं कर्तव्यें सुखानें करतां यावीं म्हणून घरामध्यें व समाजामध्यें कुठल्या सोयी, राहणीमध्यें कसले फेरफार व दृष्टिकोणांत कोणते फरक केले पाहिजेत तें पाहूं.

विवाहित स्त्रीची पहिली महत्त्वाची घरांतील जबाबदारी म्हणजे गृहकृत्यें—स्वयंपाक व तदनुषंगिक ठेवरेव, शोभासजावट, वस्त्रपात्राची व वास्तूची स्वच्छता व निगा. घराबाहेर नोकरी करणाऱ्या स्त्रीला हें किचकट व वेळखाऊ घरकामहि करावें लागतें व म्हणून तिच्यावर दुप्पट ओझें पडतें, परिणामीं कुठलेंच काम तिच्या हातून धड होत नाहीं असें मत प्रदर्शित करण्यांत येतें. मला पुष्कळ वेळां वाटतें कीं गृहकृत्यें वा घरकाम याचा उगीचच मोठा बाऊ

करून ठेवण्यांत आला आहे. इंग्रजींत म्हटलें जातें कीं, " A woman's work is never done, " स्त्रीचें काम कधीं संपत नाहीं. तिला किरकोळ रजा नाहीं, हक्काची रजा नाहीं—पूर्वी रूढीनें होती, तीहि आतां सुधारणेच्या नांवाखालीं रद्दबातल झाली—पेन्शन नाहीं. पण स्त्रीचें काम अनंत असतें, त्याला शेवट नाहीं; तें " रात्र संपली पण गोष्टी संपल्या नाहींत "–त्याचप्रमाणें " दिवस संपला पण काम संपलें नाहीं " अशा स्वरूपाचें असतें. याचें कारण, माझ्या मतें त्या कामांत योजकता नसते – तें योजनाबद्ध नसतें. ही योजना ( planning ) कशी आखावी, तें अलीकडे बऱ्याच ठिकाणीं निघालेल्या होम सायन्स कॉलेजांतून, एक परीक्षेचा विषय म्हणून शिकवतात. बिनचूक योजनेमध्यें ( perfect planning ) वेळ, पैसा व मेहनत निष्कारण, बाजवीपेक्षां जास्त खर्चीं पडूं नये म्हणून दक्षता राखण्यांत येते. राष्ट्राच्या राज्यकारभाराला पंचवर्षीय योजना लागतात, त्याप्रमाणें छोट्या गृहराज्यालासुद्धां दैनंदिन योजनेची पावलोपावलीं गरज असते.

माझ्या ओळखीचे एक गृहस्थ थट्टेनें म्हणतात, " बायकांचीं कामें कशीं संपणार ? त्यांच्या कामाची तऱ्हा कशी असते ती पहा. प्रथम घरांतलीं सगळीं भांडीं लखलखीत घांसून, पाण्यानें भरून ठेवायचीं. दुसऱ्या दिवशीं पाणी शिळें झालें म्हणून ओतून टाकायचें; भांडीं बुरसल्यासारखीं दिसतात, म्हणून पुन्हां चकचकीत घासायचीं व ताज्या पाण्यानें भरून ठेवायचीं. तिसऱ्या दिवशीं पुन्हां दुसऱ्या दिवसाची पुनरावृत्ति. हें असें काम कधीं संपत नाहीं, यांत नवल तें काय ? " " योजनाबद्ध, वेळापत्रक आंखून, कामें केलीं तर थोड्या वेळांत पुष्कळ कामाचा उरक पडतो. शिवाय, शहरी राहाणींत घरकामांतील पूर्वीचा किचकटपणा नाहींसा झाला आहे. स्वयंपाकघरांत चिरणारीं, कुटणारीं, विजेवर चालणारीं यंत्रें, प्रेशर कुकर, गॅसच्या चुली, वस्त्रपात्राच्या स्वच्छतेसाठीं द्रवरूप साबण, साबणाचा कीस, निरनिराळ्या स्वच्छ करण्याच्या रासायनिक पुडी, वगैरेंच्या साह्यानें पूर्वीपेक्षां कितीतरी झटपट व कमी मेहनतीनें घरकाम आतांशा उरकलें जातें. शिवाय खरी गोष्ट अशी आहे कीं, " घरकाम, घरकाम " म्हणजे प्रत्यक्ष घरांतलें किंवा घराचें काम नसून घरांतल्या माणसांच्या लहरी, चवीढवी संभाळणें, त्यांचे लाड पुरवणें हेंच मुख्य काम असतें. हें मीच म्हणतें असें नाहीं. महात्मा गांधींसारख्या थोर व्यक्तीनें सुद्धां अशाच आशयाचे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ........................ वि: ..................
क्रमांक ........................ नों: दि: ..................



उद्‌गार काढले आहेत. राजकीय आंदोलनांत स्त्रियांनीं भाग घ्यावा म्हणून गांधीजींनी साद घातली, तेव्हां एकदां एका स्त्रीनें त्यांना प्रश्न केला, "आपण म्हणतां तसें घराबाहेर पडून स्त्रीनें राजकीय आंदोलनाचें काम अंगावर घेतलें तर तिचें आपल्या स्वयंपाकपाण्याकडे, घरकामाकडे दुर्लक्ष नाहीं का होणार?" तेव्हां महात्मा गांधींनीं उत्तर दिलें, "स्त्रीचा घरांतला पुष्कळ वेळ आपल्या पतिराजांची बडदास्त ठेवण्यांतच जात असतो....स्त्रीची ही घरांतली गुलामगिरी मला जंगलीपणाचें लक्षण वाटतें. चुलीचें दास्य हा मुख्यतः रानटीपणाचाच अवशेष आहे, असें माझें मत आहे."

महात्मा गांधी कौटुंबिक व्यवस्थेच्या क्षेत्रांत फार मोठे सुधारक होते. त्यांचीं राजकीय व सामाजिक क्षेत्रांतील मतें जशीं मौलिक व धडाडीचीं होतीं, तशींच कौटुंबिक राहणी, खाण्यापिण्याच्या पद्धति यांबद्दलचीं त्यांचीं मतेंही बारीक निरीक्षण व खोल विचार यांवर आधारलेलीं असून, क्रांतिकारक होतीं. पानें मांडणें, वाढणें, उष्टी उचलून जागा साफ करणें—या गोष्टींत बायकांचा कितीतरी वेळ खर्च होतो. आपल्या दैनंदिनीचें वर्णन बायका त्रिसूत्रींत करतात. "रांधा, वाढा, उष्टीं काढा." महात्माजींनीं या कामांत दोनतृतीयांश कपात केली. स्त्रीनें फक्त रांधावें व चुलीपाशीं गरम राहील असें झांकून ठेवावें. नंतरचें काम प्रत्येकानें आपल्या स्वतःपुरतें करावें. प्रत्येकानें आपली जेवणाची वेळ झाली कीं आपलें पान वाढून घ्यावें. जेवण झाल्यावर पात्रांची व जागेची स्वच्छता स्वतःच करून टाकावी. प्रत्येकानें जर असें आपापलें काम केलें तर घरांतील स्त्रीवर कामाचा मोठा ताण पडणार नाहीं. तसेंच प्रत्येक माणसानें आपले कपडे धुतले, वाळवले, घड्या करून जागच्याजागीं ठेवले, घरांतील आपल्या कामाची जागा किंवा खोली झाडून, पुसून, धुवून स्वच्छ ठेवली, शक्यतेप्रमाणें सजवली तर स्त्रीचें कितीतरी किचकट काम वांचेल व मग तिला वाटेल तेवढा मोकळा वेळ मिळत जाईल. घरकाम ही आधुनिक जमान्यांत फक्त स्त्रीची जबाबदारी नसून, तें एक सहकारी तत्त्वावर करावयाचें, सामुदायिक जबाबदारीचें कलम आहे, हें घरांतील पुरुषांनीं व मोठ्या मुलांनीं लक्षांत घेतलें पाहिजे. ही सामुदायिक जबाबदारी सुलभतेनें पार पाडतां यावी म्हणून घरांतील पुरुषांनीं साधा स्वयंपाक, भांडीं स्वच्छ करणें, कपडे धुणें, झाडलोट, मुलांचें संगोपन व रुग्ण-

परिचर्या या गोष्टींचें कामचलाऊ ज्ञान तरी करून घेतलें पाहिजे व या गोष्टींचा सराव ठेवला पाहिजे. या गोष्टींत पुरुषांनां कांहीं कमीपणा वाटण्याचें किंवा समाजाला कांहीं चमत्कारिक वाटण्याचें कारण नाहीं. बायका जर घराबाहेर पडून पुरुषांच्या बरोबरीनें खुर्च्याटेबलांवर कुशलतेनें कामें करतात तर पुरुषांनीं कांहीं वेळ घरांत बसून, ताटपाटाचीं कामें करण्यास काय हरकत आहे? आतांशा मुलांनां शाळेंत शिवण शिकवतात हें समजल्यावर मला फार संतोष वाटला. बालवीरांनां स्वयंपाक करणें, भांडीं साफ करणें वगैरेचें शिक्षण दिलें जातेंच. नोकरी करणाऱ्या विवाहित स्त्रिया घरांतील अडचणींमुळें फार वेळां रजा मागतात, अशी धन्यांची तक्रार असते. मी म्हणतें, घरांतील अडचणींसाठीं स्त्रीनेंच तेवढी कां रजा घ्यावी? संसारांतली अडचण ती पुरुषाचीसुद्धां अडचण नसते का? मूल आजारी असलें किंवा घरकामाचा गडी गांवीं गेला तर एक दिवस स्त्रीनें व एक दिवस पुरुषानें रजा घेऊन तीं कामें आळीपाळीनें कां उरकूं नयेत? सध्यां आपल्याला पुरुषानें घरांतील अडचणींसाठीं रजा घेणें अप्रयोजकपणाचें वाटतें. कारण पुरुषाला बालसंगोपनाची किंवा घरकाम करण्याची माहिती नसते, अभ्यास नसतो. पण पुरुषांनीं या कामांची एकदां माहिती करून घेतली म्हणजे ते हीं कामें सहज करतील व स्त्रियांबद्दलची त्या जास्त वेळ रजेवर जातात, ही तक्रार बंद होईल.

स्त्रियांवरील घरकामाचा बोजा हलका होण्यासाठीं जशी पुरुषांच्या सहकार्याची आवश्यकता आहे, त्याचप्रमाणें कुटुंबाच्या खाण्यापिण्याच्या संवयी व वेळा यामध्येंहि सोईप्रमाणें बदल करणें अत्यंत जरूर आहे.

पूर्वींच्या काळीं स्वयंपाकघर हें स्त्रीचें साम्राज्य मानलें जाई. तिचा दिवसाचा सर्व वेळ स्वयंपाकघरांत, कुटुंबांतील लहानमोठ्या माणसांच्या खाण्यापिण्याच्या वेळा संभाळण्यांत जाई. प्रत्येकाच्या आवडीनिवडीप्रमाणें, हव्या त्या वेळीं तऱ्हेतऱ्हेचे पदार्थ शिजवून ते लाडाने खाऊं घालण्यांत स्त्रीला कृतार्थता वाटे. मऊ लागलें कीं कोपरानें खणण्याची माणसाची प्रवृत्ति असते. असें चवीचवीनें, वाटेल त्या वेळीं खाणेंपिणें हा पुरुष व मुलें आपला जन्मसिद्ध हक्क मानूं लागले. कांहीं पदार्थ बिघडला तर ताट बायकोच्या अंगावर भिरकावून देणारे पुरुषश्रेष्ठ त्या काळांत शेंकड्यानें सांपडले असते. मुलें अर्थातच बापाचा कित्ता गिरवून, खाण्यापिण्याचीं चोजें, जरा लाडेंलाडें, आईकडून पुरवून घेतात.

गुलामांनां गुलामगिरी हाडींमासीं खिळली कीं तिचेंच भूषण वाटूं लागतें. "चुलींत जन्म" घालण्यांतच बायका भूषण मानूं लागल्या. सिंदबादच्या मानगुटीवर बसलेल्या म्हाताऱ्याप्रमाणें चूल बायकांच्या बोकांडीं बसली. दोन वेळीं चारी ठाव स्वयंपाक. दोन भाज्या, आमटी, चटणीकोशिंबीर, भातपोळी, शिवाय मधूनमधून तोंडांत टाकण्यासाठीं डबे भरून ठेवणें—ही रोजची दैनंदिनी होऊन बसली. आधुनिक युगांत, गांधीजी म्हणाले त्याप्रमाणें स्त्रियांना या चुलीच्या दास्यांतून सोडवलें पाहिजे. यासाठीं कुटुंबीयांनीं आपल्या खाण्यापिण्याच्या संवयी बदलून टाकल्या पाहिजेत. ह्यामुळें दुहेरी फायदा होईल; स्त्रियांचा वेळ वांचेल व नियमित आहारामुळें सर्वांच्या तब्येती सुधारतील. दोन वेळच्या जेवणांत नेमकेच पदार्थ कटाक्षानें ठेवले पाहिजेत. महाराष्ट्रीय स्वयंपाकांत जेवढ्या तऱ्हा आहेत, तेवढ्या सगळ्यांचें दरवेळीं प्रदर्शन केलेंच पाहिजे असें नाहीं. दुपारीं फक्त पोळी व रस्साभाजी, रात्रीं भात व आमटी, कोशिंबीर असल्यास तीच जास्त प्रमाणांत करून भाजी-आमटीला सुट्टी. एखादे वेळेस थालिपीठ, घिरडें केल्यास पोळ्या कटाप; पोहे-सांजा असल्यास भाताला काट. असें जेवणाचे शुद्धीकरण ( rationalising ) केलें पाहिजे. तसेंच खाण्याच्या वेळांतहि बदल करून स्त्रीला जास्त सुट्टा वेळ उपलब्ध करून देतां येईल. मुलें शाळेंतून व पुरुष ऑफिसमधून आल्यावर पोळीभाजी जेवणासारखी खाल्ली तर स्वयंपाकाचा दुहेरी घोळ–एकदां खाणीं व पुन्हां रात्रीं सर्व स्वयंपाक–पडणार नाहीं. मग रात्रीं दूध-पाव यावर भागवतां येईल. प्रत्येक कुटुंबानें अर्थात् आपल्या सोईप्रमाणें, रुचीप्रमाणें, स्वयंपाक काय करायचा ( menu ) तें एकदां ठरवून टाकावें.

स्त्रीच्या घरकामाचा बोजा हलका होण्यासाठीं समाजानें पण सहकार्य दिलें पाहिजे. पाश्चात्त्य देशांत अशा सोयी ( social services ) उपलब्ध आहेत. उदाहरणार्थ, महिन्यांतून एकदां, सर्व घराची साफसुफी एखाद्या एजन्सीला आपल्या अंगावर घेतां येईल. युनायटेड स्टेट्स, ब्रिटन, स्वीडन, फ्रान्स वगैरे देशांमध्यें welfare agencies खाजगी 'कल्याण' संस्था रुग्णोपरिचर्या साफसुफी वगैरे कामें करीत असत. आतां पुष्कळ ठिकाणीं हीं कामें (social security system ) सामाजिक साहाय्य पद्धतींत समाविष्ट झालीं आपल्याकडे अशा ( welfare agencies ) साहाय्यसंस्था सरकारनें व

खाजगी प्रयत्नांनीं चालवल्या पाहिजेत. सध्यां सुद्धां शहरांतून नुसत्या पोळ्या करून देणाऱ्या स्त्रिया असतात. कारण दिवसभर घरीं राहून काम करणारे स्वयंपाकी व नोकर दिवसेंदिवस मिळत नाहींसे झाले आहेत. कारण एक तर राहण्याच्या जागेची पंचाईत व दुसरें एका घरीं राहून नेमक्या पगारांत बांधील काम दिवसभर करण्यापेक्षां अनेक घरीं थोडा थोडा वेळ काम करून नोकरांना जास्त पैसे मिळतात व रिकामा वेळ विश्रांतीसाठीं व मनरंजनासाठीं मिळतो. पण असे नोकर घरोघर पुरवण्याची संघटित व्यवस्था झाल्यास सुरक्षित वाटेल व सोईचें होईल.

सहकारी तत्त्वावर सामुदायिक स्वयंपाकगृहें चालवल्यासहि स्त्रियांचें काम पुष्कळच हलकें होईल. रशियामध्यें प्रचंड मोठ्या प्रमाणावर अशीं ( Community kitchens ) सामुदायिक स्वयंपाकगृहें चालवण्यांत येतात. आपणाकडे प्रारंभीं, मुंबईमधल्या मोठमोठ्या सहकारी तत्त्वावर बांधलेल्या इमारतींमधून ही पद्धति सुरू करण्यास हरकत नाहीं. मात्र ही पद्धत यशस्वी होण्यासाठीं जेवणाऱ्यांनीं फाजील चोखंदळपणा व जिभेचे अवास्तव चोज पुरवणें सोडून दिलें पाहिजे. पाश्चात्त्य देशांत अन्न शिजवण्याच्या पद्धतिं व प्रकार एकजिनसी असल्यामुळें तेथें समाईक स्वयंपाकघरें, भोजनगृहें, हॉटेल्स वगैरे योजना चटकन् आवडूं लागतात व पटतात. आपल्याकडे जातवार मसाले, फोडण्या भिन्नभिन्न, शिवाय शाकाहारी मांसाहारींचा गोंधळ, यांमुळें सामुदायिक स्वयंपाकगृहाची योजना ग्राह्य होणें कठीण जाईल. पण प्रयत्नपूर्वक एकजिनसीपणा आमच्या रोजच्या जेवणांत तरी आणणें अत्यंत जरुरीचें आहे.

याप्रमाणें घरकामाची समस्या कुटुंबीयांच्या सहकार्यानें, स्वयंपाकगृहांतील नवीन यांत्रिक उपकरणें व साधनें यांच्या साहाय्यानें, आहाराच्या पद्धति व वेळा यांचें शुद्धीकरण केल्यानें, 'गृहजीवनसाहायक' खाजगी व सरकारी संस्थांच्या निर्मितीनें व विशेषतः कुटुंबीयांच्या व समाजाच्या गृहकृत्यांकडे पहाण्याच्या बदललेल्या दृष्टिकोणानें सोडवण्यास कठीण जाऊं नये.

जास्त कठीण समस्या बालसंगोपनाची आहे. घराबाहेर पांच-सहा तास नोकरी व घरीं पाठोपाठच्या मुलांचें संगोपन, या दोहोंची समाधानकारकरीत्या सांगड घालणें हें स्त्रीला जवळ जवळ अशक्य होतें व तें साधण्याच्या अट्टाहासांत तिची शारीरिक व मानसिक विलक्षण ओढाताण होते. मुलांच्या

मानसिक व निरोगी वाढीला मातेचें साहचर्य आवश्यक आहे असें बालमानसशास्त्रज्ञ सांगतात. अर्थात् पूर्वी अविभक्त कुटुंबपद्धतींत, पंचवीस माणसांच्या पसाऱ्यांत मुलें वाढत; तेव्हां आईबापांपेक्षां घरांतल्या इतर माणसांच्या सहवासांत तीं जास्त असत. काकूला आई म्हणत व आईला काकू म्हणत. आपली खरी आई कोणती हें पुष्कळ दिवस मुलांना माहितहि नसे; आई घरकामांत गुरफटलेली असे व कित्येक वेळां वडील बायकांना ‘ अग, घे त्याला राहूं दे तें काम. ’ असें रागावून तिला सांगावें लागत असे. त्या वेळीं मुलांच्या मानसिक वाढीवर या परिस्थितीनें कांहीं अनिष्ट परिणाम होत असे कीं काय याबद्दल विचार झालेला नाहीं. तसेंच मुलांच्या निरोगी वाढीसाठीं आईची उपस्थिति चोवीस तास आवश्यक आहे कीं पांच-सहा तासांचें मध्यंतर पडल्यास चालूं शकेल याचा संशोधनात्मक अभ्यास झालेला ऐकिवांत नाहीं. एखाद्या वेळेस असें वाटतें कीं, सुजाण, सुशिक्षित, चतुर माता थोड्या वेळाच्या सहवासांत आपल्या मुलांच्या मनांवर जे उत्तम संस्कार करूं शकेल ते अडाणी माता नुसतें चोवीस तास जवळ राहून करूं शकणार नाहीं. उलट कधीं कधीं सतत सहवासानें दोघें एकमेकांवर कावतात, कंटाळतात. बदल दोघांनांहि हवा असतो.

घराबाहेर काम करणाऱ्या स्त्रियांच्या मुलांच्या प्रश्नाचा बागुलबोवा करून ठेवण्यास, बालगुन्हेगार ज्या कोर्टांपुढें उभे करण्यांत येतात तीं ( Juvenile Courts ) व त्या केसिस चालवणारे ( Probation Officers ) यांचीं या बाबतींतील मतें बरींचशीं जबाबदार आहेत. मुलांची गुन्ह्याकडे प्रवृत्ति होण्याचें मुख्य कारण ‘ Broken Homes ’ गृहिणीहीन ‘ कांतारें ’, म्हणजे घरांतील स्त्री पांच-सहा तास घराबाहेर काम करते हें होय अशी येथें ओरड होते. खरें पाहिलें असतां, नोकरी करणाऱ्या स्त्रियांच्या मुलांची शारीरिक व बौद्धिक प्रगति, इतर मुलांपेक्षां जास्त समाधानकारक असावी. कारण आर्थिक बाजू जास्त बळकट झाल्यामुळें मुलांना जास्त चांगलें अन्न, वेळेवर औषधपाणी मिळूं शकतें. शिक्षणाची सोय जास्त चांगली होते. पुष्कळ कामें स्वतःचीं स्वतःला करावीं लागत असल्यामुळें हीं मुलें जास्त स्वावलंबी, चुणचुणीत असतात.

पण बालमानसशास्त्रानें मातेच्या शिरावर मोठी जबाबदारी लादून ठेवली आहे, त्याकडे दुर्लक्ष करून भागणार नाहीं. शिवाय बालसंगोपनाचा प्रश्न

समाधानकारक रीतीनें सोडवल्याशिवाय बायकांनां घराबाहेर स्वस्थ चित्तानें नोकरी करणें शक्य होणार नाहीं व त्यांची कार्यक्षमता अपेक्षित पातळीवर राहाणार नाहीं. अविभक्त कुटुंबांत वडीलधाऱ्या बायका मुलें संभाळायला असतात. पण आपण पाहिल्याप्रमाणें शहरी राहाणींत नवराबायको व मुलें ही कुटुंबाची पद्धत बनली आहे. मुलांनां संभाळायला नोकर ठेवावे तर, एकतर तें सर्वच कुटुंबांना परवडणार नाहीं. दुसरें, आपल्याकडील नोकरवर्ग अद्यापि अशिक्षित व त्यामुळें स्वच्छतेची व टापटिपीची फारशी कदर नसलेला, आपल्या कामाविषयीं आस्था न बाळगणारा, संशयित प्रामाणिकपणाचा, शक्य तेवढी कामाची टाळाटाळ करणारा, निष्काळजीपणें काम कसें तरी उरकून टाकणारा, घरकामाचें प्रशिक्षण न घेतलेला ( untrained ) असा असतो. पाश्चात्त्य देशांत एकंदर शिक्षणाची व जीवनमानाची पातळीच उच्च असल्यामुळें व जें काम करायचें तें उत्तम कसें करावें – मग तें कुठल्याहि दर्जाचें असो – याचें प्रशिक्षण घेण्याची पद्धत असल्यामुळें त्यांचा नोकरवर्ग सुजाण, स्वच्छ, आपापल्या कामांत वाकबगार असतो. आपल्या देशांत साधी वस्त्रपात्रांची स्वच्छतासुद्धां, असावी तशी, आमच्या नोकरांना राखतां येत नाहीं. मग बालसंगोपनासारख्या अतिशय जोखमीच्या, नाजुक कामामध्यें नोकरांवर विसंबणें धोक्याचें आहे. अर्थात् मार्ग कांहीं तरी काढलाच पाहिजे. कारण स्त्रीनें घराबाहेर काम स्वीकारणें ही तिची मानसिक, कुटुंबाची आर्थिक व राष्ट्राची प्रगतिविषयक गरज आहे.

या प्रश्नाची खरी आदर्श व्यवस्था म्हणजे सरकारनें सर्व मुलें योग्य देखरेखीखालीं वाढवण्याची जबाबदारी घेणें. पण सरकार इतकें कार्यक्षम होण्यास अद्यापि अवकाश आहे व अशा योजनेस संमति देण्यासाठीं जनतेच्या मनाची तयारी होण्यासहि वेळ लागेल. मध्यंतरींच्या काळांत ही समस्या सोडवण्यासाठीं एकदोन मार्ग सुचवतां येतील.

मूल अडीच वर्षांचें झालें म्हणजे नर्सरी स्कूलमध्यें जाऊं शकतें. आईची कामाची वेळ व मुलांची शाळेची वेळ एक ठेवली म्हणजे बराचसा प्रश्न सुटेल. अशा शाळा मोठ्या प्रमाणावर उघडण्याची व चालवण्याची जबाबदारी शिक्षणक्षेत्रांतल्या यंत्रणेनें–मग ती जिल्हा परिषद असो वा राज्यसरकार असो–घेतली पाहिजे; असे प्रयत्न करणाऱ्या खाजगी संस्थांनां उत्तेजन–द्रव्यसाहाय्य,

जागा देणें, वगैरेंनीं दिलें पाहिजे. मूल अडीच वर्षांचें होईपर्यंतच्या काळांतील व्यवस्था पुढील मार्गानें करतां येईल. एकतर बाळंतपणाची भरपगारी रजा वाढवणें. दुसरें, या अडीच वर्षांच्या काळांत मातेला अल्प-वेळाचें ( part-time) काम देणें. मात्र मूल नर्सरी स्कूलमध्यें जाऊं लागलें की स्त्रीला तिची ( full-time ) नोकरी विनबोभाट परत मिळाली पाहिजे. स्त्रीनें नेहमींच अल्पवेळाच्या नोकऱ्या करीत राहणें हें तत्त्वाच्या दृष्टीनें स्त्रीहिताला विघातक आहे. स्त्रीच्या असमान दर्जाची ती कबुली दिल्यासारखें होईल. गोखल्यांच्या अंकगणितांतलें ‘ एका पुरुषाचें काम दीड बायकांच्या कामाबरोबर ’ हें कोष्टक कायमचें कमीपणा आणणारें, न्यूनगंडाचें कोष्टक–चिकटवून घेण्यासारखें होईल. फक्त मध्यंतरीच्या दोन-अडीच वर्षांच्या काळांतच स्त्री हें अल्पकाळाचें काम स्वीकारण्यास मान्यता देईल. तेवढ्या काळापुरती आर्थिक झीज, आपल्या मुलांच्या कल्याणासाठीं, ती आनंदानें सोशील. शिवाय अशा वेळा स्त्रीच्या नोकरीच्या कालमर्यादेंत दोनदां किंवा तीनदांच येतील. कारण हें कुटुंबनियोजनाचें युग आहे. मिळवती स्त्री कटाक्षानें कुटुंब-नियोजनाचा अवलंब करील, हें उघड आहे. बत्तीस-तेहतीस वर्षांच्या दीर्घ काळांत सात-आठ वर्षें अल्पकाळाचें काम स्त्रीला देणें ही योजना अशक्य किंवा बिकट, उभयपक्षीं वाटूं नये. तिसरी गोष्ट म्हणजे स्त्रिया जिथें जिथें नोकरी करीत असतील, त्या त्या संस्थांत–मग ती बॅंक असो, शाळा-कॉलेज असो, किंवा विक्रीकराची कचेरी असो, बालरक्षकगृहें (creches) चालवण्याची सक्ती कायद्यान्वयें धन्यावर किंवा व्यवस्थापकांवर केली पाहिजे. सध्यां कारखान्यांनां लागूं पडणाऱ्या कायद्यान्वयें अशीं बालरक्षागृहें चालवण्याची सक्ती कारखान-दारांवर आहेच. तशी सक्ती प्रत्येक ठिकाणीं झाली पाहिजे; मग तिथें काम करणाऱ्या विवाहित स्त्रिया कितीहि अल्पप्रमाणांत असोत. आतां कुणी असें म्हणतात, कीं या बालरक्षागृहांमध्यें मुलांना मायेची ऊब मिळणार नाहीं; यंत्रासारखें त्यांचें खाणें-पिणें-झोंप होईल; सुसंस्कृत वातावरण रहाणार नाहीं. याच्यावर एक उत्तम उपाय सुचवतां येईल. ठिकठिकाणीं चालत असलेल्या महिलामंडळांनीं, या बालरक्षागृहांवर देखरेख करण्याची जबाबदारी अंगावर घ्यावी. असें केल्यास त्यांच्या हातून खरी भरीव समाजसेवा होईल; मिळवत्या स्त्रिया त्यांच्याशीं कृतज्ञ राहतील. शक्य तेथें महिलामंडळांनीं स्वतः अशीं

बालरक्षागृहें किंवा बालमंगलकेंद्रें उघडावींत. सध्यां कित्येक महिलामंडळें नर्सरी-स्कूल्स चालवतातच; तेव्हां हीं 'गृहें' काढणें त्यांना जड जाऊं नये. या कार्याला आर्थिक मदत मिळवत्या स्त्रिया आनंदानें देतील. कारण घरीं स्वतंत्र नोकर ठेवण्यांपेक्षां त्यांना तें स्वस्त पडेल. शिवाय आपलीं मुलें सुजाण, सुसंस्कृत देखरेखीखालीं आहेत, या खात्रीनें त्यांचें बाहेरच्या कामांत संपूर्ण लक्ष लागेल व त्यांच्या कार्यक्षमतेबद्दल तक्रारी येणें बंद होईल.

पाश्चात्य देशांमध्यें 'Day Homes' किंवा 'Day Nurseries', खाजगी संस्था किंवा सुखवस्तु कुटुंबें चालवतात. सकाळीं कामावर जातांना स्त्रीनें मूल या मंडळींच्या स्वाधीन करावयाचें, त्याचें दूध, औषधपाणी, कपडे वगैरेंबद्दल सूचना देऊन ठेवावयाच्या व संध्याकाळीं कामावरून परत येतांना मूल घरीं आणायचें अशी व्यवस्था असते. शिवाय Baby-Sister, घरीं येऊन कांहीं तास मूल संभाळणें ही पद्धत आहेच. कॉलेजमध्यें जाणाऱ्या मुली सुद्धां, शिक्षणासाठीं पैसा मिळवण्यासाठीं हें काम करतात. आपल्याकडेही गरजू, पोक्त बायकांनां हाताशीं घेऊन अशीं कामें करणाऱ्या संस्था काढणें शक्य आहे.

याप्रमाणें विवाहित, नोकरी करणाऱ्या स्त्रियांच्या घरकाम व बालसंगोपन याबद्दलच्या समस्या सोडवण्याचे कांहीं मार्ग बघितले. मुख्य गोष्ट, कुटुंबीयांनीं, समाजानें, संस्थांच्या व्यवस्थापकांनीं, धन्यांनीं, विवाहित स्त्रियांच्या नोकरीकडे पहाण्याचा दृष्टिकोण बदलणें ही होय. त्यांनीं या स्त्रियांविषयीं सहानुभूति बाळगली, उदार दृष्टि ठेवली, सहकार्याची तयारी दाखवली, त्या करीत असलेल्या दुहेरी कार्याबद्दल कृतज्ञतेची, कौतुकाची भावना बाळगली तर या समस्या सोडवण्याचे मार्ग जागोजागीं अनेक दिसून येतील. असे मार्ग शोधून त्या मार्गांनीं जाणें व सुशिक्षित, विवाहित स्त्रियांना आपलीं दुहेरीं कर्तव्यें सुखानें, आरामानें पार पाडतां येतील असें अनुकूल वातावरण घरींदारीं सतत राखणें, यांत स्त्रियांचें, कुटुंबाचें, समाजाचें व राष्ट्राचें सर्वांगीण हित आहे.

* * *

प्रकरण ७ वें

# वानप्रस्थाश्रम अथवा समाजसेवाश्रमाची कल्पना

**स्त्री**चें कार्यक्षेत्र व कार्य हें फक्त घर किंवा कुटुंबापुरतें नाहीं, या मुद्द्याभोंवतीं मागील दोन प्रकरणें रचलीं आहेत. या प्रकरणांत त्या मुद्द्याचा जास्त ऊहापोह करूं व स्त्रीच्या हातून कुटुंबाव्यतिरिक्त कार्य व सेवा तिच्या जीवनांतील तिसऱ्या खंडांत तिला कशी करतां येईल याचा विचार करूं.

'स्त्री ही गृहसाम्राज्ञी आहे' या शर्करावगुंठित कडू गोळीनें मध्ययुगीन विचाराच्या लोकांनीं स्त्रीला घरांत अडकवून ठेवण्याचा यशस्वी प्रयत्न अनेक वर्षें केला. नंतर पाश्चात्त्यांच्या उत्तेजनानें व अनुकरणानें स्त्रीशिक्षणाची व स्त्रीस्वातंत्र्याची चळवळ भारतांत सुरू झाली. या चळवळींत अडचणी उत्पन्न करण्यासाठीं सनातनी पक्षाचे लोक नवीन नवीन मुद्दे शोधण्यासाठीं आपले मेंदू शिणवूं लागले. त्यांच्या कांहीं मुद्द्यांचा विचार करूं.

त्यांचा पहिला व महत्त्वाचा मुद्दा असा कीं निसर्गानें स्त्रीदेहाची रचनाच अशी केली आहे कीं तिला घराबाहेरचा वारा सोसूं नये. ती लतेसारखी नाजूक व कोमल आहे. आधाराशिवाय ती जगूंच शकणार नाहीं. अपत्य-धारणा व अपत्यसंगोपन ही तिची मुख्य जबाबदारी. ती तिनें पुरुषाच्या आधारावर घराच्या निवाऱ्यांत पार पाडावी. "चूल व मूल" हेंच स्त्रियांचें क्षेत्र. निसर्गानें या दोन कामांसाठींच त्यांना घडवलें आहे. या दोन कामांपलीकडे

त्या कांहीं करूं बघतील तर त्यांच्या शारीरिक स्वास्थ्याची कायमची हानि होईल. सनातनी पक्षाच्या या मुद्द्यांना अनेक तऱ्हेनें उत्तरें देतां येतील. प्रथम "निसर्गानें स्त्रियांना माता होण्यासाठीं निर्माण केलें आहे" हा मुद्दा सनातन्यांपेक्षां स्त्री-स्वातंत्र्याच्या कैवारी मतालाच जास्त पोषक आहे, असें विचारांतीं दिसून येईल. वंशसातत्य राखण्याची केवढी महत्त्वाची जबाबदारी निसर्गानें स्त्रियांवर टाकली आहे! केवढा थोर विश्वास दाखविला आहे निसर्गानें स्त्रियांच्या सामर्थ्यावर! निसर्गाला स्त्री नुसती "कोमल" किंवा स्पष्ट शब्दांत सांगायचें म्हणजे "दुबळी" अशी घडवायची असती तर त्यानें एवढी अवघड जबाबदारी अबलांवर न टाकतां "बलदंड" पुरुषांवर टाकली असती. स्त्री दुर्बल नसून पुरुषापेक्षा तिच्यांत गुणवत्ता जास्त आहे हें निसर्गानें स्त्रियांवर मुलें निर्माण करण्याची व वाढविण्याची जबाबदारी टाकून सिद्ध करून दिलें आहे. नऊ महिने गर्भभार वाहाणें, नंतर रजाचा गज करणें—लिबलिबीत वीतभर मांसाच्या गोळ्यांतून चालतीबोलती, चैतन्याची मूर्ति घडवणें, हें एक प्रखर तप आहे, खडतर व्रत आहे. सहनशीलता, चिकाटी, चिवटपणा, धैर्य, चातुर्य, खोल व दीर्घ दृष्टि इत्यादि गुण अंगीं असल्यामुळेंच स्त्री हें व्रत तडीस नेऊं शकते. स्त्री ही अबला नसून, पुरुषापेक्षां तिची कर्तृत्वशक्ति जास्त आहे हें मोठमोठ्यांनी कबूल केलें आहे. स्वामी विवेकानंदांनीं आपल्या एका व्याख्यानांत म्हटलें आहे, "आदिमातेच्या साक्षात् मूर्ति म्हणजे स्त्रिया. शक्तिदेवीच्या या जिवंत मूर्तीबद्दल आदरभाव बाळगण्याचें आम्हीं सोडून दिलें हें आमच्या अधःपाताचें मुख्य कारण होय." स्त्री ही 'शक्ति' आहे असा आपल्या पुराणांतहि जागोजागीं उल्लेख आहे; पण रूढीनें तिला 'अबला' बनवून टाकली. स्वामी विवेकानंद पुढें म्हणतात, "एकच परमात्मा जीवमात्राच्या ठिकाणीं असतो, असें वेदांत स्पष्टपणें प्रतिपादिलेलें असूनहि आपल्या देशांत स्त्री आणि पुरुष यांमध्यें भेद कां केला जातो? स्मृति वगैरे लिहून, कडक नियमनिर्बंधांनीं जखडून टाकून, पुरुषांनीं स्त्रियांचीं नुसतीं यंत्रें बनविलेलीं आहेत. रूढीमुळें आमच्या स्त्रियांचें जीवन संकुचित झालें आहे. त्या निर्जीव व निष्क्रिय बनल्या आहेत." दुसरें, महात्मा गांधी यांचें मत मननीय आहे. महात्माजी म्हणत असत, "मानवजातीचें उत्तम अंग म्हणजे स्त्री-जात. मी स्त्रियांनां अबला म्हणणार नाहीं. कारण आजदेखील आत्मबलिदानाची,

मूक सहनशक्तीची, नम्रतेची, श्रद्धेची आणि ज्ञानाची स्त्री ही मूर्ति आहे." हीं विचारवंतांचीं मतें झालीं. वैज्ञानिकांचींही अशींच मतें आहेत. The Natural Superiority of Women" (स्त्रियांचें जन्मसिद्ध श्रेष्ठत्व) या नांवाचें एक पुस्तक ॲश्ली मॉंटेग या गृहस्थानें लिहिलें आहे. त्यांत त्यानें म्हटलें आहे कीं, प्रयोगशाळेंत वैज्ञानिकांनीं स्त्रीचें श्रेष्ठत्व सिद्ध करून दाखविलें आहे. अनेक प्रयोग करून, शास्त्रज्ञांनीं दाखवून दिलें आहे कीं, ज्या बीजापासून स्त्रीअपत्य निर्माण होतें, तें बीज, ज्या बीजापासून पुरुषअपत्य निर्माण होतें त्या बीजापेक्षां जास्त गुणवत्, परिपूर्ण (Perfect) असतें. प्रत्यक्ष व्यवहारांतही हें स्त्रीचें श्रेष्ठत्व आधुनिक कालांत दिसून येत आहे. पुरुष अर्थप्राप्ति, नोकरी करून पैसा मिळविणें, या एका कामानेंच जेरीस आलेला दिसतो. कचेरी-पलीकडे, घर किंवा समाज, यासाठीं कांहीं करण्यास त्याला वेळ नसतो, शक्ति नसते, इच्छा नसते. स्त्री मात्र तिहेरी कार्य कौशल्यानें करतांना दिसते. ती घरकाम व अपत्यसंगोपन यांची अर्थार्जनाशीं सांगड घालून, शिवाय कांहींतरी समाजसेवा हातून व्हावी म्हणून धडपडत असते.

सारांश, शारीरिक घडण, या मुद्द्यावर स्त्रियांना घराबाहेरच्या कर्तृत्वापासून दूर ठेवणें व आपल्या मुद्द्याच्या समर्थनार्थ निसर्गाची साक्ष काढणें अप्रयोजक, अन्यायाचें व स्त्रियांच्या व समाजाच्या अहितास कारण होणारें आहे. दुसरें असेंहि सांगण्यांत येतें कीं, निसर्गानें स्त्रियांमागें अनेक कटकटी लावल्या आहेत; मासिक त्रास, गरोदरपणचे डोहाळे, प्रसूतीनंतर उद्भवणारीं अनेक दुखणीं— वगैरे नाना अडचणींमुळें स्त्रियांनां घराबाहेर जबाबदारीचें काम स्वीकारणें अगदीं अशक्य आहे. या विषयावर स्त्रीरोगचिकित्सकांचीं मतें स्त्री-स्वातंत्र्याच्या कैवाऱ्यांनीं अजमावलेलीं आहेत. या चिकित्सकांचीं मतें—हें गौप्यस्फोटन करण्यास मला जरा संकोच व इतर स्त्रियांच्या रोषाची भीति वाटते आहे— अशीं पडलीं कीं, वर निर्देशिलेले स्त्रियांचे खास रोग व तक्रारी या बऱ्याचशा काल्पनिक व मानसिक असतात. psychic causes नीं, मनाच्या विशिष्ट, दृढमूल झालेल्या ग्रहांनीं, हीं दुखणीं उपस्थित झालेलीं असतात. हल्लीं, वर वर्णन केलेल्या बायकांच्या तक्रारी जितक्या आपल्या ऐकण्यांत येतात तितक्या पन्नास-साठ वर्षांपूर्वीं बायकांच्या बाबतींत ऐकण्यांत येत नसत. हल्लीं menopause म्हणजे, बायकांची गर्भधारणा थांबण्याचा काळ, या बाबतींत

स्त्रियांना किती तरी त्रास होत असलेला आपण ऐकतों. या त्रासाची कल्पनाहि पूर्वीच्या बायकांना नव्हती, व त्याचा बाऊहि त्यांना वाटत नव्हता. अर्थात् याचें कारण कदाचित् असें कुणी शोधून काढील कीं, पूर्वी बायका अंगावर दुखणीं काढीत. कुणी त्यांच्याकडे एवढें लक्षच देत नसे व त्यामुळें त्याही आपलीं दुखणीं सांगत नसत. पण हें मला पूर्णांशानें खरें वाटत नाहीं; उलट ५०।६० वर्षांपूर्वी पांचसहा मुलें झालेली बाईसुद्धां प्रकृतीनें खणखणीत असे. बाळंतीण उठलेली बाई लिंबासारखी पिवळीधमक, तेजस्वी दिसे अशीं वर्णनें आपण ऐकतों व जुन्या पिढीनें अशीं उदाहरणें पाहिलेलीं पण आहेत. माझ्या मतें, अलीकडचीं हीं दुखणीं पूर्वीच्या बायकांना न जाणवण्याचें कारण, त्यांचें घरांतील इतर व्यवहारांत संपूर्णपणें गुरफटलेलें लक्ष हें होय. पूर्वी स्त्रिया पंचवीस माणसांच्या घरांतल्या कामाच्या रामरगाड्यांत, वार्षिक ऋतुचक्राच्या व्यवधानांत, नाना व्रतवैकल्यें, सणवार यांच्या गडबडींत, चुलत, मामे, मावस, आते–इत्यादि नात्यांच्या पसाऱ्यांत एवढ्या गर्क व दंग असत कीं आपल्या शारीरिक व्यथांकडे लक्ष देत बसण्याला त्यांना सवडच नसे. शारीरिक दुखण्यांकडे जास्त मन घातलें, त्यांचा जास्त विचार करीत गेलें की तीं वाढतात ही सर्वत्रांच्या अनुभवाची गोष्ट आहे. "आमच्या आयुष्यांतील कांहीं आठवणी" या रमाबाईसाहेब रानडे यांनीं लिहिलेल्या त्यांच्या पतीच्या चरित्रांत याचें एक चांगलें उदाहरण आहे. न्यायमूर्ति रानडे यांनां दिवसांतून एका विशिष्ट वेळीं Angina Pectoris या हृदयरोगाचे झटके ( spasms ) येत असत. घड्याळांत विशिष्ट आंकड्यावर कांटा आला कीं त्यांना झटका येऊं लागे. मध्यंतरीं रमाबाईसाहेब फार आजारी झाल्या. चिंतेनें व्यग्र होऊन न्यायमूर्ति तासन्तास त्यांच्या अंथरुणाजवळ बसत. त्या वेळांत घड्याळांतला कांटा विशिष्ट आंकड्यावर येऊन पुढें सरके व झटक्याची विशिष्ट वेळ टळून जाई. पुढें रमाबाईसाहेब बऱ्या झाल्यावर, पुन्हां विशिष्ट वेळीं झटके येऊं लागले. यावरून मनुष्याचें मन व शरीर यांची सांगड किती गाढ आहे हें दिसून येतें, व स्त्रीरोगचिकित्सकांच्या वर निर्देशिलेल्या मतांत तथ्य आहे असें पटूं लागतें. अर्थात स्त्रियांनां डोहाळ्यांचा त्रास होतो, म्हणजे त्या त्रास झाल्याचें नाटक मुद्दाम करतात, असें म्हणण्याचा उद्देश बिलकूल नाहीं; पण जास्त लक्ष दिलें की कुठलेंही दुःख जास्त जाणवतें हा शारीर व मानसशास्त्राचा सिद्ध संकेत आहे.

घराबाहेर काम करणाऱ्या स्त्रियांनां डोहाळ्यांचा वगैरे त्रास, घरांतच असणाऱ्या तत्सम स्त्रियांपेक्षां कमी होतो, ही स्वानुभवानें पटलेली व पाहिलेली गोष्ट आहे. तेव्हां घराबाहेर काम केल्यानें 'नाजूक' स्त्रीला होणारे स्त्रीजातिसहज त्रास व व्यथा असह्य होतील व त्यामुळें तें काम तिच्यानें होणार नाहीं या म्हणण्यांत तथ्य नाहीं. उलट, घराबाहेरच्या कामांत लक्ष वेधलेली स्त्री हे त्रास व व्यथा सहज निभावून नेईल.

आणखी एक असा मुद्दा पुढें आणण्यांत येतो कीं, घराबाहेर काम करणारी स्त्री ही आदर्श पत्नी व आदर्श माता होणार नाहीं; कारण तिचें लक्ष दोन ठिकाणीं विभागल्यामुळें, तिला नवऱ्याकडे व मुलांकडे पुरेसें लक्ष देतां येणार नाहीं. या बाबतींतहि उलटाच अनुभव सांगावा लागेल. आपण पांचव्या प्रकरणांत पाहिलें कीं, फक्त घरांत गुंतून राहिलेली स्त्री आपल्या करमणुकी-साठीं, सुखासाठीं, नवऱ्यावर व मुलांवर सर्वस्वीं अवलंबून असते. अशी स्त्री नवरा ऑफिसमधून घरीं आल्याबरोबर, खरेदीसाठीं किंवा सहलीसाठीं किंवा आप्तेष्टांच्या भेटीगांठीसाठीं त्याला पुन्हां बाहेर काढण्यास उत्सुक असते; त्याला घरीं स्वस्थ बसून आराम करावासा वाटतो; पण ती दिवसभर घरीं बसून कंटाळलेली असते व बाहेरच्या जगाशीं कशाच्यातरी द्वारा संपर्क साधण्या-साठीं अधीर झालेली असते. स्त्रियांना 'खरेदीची' ( shopping ) अनावर हौस असते ती बाहेरचें जग जवळून पाहण्याच्या उत्कंठेमुळेंच. पण घराबाहेर काम करून घरीं आलेली स्त्री, पतीप्रमाणेंच घरींच बसून आराम करण्यासाठीं आसुसलेली असणार. समोरासमोर खुर्ची टाकून गरम चहाचे किंवा थंडगार पेयाचे घोट घेत, परस्परांच्या कचेरींतल्या किंवा कामांतल्या गमती एकमेकांना सांगत बसण्यांत दोघांनांहि आनंद वाटेल. या दोन स्त्रियांपैकीं कुठल्या स्त्रीला आपण किंवा पुरुषवर्गही जास्त चांगली पत्नी म्हणेल ? अर्थात् दुसऱ्या स्त्रीलाच. हीच गोष्ट मुलांच्या बाबतींतहि खरी आहे. "मी तुमच्या लहानपणीं तुमच्या-साठीं एवढ्या खस्ता काढल्या; तुमच्या सुखासाठीं मीं माझ्या सुखाचा, माझ्या संभाव्य, स्वतंत्र जीवनाचा होम केला" असें आपल्या स्वार्थत्यागाचें जड ओझें मुलांच्या खांद्यावर, कधीं स्पष्ट शब्दांनीं तर कधीं सूचक स्वरानें, फक्त घरासाठीं व घरांतील जीवन जगणारी माता लादीत असते; व नंतर त्या स्वार्थत्यागाची परतफेड मुलें कृतज्ञतेनें करताहेत किंवा नाहींत याची खूण,

अशी माता क्षणोक्षणीं हुडकीत राहाते. स्वतःचें स्वतंत्र जीवन कधींच नसल्यामुळें सुखासमाधानासाठीं ती मुलांच्या जीवनांत स्थान मिळवूं पहाते. मुलें मोठीं झाल्यावर, त्यांच्या नव्यानवाळीच्या संसारांत आपल्याला स्थान नाहीं असें आढळलें की ती हिरमुसली होते. ही माता जास्त चांगली का स्वतःचें स्वतंत्र जीवन, स्वतंत्र व्यवसाय असलेली, आपल्या विरंगुळ्यासाठीं मुलांच्या जीवनावर विसंबून न रहाणारी माता जास्त आदर्श? शिवाय घराबाहेरचें जग पाहिलेली, घराबाहेरच्या जीवनाचा अनुभव घेतलेली माता बहुरंगी, वैचित्र्यपूर्ण, चैतन्यपूर्ण जिवंत जीवन जगत असते. असें जीवन व्यतीत करणारी स्त्री, आपल्या मुलांना खात्रीनें जास्त विशाल दृष्टिकोण देऊं शकेल; त्यांच्या विचारांना जास्त प्रगल्भता प्राप्त करून देऊं शकेल. नाहींतर घराबाहेरचें जग पाहिलेलीं मुलें घरीं बसून असलेल्या आपल्या आईला, "आई, तुला तें समजणार नाहीं." "तुला त्याची कल्पना नाहीं, आई", असें खुशाल म्हणतांना आढळतात. संकुचित मनोवृत्तीची, जिचें विचारविश्व टिचभर आहे अशी स्त्री तरुणपणीं पतीच्या व वार्धक्यांत मुलांच्या गळ्यांतलें लोढणें तरी होते, नाहींतर त्यांच्या उपेक्षेनें दुःखी तरी होते.

तेव्हां एकंदरीनें असें म्हणतां येईल कीं शारीरिक व मानसिक पात्रतेची कसोटी लावून पहातां स्त्री ही घरांतील व घराबाहेरील अशीं दुहेरी कर्तव्यें यथायोग्य रीतीनें पार पाडण्यास समर्थ आहे. नैसर्गिक अडचणींमुळें ही जबाबदारी ती पेलूं शकणार नाहीं हें म्हणणें फोल आहे. हें द्विगुणी कार्य कर्तबगारीनें केल्यावर तिला शारीरिक व मानसिक स्वास्थ्य लाभणार आहे; तसेंच तें तिच्या पतीच्या व मुलांच्याही मानसिक स्वास्थ्याला व समाधानी जीवनाला उपकारक ठरणार आहे.

ही दुहेरी जबाबदारी पेलण्याची स्त्रीच्या अंगीं पात्रता व शक्ति आहे—एवढेंच नव्हे तर तिनें हीं दुहेरीं कर्तव्यें कार्यक्षमतेनें करणें ही तिच्या जीवनाच्या सार्थक्याची एक गरज आहे. हीं दोन्हीं कर्तव्यें बजावल्याशिवाय तिचें जीवन कृतार्थ झाल्याचें समाधान तिच्या मनाला लाभणार नाहीं. मध्यंतरींच्या काळांत ज्याला स्त्रीजीवनाचें तमोयुग (Dark Ages) म्हणतां येईल—'चूल व मूल' एवढीच आपली आयुष्याची इतिकर्तव्यता असें स्त्रिया मानीत होत्या तें केवळ समाजानें व रूढीनें त्यांच्या मनांवर पिढ्यान्‌पिढ्या

ठसवलेल्या संस्कारांमुळें. कुणी असें म्हणतात, " निसर्गानें स्त्रियांच्या अंगीं, मातृपद संभाळण्याला उपयोगीं पडणारें वात्सल्य जन्मतःच ठेवलेलें असतें. तेव्हां निसर्गाची योजना स्त्रियांनीं माता बनावें व माता बनण्यांत कृतार्थता मानावी अशीच आहे. स्त्रियांची अंतःप्रवृत्तीहि (instinct) याच दिशेनें वळत असलेली अगदीं लहानपणापासून दिसून येते. मुली लहानपणीं चूलबोळक्यांनीं खेळतात, बाळ बाळ खेळतात, तर मुलगे ऑफिस, मोटर, आगगाडी चालवणें, सैनिकांची कवाईत घेणें, असे खेळ खेळतात." पण हे सगळे संस्कार सुद्धां आपणच घरांतील व भोंवतालचीं माणसें मुलांच्या मनांवर लहानपणापासून करीत असतों असें मला वाटतें. सहजप्रवृत्तींचा (instinct) भाग यांत कमीच असतो. मुलांचीं मनें म्हणजे मऊ मातीचे गोळे असतात; त्यांना जसें वळवावें तशीं तीं चटकन् वळतात. आपणच आपल्या घरांतील किंवा ओळखींतील, नात्यांतील मुलींना भेट देतांना बाहुल्या–चूलबोळकीं निवडतों. मुलांसाठीं बॅट-चेंडू, मोटर-इंजिन पसंत करतों. साहजिकच मुलें ते खेळ खेळूं लागतात. माझ्या माहितींतला एक लहान मुलगा " खेळायला मातीची चूल घालून दे " म्हणून आईच्या मागें लागत असे. मग आई त्याला " तूं काय पोरगी आहेस का चूल चूल खेळायला ? " असें रागावून त्याचा हट्ट मोडून काढीत असे.

तसेंच आईच्या अंगीं वात्सल्य असतें, कारण निसर्गानें तें तिला जन्मजात दिलेलें असतें, पण पुरुषाच्या अंगीं वात्सल्य नसतें असें कसें म्हणतां येईल ? वात्सल्य प्रकट करण्याचे प्रकार निराळे असतील, पण पुरुषांच्या अंगीं वात्सल्य नसतेंच असें म्हटलें तर तें आमच्या बंधूनां रुचेल काय ? या समजुती सुद्धां परंपरेनें मनांत दृढमूल होऊन बसतात. माणसाचें मन एक अद्भुत चीज आहे. पाऱ्यासारखें चंचल पण आरशासारखें तें संस्कारग्रहणांत दक्ष असतें. आईनें लहान मुलांचें संगोपन करायचें, पुरुषांचें तें काम नव्हे, त्यांना तें जमणार नाहीं, असे रूढीनें व परंपरेनें पिढयान् पिढया मनाचे ग्रह बनत गेले, की पुढें ती गोष्ट शाश्वत, सत्य सिद्धांतासारखी स्वयंसिद्ध खरी वाटूं लागते. नाहीं तर अगदीं लहान तान्ह्या मुलाला सुद्धां पुरुषांनीं उत्तम तऱ्हेनें संभाळल्याचीं उदाहरणें ऐकण्यांत व पहाण्यांत आहेत.

सारांश, जसें पुरुषाला नुसतें घरांत बसून चैन पडणार नाहीं, त्याला घरा-

बाहेर कांहींतरी उद्योग पाहिजे, तसेंच सुशिक्षित स्त्रियांनाही नुसता घरांतला कामधंदा करून मानसिक शांति व समाधान लाभणार नाहीं. निसर्गानें त्यांना घरीं बसवण्यासाठींच घडवलें आहे, हें म्हणणें गैरसमजुतीचें आहे. शिवाय, तें वादासाठीं क्षणभर खरें मानलें, तरी असा प्रश्न विचारावासा वाटतो कीं, स्त्रियांनींच तेवढी निसर्गाच्या हाकेला कां 'ओ' द्यावी ? बाकीचें सर्व जग केवळ अंतःप्रवृत्तीवर, निसर्गाच्याच शिकवणुकीवर चाललें आहे काय ? खरें पाहूं गेलें असतां आपण सर्वचजण निसर्गापासून कितीतरी दूर गेलों आहोंत–दूरदूर चाललों आहोंत. १७५ वर्षांपूर्वी फ्रान्समध्यें रूसो या सुविख्यात विचारवन्तानें "निसर्गाकडे परत चला" ( back to nature ) अशी घोषणा केली व त्याचे पडसाद इंग्लिश वाङ्मयांतहि वर्ड्‌स्‌वर्थ वगैरे कवींच्या काव्यांत उमटले. पण या मोहिमेचा पुढें फ्रान्समध्यें बोजवारा उडाला व नावीन्याला बिचकणाऱ्या, जुन्याला चिकटून राहणाऱ्या इंग्लंडनेंही या मताकडे लवकरच पाठ फिरवली. निसर्गानें निर्माण केलेल्या माणसाच्या शरीरावर, राहणीवर, मनावर सारखे भौतिक सुधारणेचे व संस्कृतीचे आघात होत असतात व ते त्यांनां नवे नवे, बदलत्या स्थलकालानुरूप भिन्न आकार देत असतात.

तेव्हां स्त्रियांच्या यशस्वी, कृतार्थ जीवनाला जेवढीं कौटुंबिक कर्तव्यें व मातृपदाची जबाबदारी हीं पार पाडण्याची आवश्यकता आहे तेवढीच त्यांच्या जीवनाला, सामाजिक ध्येयाची व जबाबदारीची (social purpose) आवश्यकता आहे. कौटुंबिक जीवनानें तिची भावनांची भूक भागते; पण तिला बौद्धिक, आत्मिक समाधान या जीवनानें मिळत नाहीं. समाजाची, राष्ट्राची एक जबाबदार घटक म्हणून राष्ट्रकार्याचा थोडा तरी वांटा उचलल्याशिवाय हें समाधान तिला लाभणार नाहीं. कौटुंबिक जीवन मानसिक समाधान (emotional satisfaction) व दैनंदिन जीवनांत शांति मिळवून देतें; पण घराबाहेरचें क्रियाशील जीवन बुद्धीला नवीन चालना, नवचैतन्य, नवजीवन मिळवून देतें. तें उत्तेजक (stimulating) असतें. या उत्तेजक जीवनाशिवाय नुसतें कौटुंबिक जीवन संथ पाण्याप्रमाणें शांत पण चैतन्यहीन, पराक्रमहीन, नेभळें होईल. वहात्या पाण्याचा जोर, सदाशुचित्व, खळाळणाऱ्या प्रपाताची प्रचंड कार्य करणारी विद्युत्‌शक्ति व तेज त्यांत निर्माण होणार नाहीं.

आतां कुणी असें म्हणेल कीं, स्त्रीच्या जीवनाच्या इतिकर्तव्यतेबद्दलचा हा

सिद्धांत पटतो; पण तो व्यवहारांत उतरण्याच्या मार्गामध्यें अनेक अडचणी आहेत. कुटुंबीयांचा, समाजाचा दृष्टिकोण पालटल्याशिवाय, सरकार, खाजगी संस्था, सार्वजनिक संस्था यांच्याकडून सहकार्याचा हात पुढें आल्याशिवाय, घरींदारीं स्त्रियांच्या दुहेरी कर्तव्यास उपकारक असें वातावरण निर्माण झाल्याशिवाय, स्त्रीला आपलीं हीं द्विगुणीं कर्मे करणें फार जड जाईल. तिच्या शरीरावर, मनावर, बुद्धीवर अतिशय ताण पडेल; त्यामुळें तिच्या घरच्या कर्तव्यांत हेळसांड होण्याचा व बाहेरच्या कामांत कार्यक्षमता कमी होण्याचा संभव आहे.

या शंकेंतील वाजवीपणा मान्य करून, दुसरा पर्याय म्हणून मी "वानप्रस्थाश्रमाची" कल्पना पुढें मांडणार आहें. आल्व्हा मिरडॉल व व्हायोलेट क्लेन या दोन स्त्रियांनीं लिहिलेल्या "Women's Two Roles–Home and Work" या इंग्लिश पुस्तकांत या मार्गाचा विचार केला आहे. हें पुस्तक १९५५ सालीं प्रसिद्ध झालें. पण तत्पूर्वीच १९४७ सालीं बडोदा रेडिओवरून केलेल्या एका भाषणांत मीं या "वानप्रस्थाश्रमाची" कल्पना चर्चिली होती; नंतर लेखरूपानें, १९४८ सालीं जुन्या "वानप्रस्थाश्रमाच्या" या नव्या अवताराचा विचार "स्त्री" मासिकांत प्रसिद्ध झाला होता. नंतर १९५५ सालीं आल्व्हा मिरडॉल यांचें पुस्तक माझ्या वाचनांत आलें व आपल्या सिद्धांताला भर मिळाल्याबद्दल आनंद वाटला.

"वानप्रस्थाश्रमाची" कल्पना आपल्या हिंदुधर्मांत आहेच. संसार सोडून, परमार्थाचा मार्ग स्वीकारण्यासाठीं, साधकानें जनसंमर्दापासून दूर, वनांत जाऊन राहावें व आत्मचिंतन करावें अशी धर्माज्ञा आहे. हा वानप्रस्थाश्रम, ब्रह्मचर्याश्रम व गृहस्थाश्रम यांतील कर्तव्यें यथायोग्यरीतीनें सिद्ध झाल्यानंतर स्वीकारावयाचा असतो. धर्म, अर्थ व काम या तीन पुरुषार्थांची सांगता या पहिल्या दोन "आश्रमांत", जीवनाच्या या पहिल्या दोन खंडांत करावयाची व नंतर 'मोक्ष' हा पुरुषार्थ साधण्यासाठीं, संसारांतून लक्ष काढून तें अध्यात्माकडे वळवायचें. व्यक्तीच्या जीवनांतल्या या तिसऱ्या खंडांतल्या कर्तव्याची मीमांसा, नवयुगाच्या संदर्भांत थोडी निराळी केली पाहिजे. बदलल्या युगाप्रमाणें धर्माचें स्वरूप बदलतें–बदललेंच पाहिजे. कारण धर्माची व्याख्याच मुळीं, "धारयतीति धर्म;" जो समाजाची धारणा करतो, बदलल्या जीवनांत यशस्वी-

पणें टिकण्याची व्यक्तीला शिकवण देतो तो धर्म अशी आहे. तेव्हां बदलत्या कालमानाप्रमाणें तो बदललाच पाहिजे; नाहींतर तो " धर्म " या संज्ञेसच पात्र होणार नाहीं. वेदकाळांतील धर्म यज्ञयागाचा होता. यथासांग यज्ञकृत्यें करून, देवांना त्यांचा हविर्भाग देऊन, संतुष्ट करून आपणांस इष्ट तें गोधनादि ऐहिक वैभव, यथाकाल पर्जन्य वगैरे सुखानुकूल गोष्टी मिळवावयाच्या, हा वैदिक धर्म होता. आधुनिक युग बुद्धिवादी आहे, कर्मकांडापेक्षां ज्ञानावर त्याचा भर आहे. पूर्वीच्या देवता इंद्रवरुणादि होत्या; आजच्या देवता निराळ्या आहेत. राष्ट्र, समाज, या आजच्या देवता आहेत; त्यांची उपासना करण्यासाठीं संघटित प्रयत्न करणें हा आजच्या ज्ञानी कर्मांचा, सेवेचा मूलमंत्र आहे. या देवतांना संतुष्ट करण्यासाठीं हविर्भाग मध तूप इत्यादिकांचा द्यावयाचा नसून, स्वतःच्या अंगीं असलेल्या शक्ति या राष्ट्रकार्यासाठीं खर्च करावयाच्या आहेत, समाजहित, राष्ट्रहित साधणें,–या कार्यासाठीं ज्याच्यापाशीं जें असेल– तें ' पत्रपुष्पतोय ' यथाशक्ति पण पूर्ण श्रद्धेनें समर्पण करणें हा आजचा युगधर्म आहे. तेव्हां आजच्या " वानप्रस्थाश्रमांत " हें परमार्थाचें कार्य करावयाचें आहे, स्वार्थापलीकडे, स्वतःच्या कुटुंबापलीकडे, दृष्टि पोंचवून जनहित, जनसेवा साधावयाची आहे. या वानप्रस्थाश्रमांत ' वनांत ' जावयाचें नसून ' जनांत ' मिसळायचें आहे; म्हणून या वानप्रस्थाश्रमाला, पुण्याच्या डॉ. खैर यांनीं " समाजसेवाश्रम " ही संज्ञा एका सभास्थानीं सुचवली होती व मीं ती स्वीकारिली आहे.

आजच्या या युगधर्माच्या पालनासाठीं, या आधुनिक यज्ञासाठीं, देशांत ठिकठिकाणीं ' वेदी ' रचिलेल्या आहेत. समाजकार्य, समाजकल्याण साधण्यासाठीं अनेक दालनें आज खुलीं आहेत. सरकारनें, समाजानें, ठिकठिकाणीं समाजकल्याणकारी साधनें उपलब्ध होण्यासाठीं केंद्रें उघडलीं आहेत; यांचा उपयोग व्यक्तिमात्रानें करून घेतला पाहिजे. पुरुषांना, सध्यांच्या परिस्थितींत, हें राष्ट्रकार्य निरनिराळ्या रूपांनीं,–पगारी वा परोपकारी–करण्याची संधि जन्मभर मिळेल. पण स्त्री ही संसारांत अडकून पडलेली असते–जन्मभर गुंतलेली असते. तेव्हां तिच्याकडून, राष्ट्राच्या प्रगतिकार्यास मदतरूप होण्याची अपेक्षा करावी किंवा कसें, हा प्रश्न विचारवंतांस पडतो. याचें उत्तर कसें देतां येईल तें पाहूं.

" संसार, संसार ! स्त्रियांनां संसार करावयाचा असतो, आमरण त्यांतून

सुटका नाहीं "–असा एक प्रकारचा बागुलबोवा, स्त्रियांपुढें आज कित्येक वर्षें निर्माण करून ठेवलेला आहे. या बागुलबोवाच्या नुसत्या काल्पनिक, अगडबंब रूपाला न घाबरतां आपण विचार करूंया कीं, 'या संसाराला'–निव्वळ 'संसाराला' स्त्रियांच्या आयुष्यांतलीं किती वर्षें खर्च करण्याची खरोखर गरज आहे ?

समाजाची बदलती घडी आपण लक्षांत घेतली पाहिजे. पूर्वीं मुलींचें लग्न सातव्या-आठव्या वर्षीं होई; नंतर अकराव्या-बाराव्या वर्षीं लग्नें होऊं लागलीं. सतराव्या वर्षीं स्त्रीला पहिलें मूल होई. हें वर्णन फार जुनें नाहीं. ५०।६० वर्षां-पूर्वींची ही परिस्थिति होती असें म्हणावयास हरकत नाहीं. नंतर ईश्वरेच्छेनें, निसर्गनियमांप्रमाणें तिला दर दोन वर्षांनीं अपत्यसंभव होई. दहा मुलें हर एक स्त्रीला होत असें मानलें तर शेवटचें मूल होईपर्यंत स्त्री ३५।४० वर्षांची होई. सगळीं मुलें हातावेगळीं होईपर्यंत, शाळेंत जाऊं लागेतोंपर्यंत स्त्री ४५।४६ वर्षांची होई. त्या काळांत या वयांत स्त्रीचें आयुष्य–कर्तृत्वाचें आयुष्य जवळजवळ संपलें असें मानण्यांत येई. कै. हरि नारायण आपटे यांच्या सामाजिक कादंबऱ्यांत पस्तीस वर्षांच्या स्त्रीचें ' पोक्तवयाची स्त्री ' असें वर्णन केलेलें आढळतें. आज असें वर्णन वाचलें तर हसूं येईल. आधुनिक काळांत पस्तीस वर्षांची स्त्री आपल्या जीवनाच्या ऐन वसंतांत असते असें म्हणण्यास हरकत नाहीं. हा काळाचा गुण आहे. आज पस्तीस वर्षांच्या स्त्रीच्या शरीराचा जोम व मनाची उभारी ऐन भरांत असते. पूर्वीं अनेक अपत्यें झाल्यामुळें स्त्रीच्या आरोग्याची हानि होत असे. बालपणीं लग्न झाल्यामुळें, लहान वयांत संसार व मुलें अंगावर पडल्यामुळें तिच्या शरीरावर व मनावर वाजवीपेक्षां जास्त व म्हणून असह्य ताण पडत असे. त्यामुळें पस्तिशीला तिचा जीवनोत्साहही अगदीं नाहींसा होऊन जात असे. आज प्रौढ वयांत लग्नें होतात, अपत्यांची संख्या मर्यादित असते. शिक्षणानें, आरोग्यविज्ञानानें आपल्या शरीराची काळजी कशी घ्यावी, योग्य आहार व नियमित व्यायाम कसा घ्यावा याची माहिती स्त्रियांना झालेली असते. नीटनेटकी राहणी, सौंदर्यसाधनें इत्यादिकांच्या साहाय्यानें स्त्री तरुण व आकर्षक दिसते. शरीराप्रमाणें तिच्या मनाचेंहि यौवन जास्त काळ टिकतें व दिवसेंदिवस फुलत जातें. पस्तिशीला आजच्या स्त्रीची कार्य-क्षमता पूर्ण होते व नवीन नवीन क्षेत्रांत कर्तृत्व करून दाखवण्याची तिची इच्छा, हौस दिवसेंदिवस वाढत जाते. पूर्वींची स्त्री पंचेचाळिशीला आपण ' म्हाताऱ्या ' झालों असें मानीत असे; नातवंडें खेळवण्यासारख्या हलक्याफूलशा कामा-

खेरीज इतर आपल्या हातून कांहीं होणें नाहीं—आपला कर्तृत्वाचा काळ संपला अशी तिची दृढ भावना असे व समाजहि तिच्याकडे याच दृष्टीनें पाही.

पण आज काळ बदलला आहे. आज मुली शिक्षण घेत आहेत. उच्च शिक्षण—सांस्कृतिक वा व्यावसायिक पूर्ण करून बावीसाव्या वर्षी मुलगी विवाह करते, असें आपण धरूं. चोविसाव्या वर्षी तिला पहिलें अपत्य होतें. आजच्या कुटुंब-नियोजनाच्या युगांत सुजाण स्त्रीची पंचवार्षिक अथवा सप्तवार्षिक योजना—दोन किंवा तीन मुलांची, पुरी होईपर्यंत ती तिशीला येते. तिचें सर्वांत लहान मूल ती पस्तीस वर्षांची असतांना शाळेंत जाऊं लागतें. आतां तिला घरांत पुष्कळ मोकळा वेळ मिळतो. घरकाम हेंहि पूर्वीपेक्षां कसें कमी किचकट झालें आहे हें आपण सहाव्या प्रकरणांत पाहिलें. मुलेंहि मोठीं झाल्यामुळें पस्तीस वर्षांच्या स्त्रीला घराबाहेर काम करण्यास मोकळीक होते असें मानण्यास हरकत नाहीं. पण वर उल्लेखिलेल्या मताप्रमाणें, दुहेरी कर्तव्यें बजावण्यांत, या वयांतहि, अजून शेवटचें मूल लहान असल्यामुळें, स्त्रीवर अवास्तव ताण पडतो असें वाटल्यास स्त्रीला आणखी दहा वर्षें 'संसार' करण्यासाठीं देऊं. स्त्री पंचेचाळीस वर्षांची होते तेव्हां तिचें सर्वांत मोठें मूल २१।२२ वर्षांचें झालेलें असतें. सर्वांत लहान कॉलेजमध्यें जात असतें. लवकरच तिला सून येईल; मुलीचें लग्न झालेलें असेल किंवा लवकरच होईल. संसारांतली तिची कामगिरी जवळजवळ संपलेली आहे; पण तिच्या शरीराचा व मनाचा जोम अजून कायम आहे. विज्ञानाच्या प्रगतीमुळें, वैद्यकीय ज्ञानाच्या वाढीमुळें मध्यमवर्गाची तरी आयुर्मर्यादा आज निश्चित वाढली आहे. गृहस्थाश्रम जवळजवळ संपलेल्या या आधुनिक स्त्रीपुढें अजून पंधरा वर्षांचा तरी कर्तृत्वाचा दीर्घ काळ आहे. या काळांत तिनें पूर्वीचा वानप्रस्थाश्रम व आधुनिक परिभाषेंत "समाजसेवाश्रम" पत्करावा व दुसऱ्या आश्रमांत करायला न मिळालेलें कुटुंबा-पलीकडचें, परमार्थाचें, समाजहिताचें कार्य करावें, असें सुचवल्यास अप्रयोजक ठरूं नये. सहाव्या प्रकरणांत सुचवलेलें दोन्हीं कार्यें—कौटुंबिक व सामाजिक—एकसमयावच्छेदेंकरून करणें, सध्यांच्या सामाजिक ठेवणींत स्त्रीस अशक्य ठरल्यास तिनें निदान हा वानप्रस्थाश्रम किंवा समाजसेवाश्रम तरी कटाक्षानें स्वीकारावा. हा वानप्रस्थाश्रम उत्कृष्ट रीतीनें यशस्वी व्हावा म्हणून पूर्वीपासून, ब्रह्मचर्याश्रम व गृहस्थाश्रमापासून—विद्यार्थिदशा व संसारापासूनच काळजी घेतली पाहिजे. ती कशी घ्यावी याचा विचार पुढील प्रकरणांत करूं. ★ ★ ★

प्रकरण ८ वें

# वानप्रस्थाश्रम – पूर्वतयारी व फलश्रुति

**स्त्री**च्या जीवनांतला तिसरा खंड कर्तृत्वाच्या तेजानें झळाळून उठण्यासाठीं तिनें आपल्या आयुष्याच्या पहिल्या व दुसऱ्या खंडापासून काळजीपूर्वक पूर्वतयारी केली पाहिजे. पहिला खंड विद्यार्थिदशा व दुसरा खंड गृहस्थाश्रम किंवा संसार. या दोन खंडांपासून विचारपूर्वक तिनें आपल्या भावी जीवनाची रूपरेखा आखली तर तिसऱ्या खंडाच्या आरंभीं, पूर्वीच्या स्त्री-प्रमाणें तिला जीवनांत विफलता न भासतां उलट नवा हुरूप येईल. आंग्ल कवी ब्राउनिंगप्रमाणें ती म्हणूं शकेल,

> " The best is yet to be
> The last of life, for which the first was made."

( आयुष्याचा सर्वोत्तम भाग अजून पुढेंच आहे; त्या उत्तर खंडासाठींच तर ही पूर्वखंडांतील तयारी ! )

प्राथमिक शिक्षण व दुय्यम शिक्षण घेतांनां पूर्वयोजनेची किंवा विचाराची गरज पडत नाहीं. कारण तें बव्हंशीं सर्वच मुलामुलींना एकाच स्वरूपाचें घ्यावयाचें असतें. पण दुय्यम शिक्षण संपवून विश्वविद्यालयीन शिक्षण सुरू करण्याच्या वेळीं मुलीनें विचारपूर्वक योजना केली पाहिजे. आपल्याला कुठल्या

विषयाची आवड आहे, आपल्याला कुठला अभ्यासक्रम झेंपण्याजोगा आहे या विचारांबरोबरच, आपल्याला आपलें भावी आयुष्य कशा रीतीनें जगावयाचें आहे याचा आराखडाहि तिनें आपल्या मनाशीं योजून घेतला पाहिजे. उच्च शिक्षण घेतल्यानंतर ती विवाह करणार आहे काय ? शंभरांतल्या नव्याण्णव मुलींनां विवाह करावयाचा असतोच. विवाहानंतर टीकेला, अडचणींना न जुमानतां ती आपल्या शिक्षणाला साजेशी नोकरी किंवा शिकून घेतलेला व्यवसाय, खंबीरपणें चालू ठेवणार आहे काय ? संसार व व्यवसाय, दोन्ही एका वेळीं सांभाळण्याची तिची इच्छा व ताकद नसल्यास, ज्या व्यवसायांत मध्यंतरीं १५।२० वर्षांचा खंड पडला तरी चालूं शकेल असाच व्यवसाय तिनें उच्च शिक्षणासाठीं निवडला पाहिजे. विवाहानंतर वीस वर्षें फक्त संसारच करायचा असा तिनें मनाचा निश्चय केलेला असल्यास, तिला डॉक्टर, वकील, इंजिनिअर असे व्यवसाय अभ्यासासाठीं निवडतां येणार नाहींत. कारण या व्यवसायांत मध्यंतरीं वीस वर्षांचा खंड पडून चालणार नाहीं. असले व्यवसाय यशस्वी होण्यासाठीं सतत अभ्यास, व्यासंग, अद्ययावत् ज्ञान अवश्य आहे. तेव्हां वीस वर्षांचें मध्यंतर घेण्याचें योजलेल्या मुलींनीं अध्यापन, रुग्णपरिचर्या विक्रयकला, विमा-व्यवसाय, ग्रंथपालन वगैरे व्यवसाय निवडावे. या व्यवसायांत वीस वर्षांचा खंड पडला तरी जुने धागे उचलून त्यांची पुन्हां जुळणी करण्यास त्रास पडणार नाहीं.

विद्यार्थिदशेंत हा विचार पक्का करून मुलीनें कॉलेज-शिक्षणास सुरुवात केली पाहिजे. आपलें शिक्षण ही एक अत्यंत गंभीर, आपल्या आयुष्यांत दूरवर परिणाम पोंचवणारी गोष्ट आहे; हें आपल्या हातांतलें जीवनसंग्रामांत वापरावयाचें एक हत्यार आहे. तेव्हां तें आपल्याला वाटेल त्या वेळीं कुशलतेनें चालवतां येईल, अशा प्रकारचें निवडून घेतलें पाहिजे. मनगटांतला जोर व लढाईचा प्रकार दोन्हीं लक्षांत घेतलीं पाहिजेत. साधी टेनिस रॅकेट विकत घेतांनां किती वजनाची घ्यावी, कुठल्या कंपनीची घ्यावी याचा खल करून मगच मुलें-मुली ती विकत घेतात. मग शिक्षण या आयुष्यांतल्या अत्यंत महत्त्वाच्या गोष्टीकडे उडत्या दृष्टीनें पाहून कसें बरें चालेल ? "माझ्या मैत्रिणी सायन्सला गेल्या, म्हणून मी पण तिकडेच गेलें." "माझा 'ग्रुप' कॉमर्सला गेला म्हणून मी पण कॉमर्सच घेतलें" असें म्हणणाऱ्या मुली पहाण्यांत

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम........ वि: ........
क्रमांक ........ नों. दि: ........


येतात. अमुक कॉलेज जवळ पडतें म्हणून, अमुक कॉलेजचा जिमखाना 'पव्हिलिअन' झक्क आहे म्हणून, तर तिसऱ्या एखाद्या कॉलेजला पोहण्याच्या तलावाची सोय आहे म्हणून, तें तें कॉलेज अभ्यासक्रमासाठीं निवडणें, ही फार उथळ व अक्षम्य दृष्टि आहे.

तसेंच गृहस्थाश्रमास आरंभ करतांनांहि, आपल्या आयुष्याचा भावी जोडीदार निवडतांना, मुलीनें स्वतःच्या जीवनाचा जो आराखडा मनाशीं योजलेला असेल, त्याच्याशीं तो सहमत असेल अशी खबरदारी घेतली पाहिजे. नुकतीच एका जपानी मुलीची एक गोष्ट वाचण्यांत आली. ही मुलगी डॉक्टरीच्या उच्च शिक्षणासाठीं अमेरिकेस गेली होती. बालरोगचिकित्सा हा तिचा खास विषय असून त्यांत संशोधन करण्याची तिची इच्छा होती. शिक्षण पूर्ण झाल्यावर ती स्वदेशीं परत जाणार होती व विवाह करून संसाराबरोबर आपला व्यवसाय व संशोधन चालू ठेवणार होती. अमेरिकेंत, उच्च शिक्षणासाठीं आलेल्या तीनचार जपानी मुलांशीं तिची ओळख झाली होती. तिकडच्या पद्धतीप्रमाणें तीं मुलें त्या मुलीचें प्रियाराधन (courting) करीत होतीं. पण त्या मुलीच्या डोळ्यांसमोर तिच्या भावी जीवनाची रूपरेषा अगदीं स्पष्ट असल्यामुळें, जो मुलगा तिच्याशीं जीवनाच्या ध्येयाबाबत सहमत असेल व तिला सहकार्य द्यायला तयार असेल, त्यालाच होकार देण्याचा तिचा निश्चय होता. तसे ते सगळे बाह्यांगानें तिला आवडले होते, पण त्यांचीं मतें व विचार अजमावल्याशिवाय ती निर्णय घेण्यास तयार नव्हती. त्या दृष्टीनें बोलणें झाल्यावर तिला आढळून आलें कीं, त्या मुलांपैकीं एकाला बायकोनें विवाहानंतर घराबाहेर काम किंवा व्यवसाय करावा, हेंच मुळीं पसंत नव्हतें. दुसऱ्याला – तोहि डॉक्टर होता – दोघांनीं जोडीनें 'प्रॅक्टिस' करून अमाप संपत्ति मिळवावी, चैनीनें राहावें, असें वाटत होतें. संशोधनाची, ज्ञान वाढवण्याची, त्याला इच्छा नव्हती. तिसरा संशोधनाचा प्रेमी होता, बायकोनें संसार व व्यवसाय दोन्ही करावें अशा मताचा होता– पण त्याला अमेरिकेंतच स्थाईक व्हावयाचें होतें, जपानमध्यें परत जायला तो तयार नव्हता. याप्रमाणें त्या मुलांपैकीं कुणाशींहि त्या मुलीच्या भावी जीवनाच्या कल्पना जमत नव्हत्या, व त्यामुळें तिनें आभारपूर्वक त्यांना लग्नाबद्दल नकार दिला. नंतर तिला एक इंजिनिअर भेटला. त्याला संशोधनाची आवड

होती. स्वदेशीं परत जाऊन आपल्या देशबांधवांना आपल्या ज्ञानाचा फायदा करून देण्याची इच्छा होती. पत्नीनें घरसंसाराबरोबर, समाजकार्य, राष्ट्रकार्य करावें अशी हौस होती. एवढीं सगळीं मतें व विचार जुळताहेत असें पाहिल्यानंतर त्या मुलीनें त्या मुलाला पसंत केलें व नंतर त्यांचा विवाह झाला. हा विवाह अत्यंत सुखी झाला असेल अशी खात्री बाळगण्यास हरकत नाहीं. सारांश, आमच्या मुलींनींही पति निवडतांना नुसतें "तरुण, कुलीन, गोरा, हंसतमुख" एवढीच दृष्टि न ठेवतां, त्याचीं भावी सहजीवनाचीं मतें, आपल्या मताशीं जमताहेत किंवा नाहीं हें प्रथम पहावें.

याप्रमाणें, योजनाबद्ध उच्च शिक्षण घेतल्यानंतर, समान आवडीनिवडीचा, समानशील सहचर निवडून मुलगी गृहस्थाश्रमांत प्रवेश करते. नेटका प्रपंच करून, दोन किंवा तीन अपत्यांना जन्म देऊन ती निसर्गाचें ऋण फेडते. सुमारें पंचवीस वर्षें, विसाव्या वर्षापासून पंचेचाळिसाव्या वर्षापर्यंत, ती स्वतःच्या संसाराला स्वतःला वाहून घेते. भावी वानप्रस्थाश्रम यशस्वी व्हावा म्हणून मुलीनें ज्याप्रमाणें शिक्षणक्रम निवडतांना व सहचर पसंत करतांना विचारपूर्वक पावलें टाकावीं, त्याप्रमाणें गृहस्थाश्रमांतहि तिनें एक गोष्ट कटाक्षानें केली पाहिजे ती ही कीं, ज्या विषयाचें, कलेचें, शास्त्राचें तिनें आयुष्याच्या प्रथम खंडांत शिक्षण घेतलेलें असेल, त्या विषयाशीं, कलेशीं किंवा शास्त्राशीं शक्य तितका संपर्क ठेवणें. नाहींतर पुष्कळ वेळां, लग्न झाल्यावर आठदहा वर्षांनीं, मुलीला आपण बी. ए. ला तत्त्वज्ञान घेतलें कीं अर्थशास्त्र हें सुद्धां आठवून सांगावें लागतें. असा संपर्क साधण्याची आजकाल अनेक साधनें उपलब्ध झालेलीं आहेत. वर्तमानपत्रें, मासिकें व रेडिओ यांमधून निरनिराळ्या विषयांवरील अद्ययावत् माहिती कटाक्षानें प्रसृत करण्यांत येत आहे. निरनिराळ्या संस्था, नाना विषयांवर, तज्ज्ञांचीं व्याख्यानें किंवा परिसंवाद आयोजित असतात. या सर्व साधनांचा शक्य तेवढा जास्त उपयोग करून घेऊन स्त्रीनें आपलें, आपल्या विषयाबद्दलचें ज्ञान ताजें व अद्ययावत् राखलें पाहिजे. कांहीं वर्षांनीं तिचीं सगळीं मुलें शाळा-कॉलेजांत जाऊं लागलीं की, तिला जास्त वेळ मोकळा मिळूं लागेल. त्या वेळीं तिनें तिच्या विषयांतील रिफ्रेशर कोर्सेस्, विश्वविद्यालयांचीं बहिःशाल व्याख्यानें किंवा अभ्यासक्रम, वासंतिक वर्ग, शिबिरें वगैरे ठिकाणीं जाऊन आपल्या विषयाची ताजी माहिती मिळवली

दा. क्र.



पाहिजे, अभ्यासिली पाहिजे. सोय असेल तिथें त्या माहितीचा व्यवहारांत उपयोग, प्रात्यक्षिक रूपानें करण्यास झटलें पाहिजे. तिला तसें करण्यास संधि व सवड तिच्या पतीनें व मोठ्या मुलांनीं सहकार्य करून मिळवून दिली पाहिजे. तसें करतां यावें म्हणून पतीनें व मुलांनीं घरांतील कामें करण्याची व जबाबदारी संभाळण्याची संवय ठेवली पाहिजे. आपल्या विषयाशीं संपर्क ठेवण्यासाठीं महिलामंडळांचा स्त्रीला चांगला उपयोग करून घेतां येईल. आपल्या विषयांतील माहिती व व्यवहारांत उपयोगी पडेल इतकें ज्ञान देण्यासाठीं व प्रात्यक्षिकें करून घेण्यासाठीं तिला मंडळांत वर्ग चालवतां येतील. व्यवहारापुरती रुग्णपरिचर्या, टाइपिंग व लघुलिपीलेखन, बालमानसशास्त्र, मुलांचें निरनिराळ्या वयांत संगोपन वगैरेंचें ज्ञान या वर्गांतून दुसऱ्या स्त्रियांना तिला देतां येईल. त्यामुळें तिचें ज्ञान ताजें व सदैव वाढतें राहील. या वर्गांच्या द्वारां भोंवतालच्या मागसलेल्या वस्तींत तें तें विशिष्ट कार्य तिला करतां येईल. त्यामुळें त्या वस्तीचा फायदा होईल. अनेक स्त्रियांच्या हातून उपयुक्त कार्य करून घेतल्याचें स्वतः स्त्रीला समाधान लाभून, भावी "समाजसेवाश्रमांतील" कार्याचा हा एक प्रकारें श्रीगणेशाच होईल. महिलामंडळांनीं, वुईमेन्स् कौन्सिल्स्, समाजशिक्षणसंस्था, विश्वविद्यालयें वगैरे संस्थांनीं खास स्त्रियांसाठीं, त्यांची सवड पाहून, अनुकूल वातावरणांत, अनेक विषयांवर छोटे सुटसुटीत अभ्यासक्रम ( Courses ) शिकवण्याची व्यवस्था करावी. उन्हाळ्याच्या सुट्टीमध्यें असे वर्ग भरवल्यास संसारी स्त्रियांना सोयीचें होईल. कारण त्या वेळीं शाळा-कॉलेजें बंद होऊन मुलांना सुट्टया असतात. मघाशीं उल्लेखिलेल्या "Women's Two Roles" ( स्त्रियांचीं दुहेरीं कर्तव्यें ) या पुस्तकांत लेखिकेनें आपल्या विषयाशीं संपर्क ठेवण्यास झटणाऱ्या अशा स्त्रियांना मोठें सूचक नांव दिलें आहे. ती त्यांना "Ex-Service Mothers" असें म्हणते. Ex-Service Soldiers या संज्ञेवरून लेखिकेला ही संज्ञा सुचली असावी. नोकरींत चालू नसलेले जवान या शब्दांनीं सूचित होतात. पण चालू नसले तरी आणीबाणीच्या परिस्थितींत केव्हांहि या जवानांना चाकरीवर हजर रहावें लागतें. म्हणून, त्यांची सैनिकी बाण्याची व कामांची संवय सुटूं नये यासाठीं, या माजी जवानांना मधूनमधून, सैनिकी कवायती, लढाईच्या हालचाली यांचा अभ्यासक्रम ताजा ठेवण्यासाठीं बोलावण्यांत येतें. त्यांच्याकडून हीं कामें करून

घेण्यांत येतात व त्या बाबतींतली अद्ययावत् माहिती त्यांना पुरवण्यांत येते. Ex-Service Mothers साठींही असे वर्ग व शिबिरें चालवलीं पाहिजेत असें वरील लेखिकेनें म्हटलें आहे. म्हणजे या मातांचीं वैयक्तिक व कौटुंबिक कर्तव्यें पार पडल्यानंतर त्या जेव्हां समाजाचा संसार करण्यास उद्युक्त होतील तेव्हां त्यांना अगदीं नवीन क्षेत्रांत आल्याप्रमाणें बुजल्यासारखें होणार नाहीं. सामाजिक कार्याचा सराव व उपयुक्त ज्ञान त्यांना सतत उपलब्ध होत राहील. मातांसाठीं असे 'वासंतिक' वर्ग (Summer schools) उघडतांना, जवळच मुलांसाठींहि त्यांना उपयुक्त असें बहिःशाल शिक्षण सप्रात्यक्षिक देण्यासाठीं शिबिरें चालवल्यास फारच सोईचें होईल. (अशा वेळीं घरांतील पुरुषांनीं काय करावें, असा प्रश्न कोणी उपस्थित करतील. "Seven Years Itch" या चित्रपटांत या प्रश्नाचें मनोरंजक उत्तर सांपडेल!) मिसेस् मिडॉर्लेनें न्यूयॉर्क-मधल्या Vassar College चालवीत असलेल्या Summer Institute for Family and Community Living या संस्थेचा गौरवपूर्वक उल्लेख केला आहे. या वासंतिक वर्गांतून सामुदायिक जीवनाचा अनुभव मिळतो व सामाजिक जीवनाचा सराव होतो.

याप्रमाणें गृहस्थाश्रमांत, नाना साधनांचा उपयोग करून, ब्रह्मचर्याश्रमांत विद्यार्थिदशेंत संपादलेलें ज्ञान ताजें, क्रियाशील व अद्ययावत् राखण्याचा स्त्रीनें कटाक्षानें प्रयत्न करावा; ही तिची वानप्रस्थाश्रमाची, समाजसेवाश्रमाची पूर्व तयारी आहे. ही तिनें साक्षेपानें केल्यास तिचा समाजसेवाश्रम यशस्वी होऊन तिला व समाजाला फलप्रद होईल.

याप्रमाणें अगदीं सनातनी मताच्या लोकांनासुद्धां पसंत पडेल असा आदर्श संसार करीत करीत स्त्री पंचेचाळिशीला येऊन ठेपते. या सुमारास तिचीं मुलें मोठीं, स्वावलंबी झालेलीं असतात. लवकरच ती कौटुंबिक जबाबदारींतून बरी-चशी मोकळी होईल. 'स्त्री' म्हणून, निसर्गानें तिच्याकडे सोंपवलेलें कर्तव्य—पुढील पिढी तयार करणें—तिनें पार पाडलें आहे. आतां 'मानव' म्हणून कराव-याचीं कर्तव्यें बाकी आहेत. ज्या समाजाची एक घटक म्हणून इतके दिवस ती कुटुंबांत सुरक्षित राहिली, मुलांचें शिक्षण करूं शकली, अडीअडचणींतून पार पडली, त्या समाजाचें ऋण तिला अद्यापि फेडावयाचें आहे. म्हणून या सुमा-रास स्त्रीनें घरांतील लक्ष हळूहळू काढून घेऊन, आपलें स्वतंत्र जीवन व

सामाजिक जीवन जगण्यास सुरुवात करावी. मातेचें काम, गृहिणीचें काम हें सर्व वेळ खाणारें आहे (A full time job). या कामापलीकडे तिला दुसरें कांहीं करणें शक्यच नाहीं, हें म्हणणें कांहीं काळाबाबतींत खरें आहे. पण आयुष्याचीं भर उमेदीचीं पंचवीस वर्षें या कामांना दिल्यावर, नंतरही तिच्या सर्व वेळाची मागणी कुटुंबीयांनीं करणें न्याय्य ठरणार नाहीं व तशी गरजहि वास्तविक राहाणार नाहीं; कारण लवकरच घरांत नवी सून येणार आहे, नव्या कल्पना घरांत वावरूं लागणार आहेत. घराच्या धमन्यांतून नवें, ताजें रक्त सळसळूं लागणार आहे. नव्याजुन्याचा अटळ संघर्ष चुकवण्यासाठीं सासूबाईनीं सूनबाईकडे 'चार्ज' देऊन टाकून, घराबाहेर, परमार्थाकडे लक्ष लावावें हें फार उचित ठरणार आहे. पूर्वी वरातीच्या दुसऱ्या दिवशीं सासू सूनबाईला ' हात धुण्याची ' म्हणून मोहोरेची सोन्याची अंगठी देत असत. त्यांतला खोल आशय याच प्रकारचा होता. सासूबाई घराच्या जबाबदारीबद्दलचे हात धुऊन ती सुनेच्या ताब्यांत देत; त्यासाठीं लागणारें, पूर्वी सासूबाईंच्या ताब्यांत असलेलें " शिक्कामोर्तब " सुनेला दिलें जाई. आतां यापुढें सुनबाईच्या मोहोरेच्या आज्ञेनें घरांतील व्यवहार होणार.

स्त्रीनें घराबाहेर काम काय स्वरूपाचें स्वीकारावें, हें तिच्या मनाच्या कलावर व सामाजिक परिस्थितीवर अवलंबून राहील. पगारी काम तिची इच्छा असल्यास ती करूं शकेल. तिनें अशा व्यवसायाचें शिक्षण घेतलेलें आहे कीं तिला पंचवीस वर्षांच्या खाड्यानंतर सुद्धां नोकरी मिळूं शकेल. गृहस्थाश्रमांत तिनें आपल्या विषयाशीं घनिष्ट संबंध राखलेला असल्यामुळें तिला नोकरी करणें सोपें जाईल. मध्यम प्राप्तीच्या संसारांत, स्त्रीचें स्वतःचें असें कांहींच रहात नाहीं. त्यामुळें तिला म्हातारपणीं मुलांवर अवलंबून रहावें लागतें. जर पंचेचाळिशीनंतर पंधरा वर्षें (आतां सेवानिवृत्तीचें वय खाजगी संस्थांतून ' साठ ' झालें आहे ) ती पगारी काम करूं शकली तर तिचा स्वतःचा असा पैसा, म्हातारपणीं तिच्या हाताशीं राहील. असा स्वतःचा पैसा जवळ असणें ही एक फार महत्त्वाची गोष्ट आहे; निष्काम प्रेम, निर्लेप भक्ति वगैरे वाङ्मयांतून वाचायला ठीक असतें, पण व्यवहारांत ' दाम करी काम ' याच म्हणीची सत्यता पावलोपावलीं पटते. म्हातारपणीं पैसा जवळ असला तरच ' मायेचीं ' म्हणवणारीं माणसें खुषीनें सेवाचाकरी करतात, पैसा नसल्यास अवस्था कठिण

असते. अर्थार्जन करावयाची इच्छा नसल्यास, आपल्या भारतांत तरी परोपकारी समाजसेवा करण्यास अनंत क्षेत्रें आहेत. सात लाख खेड्यांतून अत्यंत जरूर असलेल्या अशा कार्यांचे डोंगर पडले आहेत. शहरांतूनहि अज्ञान, रोगराई यांनीं त्रस्त झालेल्या वर्गासाठीं कितीतरी करतां येण्याजोगें आहे. समाजसेवाश्रम स्वीकारूं इच्छिणाऱ्या स्त्रियांची संघटना करून, त्याद्वारें हीं कार्यें केल्यास जास्त फळ पदरांत पडेल. सरकारी व खाजगी संस्थांनीं उपलब्ध असलेल्या व वरोवर फुकट जात असलेल्या या शक्तीचा ( man-power का woman-power ? ) योजनाबद्ध उपयोग करून घेतला पाहिजे.

या सुमारास स्त्रीचें प्रकृतिस्वास्थ्य उत्तम असतें. पुष्कळ मुलें झालेल्या स्त्रियांच्या बाबतींत सुद्धां अपत्यसंभवाचा काल संपला म्हणजे त्यांची प्रकृति सुधारते असें वैद्यकीय मत आहे. मग आमची आधुनिक स्त्री तर प्रौढपणीं विवाह झालेली, त्यामुळें संसाराचा व अपत्यसंगोपनाचा भार पूर्ण विकसित शक्तीवर घेणारी, कुटुंबनियोजनामुळें आपली प्रकृति व शक्ति यांवर फाजील ताण पडूं न देणारी–अशी असते. तेव्हां पंचेचाळिसाव्या वर्षाच्या सुमारास तिची प्रकृति निर्दोष व कार्यक्षमता अभंग असते. या कार्यक्षमतेला पुरेसें काम मिळवून देणें हीच खरोखर या वयाची समस्या असते. पूर्वीं या वयाच्या सुमारास स्त्रीला वैफल्य येई व ती देवाधर्माकडे लक्ष वळवून मनःशांति मिळवण्याचा प्रयत्न करी हें आपण पांचव्या प्रकरणांत पाहिलेंच. स्त्रीचें हें वय म्हणजे फार नाजूक व जोखमीचा काळ आहे. केवळ शारीरिक फरकाच्या संदर्भांतच हें विधान केलेलें नाहीं. Menopause अपत्यसंभवाच्या कालाचा शेवट या विषयीं बोलतांना डॉक्टर व मानसशास्त्रज्ञ या शारीरिक बदलावरच भर देतात. शरीरांत क्रांति होत असल्यामुळें मन अस्थिर होतें. कारण शरीर व मन यांची सांगड निसर्गानें कायमची घातलेली आहे. तेव्हां या काळांत स्त्रीच्या शरीरप्रकृतीप्रमाणेंच मनःस्थितीलाहि जपलें पाहिजे, अशा सूचना डॉक्टर कुटुंबीयांना देत असतात. या काळांत स्त्री चिडकी होते, लवकर रागावते, लवकर थकते, चंचल बनते– तेव्हां तिच्या कलानेंच सर्वांनीं घरांत वागावें, असें सांगितलें जातें. पण मला वाटतें, या सर्वांच्या जोडीला, तिच्या कर्तृत्वशक्तीला भरपूर वाव मिळवून देणें, तिला वैफल्य येऊं नये याबद्दल खबरदारी घेणें हें अत्यंत महत्त्वाचें आहे. तिचें मन व कर्तृत्वशक्ति तिला

आवडणाऱ्या, येत असलेल्या कामांत गुंतून राहिली म्हणजे शारीरिक त्रास ती सहज निभावून नेईल.

याप्रमाणें स्त्रीच्या आयुष्याचा तिसरा कालखंड सुरू होतो. सुशिक्षित स्त्रीच्या जीवनांतला सर्वांत उज्ज्वल, तिच्या शिक्षणाचें वैशिष्ट्य ज्यांत उठून दिसेल, असा हा कालखंड; तिच्या जीवनाचें संपूर्ण सार्थक या कालखंडांत होतें. पहिल्या कालखंडांत तिनें शिक्षण घेतलें; दुसऱ्यांत संसार करून वंशवर्धन केलें; आतां दोन्ही कालखंडांतल्या कर्तृत्वानें व अनुभवानें, वर्षोवर्षी जवळ सांठलेल्या शहाणपणानें व व्यवहारज्ञानानें, तिचें व्यक्तिमत्व पूर्ण पक्व, सर्वांगविकसित, बहुरंगी, चतुरस्त्र झालेलें असतें. हें परिणतप्रज्ञ व्यक्तिमत्व व पूर्व वयांत प्राप्त करून घेतलेलें व टवटवीत राखलेलें शिक्षण, याच्या जोरावर स्त्री अत्यंत उत्तम कर्तृत्व या तिसऱ्या कालखंडांत करून दाखवील. ज्या वयाला पूर्वीची अशिक्षित, बाहेच्या जगाशीं अपरिचित अशी स्त्री, आपलें सांसारिक कर्तृत्व संपवून निवृत्त होत असे, नातवंडें खेळवण्यासारख्या केवळ मनोरंजक व वेळकाढू कार्यांत उर्वरित आयुष्य संपवून टाकीत असे, मनःशांतीसाठी देवधर्माकडे वळत असे व ती शांति न लाभल्यास दुःखी होत असे, वैफल्याच्या भावनेनें हताश व उदास बनत असे, त्याच काळांत आतां सुशिक्षित स्त्रीच्या कर्तृत्वाचा फुलोरा नव्या वसंतागमनानें फुलूं लागेल. त्यामुळें तिच्या जीवनाचें सार्थक होईल व राष्ट्राच्या प्रगतीस तिचा फार उपयोग होईल. आयुष्याच्या तिसऱ्या खंडांत सुशिक्षित स्त्रीनें जर हा परमार्थाचा, समाजाच्या, राष्ट्राच्या उन्नतीस हातभार लावण्याचा मार्ग चोखाळला नाहीं तर किती अमोल अमाप शक्ति फुकट जाईल व त्यामुळें राष्ट्राचें किती मोठें नुकसान होईल ! सध्यां भारतांत नाना क्षेत्रांतून जाणत्या अनुभवी कार्यकर्त्यांची अत्यंत जरुरी आहे. राष्ट्राची अर्धी शक्ति–अर्धे मनुष्यबळ जर घराच्या चार भिंतींच्या आंत अडकून पडलें, तर राष्ट्राचें पाऊल झपाट्यानें पुढें कसें पडेल ?

याप्रमाणें आधुनिक सुशिक्षित स्त्रियांच्या जीवनांतील नवीं क्षितिजें आपण पाहिलीं. उच्च शिक्षण, सुटसुटीत गृहस्थाश्रम व समाजसेवाश्रम– हे तिच्या जीवनांतील नव्या क्षितिजाचे तीन भाग आहेत. जीवनारंभींचा सात्त्विक ब्रह्मचर्याश्रम किंवा छात्रदशा, जीवनमध्यांतील राजस, प्रियजनसहवासांतील जीवनानंद व जीवनसंध्येचा पवित्र, शांत, स्वार्थनिरपेक्ष, परोपकारक अस्तरंग–

असा आजच्या स्त्रीच्या जीवनाचा आराखडा काढतां येईल. अर्थात् आपण हें लक्षांत घेतलें पाहिजे कीं, कागदावर किंवा कल्पनाफलकावर नुसतीं नेत्रोद्दीपक रेखाचित्रें काढून कार्यसिद्धी होत नाहीं. भारतीय राज्यघटनेनें मूलभूत हक्कांच्या यादींत स्त्री-पुरुषांचा समान दर्जा मानला आहे. पण नुसता कागदावर मान्य केल्यानें तो सुफलित होत नाहीं, प्रत्यक्षांत झालेला नाहीं, ही अनुभवाची गोष्ट आहे. कागदी घोडे सत्यसृष्टींत उतरून दौडायला पाहिजे असतील तर प्रयत्नाची कांस धरली पाहिजे. श्रद्धेवर ठाम ठाण मांडलें पाहिजे. या बाबतींत जपानी मुलींची एक श्रद्धा उल्लेखनीय आहे. जपानी मुलींनां, आपल्या भारतीय मुलींप्रमाणेंच, बाहुल्यांचें फार वेड असतें. तऱ्हेतऱ्हेच्या बाहुल्या त्यांच्या संग्रहीं असतात व त्या साऱ्यांवर मुली जीवापाड प्रेम करतात. या जपानी मुलींची अशी दृढ श्रद्धा असते कीं, आपल्या बाहुल्यांवर आपण अगदीं मनापासून प्रेम केलें तर त्या एक दिवस सजीव होतील! माणसांच्या ध्येयांबद्दल असेंच म्हणतां येईल. मनुष्यमात्रानें आपल्या ध्येयांवर मनापासून निष्ठा ठेवली व तीं साध्य करण्याची निरलस, सतत खटपट केली तरच तीं एक दिवस साकार होतात. जीवनांत दुहेरी कर्तव्यें बजावून आपलें जीवन सार्थ करण्याचें स्त्रियांचें ध्येय–स्त्रियांचें मधुर स्वप्न सत्यसृष्टींत आणण्यासाठीं स्त्रियांनीं सश्रद्ध, पण सुजाणपणें तन-मन-धनेंकरून झगडलें पाहिजे. ही लढाई त्यांनां तीन आघाड्यांवर लढवायची आहे. पहिली आघाडी स्वतःचें रूढिग्रस्त, परंपराबद्ध, नवीन गोष्टींना बिचकणारें, भीरु मन. दुसरी आघाडी कुटुंबीयांच्या पूर्वग्रहांची, असहकाराची व तिसरी सामाजिक विरोधाची.

या तिन्ही आघाड्या सर करण्यासाठीं ठासावा लागणारा पहिला सुरुंग– मध्ययुगीन, संकुचित, अनुदार असा स्त्रीविषयक दृष्टिकोण मुळासकट उडवून देण्यासाठीं योजला पाहिजे. भारतांतील मध्यंतरींच्या शारीरिक, बौद्धिक, आर्थिक, आत्मिक गुलामगिरीच्या काळांत, स्त्रियांकडे पहाण्याचा दृष्टिकोण अत्यंत हीन अभिरुचीचा व बौद्धिक दिवाळखोरीचा द्योतक होता. "स्त्रियांचें बुद्धिबल कोतें असतें; त्या शरीरानें दुबळ्या असतात; मनानें भित्र्या व अधु; जीवनाच्या धकाधकींत त्यांचा निभाव लागणार नाहीं; तेव्हां त्यांनीं घरांत बसून अन्न शिजवावें व पोरें संभाळावीं; यापलीकडे त्या अक्कल चालवूं पहातील तर अनर्थ होईल." या तर्कदुष्ट, खोट्या, बदलत्या कालमानाकडे पाठ फिरव-

णाऱ्या विचारसरणीनें स्त्रियांचें व राष्ट्राचें फार नुकसान झालें आहे. पाश्चात्त्य राष्ट्रांच्या अनुकरणानें हा दृष्टिकोण समाजाच्या कांहीं थरांत सुधारत गेला व स्त्रियांनां शिक्षणादि अधिकार व संधि मिळून आपली पात्रता सिद्ध करून दाखवतां येऊं लागली. एकंदर समाजाचा दृष्टिकोण सुधारण्यासाठीं स्त्रियांनीं आपल्या कर्तृत्वाची कमान चढती ठेवली पाहिजे. आपण पुरुषांप्रमाणेंच, किंबहुना कांहीं क्षेत्रांत पुरुषांहूनहि सरस कर्तृत्व करूं शकतों असें दाखवून दिलें पाहिजे. स्त्रिया शरीरानें नाजूक असल्यामुळें "बळी तो कान पिळी"– ( Might is right ) हा कायदाच ज्या युगांत प्रधान होता, त्या युगांत त्या कदाचित् पुरुषापेक्षां उण्या ठरल्या असतील. पण आधुनिक युग यंत्रांचें आहे, येथें काम बुद्धीचें आहे, शारीरिक शक्तीचें नाहीं; तेव्हां या युगांत स्त्री ही पुरुषाइतकी किंबहुना जास्त कर्तृत्ववान् होण्यास कांहींच प्रत्यवाय नाहीं. स्त्रीनें हें ध्येय, ही महत्त्वाकांक्षा बाळगळी पाहिजे. खालच्या यत्तेतून वरच्या यत्तेंत जाणारा मुलगा आपला जुना कित्ता टाकून देतो व नवीन वापरूं लागतो. स्त्री-पुरुषांनीं व समाजानें बदलत्या युगधर्माप्रमाणें जुन्या कल्पना टाकून दिल्या पाहिजेत व बदलत्या कालमानास अनुरूप अशा नवीन कल्पना घेतल्या पाहिजेत. ॲरिस्टॉटल् हा प्रसिद्ध ग्रीक तत्त्ववेत्ता म्हणत असे, "The female is a female by virtue of a certain lack of qualities" ( पुरुषांतून कांहीं गुण वजा केले की स्त्री होते.) ॲरिस्टॉटल् मोठा तत्त्ववेत्ता असेल, होताच, पण तो दोन हजार वर्षांपूर्वी होऊन गेला हें आपण ध्यानांत धरलें पाहिजे. त्याच्या वेळच्या सामाजिक परिस्थितीला अनुरूप अशी त्याची स्त्रीची व्याख्या असेल. ती आजच्या परिस्थितीला कशी लागू पडेल? तीनशें वर्षांपूर्वीच्या न्यूटनच्या विद्वन्मान्य सिद्धांताला पन्नास वर्षांपुर्वी आइनस्टाइनला डागडुजी करावी लागली, आणि आज हॉईल-नारळीकर, आइनस्टाइनला पुस्ती जोडूं पहात आहेत. जड वस्तूंशीं (matter) निगडित शास्त्रांची ही अवस्था, मग मन ( mind )– तरल, पाऱ्यासारखें धांवरें, प्रयत्न करूनहि हातीं न लागणारें मन व त्याचे व्यापार यांचें रंगरूप शतकाशतकाला बदलत जाईल यांत काय नवल? माणसाच्या कल्पना बदलत्या कालमानाप्रमाणें, पालटत्या परिस्थितीप्रमाणें उत्क्रांत झाल्याच पाहिजेत. त्या तशाच राहिल्या तर मानववंशाची प्रगतीच खुंटेल.

तेव्हां, समाजानें आपल्या स्त्रीजन्माच्या उद्दिष्टाबद्दलच्या कल्पना व स्त्रियांनीं आपल्या आयुष्याचें ध्येय, बदलत्या युगधर्मांच्या संदर्भांत बदलून घेतलें पाहिजे. पूर्वीच्या स्त्रियांचें जीवित-ध्येय ऋणस्वरूपांचें ( negative ) होतें. "भोक्तृत्व हेंच कर्तृत्व" हें स्त्रियांच्या जीवनाचें ब्रीदवाक्य असे. जी स्त्री निमुटपणें आपल्या वांट्याचीं सारीं दुःखें सहन करील ती स्त्री आदर्श मानली जाई. सीता, अहिल्या, द्रौपदीचे आदर्श याच स्वरूपाचे होते. आपल्या कुटुंबाच्या स्वास्थ्यासाठीं जी आपलें सारें जीवित, आपल्या साऱ्या शक्ति वेंचील, स्वतःचें व्यक्तिमत्त्व गुंडाळून ठेवील, अस्मिता विसरून जाईल, ती खरी "आर्य स्त्री" अशी पूर्वीची समजूत होती. ती समजूत आधुनिक युगांत बदलून टाकली पाहिजे. या समजुतीनें स्त्रीच्या सर्वांगीण विकासाला खीळ पडली व समाजाच्या हिशेबीं तिची किंमत शून्य होऊन राहिली. स्त्रियांच्या कर्तृत्वाला समाज व राष्ट्र सर्वस्वीं मुकल्यामुळें त्यांच्याहि प्रगतीला निश्चितच पायबंद बसला. यापुढें सावध होऊन स्त्रीला स्वतंत्र व्यक्तिमत्त्व व कर्तृत्व आहे; स्त्रीच्या जीविताचें ध्येय पुरुषाप्रमाणेंच, द्विगुणी आहे ही गोष्ट सर्वांनीं मनाला पटवून घेतली पाहिजे. पुरुषाप्रमाणेंच स्त्रीनेंहि कौटुंबिक कर्तव्यें करून मग सामाजिक व राष्ट्रगत कर्तव्यें आपल्या शक्तीप्रमाणें करावयाचीं आहेत. स्त्रीचीं कौटुंबिक कर्तव्यें जोखमीचीं व वेळखाऊ असल्यामुळें संसार करीत असतां तिला समाजसेवा किंवा राष्ट्रसेवा करतां आली नाहीं तर तिनें आपल्या आयुष्याच्या तिसऱ्या कालखंडांत, पंचेचाळिसाव्या वर्षाच्या सुमारास, ती कौटुंबिक जबाबदारींतून बव्हंशी मुक्त होईल तेव्हां समाजसेवाश्रम अथवा वानप्रस्थाश्रमामध्यें प्रवेश करून सामाजिक कर्तव्यें बजावावीं. छात्रदशेंतील उच्च शिक्षणाचा व गृहस्थाश्रमांतील अनुभवाचा या तिसऱ्या आश्रमांत तिनें सदुपयोग करावा. समाजानें तिची ही दुहेरी जबाबदारी मान्य करून तिला सहकार्य द्यावें; तिच्या कामगिरीचें कौतुक करावें, तिच्याशीं कृतज्ञ असावें. असें करण्यांत स्त्रियांचें, समाजाचें व राष्ट्राचें सर्वांगीण हित साधणार आहे.

★ ★ ★

प्रकरण ९ वें

# कुटुंबनियोजन

**स्त्री**जीवनांतील नव्या क्षितिजांची रूपरेषा गेल्या प्रकरणांतून पाहिली. हीं क्षितिजें दूर दूर न पळतां जवळ यावीं, प्रत्येक स्त्रीच्या टप्प्यांत यावीं म्हणून ज्या अनेक गोष्टी गृहीतकृत्यें म्हणून धराव्या लागल्या, त्यांपैकीं कुटुंबनियोजन हें एक प्रमुख गृहीतकृत्य आहे. राष्ट्राच्या जीवनांत, विशेषतः सध्यांच्या भारताच्या प्रगतीसाठीं आंखल्या गेलेल्या विकासयोजनांत कुटुंब-नियोजनाला अग्रपूजेचा मान दिलेला आढळेल. अर्थशास्त्रज्ञांची भारतीयांचें जीवनमान व अर्थप्राप्ति वाढविण्यासाठीं चाललेली खटपट, वाढत्या लोकसंख्ये-पुढें पराभूत होत आहे. वाढत्या लोकसंख्येबद्दल डेमोग्राफर्सनीं (जनन मरण रोगराई यांचे आंकडे गोळा करून लोकस्थिति अजमावणारे शास्त्रज्ञ) बांधलेले कयास, हरीणदौडीनें धांवणाऱ्या जननसंख्येनें विस्कटून टाकले आहेत व त्यामुळें या कयासांवर आधारलेल्या पंचवार्षिक योजना कोलमडून पडत आहेत. यामुळें कुटुंबनियोजन हा आजमितीला भारताच्या प्रगतीचा मूलमंत्र झाला आहे. चौथ्या पंचवार्षिक योजनेंत कुटुंबनियोजनासाठीं अवाढव्य रकमा खर्चीं टाकण्याचा संकल्प सुटला आहे. कुटुंबनियोजनाचा प्रसार करण्यासाठीं नाना कल्पना, क्लृप्त्या ठिकठिकाणीं वापरल्या जात आहेत. राष्ट्राच्या जीवनांत

कुटुंबनियोजनाचें जेवढें निकडीचें महत्त्व आहे तितकेंच आधुनिक स्त्रीच्या जीवनाच्या आलेखांत आहे. म्हणून एका स्वतंत्र प्रकरणांत या विषयाचा खल करण्याचें योजिलें आहे.

कुटुंबनियोजन, जें पूर्वी " संततिनियमन " या कमी अर्थगर्भ व कांहींशा परखड संज्ञेनें ओळखलें जात असे, तें आतां नागरी जनतेच्या चांगल्या परिचयाचें झालें आहे. खेड्यांतील जनतेंतही या कल्पनेचा प्रसार करण्यासाठीं भगीरथ प्रयत्न सरकार, समाजकल्याण संस्था व समाजसेवक करीत आहेत. आतां या कल्पनेला प्रतिष्ठित स्वरूप प्राप्त झालें आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. पूर्वीप्रमाणें आतां त्या विषयाचें नांव घेणें किंवा त्यावरील पुस्तकें संग्रहीं असणें हें असभ्य किंवा अनैतिक समजलें जात नाहीं. संततिप्रतिबंधक साधनांची चौकशी करणें किंवा तीं उघडपणें खरेदी करणें यामधील मनाचा संकोच पुष्कळच कमी झाला आहे. संततिप्रतिबंधक शस्त्रक्रियेची भीति लोपली असून, पुष्कळ स्त्री–पुरुष दोनतीन अपत्त्यांनंतर तीं खुषीनें करून घेत आहेत. सरकारनें या बाबतींत उत्तेजनार्थ विलोभनें ठेवलीं आहेत. कुटुंबनियोजनाबद्दल सल्ला देणारीं अनेक केंद्रें निघालीं असून शस्त्रक्रियेची व्यवस्थाहि अनेक रुग्णालयांत आहे. जनता मोठ्या प्रमाणांत या सोईचा उपयोग करून घेत आहे असें सांगण्यांत येतें. एकंदरीनें लोक या बाबतींत बरेच जागृत झाले आहेत, असें म्हणण्यास हरकत नाहीं. तेव्हां कुटुंबनियोजन या विषयाची अगदीं मुळाशीं जाऊन चर्चा करण्याची मोठीशी गरज आतां राहिली आहे असें नाहीं. पण हा विषय स्त्रियांच्या हिताशीं अगदीं निगडीत; तेव्हां सदरहु पुस्तकांत त्याच्याबद्दल थोडासा खल केल्याशिवाय राहवत नाहीं. म्हणून या विषयाची भूमिका व त्यावरील मतमतांतरें थोडक्यांत पाहूंया.

कुटुंबनियोजनाविरुद्ध पहिला सनातनी आक्षेप " पूर्व–संचिता " वरील श्रद्धेपासून उत्पन्न होतो. ललाटींचा लेख पुसण्याचा प्रयत्न करणें म्हणजे वेडेपणा आहे. देव व दैव यांच्या लीला मानवानें मुकाट्यानें सहन कराव्या; त्याविरुद्ध जाण्याचा प्रयत्न करणें वाजवी नाहीं. अशिक्षित, नेणत्या स्त्रियांच्या तोंडीं, अजूनसुद्धां पुढील भाषा ऐकूं येते. " मुलें म्हणजे देवाची देणगी, बाई ! तिला आपण कोण हवीं नको म्हणणार ? " दुसरा आक्षेप, " कुटुंबनियोजन म्हणजे भ्रूणहत्येचें पाप शिरीं घेणें आहे," हा होय. अर्थात्, अलीकडच्या जमान्यांत

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम........................ वि: ........................
क्रमांक ........................ नोंद दि: ........................



'गर्भपाताला कायदेशीर मान्यता द्यावी काय ?' असा प्रश्न उपस्थित करून त्याच्यावर साधकबाधक मतें मांडण्यापर्यंत लोकांची मजल आली आहे. तेव्हां कुटुंबनियोजनामुळें होणाऱ्या 'अप्रत्यक्ष भ्रूणहत्येला' कुणी भिईल असें वाटत नाहीं. पण जर कुणी ही कुशंका मनांत बाळगूं लागेल तर त्याला असा प्रश्न विचारावासा वाटतो कीं, "फार मुलें झाल्यामुळें, मातेची प्रकृती ढांसळत जाऊन ती क्षय, बाळंतरोग इत्यादि रोगांनां बळी पडते, तेव्हां त्या हत्त्येचें पाप कुणाच्या शिरावर लादायचें ? आई गेल्यावर मुलांची आबाळ झाली, किंवा सावत्र आईच्या राज्यांत त्यांची मानसिक कुचंबणा झाली तर त्या पापाला जबाबदार कोण ?" अपत्यसंभव ही देवाची देणगी आहे, नैसर्गिक गोष्ट आहे—तिच्या विरुद्ध जाणें अस्वाभाविक आहे, असें म्हणणारे, देवी येणें ही नैसर्गिक गोष्ट आहे, देवाच्या इच्छेनुरूप होणारी आहे. असें मानून, आपल्या मुलांनां देवी टोंचल्याशिवाय राहातात काय ? आतां तर देवी टोंचण्याच्या जोडीला त्रिगुणी सुई ( Triple Vaccination ), पोलिओ—प्रतिबंधक लस वगैरे मुलांना टोंचावीं लागतात व हे निसर्गपूजक लोक हे सर्व सोपस्कार वेळोवेळीं करण्यांत दक्ष असतात. मग कुटुंबनियोजन हेंच तेवढें अनैसर्गिक म्हणून कां डावलावें ? शिवाय मुलें ही देवाची देणगी हें म्हणणें उचित आहे, पण कोठपर्यंत ? जोंवर तीं सुखकारक, आनंददायक होतात तोंपर्यंत. जर मुलें आईबापांच्या दुःखास, कष्टास कारणीभूत होऊं लागलीं तर ती देणगी न म्हणतां, देवाचा कोपच म्हटला पाहिजे. फार मुलें झाल्यामुळें आईची प्रकृति ढांसळली, बाप त्यांनां पोटभर अन्नवस्त्र, शिक्षण, औषध-पाणी देण्यास असमर्थ ठरूं लागला तर मग तीं मुलें म्हणजे ईश्वरी कोपच नाहीं का ? आणि तो टाळण्यासाठीं उपाय करायला नको का ? शिवाय मूल होत नसलें तर देवाला संकट घालण्यापासून, दवाखान्याच्या पायऱ्या झिजवण्यापर्यंत सारे उपाय केले तर चालतात, मग मुलें होऊं नयेत म्हणून उपाय करायला कोणती हरकत ?

आणखी एक शंका अशी कीं, तीन मुलें झाल्यावर, शस्त्रक्रिया करून घेतली आणि मग तीं मुलें दगावलीं, तर केवढी समस्या उभी राहील ? दैवावर भरंवसा ठेवणाऱ्या सनातनी पक्षाला तरी ही शंका पुढें आणतां येणार नाहीं. कारण, त्यांच्या कल्पनेप्रमाणें, नशिबांतच जर अपत्यसुख नसलें तर दहा अपत्यें

झालीं तरी लाभणार नाहींत. आणि नशिबांत असलें, तर एकच मूल झालें तरी तें लाभेल. कहाणींतल्या निपुत्रिक माणसानें आंब्याच्या झाडावर चढून टोपलीभर फळें खालीं टाकलीं पण खालीं उतरून पाहतो तो झाडाखालीं एकच फळ—कारण त्याच्या नशिबीं एकच मूल होतें; तेव्हां झालेलीं मुलें गेलीं तर मग कसें, ही शंका घेण्यांत अर्थ नाहीं.

अत्यंत महत्वाचा असा आणखी एक आक्षेप विरोधकांकडून वरचेवर पुढें मांडण्यांत येतो; तो असा कीं, संततिनियमनाच्या ज्ञानाचा व साधनांचा सर्वत्र प्रसार झाला कीं परिणामाची भीति न राहिल्यामुळें स्वैराचार माजेल व समाजाची नैतिक अवनति होईल. गर्भपात कायदेशीर करण्याविरुद्धहि हाच आक्षेप पुढें आणण्यांत येतो; ही भीति निरर्थक आहे, असें तत्सम इतर गोष्टींवरून सिद्ध करून दाखवतां येईल. स्वैराचार करणारे परिणामाला कधींच भीक घालीत नाहींत; उलट स्वैराचाराच्या जोडीला बालहत्येचें पाप खुशाल जोडून ठेवतात. शिवाय हा परिणाम स्त्रियांनां भोगावयाचा असतो. मुलें होण्याचीं बंद केलीं कीं स्त्री स्वैराचारास प्रवृत्त होईल असें शक्य वाटत नाहीं. अर्थात्, स्त्री ही निसर्गतःच संयमी, विषयपराङ्मुख व लज्जाशील असते, हा मुद्दा सयुक्तिक असला तरी पुढें आणीत नाहीं—कारण पुष्कळ लोक तो पटवून घेण्यास तयार होणार नाहींत. आमच्या शास्त्रकारांनीं तर स्त्रियांच्या विरुद्ध, "स्थलं नास्ति, क्षणं नास्ति" वगैरे सुभाषित-मुक्ताफळें बरींचशीं विखरून ठेवलेलीं आहेत. पण स्त्री स्वैराचारास प्रवृत्त होणार नाहीं याचीं पटण्याजोगी कारणें दोन सांगतां येतील. एकतर आपल्या सध्यांच्या समाजाच्या रचनेंत स्त्री ही इतकी कोंडली गेली आहे कीं, तिला मनःपूत स्वैराचार करण्यास इच्छा झाली तरी सवड व संधीच मिळणार नाहीं. शक्यता नसली म्हणजे स्वाभाविकच मन त्या बाजूला झुकत नाहीं. कुमारिकांचा स्वैराचार येथें अप्रस्तुत आहे. कारण या प्रकरणांत गृहिणीच्या संदर्भात आपण कुटुंबनियोजनाचा विचार करीत आहोंत. तीन मुलांची माता असलेली, पती, मुलें, घर या त्रिपुटीच्या सेवेंत संपूर्ण गुरफटलेली, शिवाय या सोनेरी बेडीच्या जोडीला रुपेरी बेडींत अडकलेली म्हणजेच नोकरी करणारी स्त्री, स्वैराचारास प्रवृत्त होईल, हें संभवत नाहीं. तिला स्वैराचारास सवडच राहणार नाहीं. शिवाय मानसशास्त्रज्ञांच्या मतें स्त्रियांचा 'काम' हा अपत्यवात्सल्याच्या रूपानें उदात्तीकरण पावत असतो.

तीन मुलांवर वात्सल्याचा वर्षाव करीत असलेली, स्वतःच्या संसारांत "सौभाग्यवती" असलेली स्त्री, "परिणामाची भीति नाहीं, अपत्य होण्याचा संभव नाहीं" म्हणून स्वैराचारास उद्युक्त होईल, ही कल्पनाच हास्यास्पद व अशक्य वाटते.

शिवाय दुसरें असेंहि म्हणतां येईल कीं, कुटुंबनियोजनापासून होणारे राष्ट्राचे व कुटुंबाचे फ़ायदे इतके विपुल आहेत कीं, त्यांच्यासाठीं थोडा धोका पत्करावा लागला तरी हरकत नाहीं. मानवी समाजांत कुठली वस्तु, व्यक्ति किंवा संस्था सर्वगुणसंपन्न आहे? प्रत्येकामध्यें कांहीं अवगुण, कांहीं धोका असतोच. सध्यां सर्वांच्या डोळ्यांसमोर असणारें अणुशक्तीचेंच उदाहरण घेतां येईल. अणुशक्ति हें खरोखर विज्ञानाचें मानवाला एक मोठें वरदान आहे. कोळसा, पेट्रोल वगैरे इंधनें-कीं ज्यापासून या यंत्रयुगांतील यंत्रांना गति व शक्ति मिळते, तीं लवकरच संपुष्टांत येतील, व मग 'पुढें काय' असा भयंकर प्रश्न आऽ वासून वैज्ञानिकांपुढें उभा राहिलेला असतांना अणुशक्तीचा शोध लागला. ही शक्ति इतर इंधनांपेक्षां प्रचंड असून, अफाट, कधीं न संपणारी आहे. पण आक्रमक वृत्तीचे, ऱ्हस्व दृष्टीचे, स्वार्थासाठीं वाटेल तें निर्घृण कृत्य करण्यास तयार असलेले मानववंश या अणुशक्तीचा विश्वाच्या संहारासाठीं उपयोग करतील, दूरचा कल्पांत आजच ओढवून घेतील, या भीतीनें, ही अणुशक्ति वापरूंच नये, असें म्हणणें सूज्ञपणाचें ठरेल काय? ही अमोल देणगी अव्हेरण्यापेक्षां, तिचा दुरुपयोग करूं पहाणाऱ्या राष्ट्रांना, साम, दाम, दंड, भेद इत्यादि उपायांनीं सन्मार्गावर आणण्याची खटपट करणें जास्त इष्ट नाहीं का?

तेव्हां कांहीं विकृत मनोवृत्तीचे स्त्री-पुरुष परिणामाची भीति नसल्यामुळें स्वैराचार करतील या भीतीनें कुटुंबनियोजनासारखी सर्वांगीण हिताची गोष्ट टाकून देणें गैर होईल. शिवाय पुरुषांना परिणाम भोगण्याची भीति नसते म्हणून काय सगळेच पुरुष स्वैराचारी झाले आहेत? स्त्री-पुरुषांच्या विवेकशक्तीवर, सारासार विचारबुद्धीवर श्रद्धा ठेवून, कुटुंबनियोजनासारख्या समाज हितवर्धक गोष्टींचा प्रसार करण्यासाठीं सर्वत्रांनीं झटलें पाहिजे. भारत सरकार कुटुंबनियोजनावर लाखों रुपये खर्चायला तयार आहे. पण तेवढे खर्चींच पडत नाहींत. कारण कुटुंबनियोजनाच्या कल्पनेचा प्रसार अजून लहान गांवांत झालेला नाहीं; व त्यामुळें जरूर ती शस्त्रक्रिया मोफत किंवा दक्षिणेसहसुद्धा

करून घ्यायला जनता पुढें येत नाहीं. संततिप्रतिबंधक साधनें व सल्ला फुकट किंवा अल्पमोली मिळण्याची सोय असूनहि तिचा फायदा, अज्ञ जनसमूहांत कुणी घेत नाहीं. या कल्पनेचा प्रसार करण्यासाठीं फार मोठ्या संख्येनें प्रचारक व समाजसेवक तयार झाले पाहिजेत. या क्षेत्रांत पूर्वी सूचित केलेल्या "वानप्रस्थीय" स्त्रियांचा फार मोठा उपयोग होणार आहे. पोक्त, कुटुंबवत्सल आजीबाई झालेल्या स्त्रियांपाशीं अडाणी, लहान वयाच्या स्त्रिया मोकळ्या मनानें बोलतील, शंका विचारतील व मदत घेण्यास तयार होतील.

कुटुंबनियोजन ही राष्ट्राप्रमाणें, स्त्रीजीवनाची फार मोठी गरज आहे. त्यामुळें स्त्रियांनींच या विषयांत जास्त कळकळीनें लक्ष घातलें पाहिजे. कुटुंबनियोजनानेंच स्त्रीच्या कर्तृत्वास सामाजिक कार्यास पूर्ण वाव मिळेल; नाहींतर स्त्रीचें शहाणपण, शिक्षण, कर्तृत्व बहुप्रसवा गांधारीप्रमाणें डोळे असून आंधळें बनून जाईल.

स्त्री-शिक्षणाचा विचार करतांना आपण पाहिलें कीं, स्त्री-शिक्षणाचें उद्दिष्ट केवळ सुगृहिणी व सुमाता बनवण्याचें नसून, उत्तम नागरिक, आदर्श समाज-सेवक व कर्तृत्ववान् देशभक्त निर्माण करण्याचें असणें जरूर आहे.

स्त्री-जीवनाच्या क्षितिजावर हे नवे तारे उदयास येऊं लागले असून ते तिचें जीवन उजळून टाकीत आहेत. मध्यंतरींच्या काळांत स्त्रीला घराबाहेर जीवन नव्हतें, जग नव्हतें; ती पतिपुत्रांच्या जीवनांतच जगत होती, झिजत होती. पण आतां विचारवंतांनीं स्त्रीच्या स्वतंत्र व्यक्तिमत्वाचें महत्त्व ओळखलें असून, त्याच्या उत्कर्षासाठीं शिक्षणादि साधनें तिला खुलीं करून दिलीं आहेत. भारत-सरकारनें आपल्या घटनेंत स्त्रीचा दर्जा पुरुषासमान मान्य केला आहे. या बाबतींत भारतीय स्त्रिया सरकारच्या सदैव ऋणी राहतील. इंग्लंडमध्यें नुसता मतदानाचा समान हक्क मिळवण्यासाठीं स्त्रियांना उग्र लढा द्यावा लागला. या स्त्रीस्वातंत्र्यवादिनींनीं (सफ्रेजेट्स्) तुरुंग भरून टाकले, शिपायांच्या घोड्यांच्या टापांखालीं स्वतःचे देह तुडवून घेतले, तुरुंगांत अन्नसत्याग्रह केले; एवढ्या हालअपेष्टा सोसूनसुद्धां, सनातनी इंग्रजसरकारकडून त्यांना मतदानाचा हक्क मिळाला नाहीं. मग लोकप्रतिनिधि म्हणून लोकसभेंत बसणें तर दूरच राहिलें. नंतर पहिल्या महायुद्धांत सारे कर्ते पुरुष आघाड्यांवर लढावयास गेले असतांना, स्त्रियांनीं हिंमतीनें पुढें येऊन, पुरुषांच्या जागा भरून काढल्या व

देशाच्या दैनंदिन व्यवहाराची व युद्धाच्या तयारीची धुरा आपल्या नाजूक खांद्यांवर घेऊन तो गाडा पुढें रेटीत नेला. १९१४ ते १९१८ या चार वर्षांच्या या घोर तपश्चर्येचें फळ स्त्रियांना मिळालें व स्त्रिया मतदान करूं लागल्या. स्वतःला 'स्त्री-दक्षिण' म्हणविणाऱ्या इंग्लंडसारख्या राष्ट्राची ही तऱ्हा मग त्या मानानें मागसलेल्या युरोपियन देशांची गोष्ट तर विचारूंच नये. कित्येक युरोपियन देशांत स्त्रियांना अजून मतदानाचा हक्क मिळालेला नाहीं व कांहीं थोड्या राष्ट्रांनीं तो नुकताच दिला आहे. मागसलेला म्हणून हिणवला जाणाऱ्या भारताची या आघाडीवरली धडाडी प्रशंसनीय आहे. स्त्रियांनीं मागण्यापूर्वींच सर्व समान हक्क भारतानें स्त्रियांना देऊन टाकले आहेत.

मात्र ते हक्क बजावण्याची पात्रता अंगीं येण्यासाठीं स्त्रियांमध्यें अजून पुष्कळच जागृति व्हावयास पाहिजे आहे. लहान गांवांतून, खेड्यांमध्यें स्त्री-शिक्षणाचा प्रसार व्हावयास पाहिजे आहे. सर्व सत्ता केंद्रित असतांना या दिशेनें, किंनहुना सर्वत्र सामाजिक कार्याच्या क्षेत्रांत पुढें पाऊल फार धीमेपणानें पडत होतें. आतां सत्तेचें विकेंद्रीकरण राज्यांतून झाल्यामुळें प्रगति झपाट्यानें व्हावी. जिल्हापरिषद वगैरे ठिकठिकाणच्या यंत्रणा, स्थानिक परिस्थिति, स्थानिक लोकमत, स्थानिक सोई व अडचणी ओळखून तदनुरूप कार्याची दिशा आंखूं शकतील. व त्यामुळें सुधारणा सुलभ व लवकर होत जाईल. शिक्षणानें स्त्रीला स्वतःची ओळख पटली म्हणजे तिला तिच्या कार्याचीं नवीं क्षितिजें स्पष्ट दिसूं लागतील व त्या मार्गानें ती वाटचाल करूं लागेल.

आपण पूर्वीं पाहिल्याप्रमाणें शहरांतून स्त्रीशिक्षणाचा प्रसार पुष्कळ प्रमाणांत झाला आहे. पण, उच्चशिक्षण घेतलेल्या स्त्रियाही विवाह झाल्यावर संसारांत अडकून पडतांना दिसत आहेत. घराबाहेरच्या जगाला, पूर्वींच्या अशिक्षित स्त्रियांप्रमाणेंच त्या पारख्या झाल्या आहेत. आपणांपुढें उजळलेलें नवें क्षितिज घराचीं खिडक्यादारें दडपून टाकून, नीट निरखण्याचें त्या नाकारीत आहेत. ही प्रवृत्ति घातुक, आत्मघातकी व राष्ट्रहितनाशक आहे. आपल्या नव्या कर्तव्यांची, बदलत्या कालमानानुरूप ठरलेल्या जीवनाच्या नव्या इतिकर्तव्यतेची त्यांनीं दखल घेतली पाहिजे. ही दखल घेण्याची इच्छा असून प्रतिकूल परि-स्थितीमुळें, स्त्रिया त्या दिशेनें पावलें टाकूं शकत नसल्यास पुरुषवर्गानें, समाजानें, राष्ट्रानें त्यांच्या मार्गांतील अडचणींचा विचार करून त्या दूर केल्या

पाहिजेत. या निरनिराळ्या अडचणींचा मागील प्रकरणांतून विचार झाला आहेच. येथें एका प्रमुख अडचणीचा– बहुप्रसवतेचा–विचार प्रस्तुत आहे.

शहरांतील मध्यमवर्गातील, वरच्या व खालच्या थरांतील स्त्री, आपण मागें एका प्रकरणांत पाहिल्याप्रमाणें उच्च शिक्षण संपवल्यानंतर २१।२२ वर्षांची असतांना विवाह करते. चोविसाव्या वर्षी ती माता होते असें धरून चालूं. यानंतरची गर्भधारणा जर तिनें निसर्गावर सोंपवली तर गर्भधारणेचा काल संपेपर्यंत म्हणजे ४५।४६ वर्षांचें वय होईपर्यंत, अगदीं तीन वर्षांचा पाळणा धरला तरी तिला सात–आठ मुलें होतील. बालविवाहाच्या काळांत, निसर्गाला पूर्णपणें मोकळें मैदान असतांना, सासूबाईसूनबाईचे पाळणे बरोबर हलत असल्याचीं उदाहरणें वाचकांच्या पहाण्यांत किंवा ऐकण्यांत असतील. पंचेचाळिसाव्या वर्षापर्यंत मुलें होत राहिलीं म्हणजे सर्वांत लहान मूल हातावेगळें होईपर्यंत बाईची पन्नाशी येते. गर्भारपण-बाळंतपणाच्या सतत फिरणाऱ्या चक्रावर गरगर फिरून तिची दमछाक झालेली असते. प्रकृतीनें कमकुवत व मनानें ती निरुत्साही झालेली असते. अशा वेळीं तिनें पूर्ववयांत घेतलेल्या शिक्षणाचा किंवा गृहस्थाश्रमांत घेतलेल्या अनुभवाचा ती समाजास काय व कसा उपयोग करून देऊं शकणार ? आर्थिक चणचणीच्या या काळांत मध्यमस्थितींतल्या पुरुषाची, एकट्याची प्राप्ति एवढा मोठा संसाराचा गाडा ओढण्यास पुरेशी नसते. त्यामुळें नोकरमाणसांची घरकामांत किंवा मुलांचें करण्यांत मदत मिळणें स्त्रीला अशक्य होतें. पुरेसें सकस अन्न, प्रसूतिपूर्व व प्रसूतीनंतर विश्रांतीहि तिला मिळूं शकत नाहीं. या ओढघस्तीच्या संसारांत ती सर्वच बाजूंनीं खंगत जाते. विज्ञानाच्या प्रगतीमुळें मानवाची आयुर्मर्यादा खरें पाहिलें असतां, आधुनिक युगांत वाढली आहे; पण बहुप्रसवा स्त्री, बेताच्या प्राप्तीच्या संसारांत गुरफटलेली असल्यास तिचें आयुष्य संपुष्टांतच येतें, वर्षांची संख्या वाढली कदाचित् तरी कर्तृत्वाची, तन्दुरुस्तीचीं वर्षे खुंटत जातात.

पूर्वींच्या अशिक्षित स्त्रियांच्या बाबतींत हें सर्व होईच; पण आधुनिक सुशिक्षित स्त्रीच्या वांट्याला, वरील अपेष्टांच्या जोडीला वैफल्याची भावना येते. उच्च शिक्षण घेतलेलें असून, अर्थार्जनक्षमता अंगीं आलेली असून, केवळ पूर्वपरंपरेच्या व रूढीच्या आहारीं जाऊन, ती अनिर्बंध असा संसार व

प्रजोत्पत्ति करीत बसेल तर तें तिच्या हिताच्या व समाजाच्या हिताच्या दृष्टीनें अत्यंत शोचनीय ठरेल. समाजासाठीं आपणाला, अंगीं पात्रता असून परिस्थिति प्रतिकूल असल्यामुळें कांहीं करतां येत नाहीं, याचा स्त्रीला खेद होत राहून तिचें जीवन कडवट होईल. स्त्रीच्या शिक्षणावर खर्च झालेला पैसा, श्रम, काळ याची परतफेड म्हणून स्त्रीच्या हातून कांहींच सामाजिक कार्य होत नाही हें पाहून राष्ट्र रुष्ट होईल व तर मग 'स्त्रियांना शिक्षण द्यावेंच कशाला?'—अशा प्रतिगामी धोरणाकडे झुकूं लागेल. हा अनवस्थाप्रसंग टाळण्याला कुटुंबनियोजनाची अत्यंत आवश्यकता आहे. मागील प्रकरणांत दिग्दर्शित केल्याप्रमाणें कुटुंबनियोजनानें अपत्यांची संख्या मर्यादित होईल. त्यामुळें स्त्रीची प्रकृति व जीवनोत्साह टवटवीत राहील. मुलें हाताविगळीं झाल्यावर आयुर्मर्यादा सर्वसाधारण वाढलेली असल्यामुळें समाजसेवाश्रमासाठीं तिला पंधरा वर्षांचा भरपूर वेळ मिळेल.

तीन मुलांचें सुटसुटीत कुटुंब झालें म्हणजे कुटुंबाची आर्थिक परिस्थितीहि सांवरेल. पहिल्या दोन मुलीच झाल्या तर तिसऱ्यांदा मुलाची वाट पहावी; पण तिसरीहि मुलगी झाल्यास चालू स्थितींत समाधान मानून पूर्णविराम घ्यावा. नाहींतरी समान दर्जाच्या या काळांत मुली व मुलगे असा फरक मानण्यांत काय अर्थ आहे? आधुनिक काळांत मुलाप्रमाणें मुलीहि कर्तबगारीनें उभय कुळांचें नांव उजळतात. मुलींना मुलांप्रमाणेंच शिक्षण द्यायचें असतें. कित्येक मुली शिक्षण झाल्यावर मुलांप्रमाणेंच मातापित्यांचे संसार चालवितात. विवाहोत्तरहि आर्थिक मदत देऊं शकतात. वारसाहक्काच्या कायद्यानें मुलींना पित्याच्या मालमत्तेंत हक्कहि असतो; मग आतां मुलगा झाल्याचा आनंद व मुलगी झाल्याचा खेद कशाला मानावा? मुलगी परघरीं जाते, दुसरें आडनांव लावते, हा एक महत्त्वाचा फरक. यासाठीं मला असें सुचवावेसें वाटतें कीं, मुलींनीं लग्नानंतर दुहेरी आडनांवें आपल्या नांवापुढें लावण्याची प्रथा पाडावी. लिमयांची मुलगी लेल्यांच्या घरीं दिलेली असल्यास, तिनें लिमयेलेले असें जोड आडनांव चालू करावें; म्हणजे मुलाप्रमाणेंच, वंशाचें नांव मुलगीहि पुढें चालवीत आहे असें समाधान तिच्या पितृगृहीं वाटेल.

तेव्हां मुलीनें विवाहापूर्वीच आपल्या मनाशीं आपल्या भावी जीवनाचा आराखडा काढतांना, कुटुंबनियोजनाचा त्या रूपरेषेंत कटाक्षानें समावेश करावा;

जोडीदार निवडतांना, तो आपल्याशीं सहमत आहे ना, याची सूचक चर्चा करून खात्री करून घ्यावी. लग्नानंतर तीन मुलें दहा वर्षांच्या काळांत व्हावीं. पाळणा दूर असू नये. मध्यंतरीं, पहिलें मूल पांच वर्षांचें झाल्याशिवाय दुसरें होऊं द्यायचें नाहीं, अशी टूम निघाली होती. पण ही कल्पना अनेक दृष्टींनीं गैरसोईची आहे. एकतर पांच वर्षांच्या पाळण्यांत, स्त्रींचीं फार वर्षें अपत्य संगोपनासाठीं खर्च होतात. दोनअडीच वर्षांच्या पाळण्यांत आठ वर्षांत तीन मुलें मोठीं करतां येतात. मुलांत मुलांचें होऊन जातें. प्रत्येकासाठीं निराळा वेळ खर्च करावा लागत नाहीं. एका विनोदी इंग्लिश चित्रपटांत एक डझन मुलें होणें, कमी मुलें होण्यापेक्षां कसें स्वस्त व सोईचें पडतें तें दाखविलें होतें. (Cheaper by the Dozen). त्यांतील अतिशयोक्तीचा भाग सोडून दिला तर मूळ तत्त्व खरें आहे. शिवाय अडीच वर्षांचें अंतर मुलांच्यांत असलें म्हणजे त्यांची एकमेकांला संगत लाभते (Companionship). घरांतच खेळगडी मिळतात. त्यामुळें आईचाहि पुष्कळ वेळ वांचतो. एकेकटीं मुलें, किंवा पांच वर्षांचें अंतर असलेलीं भावंडें एकटीं पडतात; तीं एकलकोंडीं होतात; आईवर करमणुकीसाठीं जास्त अवलंबून राहतात; किंवा सारखीं शेजारच्या घरांत पळतात. तेव्हां ७।८ वर्षांच्या कालावधींत तीन अपत्यें होणें श्रेयस्कर आहे.

कुटुंबनियोजनाच्या संदर्भांत "गर्भपात कायद्यानें मान्य करावा काय?" या विषयावर चार शब्द लिहिणें अप्रस्तुत होणार नाहीं. सध्यां हा विषय सगळीकडे चर्चिला जात आहे. अर्थात् पतिता, कुमारिका यांच्याविषयीं चालू संदर्भांत कांहीं लिहावयाचें कारण नाहीं. "विवाहित स्त्रीला, संततिनियमन अयशस्वी झाल्यास, गर्भपात करून घेण्यास कायद्यानें संमति द्यावी काय?" या प्रश्नाचा, प्रस्तुत पुस्तकाच्या विषयाच्या संदर्भांत विचार करणें जरूर आहे.

या चर्चेंत रशियाचें नांव नेहमीं प्रामुख्यानें डोळ्यांसमोर येतें. रशियानें स्त्रियांच्या कर्तृत्वाचा राष्ट्राच्या प्रगतीसाठीं संपूर्णपणें उपयोग करून घेण्याचें ठरवल्यावर, साहजिकच त्याला घरकामाचा व अपत्यसंगोपनाचा प्रश्न सोडवावा लागला. सामुदायिक भोजनगृहें व राष्ट्रप्रणीत बालसंरक्षक केंद्रें काढून रशियानें तो सोडवला. स्त्रीची कर्तृत्वशक्ति खच्ची होऊं नये, म्हणून तिचें बहुप्रसवत्व थांबवणेंहि ओघानेंच आलें. त्यासाठीं संततिनियमन करण्यांत आलें.

पण चाळिस-पंचेचाळीस वर्षांपूर्वी संततिनियमनाचीं साधनें रशियांत दुर्मिळ होतीं; तें शास्त्र अद्यापि बाल्यावस्थेंत असल्यामुळें तीं साधनें हमखास यश-स्वीहि होत नव्हतीं. त्यामुळें रशियानें विवाहित स्त्रीचा स्वखुषीचा गर्भपात १९२० सालीं कायदेशीर ठरवला. स्त्रीला आपण केव्हां मातृपद स्वीकारावयाचें हें ठरवण्याचा हक्क असणें तिच्या हिताच्या व राष्ट्राच्या हिताच्या दृष्टीनें आवश्यक होतें. जपानमध्येंहि लोकसंख्येस आळा घालण्यासाठीं या उपायाचा अवलंब करण्यांत आला होता व त्याचा इष्ट तो परिणाम झालाही.

रशियामध्यें कांहीं वर्षांपूर्वी हा कायदा बदलून टाकण्यांत आला. आंकडे-शास्त्रानें, गर्भपातानें स्त्रियांची प्रकृति खालावते असें सिद्ध करून दाखवलें. बाकी याच आंकडेशास्त्रानें १९२० सालीं, योग्य काळजी घेऊन, वैद्यकीय कुशल देखरेखीखालीं गर्भपात करविल्यास, बाईच्या प्रकृतीस धोका पोंचत नाहीं असेंही सिद्ध केलें होतें. अर्थात् रशियामध्यें, साहित्यिकांप्रमाणें, आंकडे-शास्त्रहि राज्यकर्त्यांच्या अंगुलीच्या इशाऱ्यावर कदाचित् नाचत असेल. पण सर्वसाधारण आंकडेशास्त्राबद्दल सुद्धां असा विनोद करण्यांत येतो कीं, " जगांत तीन प्रकारचीं असत्यें आहेत; निरुपद्रवी असत्य ( white lies ); उपद्रवी असत्य ( black lies ) व आंकड्यांतील असत्य ( statistical lies ).

तें कसेंहि असो. विवाहित स्त्रीला, तिच्या स्वीकृत कार्यांत मातृपद अडथळा करील असें वाटल्यास, गर्भपात करून घेण्याचा कायदेशीर हक्क असलाच पाहिजे. बाईच्या प्रकृतीस धोका असल्यास, गर्भपात करण्यास डॉक्टरांना कायद्याची परवानगी असते. बाईच्या प्रकृतीइतकेंच किंबहुना जास्तही राष्ट्राचें प्रकृतिमान, स्वास्थ्य महत्त्वाचें नाहीं काय? मूल विकृत शरीराचें निपजेल अशी धास्ती असल्यास वैद्यकीय शास्त्रांत गर्भपात करव-ण्याची कायदेशीर परवानगी आहे. स्त्री करीत असलेलें महत्त्वाचें कार्य, तिला नको असलेलें मातृपद आल्यामुळें बिघडूं लागलें तर तें उणें कार्य, व्यंग असलेल्या मुलाइतकेंच, अनिष्ट नाहीं काय? व तें तसें होऊं नये, म्हणून स्त्रीला त्या वेळीं मातृपद नाकारण्याचा हक्क कायद्यानें देणें सर्वांगीण हिताच्या दृष्टीनें इष्ट नाहीं काय?

याप्रमाणें स्त्रीला आपलें दुहेरी कर्तृत्व यशस्वी व सुलभ रीतीनें करतां यावें म्हणून तिच्या जीवनाच्या आराखड्यांत कुटुंबनियोजनाचें स्थान महत्त्वाचें

आहे, हें आपण पाहिलें. या कुटुंबनियोजनासाठीं सोपीं, स्वस्त व बिनधोक्याचीं साधनें स्त्रीपुरुषांना उपलब्ध करून देणें ही सर्वस्वी सरकारची जबाबदारी आहे. शस्त्रक्रिया सोपी व बिनधोक्याची असली तरी तो एक प्रकारचा आत्यंतिक स्वरूपाचा उपाय असल्यामुळें त्याचा आश्रय घेण्यास स्त्री-पुरुष जरा कचरतातच. यामुळें उपर्युक्त साधनें संशोधन व प्रयोग करून सरकारनें शोधलीं पाहिजेत व नंतर त्याचा प्रसार सरकारी व समाजकल्याणकारी संस्थांकरवीं प्रत्येक व्यक्ती-पर्यंत केला पाहिजे. जपाननें नाना उपायांनीं प्रजोत्पादनाचें दरवर्षीचें प्रमाण निम्म्यावर आणलें आहे. भारत सरकारनेंहि आपल्या देशस्थितीस व लोकांच्या स्वभावास अनुरूप असे उपाय योजून हेंच उद्दिष्ट गांठलें पाहिजे. नाहींतर सर्वतोपरी राष्ट्राचा तरणोपाय नाहीं.

* * *

प्रकरण १० वें

# उपसंहार

याप्रमाणें नऊ प्रकरणांत आधुनिक युगांतील स्त्री-जीवनाच्या नव्या क्षितिजांचा विचार केला. आधुनिक सुशिक्षित विवाहित स्त्रीचें जीवन, हें पूर्वीच्या स्त्रीच्या जीवनापेक्षां कसें जास्त कृतार्थ होईल व राष्ट्रहितास कसें पोषक होईल तें पाहिलें.

आधुनिक सुशिक्षित स्त्रीच्या आयुष्यांत झालेल्या या स्थित्यंतराकडे उदासीन दृष्टिकोणानें पहाणारे कांहीं निराशावादी, पण प्रामाणिक विचारांचे विरोधक आहेत. त्यांच्या मतें पहिल्या उत्साहाच्या भरांत स्त्री, पुरुषासारखें उच्च शिक्षण घेत गेली, नोकरी करूं लागली, भराभरा आपण पुष्कळच वाटचाल केली असा आभास तिनें उत्पन्न केला. समाजालाहि 'काय हो ही उन्नति!' म्हणून कौतुक वाटत गेलें. पण प्राथमिक उत्साहाची लाट ओसरल्यावर स्त्रियांनां व समाजालाहि असें आढळून आलें कीं, पाश्चात्त्य सुधारणेच्या देखाव्यानें हुरळून आपल्याकडल्या पहिल्या पिढीच्या सुधारकांनीं स्त्रियांनां जो मार्ग दाखवला व स्त्रिया भुरळून ज्या मार्गानें पळत सुटल्या तो मार्ग चुकीचा आहे. प्रथम, स्त्रियांची शिक्षणाची दिशाच चुकीची आहे; दुसरें, सहशिक्षण परिणामीं फार घातक ठरणारें आहे; तिसरें, स्त्रियांना उच्च शिक्षण देऊन कांहीं फायदा नाहीं, सांस्कृतिक शिक्षणाचा त्यांनां त्यांच्या दैनंदिन जीवनांत उपयोग होत नाहीं, व्यावसायिक शिक्षणाचा त्या वैवाहिक जीवनाशीं समन्वय करूं शकत

नाहींत; चौथें, स्त्रियांनीं घराबाहेर पडून नोकरी करणें अनिष्ट आहे. त्यामुळें संसाराचा बोजवारा उडतो, मुलांची हयगय होते, नवरा पोरका होतो; स्वतः स्त्रीच्या प्रकृतीवर वाईट परिणाम होतो. आधींच पुरुषासमान उच्च शिक्षण घेतल्यानें तिच्या प्रकृतीवर फाजील ताण पडलेला असतो; त्यामुळें विवाहानंतर गर्भधारणा, अपत्यसंगोपन यांच्या भारानें तिची प्रकृति ढांसळते. त्यांत नोकरीमुळें दुप्पट ओझें स्त्रीवर पडल्यास ती शरीरानें, मनानें खंगत जाते. या सर्व आक्षेपांचा यथाशक्ति समाचार पहिल्या नऊ प्रकरणांत घेतला आहेच. शेवटच्या एका आक्षेपाचा या शेवटच्या प्रकरणांत विचार करून पूर्णविराम द्यावयाचा आहे. तो आक्षेप असा कीं, "एवढी सर्व धडपड करून शेवटीं स्त्री सुखी झाली आहे काय? तिला हवें असलेलें स्वातंत्र्य, स्वयंसिद्धता, स्वायत्तता प्राप्त झाली आहे काय?" निराशावादी विरोधक या प्रश्नाला नकारात्मक उत्तर देऊन मोकळे होतात.

आधुनिक स्त्रीजीवनाबद्दलचे हे नाना आक्षेप ऐकून क्षणभर मन गोंधळून गेलें, खिन्न झालें तरी मग एक प्रकारच्या आनंदानें व अभिमानानें भरून जातें. आधुनिक सुशिक्षित स्त्री ही आज समाजांत निश्चितच खळबळ उडवून देत आहे. ही प्रगति तरी काय थोडी आहे? मध्ययुगीन स्त्री म्हणजे लक्षांत न येण्याजोगी, लक्षांत न घेण्याजोगी एक कळसूत्री बाहुली होती. दिसायची पण डोळ्यांवर यायची नाहीं. "children should be seen, not heard" असें मुलांबद्दल व्हिक्टोरिया राणीच्या राज्यांत इंग्लंडमध्यें म्हणत. 'मुलांनीं फक्त गोजिरवाणें दिसावें. पण त्यांनीं ब्र सुद्धां उच्चारूं नये व मोठ्या माणसांची शांति भंगूं नये.' स्त्रियांच्या बाबतींत, भारतांत, हीच अवस्था होती. पण आज ही बाहुली स्वतंत्रानें हालूंबोलूं लागली आहे. तिला मागच्या रांगेंत ठरवून दिलेलें स्थान सोडून ती पुढें घुसूं पहात आहे. पुरुषांशेजारीं तिला जागा हवी आहे. त्यामुळें समाजांत कित्येकांस तिची अडचण वाटूं लागली आहे. तर कित्येकांस ती अशी पुढें घुसल्यामुळें स्वतःस संकटांत व अडचणींत पाडून घेत आहे म्हणून काळजी वाटत आहे. मागच्या रांगेंतलें शांत, सुरक्षित, संथ जीवन सोडून पुढें घुसल्यामुळें ती आपल्या सुखास, स्वास्थ्यास सुरुंग लावीत आहे. तिची स्वतंत्र होण्याची धडपड फुकट आहे. हातपाय बांधलेला माणूस सुटण्यासाठीं धडपड करूं लागला तर त्याला बांधून टाकलेल्या दोरीच्या गांठी

जास्त घट्ट होत जातात व तो जास्तच जखडला जातो. स्वतंत्र होण्यासाठीं चाललेली स्त्रीची धडपड तिच्या पायांतल्या बेड्या जास्त जड करीत आहे; तिला जास्त बंधनांत गोवीत आहे. पूर्वी ती वाटल्यास ' गुलाम ' म्हणा, होती; पण आपल्याच माणसांची, सासरच्या मंडळींची, नवऱ्याची, मुलांची गुलाम होती. आतां नोकरीमुळें ती घराबाहेरल्या परक्यांची पण ' गुलाम ' झाली आहे. सोनेरी बेडीच्या जोडीला रुपेरी बेडीची भर पडली आहे. घराच्या सांवलींत निवांत, थंड बसावयाचें सोडून नोकरी-प्रीत्यर्थ उन्हा-पावसांत रखडणाऱ्या स्त्रियांकडे पुरुष नवलानें पहातात. " आम्हांला कुणी असें घरबसल्या आयतें जेऊं घातलें असतें तर घराचा उंबरठा ओलांडण्याचें आम्ही स्वप्नांत सुद्धां मनांत आणलें नसतें. " असें पुरुष म्हणतात. एकंदरीनें स्त्रीजीवनाच्या नवीन अवतारामुळें समाजांत जोराचीं वैचारिक आंदोलनें सुरू झालीं आहेत यांत शंका नाहीं. मध्यंतरींच्या कालांत ' जडमूढ ' ( static ) झालेली स्त्री आतां वेगवती क्रियाशील (dynamic) झाली आहे. शिळेची अहिल्या झाली आहे. स्त्रियांनीं प्रगतिपथावरचा हा एक मोठा टप्पा गांठला आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. असो.

" आजची स्त्री सुखी आहे का ? " या प्रश्नाला उत्तर देतांनां, दुसरे अनेक प्रश्न, सॉक्रेटिशी पद्धतीनें उपस्थित करावे लागतील. प्रथम सुख म्हणजे काय ? निर्भेळ सुख असूं शकतें का ? असें निर्भेळ सुख आज आमच्या पुरुषवर्गाला तरी मिळालें आहे का ? ' सुखप्राप्ति ' हेंच मानवजीविताचें अंतिम ध्येय आहे का ?

" सुख म्हणजे काय ? " या प्रश्नाला अनेक तऱ्हांनीं उत्तरें दिलीं जातात. सुख म्हणजे समाधान, संतोष अशी व्याख्या पुष्कळजण करतात. पण हें सुख वा समाधान अर्थातच सापेक्ष असतें. प्रत्येकाची सुखाची कल्पना निराळी असते. दाराशीं वाहन अजिबात नसलेल्यांना, मोटर ठेवणें म्हणजे सुख वाटेल; पण घरांतील प्रत्येक माणूस ' कामाचा ' असल्यास, घरांत एकच मोटार असणें दुःखास कारण होईल. दोनतीन मोटारी—एक घरधन्याला ऑफिससाठीं, दुसरी गृहिणीला भेटीगांठी–खरेदीसाठीं, तिसरी मुलांना शाळा-कॉलेजांसाठीं— असल्याशिवाय त्या घरांत सुख नांदणार नाहीं. पण सुख म्हणजे समाधान, तृप्ति, अशी व्याख्या केली तर सुख हें प्रगतीस विघातक

आहे असें म्हणावें लागेल; कारण divine discontent, 'उच्च पातळीवरचें असमाधान' हा प्रगतीचा मूलमंत्र आहे. जीवनामध्यें 'हुश्श' करून जो सुखासमाधानानें 'बसेल' तो जीवनांतून कायमचा 'उठेल' कारण त्याला पुढें कांहीं करावें अशी इच्छाच उरणार नाहीं; आणि प्रगतीचें चिन्ह म्हणजे आणखी कांहींतरी साध्य करण्याची, आपल्या क्षेत्रांत आणखी दोनचार पावलें पुढें टाकण्याची इच्छा व तळमळ असणें हें होय.

सुखाच्या कल्पनेचें याप्रमाणें विश्लेषण केल्यावर मग प्रश्न करूंया कीं, "आमच्या स्त्रियांना काय पाहिजे ? हें 'सुख' का 'प्रगति' ? सुख काय— अठराव्या शतकांतली स्त्रीसुद्धां एक प्रकारें 'सुखी' होती. तिच्या अज्ञानांतच तिचें सुख सामावलेलें होतें. चार सुना हाताखालीं आल्या, लेकी सुखासमाधानानें आपापल्या सासरीं नांदूं लागल्या, दहाबारा नातवंडें आवतीभंवतीं खेळूं लागून, घराचें 'गोकुळ' झालें कीं तिचा जीवनचषक कांठोकांठ आनंदानें, सुखानें भरून जाई. मग पतीच्या मांडीवर डोकें ठेवून जीवितयात्रा संपविण्यास ती केव्हांहि संतोषानें तयार असे. पण स्त्रीच्या त्या सुखामध्यें व्यक्तिमत्त्वाच्या उत्कर्षाचा किती भाग होता ? स्वतंत्र कर्तृत्वाच्या जाणिवेचें समाधान कितपत होतें ? मग त्या अज्ञानी सुखांत काय तात्पर्य आहे ?

सारांश, प्रगतीला मर्यादा नाहीं, तशीच सुखालाहि नाहीं. आत्यंतिक सुख हें आत्यंतिक प्रगतीप्रमाणेंच अस्तित्वांतच आढळणार नाहीं—निदान या जगांत तरी सांपडणार नाहीं. प्रगतीचा ध्यास लागलेल्या मनाची धांव नेहमीं पुढेंच असते. ध्येयामागें दौडत असतांनां मनुष्य पुष्कळ वेळां खांचखळग्यांत अडखळतो, जायबंदी होतो व म्हणून दुःखीकष्टी होतो; पण या दुःखाकष्टाला भिऊन तो ध्येयाच्या मार्गांतून बाजूला होईल, एखाद्या सावलीच्या कोंपऱ्यांत विसावेल तर त्याला तात्पुरता आराम वाटला तरी ध्येयप्राप्तीच्या प्रयत्नांच्या आनंदाला तो कायमचा मुकेल. ध्येयप्राप्तीच्या मार्गावर ठेंचाळत पण नेटानें चालत राहणें यांत दुःखकष्ट असले तरी त्या दुःखांतच जीविताचें सार्थक आहे. वामन मल्हार जोशी यांनीं आपल्या "इंदु काळे व सरला भोळे" या पत्रमय कादंबरींत हेंच सूत्र गोंवलें आहे कीं, "ध्येयें तेवढीं दुःखें"; ज्याला कांहीं ध्येय नसतें, त्याला आंतरिक तळमळ नसते, म्हणून तो 'सुखी' असतो. पण तें निर्जीव सुख म्हणजे आत्मा नसलेलें स्वस्थ, सुस्त कलेवरच होय. त्या सुखाची

त्या व्यक्तीच्या आत्मोन्नतीच्या, राष्ट्राच्या प्रगतीच्या लेखीं काय किंमत आहे ? जो ध्येयामागें धांवेल तो व्यक्तींनां, समाजाला, राष्ट्राला, प्रगतीपथावर एक तसूभर तरी खात्रीनें पुढें घेऊन जाईल. म्हणून, आजची स्त्री तिच्या त्रिविध कार्यव्याप्तीमुळें दुःखीकष्टी भासली, तरी तें दुःख ज्ञानी, ध्येयवादित्वाचें आहे. आतां स्त्रियांनां अज्ञानाचें, कर्तृत्वशून्य, चैतन्यहीन तथाकथित सुख नकोच आहे. पुष्कळ शतकें तें भोगून झालें. आतां तें जीर्ण, चावून चोथा झालेलें पान उलटायचें आहे; नवीन धडा वाचायचा आहे, तेच ते पाढे पुष्कळ झाले. आतां चुकतमाकत कां होईना, धडपडत, पडतझडत कां होईना, आत्मोन्नतीच्या मार्गावर हिमतीनें पुढें सरकावयाचें आहे. कुन्तीनें श्रीकृष्णापाशीं दुःखच मागितलें होतें ना ? दुःखांत परमेश्वराचें स्मरण रहातें, प्रयत्नदेवाची पूजा घडते, आत्मसंतुष्टतेचें शैथिल्य हटतें, हें तिनें ओळखलें होतें. टीचभर स्वार्थसाधनेच्या तुकड्यांतलें सुख का जीवनानंद मानायचें ? पोटोबा काय, उत्क्रांतीच्या प्राथमिक टप्प्यांतील जीवजीवाणु सुद्धां, तृप्त करून 'सुखी' होतात. त्यापुढची 'विठोबाला', ध्येयाला गांठण्याची पायरी जो चढेल तोच धन्य, मानव या बिरुदाला पात्र. बायबलमधल्या गोष्टीप्रमाणें, ईव्हला आतां ज्ञानवृक्षाचें फळ चाखायचें आहे; व त्याच्या पोटीं काय दुःखें भरलीं आहेत, तें अनुभवायचें आहे. चार भिंतींच्या आंतला—मग त्या सोन्याच्या भिंती कां असत ना—बंदिस्त स्वर्ग सोडून तिला सर्वसामान्य भावनांचें जग पाहावयाचें आहे, त्यांत मिसळायचें आहे, त्याच्या उद्धारासाठीं झटायचें आहे. ज्ञानानें, शिक्षणानें स्त्रीच्या भोंवतालच्या भिंती धडाधडा कोसळल्या असून, तिला पलीकडचें जग दिसूं लागलें आहे. तिचें सरळ, सपाट जीवन, त्रिमितियुक्त झालें आहे. टेनिसनच्या कवितेंतील शॅलॉटच्या सरदारणीप्रमाणें, खिडक्यांकडे पाठ करून, घराच्या आरशांत जगाचें नुसतें प्रतिबिंब पहाण्यांत तिला आतां समाधान नाहीं; ज्ञानचक्षू उघडून बाहेरच्या जीवनाकडे टाकलेल्या पहिल्या कटाक्षाबरोबरच, तिनें आपल्याभोंवतीं विणलेल्या अवास्तव स्वप्निल जीवनजालाचे धागे तटातट तुटून, तिचा पाय घरांत ठरेनासा झाला आहे. विशाल जीवनाच्या वाहत्या प्रवाहांत तिनें आपली जीवननौका लोटली आहे. घराबाहेरच्या झंझावातांत, संवय नसल्यामुळें ती प्रथम कांकडेल, तिची नौका डगमगेल; मार्ग सरावाचा नसल्यामुळें ती बावरेल, चांचपडेल, क्वचित्

दिशाभुलीनें भलतीकडे जाईल. पण या धकाधकीच्या, कष्टी जीवनांतच तिला खरोखरी 'जगल्याचा' आनंद प्राप्त होईल. जरी ध्येयापर्यंत पहिल्या पिढींतच स्त्री पोंचली नाहीं, तिच्या पदरीं क्वचित् निराशा, वैफल्य आलें, भोंवतालच्या लोकानीं मग "बघ, तरी आम्ही सांगत होतों; चार भिंतींच्या आंत बसून राहिली असतीस तर या हालअपेष्टांतून बचावली असतीस, सुखी झाली असतीस" असा गलका केला तरी तिनें धीर सोडतां कामा नये. ध्येयप्राप्तीसाठीं सोसलेल्या हालअपेष्टांनीं त्या ध्येयाचें नैतिक तेज व ध्येयपूजकांचें नैतिक बळ वाढतें ही खूणगांठ मनाशीं पक्की बांधली म्हणजे आजच्या स्त्रीला आजच्या दुःखांतच, उद्यांच्या स्त्रीला लाभणाऱ्या कृतकृत्यतेचा आनंद लाभेल.

सारांश, "आजची स्त्री सुखी आहे का?" असा प्रश्न उपस्थित करणें भ्रममूलक आहे, बुद्धिभेदास कारणीभूत होणारें आहे; 'प्रकाशाचें प्रखर दर्शन टाळण्यासाठीं भुईंत मुंडी खुपसावी' असा ऱ्हस्व दृष्टि, शहामृगी उपदेश करणें आहे. 'सुखदुःखे समेकृत्वा' ध्येयाच्या ध्रुवताऱ्यावर लक्ष ठेवून मनाच्या निर्धारानें पाऊल पुढें टाकणें यांतच स्त्रीचें अंतिम हित आहे.

आणखी एका शंकेचा विचार करून ही "संशयरत्नमाला" पुरी करूं. कांहीं विद्वानांनीं एकदां असा प्रश्न उपस्थित केला होता कीं, एवढा स्त्रीशिक्षणाचा आटापिटा करून, स्त्रीचें आर्थिक स्वातंत्र्य सिद्ध करून शेवटीं स्त्रियांच्या पदरांत काय पडलें? त्या खऱ्या अर्थानें स्वतंत्र झाल्या का? स्वयंसिद्धपणें त्या आपल्या जीविताचें सार्थक करण्यास समर्थ झाल्या आहेत का? या विद्वानांच्या मतें, शेवटीं स्त्री परावलंबी ती परावलंबीच. स्वतःच्या सुखासाठीं ती नेहमींच दुसऱ्यांवर, पतिपुत्रांवर, अवलंबून राहाणार, तिच्या जीवनांत स्वायत्तत्ता खऱ्या अर्थानें कधींच येणार नाहीं. मग एवढा खटाटोप कशाला?

या आक्षेपांला उत्तर दोन तऱ्हांनीं देतां येईल. प्रथम, तसेंच पाहूं गेलें तर पुरुष तरी कुठें स्वायत्त आहे? त्याचेही पुरुषार्थ स्त्रीच्या सहकार्यानें–किंवा सहकार्य सनातनी मतास कबूल नसल्यास, निदान साहचर्यानेंच सिद्ध होतात ना? पार्वती परमेश्वर सुद्धां 'वागर्थाविव' संपृक्त असतात. सृष्टि निर्माण करणाऱ्या शक्तीनें स्त्री व पुरुष एकमेकांना पूरक अशींच निर्माण केलीं आहेत. "स्त्रीचें पुरुषाशिवाय अडतें" असा दावा असेल तर चोख प्रत्युत्तर आहे 'पुरुषाचेंहि स्त्रीशिवाय चालत नाहीं."

पण तरीहि "पुरुष हा केव्हांहि स्वयंपूर्ण असतो व स्त्री तशी केव्हांहि होऊं शकणार नाहीं." असा तर्कविरुद्ध हट्टच कुणी घेऊन बसलें तर त्याला तसेंच आग्रही, किंचित् अततायी उत्तर देतां येईल. फ्रॉइडच्या मताप्रमाणें 'कामभावना' ही मनुष्याच्या जीविताचें मुख्य सूत्र आहे. त्याच्यांत गुंतागुंत झाली तर मनुष्याचें आयुष्य विफल होतें; विकृत होतें, निश्चित वेळीं ही कामभावना पुरुषाच्या मनांत जागृत होते (फ्रॉइड तर म्हणतो एक दिवसाच्या तान्ह्या मुलांतसुद्धां ही भावना असते. पण हें मत कांहींसें आत्यंतिक वाटतें); तिचें योग्य मार्गानें समाधान झालें तरच पुरुषाचा संसार सुरळित सुरू होतो. स्त्रीचें स्थान साहजिकच त्याच्या जीवनांत निकडीचें ठरतें. ही कामभावना दबली किंवा संयत केली तर पुरुषाच्या मनांत विकृति निर्माण होतात. अर्थात् प्रत्येक भावना ( instinct ) ऊर्ध्वगामी ( sublimate ) प्रयत्नानें करतां येते. आग्रहाचा सत्याग्रह करतां येतो; अभिमानाचा स्वाभिमान होऊं शकतो. व क्रोधाचा, 'सात्त्विक संताप' ( righteous indignation ) म्हणून दुरिताचें तिमिर निपटण्यास उपयोग होतो. कामभावनेचें उदात्तीकरण करण्याचे दोन मार्ग, बौद्धिक व भावनैक. एखाद्या शास्त्रीय विषयाला किंवा कलेला सर्व बौद्धिक शक्ति केंद्रित करून माणसानें वाहून घेतलें तर त्याच्या कामभावनेचें उदात्तीकरण होऊन, त्याच्यांत मानसिक विकृति संभवणार नाहींत; पण असें करण्याला असामान्य बुद्धिवैभव व दैवी प्रतिभा लागते. अशा देणग्या कितीशा पुरुषांजवळ असणार? तेव्हां सर्वसामान्य पुरुष कामभावनेच्या अधीन असतो व स्वयंसिद्ध जीवन जगूं शकत नाहीं.

कामभावनेचें भावनैक उदात्तीकरणही होऊं शकतें. एखाद्या व्यक्तीवर किंवा ध्येयावर सकल भावना केंद्रित होऊं शकल्या तर कामभावनेचें उच्चाटन मनांतून होऊं शकेल. पण पुरुषाच्या बाबतींत येथेंहि असाधारण व्यक्तिमत्त्वाची जरुरी आहे. हजारांत एखादा पुरुष देशावर, समाजांतील दीनदुबळ्यांवर, शापित रुग्णांवर आपल्या सर्व भावना केंद्रित करून, त्याच्या ध्येयांवर जीवापाड प्रेम करून आपल्या भावनेचें उदात्तीकरण करूं शकेल. येऱ्यागबाळांकडून हें काम होणार नाहीं. पण स्त्रियांच्या बाबतींत मात्र कामभावनेचें उदात्तीकरण वात्सल्याच्या भावनेंत सहज होऊं शकतें. असें झालें नसतें तर पूर्वीच्या सर्वच बालविधवा विकृत मनाच्या बनल्या असत्या. वैवाहिक जीवनाला व मातृपदाला

मुकलेल्या या स्त्रिया दीरानणंदांच्या, भावाबहिणींच्या मुलांवर आपल्या वात्सल्याचा वर्षाव करून चित्तशांति मिळवीत. अशा मुलांच्या अभावीं त्या "लंगड्या" बाळकृष्णाचें पोटच्या पोरासारखें पूजेंत कोडकौतुक करीत. काकड आरतीच्या वेळीं बाळकृष्णाला किंवा विठोबाला सायसाखर, लोणी-साखर देणें, त्याला पंचामृतानें न्हाऊं माखूं घालणें, पूजेंतल्या देवांनां अंगडींटोपडीं शिवणें, त्यांना शेजारती म्हणून झोंपवणें—वगैरे धार्मिक म्हणवून घेणाऱ्या विधींनीं स्त्रिया आपल्या हृदयांतली आसक्तीच शमवीत असतात. देवपूजेला न लागलेल्या स्त्रिया कुत्रे, मांजरें, पोपट यांवर वात्सल्याचा वर्षाव करतात. सानेगुरुजींनीं आपल्या एका बालपणीं विधवा झालेल्या आतेचें वर्णन केलें आहे. तिचें आपल्या वासरावरच मुलासारखें प्रेम होतें. "किती समजतें पण त्याला. मी हांक मारल्यावर मान फिरवलीन् पण" असें ती त्याचें कौतुक करी.

कामभावनेचें उदात्तीकरण होऊन उत्पन्न झालेली ही वात्सल्यबुद्धि, संरक्षणक्षम (protective) अशी फार मोठी शक्ति आहे. त्यागबुद्धि, आत्मसमर्पणवृत्ति ही स्त्रियांच्या अंगीं युगानुयुगें मुरलेली असल्यामुळें, सर्वस्वाचा होम करून स्त्रिया, आपल्या वात्सल्याचा विषय बनलेल्या व्यक्तीभोंवतीं संरक्षणाचे कोट उभारतात. एका बहादूर मातेनें, आपलें अजगरानें गिळलेलें मूल, त्वरित त्याचा जबडा फाडून, त्याला उभा चिरून, त्याच्या पोटांतून जीवंत उचलून घेतल्याची गोष्ट पुष्कळांनीं ऐकली आहे. (प्राणिसृष्टींत सुद्धां, वांसराला वांचवण्यासाठीं गाय वाघावर शिंगें रोखून झडप घालते म्हणतात.) स्त्रीच्या अंगीं उत्पन्न होऊं शकणाऱ्या या संरक्षक शक्तीमुळेंच परमेश्वराला सुद्धां त्याचे भक्त "जगज्जननी" म्हणून आळवतात. आपल्या संतमंडळींची "विठाई," श्रीरामकृष्ण परमहंस यांची "मा" व श्रीअरविंदांची "माता" – ही परमेश्वराला मातृरूपानें आळवण्याची पद्धति सर्वश्रुतच आहे. एकंदरीनें, स्त्री ही पुरुषापेक्षां जास्त प्रमाणांत सर्वस्वीं स्वयंपूर्ण होऊं शकते. ती स्वतःच्या सुखासाठीं दुसऱ्यावर अवलंबून रहात नाहीं – तर उलट स्वतःचें सुख होमून दुसऱ्यांच्या सुखाची काळजी वहाते. मध्यंतरींच्या स्त्रियांच्या "शबल युगांत" सुद्धां, एक आर्थिक बाजू सोडली तर स्त्री पुरुषापेक्षां स्वयंपूर्ण होती. दुर्दैवानें घरांतली स्त्री मृत झाली तर घरदार पोरकें होतें. नवरा-मुलें उघडीं पडतात.

पुरुष गेला तर आर्थिक तंगी जाणवते; पण पोराबाळांची हेळसांड होऊन तीं सैरावैरा होत नाहींत. आतां तर स्त्री अर्थार्जनक्षम व घराबाहेरील व्यवहारांत निपुण व अभ्यस्त झाल्यामुळें ती पूर्णांशानें स्वायत्त झाली आहे असें निःसंशय म्हणतां येईल. एखाद्या पुरुषास परगांवीं नोकरीच्या निमित्तानें एकटें रहावें लागलें तर त्याचे हाल होतात व शेजाऱ्या-पाजाऱ्यांच्या अनुकंपेचा तो विषय बनतो. आधुनिक स्त्री मात्र, एकटी असली, तरी अशी अगतिक होत नाहीं. पुरुष नुसतें अर्थार्जनाचें काम करतांकरतांच टेकीस येतो. स्त्री नोकरी, संसार, व समाजसेवा ही तिहेरी, तिपेडी वेणी प्रयत्नानें गुंफूं शकते. तेव्हां, उच्चविद्या-विभूषित आधुनिक स्त्री ही संपूर्ण स्वायत्त व स्वतंत्र झाली आहे हें सिद्ध होत नाहीं काय ?

मात्र ही विविध कार्यांची जबाबदारी स्त्रियांच्या हातून समर्थपणें पार पडण्यासाठीं एका गोष्टीची अत्यंत जरूर आहे. ती गोष्ट म्हणजे श्रद्धा.

मानवाच्या जीवनामध्यें श्रद्धेचें स्थान फार महत्त्वाचें आहे. ‘ श्रद्धेनें पर्वत हालवतां येतील ’ अशी म्हण आहे. केवळ श्रद्धेनें असाध्य आजार बरे झाल्याचीं उदाहरणें आहेत. मानसोपचार, faith cure, यांचीं उदाहरणें पाश्चात्त्य देशांतूनसुद्धां आढळतात. Lourdes येथल्या पवित्र पाण्यानें असाध्य रोग बरे झाल्याची खात्री निष्णात डॉक्टरांनांसुद्धां पटली आहे. हा चमत्कार श्रद्धेनेंच घडून येतो यांत शंका नाहीं. भारतांत तरुण पिढींतून या श्रद्धेचें उच्चाटन झाल्याची ओरड सर्व क्षेत्रांतून ऐकूं येते. ही तक्रार बेशिस्त विद्यार्थ्यां-विरुद्ध विशेष ऐकूं येते. पूर्वीच्या काळीं घरांत नवीन सासुरवाशीण आली, म्हणजे कांहीं कुठें घरकामांत चुकलें कीं तिच्यावर टेपर ठेवीत; किंवा घरांत एखादा भाबडा नोकर असला कीं सगळ्या गोंधळाचें खापर त्याच्याच डोक्या-वर जसें फोडण्यांत येतें—त्याचप्रमाणें बिचारे विद्यार्थी सगळयांच्या टीकेचें सध्यां लक्ष्य झाले आहेत. विद्यार्थी cynical, अश्रद्ध झाले आहेत व म्हणून, त्यांना गुरुजनांबद्दल, विश्वविद्यालयमाऊलीबद्दल, किंबहुना प्रत्यक्ष विद्यादेवी-बद्दलसुद्धां सुतराम् आदर वाटत नाहीं, असें जळजळीत शरसंधान विद्यार्थ्यांवर सतत रोखलेलें दिसतें. पण मला वाटतें या अश्रद्धत्वाच्या आरोपांतून टीका-कारांनांहि आपली सोडवणूक करून घेतां येणार नाहीं. फार फार तर, या दोषांबद्दल परिस्थितीला जबाबदार धरून मोकळें होतां येईल एवढेंच.

सध्या आपलें राष्ट्र, व विशेषतः तरुण पिढी मोठ्या चमत्कारिक काळाच्या टप्प्यांत उभी आहे. इंग्रजी अमलापूर्वीं समाजाची व जनतेची धर्मावर श्रद्धा होती. धर्मशास्त्राच्या आज्ञा, धर्मानें व परंपरेनें आंखून दिलेली आचारसंहिता कांटेकोरपणें पाळण्याची निष्ठा आढळून येत होती. देवकार्य व धर्मकार्य याबद्दल आस्था, वडील माणसांबद्दल चिकित्सारहित आदर, पूर्वजांच्या विभूतिमत्त्वावर विश्वास हा सर्वसाधारण लोकसमूहाचा स्थायीभाव होता. ती एक प्रकारची शिस्त समाजजीवनाला व व्यक्तिजीवनाला होती. आठव्या वर्षी मुंज झाली की संध्या, सूर्यनमस्कार, गृहस्थाश्रमाला विहित तें हव्यकव्य, पूजापाठ, व्रतवैकल्यें, यांनीं आयुष्य नियमबद्ध होतें. स्त्रियांच्या जीवनाला तर ही शिस्त विशेष होती व ती त्या विशेष श्रद्धेनें व कसोशीनें मानीत. त्यामुळें त्यांच्या मनाला शांति, समाधान, स्वास्थ्य पण लाभत होतें.

इंग्लिश अमलानंतर, इंग्लिश भाषेंतील ग्रंथांच्या वाचनानें— स्पेन्सर, मिल् वगैरे बुद्धिवाद्यांच्या विचारप्रणालीनें—तत्कालीन तरुण पिढीची जुन्या धर्मावरील व विशेषतः कर्मकांडावरील श्रद्धा उडत चालली. आपला सनातन धर्म बुरसून गेला आहे, वठून जात आहे; त्यावर नव्या विचारांचें कलम केलें पाहिजे. निर्जीव, वाळलेल्या खांद्या, अंधश्रद्धा मोडून काढल्या पाहिजेत. वेडगळ—कालांतरामुळें त्यांतील स्वारस्य व औचित्य नष्ट झाल्यामुळें निश्चित वेडगळ भासणाऱ्या रूढि टाकून दिल्या पाहिजेत – अशी विचारसरणी तरुण पिढींत जोरानें प्रसृत होऊं लागली. त्या वेळच्या हिंदु समाजांत वेडगळ रूढींचें प्राबल्य फार माजलें होतें खरेंच. बालविवाह, बालविधवांची दुःस्थिति, स्त्रीशिक्षणाबद्दलची दहशत, परदेशगमनाबद्दल आक्षेप, स्पृश्यास्पृश्य विचार, जातिजातींतील वैमनस्य–या समाजाला लागलेल्या भुंग्यांचें उच्चाटन करण्यासाठीं तरुण पिढीनें कंबर कसली. ही प्रगतिप्रियता, डोळसपणा, बुद्धिप्रामाण्य, एवंविशिष्ट क्रांतीनें राष्ट्राचा उद्धार करण्याची प्रखर महत्त्वाकांक्षा – हीं त्या पिढीचीं श्रद्धास्थानें बनलीं. म्हणून धर्मश्रद्धा गेली तरी तत्कालीन तरुण पिढी अश्रद्ध व म्हणून निष्क्रिय, निष्प्रभ झाली नाहीं. स्वदेशप्रीति, समाज सुधारणा हीच नवीन श्रद्धा, नवीन युगधर्म बनली. जसजशा स्त्रिया शिकूं लागल्या तसतसें, अर्थात् कमी प्रमाणांत, स्त्रियांच्या मनांतूनहि केवळ अंधश्रद्धेचें ठाण उठलें व त्याची जागा उपरोक्त श्रद्धांनीं घेतली. या श्रद्धांच्या अधिष्ठानामुळें

स्त्रियांच्या जीवनाला एक नवा आशय आला, आगळें तेज चढलें; कर्तृत्वाच्या चैतन्यानें त्यांचें जीवन रसरशीत होऊं लागलें. महात्मा गांधींच्या नेतृत्वाखालीं देशांत स्वातंत्र्यप्राप्तीच्या चळवळीची लाट अगदीं खालच्या थरापर्यंत व विशेषतः स्त्रियांपर्यंत पोंचली. स्वराज्यप्राप्तीपर्यंतचा तो पंचवीस वर्षांचा काळ देशभक्तीच्या श्रद्धेनें तळपत होता. पण १९४७ सालीं स्वातंत्र्य प्राप्त झाल्यावर एक प्रकारची "जितं मया" म्हणून आत्मसंतुष्टतेची व तद्भव निष्क्रियतेची सुस्ती सर्वत्रांवर आली. स्त्रियांच्या काय किंवा पुरुषांच्या काय जीवनाला जणुं बूडच राहिलें नाहीं. स्वातंत्र्यापूर्वींच्या सर्वसामान्य जनतेच्या स्वास्थ्य समृद्धीच्या अपेक्षा त्वरित पुऱ्या होत नाहींशा पाहून सर्व देशभर वैफल्याचे, नितांत अश्रद्धेचे वारे वाहूं लागले.

स्त्रियांच्या जीवनांत शिरलेल्या अश्रद्धेचा व निष्क्रियतेचा प्रस्तुत विषयाच्या संदर्भांत विशेष विचार करावयाचा आहे. मध्ययुगीन काळांत, एकत्र कुटुंब-पद्धतींत स्त्रियांच्या जीवनांत नाना श्रद्धा व तद्विषयक नाना कर्तव्यें होतीं. देव-धर्म, व्रतवैकल्यें, श्राद्धपक्ष, लग्नमुंजी, कुलाचारपालन, वडिलांचा मान राखणें, त्यांच्यापासून जुन्या गोष्टी शिकून घेणें व त्या स्वतःच्या आचाराविचारांत बिंबविणें या श्रद्धांच्या भक्कम बैठकीवर स्त्रियांचें आयुष्य स्थिर व क्रियाशील होतें. नंतर बदलत्या युगांत आपण मागें पडल्याची जाणीव झाल्यावर शिक्षण घेणें, आपलें ज्ञान वाढवणें, सामाजिक बदलांचा अर्थ समजावून घेऊन, सामाजिक सुधारणांशीं समरस होण्यास झगडणें या नव्या श्रद्धा स्त्रीजीवनांत आल्या व त्यामुळें त्यांचें जीवन गतिमान् राहिलें. पण आज शहरांतील, मध्यमवर्गीय स्त्रियांच्या जीवनांत एक प्रकारची वैचारिक पोकळी उद्‌भवली आहे व त्यामुळें त्यांचें जीवन निस्तेज, अर्थहीन व चैतन्यहीन होत चाललें आहे. आज शहरांत मुलींनां सर्व पातळींवर उच्च शिक्षणापर्यंत शिक्षण मिळत आहे. लग्न झाल्यावर राजाराणीचा संसार स्वतंत्र थाटला जात आहे व मग स्त्री निष्क्रिय बनून राहात आहे. देशाला स्वराज्य मिळून चुकलें, व्यक्तीचा उत्कर्ष व्हावयाचा तेवढा होऊन गेला तेव्हां आतां मिळवण्याजोगें कांहीं राहिलें नाहीं. अशी आत्मसंतुष्ट वृत्ति स्त्रियांमध्यें येत आहे. मग जी एखादी स्त्री समाजसेवे-साठीं कांहीं धडपड करील तिला हसण्याकडे, निष्कारण उरस्फोड—कदाचित् प्रसिद्धीच्या हावेनें करीत आहे, म्हणून तिला नांवें ठेवण्याकडे स्त्रियांची

प्रवृत्ति होत आहे. साहजिकच या स्त्रियांना, संसार आटोपशीर बनल्यामुळें, वेळ काढण्यासाठीं नवनवीं कलाकुसरीचीं कामें शोधून काढण्याखेरीज कांहीं करायजोगें असें शिल्लक राहात नाहीं. चिंध्यांपासून तो शंखशिंपांपर्यंत नाना वस्तूंच्या बाहुल्या बनवणें, सिगारेटच्या पाकिटांपासून तों नायलॉनच्या धाग्यापर्यंत हरतऱ्हेच्या परड्या, टोपल्या, मंजूषा गुंफणें, फिरत्या वाचनालयांतील बहुशः रटाळ असलेलीं मासिकें वाचणें, प्रत्येक नवीन हिंदी सिनेमा साक्षेपानें विशेष राजी नसलेल्या नवऱ्याला आग्रहानें घराबाहेर काढून पहाणें, अशा गोष्टींखेरीज जास्त उपयुक्त असें कार्य कांहीं असेल ही श्रद्धाच स्त्रियांच्या मनांतून नाहींशी झाली आहे.

ही असंतुष्ट व अश्रद्ध वृत्ति स्त्रियांनीं आपल्या जीवनांतून काढून टाकली पाहिजे. प्रगतीच्या मार्गातील ती एक मोठी धोंड आहे. आपण ' पूर्ण ' झालों, सर्वस्वीं शहाणे झालों असें ज्याला वाटतें, त्याची पुढें आणखी कांहीं सुधारणा होण्याची शक्यताच नाहीं. साक्रेटिसच्या ग्रामदेवतेनें कौल दिला कीं, " साक्रेटिस सर्व नागरिकांपेक्षां शहाणा आहे. " तेव्हां साक्रेटिस बुचकळ्यांत पडला. कारण ज्ञान्याला साजेशी व ज्ञात्यांतच संभवणारी लीनता त्याच्यांत होती. पण विचारांनीं त्यानें ग्रामदेवतेच्या कौलांतील गूढार्थ ओळखला. " आपल्या अज्ञानाची जाणीव असणें, हेंच शहाणपण – कारण अधिक शहाणपणा मिळवण्याची ती प्रथम पायरी आहे. हें आपल्या अज्ञानाच्या जाणीवेचें शहाणपण इतरांच्यांत नव्हतें – त्यांचे भावी अधिक शहाणे होण्याची शक्यता नव्हती – म्हणून साक्रेटिस इतरांपेक्षां शहाणा.

स्त्रियांनीं या गोष्टीचें तात्पर्य लक्षांत घेतलें पाहिजे. उच्चशिक्षण घेतलें म्हणजे पूर्णपदाला पोंचलों असें न मानतां प्राप्त झालेले ज्ञानचक्षू चांगले उघडे ठेऊन, चोहींकडे पाहिलें तर त्यांच्या लक्षांत येईल कीं, अजून कितीतरी साध्य व्हावयाचें राहिलें आहे. तें साध्य, ध्येय ठेऊन, त्या ध्येयावर श्रद्धा ठेऊन, स्त्रियांनीं प्रयत्नानें, आतांपर्यंत वर्णन केलेली त्रिविध कामगिरी – आत्मोन्नति, संसार, समाज व राष्ट्रसेवा – पार पाडून स्त्रीजातीचें मुख उज्ज्वल केलें पाहिजे.

शेवटीं एवढेंच सांगावयाचें कीं, समाजानें स्त्रियांकडे पहाण्याचा आपला दृष्टिकोण आधुनिक युगाच्या रूपरंगास साजेल असा बदलला पाहिजे व स्त्रियांनींहि समाजानें आपणाकडून काय अपेक्षा कराव्या याबद्दल निश्चित मतें

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम.......................... दि: ........................
क्रमांक .......................... नोंद दि: ........................



बनवून, त्याप्रमाणें आपलें व्यक्तिमत्व घडविण्याचा प्रयत्न केला पाहिजे स्त्रियांकडे पहाण्याचे समाजाचे निरनिराळे दृष्टिकोण अभ्यासणें मनरंजक ठरेल. आपल्या भारतांतील मध्ययुगीन पौराणिक दृष्टिकोण म्हणजे "स्त्री हें नरकद्वार आहे; मोक्षाच्या मार्गांत अडसर घालणारी मायाविनी आहे; अनेक दुर्गुणांची मूस आहे; कनकाप्रमाणेंच कांतेचा मोह टाळल्याशिवाय पुरुषाला सद्गति नाहीं." दुसरा वरून गोजिरवाणा पण आंतून मानभावी असणारा दृष्टिकोण म्हणजे, "स्त्री ही देवता आहे. नवऱ्यासाठीं, मुलांसाठीं आपलें सर्वस्व होमून टाकणारी त्यागमूर्ति आहे. आपल्या चामड्याचे जोडे करून घातले तरी तिचे 'थोर उपकार' फिटणार नाहींत." तेव्हां 'फाल्गुनरावी' पद्धतीनें कांहींच न करणें, नुसतें गहिंवरून हात जोडणें, यांत सर्व कांहीं आलें. तिसरा काव्य-मय, अद्भुतरम्य दृष्टिकोण म्हणजे स्त्री हें विधात्यानें पुरुषापुढें टाकलेलें गोड गूढ, "गुलाबी कोडें" आहे. इंद्रधनुष्याच्या सप्तरंगांनीं न्हाऊन निघालेली, नवनीतासारखी मृदु, फुलपांखराच्या पंखांसारखी नाजूक, हळुवार स्त्री—तिला फुलासारखी जपली पाहिजे. तिच्या पायांखालीं आपल्या हृदयाच्या पायघड्या पसरल्या पाहिजेत. या पायघड्या तिनें कधीं अदयपणें तुडवल्या तरी त्या हृदयांतील कण न् कण तिच्या प्राप्तीसाठीं तडफडतच राहाणार, आक्रंदत राहा-णार; कारण त्या विश्वमोहिनीचें, स्त्रीचें, इंद्रजालच तसें विलक्षण भुरळ घालणारें, गुंतवून ठेवणारें आहे.

हे निरनिराळे दृष्टिकोण असणाऱ्या पुरुषांची अपेक्षा असते कीं त्या त्या दृष्टिकोणास अनुरूप अशी प्रतिक्रिया स्त्रियांकडून व्हावी व तदनुरूप त्यांचा दृष्टिकोण व वागणूक असावी. पुरुष त्यांना 'नरकद्वार' म्हणतो. तेव्हां त्यांनीं आपल्या त्या पायरीप्रमाणें पायदळीं पडून राहावें; वर डोळा उचलून बघूं सुद्धां नये. पतिदेवाची सेवा, मुलांच्या खस्ता खाणें एवढेंच त्यांचें जीवितकार्य. एवढीच त्यांची लायकी. पुरुषार्थाचीं द्वारें त्यांना बंद आहेत. त्यांना मोक्ष मिळवावयाचा असला तर तो सतीत्वाचें वाण पदरीं बांधूनच मिळेल. नवरा कसाहि असो, त्याचे पाय कधींहि न सोडणें हाच सतीचा धर्म. हा आचरीत असतांना दुःखकष्ट होतील; ते ती किती सोशीकपणें निमुटपणें काढते, हीच तिची कसोटी. या पातिव्रत्याच्या कसोटीला ती उतरली तर ती स्वर्गांत जाईल व आमच्या लहानपणीं 'यमपुरी' या कळसूत्री

बाहुल्यांच्या खेळांत दाखवीत असत त्याप्रमाणें अप्सरा तिला सोन्याच्या झोंपाळ्यावर बसवून झोके देतील!

पुरुषांनीं स्त्रियांनां ‘ देवता ’ म्हणून हात जोडले, म्हणजे त्यांची अपेक्षा कीं, या उच्च मानापलीकडे स्त्रियांनीं कांहीं व्यावहारिक अपेक्षा ठेऊं नये. प्रभावळींतील मूर्ति सिंहासनावरून खालीं उतरली, समोरच्या ताटांतला नैवेद्य खाऊं लागली, तर भक्तांची मोठी पंचाईत होणार! देवतेची श्रेष्ठ पदवी प्राप्त झाल्यावर मग समानशिक्षण, समानसंधि, समानदर्जा यांची मागणी करणें, अस्थानीं व असमंजसपणाचें नाहीं का? हे मानवी व्यवहार कितीतरी खालच्या पायरीवर! देवतेनें तिकडे दृष्टिक्षेपसुद्धां करूं नये. अर्थात् हें देवतापण संभाळतांनां लोखंडाचे चणे दांताखालीं आले तरी परलोकीं लाभणाऱ्या ब्रह्मपदाकडे लक्ष देऊन स्त्रीनें ते निमूटपणें चघळावे.

पुरुषांनीं “ हृदयदेवता ” म्हणून स्त्रीची काव्यमय पूजा बांधली म्हणजे भक्ताकडे सहास्यवदन बघत ती पूजा स्वीकारणें याखेरीज स्त्रीनें दुसरा उद्योग करूं नये. पुरुष फुलासारखें जपतो म्हणून स्त्रीनें जास्त जास्त कोमल, हळुवार बनण्याचा प्रयत्न करावा; बाहुलीसारखें सदा सुबक, रेखीव, शृंगारित असावें; पण बाहुलीसारखेंच परप्रेरित पुरुषाच्या, संरक्षणाबद्दल कृतज्ञ असावें. मनुमहाराजांनीं घातलेल्या दंडकाप्रमाणें लहानपणीं पित्याला, तरुणपणीं पतीला व वृद्धावस्थेंत मुलाला योगक्षेमासाठीं बिलगून राहावें. स्वतः हातपाय हालवण्याचा घातक विचार मनांतहि आणूं नये.

या तीन दृष्टिकोणांपैकीं एकहि दृष्टिकोण आधुनिक सुशिक्षित स्त्री स्वीकारणार नाहीं. या जुन्या क्षितिजांकडे पाठ फिरवून ती नव्या क्षितिजांकडे उत्कंठेनें संमुख झाली आहे. या नव्या क्षितिजांवर ज्ञानाचे, स्वायत्ततेचे, कर्तेपणाचे तारे उदय पावत आहेत. संक्रमणाच्या काळांत अडचणीच्या, संकटाच्या मेघांनीं हीं नवीन क्षितिजें कदाचित् काळवंडतील, उगवते तारे लुप्ततेज होतील पण हे मेघ क्षणाचे सोबती ठरतील. स्त्रीनें हताश, हतबल न होतां निष्ठेनें, सर्व शक्ति एकवटून निर्धारानें नव्या क्षितिजांकडे वाटचाल केल्यास, हीं क्षितिजें तेजानें उजळून उठतील व स्त्रीला ध्येय-ध्रुवाचें सतत दर्शन व अंतीं प्राप्ति होऊन तिच्या जीविताचें सार्थक होईल. स्त्रीला नरकद्वार म्हणणारांचा ती धिक्कार करते, कींव करते; तिला ही अवास्तव निंदा नको आहे, तसाच देवता

म्हणून होणारा लटका गौरवहि नको आहे; कवि-कल्पनांच्या नकली शिणगाराला ती कंटाळली आहे. वल्कलें नेसून जीवनांतल्या रामाची तिला साथ करावयाची आहे. तिला "मनुष्य" म्हणून जगावयाचें आहे; देवता म्हणून नाहीं, राक्षसी म्हणून नाहीं, कविकल्पना म्हणून नाहीं. 'माणूस' म्हणून तिला स्वतःसंबंधींचीं, कुटुंबासंबंधीचीं, समाजराष्ट्रासंबंधींचीं प्राप्तकर्तव्यें समर्थपणें बजवावयाचीं आहेत. खरखरीत जीवनप्रगतिपथावर तिला आपल्या देहाची सावली पाडावयाची आहे. देवतेप्रमाणें आपली सावली गमावून बसणें तिला रुचणार नाहीं. आधुनिक युगांत तिच्या जीवनाला प्राप्त झालेला नवा अर्थ तिला समजावून घ्यायचा आहे; समाजाला, तो समजावून घेण्यासाठीं ती प्रार्थित आहे. हा नवा आशय वास्तवसृष्टींत सिद्ध करण्यासाठीं ती उचित साधनें हुडकीत आहे; तीं उपलब्ध करून देण्यासाठीं समाजाचें साहाय्य ती मागत आहे. साधनांच्या अनेकतेनें सज्ज होऊन ती राष्ट्रदेवाची पूजा बांधणार आहे. आपली ही पूजा, पायदळीं न पाडतां रुजू करून घ्यावी म्हणून राष्ट्रशासकांना ती आळवीत आहे. स्त्रीजीवनाचीं नवीं क्षितिजें, नवयुगाच्या प्रकाशानें देदिप्यमान झालीं आहेत–अधिकाधिक होणार आहेत. त्या क्षितिजावर राष्ट्राचा ललाटलेख तेजस्वी अक्षरानें रेखाटण्यांत स्त्रीचा हातभार लागो हीच त्या जगन्नियंत्यापाशीं अखिल स्त्रीजातीची प्रार्थना !

* * *

REFBK-0014357

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. १४३५७

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम.................... दि. ..................
वर्ग .......................... नोंद दि ..................

## शुद्धिपत्र

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| १ | १६ | ज्यामुळें या स्त्रियांना | यामुळें ज्या स्त्रियांना |
| २६ | ७ | पायरीला कांहीं | पायरीला तें कांहीं |
| २६ | १६ | तशी | तशा |
| ३७ | १९ | धमात | धर्मांत |
| ३८ | ३ | (Arts Humanities) | (Arts, Humanities) |
| ४६ | १७ | समजूतदारणा | समजूतदारपणा |
| ५१ | १९ | म्हणतत. | म्हणतात. |
| ६१ | ११ | संवरत | संव्रत |
| ७१ | १५ | भ उाराहून | उभा राहून |
| ७९ | ४ | वेळीं | वेळां |
| ७९ | २६ | रुग्णोपरिचर्या | रुग्णपरिचर्या |
| ८१ | १८ | ( Juvenile | Juvenile |
| ८१ | १९ | Courts ) | Courts |
| ८१ | १९ | (Probation Officers) | Probation Officers |
| ८१ | २१ | गृहिणीहीन ‘ कांतारें ’ | ‘ गृहिणीहीन कांतारें ’ |
| ८४ | ११ | ( full-time ) | full-time |
| ८४ | ११ | Baby-sister | Baby-Sitter |
| ११५ | १३ | किंनहुना | किंबहुना |
| ११९ | १६ | (Statistical lies). | (Statistical lies)”. |
| १२३ | २५ | ‘ कामाचा | ‘ कामाचा ’ |
| १२४ | ८ | ‘ प्रगति ’ ? | ‘ प्रगति ’ ?” |
| १२८ | २९ | पडतत. | पडतात. |
| १३० | २३ | बुद्धिप्रमाण्य | बुद्धिप्रामाण्य |
| १३२ | १६ | विचारांनीं | विचारांतीं |
| १३२ | २० | शहाणा. | शहाणा. ” |